पेंडसे-कुल-वृत्तान्त

खंड दुसरा

ह. वि. पेंडसे

पेंडसे-कुल-वृत्तान्त

खंड दुसरा

संपादक

कृष्णाजी विनायक पेंडसे

सेवानिवृत्त अकाउंटन्ट, मिलिटरी अकाउंटस् डिपार्टमेंट

शक १८७०] मूल्य पांच रुपये [सन १९४९

प्रकाशक



क्रुष्णाजी विनायक पेंडसे
२२३ अ, सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक— वि. गं. केतकर
लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव, पुणें २.

प्रस्तावना

कुलवृत्तान्ताचें साफल्य कशांत आहे ?

चित्तपावन ब्राह्मण वर्गांत कुलवृत्तान्त लिहून प्रसिद्ध करण्याची प्रथा सध्यां जोरांत सुरू आहे. कुलाभिमान, ऐतिहासिक संशोधनाची आवड आणि एक प्रकारच्या संघटित कार्याची प्रेरणा या दृष्टीनें ही प्रथा अभिनंदनीय आहे. त्याच बरोबर तात्त्विक दृष्टया असा एक खिन्नतेचा विचार मनास चाटून जातो; आतां चित्तपावन ज्ञातीपुढें भविष्यकाळांत कोणतेंहि भव्य उच्च ध्येय उभें नाहीं म्हणून तर ही मंडळी जुन्या संशोधनांतून हातीं लागणाऱ्या पूर्वजांच्या भूतकालीन पराक्रमाकडे पाहूनच समाधान मानून घेण्याच्या वृत्तीनें भारलेली नसतील ना ? अशी शंका येण्याचें कारण हेंच कीं, ज्यावेळीं एखाद्या समाजांत अथवा राष्ट्रांत नित्य नवे नवे रोमांचकारी प्रसंग घडून येत असतात त्या वेळीं व्यक्तींची व समाजाची दृष्टि वर्तमान व भविष्यकाळांनीं आकर्षून घेतल्यामुळें भूतकाळाची चिकित्सा करीत बसण्याला मनाला फुरसत नसते व त्या चिकित्सेंत त्याचें मन रंगूनहि जात नाहीं. हें तत्त्व खरें मानल्यास आज मितीला चित्तपावन समाजापुढें चित्तवेधक असें भविष्यकालीन चित्र उभें नसल्यामुळेंच हा समाज भूतकालीन धडामोडींच्या संशोधनांत आपल्या मनाला विरंगुळा प्राप्त करून देण्याच्या नादीं लागला असावा, ही शंका साधार ठरेल. तें कसेंहि असो. चित्तपावनसमाज आपला आजपर्यंतचा इतिहास शोधण्याच्या कामांत लक्ष घालूं लागला यांत दोषास्पद असें कांहीं नसून तो उद्योग कांहींच न करीत काळ कंठण्यापेक्षां बरा एवढें तरी हमखास म्हणतां येईल. आपल्यांत 'बैठेसो बिगार अच्छा' अशी एक म्हण आहे. तिच्यांतला मतलब तरी हाच कीं, रिकामें बसून सैतानाला मनांत धुडगुस घा[illegible]ला अवसर देण्यापेक्षां फुकटाची बिगार का होईना, पण त्या कामांत गुंतून राहिलेलें बरें. त्याचप्रमाणें दुसराहि एक अनुभवसिद्ध सिद्धान्त आहे कीं, काम केल्यानें कांहीं हात झिजत नाहींत, तर उलट



ज. स. करंदीकर

बळकट होतात, आणि बौद्धिक श्रमानेंहि बुद्धि न थकतां उलट अधिक तीक्ष्ण होते. तेव्हां कुलवृत्तान्त—लेखनाच्या कार्यानें नुकसान न होतां अत्यल्प का होईना पण फायदाच होत असला पाहिजे.

तर्कटी आक्षेपांना उत्तर

स्वतःच्या मनालाच यांत कांहीं तरी रुखरुख वाटते आहे म्हणून हें ओढूनताणून आत्मसमर्थन चालू आहे असा याचा अर्थ नव्हे. आम्हा स्वतःस हें एक अवश्य कर्तव्यच वाटतें याविषयीं शंकाच नाहीं व तेवढ्याकरितांच चित्तपावन परिषदेंत असे कुलवृत्तान्त प्रसिद्ध केले जावेत म्हणून ठरावहि संमत करून घेण्यांत आला. पण हल्लींच्या कालांत साध्या गोष्टीवरहि आक्षेप घेण्यांत आणि भ्रान्तिष्टपणानें साप साप म्हणून भुई बडविण्यांत येत असल्यानें, आक्षेपकांनाहि निरुत्तर व्हावें लागेल अशी अगदीं खालच्या थराची भूमिका पत्करणेंच सोयिस्कर वाटून ' बैठेसो बेगार अच्छा ' या न्यायानेंच हें काम करण्यांत येत आहे असें म्हणून आक्षेपांची नांगी मोडून टाकण्यांत येत आहे.

कल्पित आक्षेपांना फाजील विनयाचें हें उत्तर देण्यांत येत आहे असें कोणी मानण्याचें कारण नाहीं. जर्मन महायुद्ध चालू असतांना देशांत कोठें कांहीं खुट्ट झालें कीं, ती जर्मनांची कारवाई असावी असा अंदेशा घेण्यांत येत असे, त्याप्रमाणें हल्लीं कोठें कांहीं बिनसलें कीं, ब्राह्मण समाजाच्या बोचक वरचढपणाचा हा परिणाम होय असा सिद्धान्त ठोकून दिला जातो. याच विचारसरणीला अनुसरून एका शहाण्या लेखकानें असें विधान ठोकून दिलें कीं, ब्राह्मण समाज इतरांना हलकट समजतो, याचा पुरावा पाहावयाचा असल्यास त्यांचें कुलवृत्तान्तांचें प्रकाशन पाहा. कुलवृत्तान्त प्रसिद्ध करणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या भोंवतीं दिवे ओवाळून घेऊन स्वतःच्या मोठेपणाचा टेंभा मिरवणेंच होय. असल्याच प्रकारांनीं ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यांतली दुही वाढत जाते !

असले तर्कटी आक्षेप दृष्टीसमोर आल्यावर स्वतःची भूमिका पारखून ती शुद्ध व निर्दोष असल्याबद्दल पुनः एकदा मनाची खात्री करून घेणें अगत्याचें होतें. त्याकरितां वरील ऊहापोह केला आणि आत्मनिरीक्षण केल्यावरून अशी खात्री पटली कीं, हें कार्य नुसतें निर्दोष आहे एवढेंच नव्हे तर या योगानें समाजालाहि आत्मनिरीक्षणाचें हितकर वळण लागेल. व्यक्तीनें वा संघानें वारंवार आपल्या जमाखर्चाचा ताळेबंद पाहण्यांत ज्याप्रमाणें दूरदर्शीपणा दिसतो त्याप्रमाणेंच एकेक पिढीच्या अंतरानें कुलवृत्तान्त पाहण्यांत दूरदृष्टीच व्यक्त होते. आपल्या कुलाचा उत्कर्ष होत आहे का अपकर्ष होत आहे हें समजून येण्याला हा आढावाच साधनीभूत होणार असून कुलाचा अपकर्ष होत असल्यास तो टाळण्याला कोणता उपाय योजावा याची चिकित्सा करण्याला असले कुलवृत्तान्त हाच मूलाधार होय.

प्रत्येक कुलाच्या उत्कर्षापकर्षाचा परिणाम एकंदर ब्राह्मणसमाजावर होत असल्यानें ब्राह्मणसमाजाच्या भवितव्याविषयीं विचार करण्यालाहि कुलवृत्तान्ताचाच आधार घ्यावा लागतो. यास्तव कुलवृत्तान्त माहितीपूर्ण व बिनचूक तयार करणें अगत्याचें आहे.

पेंडसे कुलवृत्तान्त प्रथम १९३८ सालींच तयार होऊन प्रसिद्ध झाला. सध्यांचा हा भाग पहिल्या भागाला पुरवणीसारखा जोडला जात आहे, पण त्याबरोबरच पूर्वीच्या भागांत जी माहिती अपूर्ण अथवा संशयास्पद होती ती आतां पूर्ण व संशयातीत स्वरूपांत यांत देण्यांत आली आहे. वास्तविक पाहतां २५ वर्षांनीं जुनी पिढी जाऊन नवी पिढी पुढें येत असल्यानें कोणत्याहि कुलवृत्तान्ताची दुसरी आवृत्ति अथवा पुरवणी २५ वर्षांचे आंत काढण्याचें कारण नाहीं. परंतु अद्यापि आपल्याकडे कुलाची माहिती देणें व ती तपशीलवार देणें याचें महत्त्वच पुरतें पटलेलें दिसत नाहीं; त्यामुळें पहिल्या खेपेस मिळालेली माहिती अपुरी राहिल्यानें दहा वर्षांतच पुरवणी छापण्याची पाळी आली आहे.

छोटया कुळांचे वृत्तान्त गटवारीनें प्रसिद्ध करावे

कुलवृत्तान्त छापून काढण्याची कल्पना योजून तें कार्य करून दाखविण्याचा पहिला मान कै. गोविंदराव आपटे यांना आहे. त्यानंतर या कामाची पद्धतशीर मांडणी करणें, माहिती मिळवून तिच्या प्रसिद्धीची तयारी करून देणें इत्यादि कामें करण्यांत श्री. विष्णु विनायक परांजपेशास्त्री आणि चिंतामणशास्त्री दातार यांनीं मोठीच प्रगति केली आहे. त्याचप्रमाणें पेंडसे कुलवृत्तान्ताचे लेखक श्री. कृ. वि. पेंडसे यांनी कुलवृत्तान्त-संघ स्थापन करून आणि पेशवे दप्तरांतील कागदपत्र पाहावयास मिळण्याची परवानगी मिळवून भावी कुलवृत्तान्तकारांची मोठी सोय करून ठेवली आहे. यामुळें दहावीस तरी नवे कुलवृत्तान्त गर्भावस्थेंत आहेत. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या कुलवृत्तान्तांत परांजपे, पेंडसे, लिमये, भावे, खरे, साठे, मराठे इत्यादि घराण्यांचे वृत्तान्त नमुनेदार झाले आहेत. कुलवृत्तान्तांत नमूद करावयाच्या विद्यमान कुलबंधूंची संख्या किमानपक्ष एक हजार असेल तर प्रकाशनाचें काम देणग्यांच्या व विक्रीच्या रकमेंतून भागतें. ज्या घराण्यांतील विद्यमान पुरुष व्यक्तींची संख्या शेंपांचशेंच्या आंतच असेल त्या घराण्यांचा वृत्तान्त कोणातरी धनाढ्य व्यक्तीनें अंगावर घेऊन तयार केला तरच तो होऊं शकतो. पण इच्छा तर अशी आहे कीं, कुल लहान असो वा मोठें असो प्रत्येक कुलाचा वृत्तान्त छापला जाऊन समाजाच्या इतिहासाचें हें एक अंग तरी पूर्णतया इतिहासलेखकास उपलब्ध व्हावें. ही इच्छा सफल होण्याकरितां लहान लहान घराण्यांनीं गोत्रवारीनें गट करून कुलवृत्तान्ताच्या ऐवजीं गोत्रवृत्तान्त प्रसिद्ध करण्याची प्रथा सुरू करावी, वृत्तान्ताच्या एका खंडांत निदान दोन हजार विद्यमान पुरुष व्यक्तींचा समावेश

होईल इतक्या बेतानें एकेका गोत्रांतील घराण्यांचे गट पाडून तशा गटवारीनें वृत्तान्त तयार करावे, तसा प्रयत्न केल्यास अखिल चित्तपावन घराण्यांचे वृत्तान्त तयार होतील.

कुलवृत्तान्तकारांस कांहीं सूचना

आतांपर्यंत जे कुलवृत्तान्त प्रसिद्ध झाले आहेत ते चाळून पाहून त्या संबंधांत दोन सूचना कराव्याशा वाटतात. ऐतिहासिक माहिती म्हणून जे कागदपत्र प्रसिद्ध केले गेले आहेत त्यांत इनाम जमिनींच्या अथवा हक्कदारीच्या तंट्याबाबतचे कागदपत्र पुष्कळच छापलेले आढळतात. ही भाऊबंदांची भांडणें आपल्या पांचवीलाच पुजलेलीं आहेत व त्या पासूनचा मनस्ताप आपण नित्यशः अनुभवीत असतोच. मग त्या भाऊबंदकीला कुलवृत्तान्तांत एवढी जागा देऊन आपणास लाभ काय? हा जागेचा व द्रव्याचा अपव्यय होय. भाऊबंदकीच्या तंट्यांचा तपशील देऊन शेवटीं निष्कर्ष हाच निघणार कीं या तंट्यांत झालेल्या खर्चाच्या पायीं शेवटीं तें इनाम अथवा ते हक्क हातचे घालविण्यांत आले! यास्तव या बाबतींत असें धोरण ठेवावें कीं, मूळ इनाम अगर हक्क अथवा पदवी ज्यानें संपादन केली त्याच्या कर्तृत्वाचा उल्लेख करून तेवढचा पुरताच सनदेचा भाग प्रसिद्ध करावा आणि त्यानंतर तंटाबखेडा निर्माण झाला असल्यास अमक्या पिढींत तंटाबखेडा झाला व शेवटीं इनाम राखलें असल्यास ज्यानें राखलें अथवा हातचें गमावलें असल्यास ज्यानें गमावलें त्या व्यक्तीचा तेवढा नामनिर्देश कालनिर्देशासह करावा. यापेक्षां अधिक तपशीलवार कागदपत्र छापण्याची जरुरी नाहीं. अशी काटकसर केल्यास छपाईच्या खर्चांत बरीच बचत होईल.

दुसरी सूचना अशी कीं, कुलवृत्तान्तांत स्त्रियांच्या बरोबरीच्या हक्काची जाणीव ठेवलेली दिसत नाहीं. पुरुष व्यक्तींचीच तेवढीं नांवें सूचींत दिलीं जातात, स्त्रिया ह्या पुरुषांच्या अर्धांगीच असल्यानें पुरुषाच्या नांवांत त्यांचाहि समावेश झालाच असें म्हणतां येईल, हें समर्थन कांहींसें खरें आहे. तथापि सर्वच ठिकाणीं पुरुष हाच कुटुंबाचा कर्ता असतो असें नाहीं. एकत्र कुटुंबाची पद्धति जारी होती त्या वेळीं स्त्रियांच्याकडे कर्तेपण येत नसे हें खरें. पण आतां एकत्र कुटुंबाची ती पद्धत मोडत चालली आहे आणि जेथें कुटुंबाचा कर्ता पुरुष गत होतो तेथें कुटुंबाचा भार स्त्रियांच्यावरच पडतो आणि अशा परिस्थितींत अनेक स्त्रियांनीं आपल्या कर्तबगारीनें मुलांचें संगोपन करून तें कुटुंब ऊर्जितावस्थेस आणलेलें असतें. अशा स्त्रियांचा उल्लेख त्या त्या कुटुंबांत पुरुषांच्या जागीं केला जावा हें उचित आहे. याशिवाय अलीकडे स्त्रियांच्या शिक्षणाची मजल वाढत चालली आहे आणि एकत्र कुटुंबांत देखील कित्येक स्त्रियांकडून कुटुंब पोषणाच्या कामीं साहाय्य होत असतें. अशा स्थळीं स्त्रियांच्या व्यवसायाचाहि नामनिर्देश केला जावा.

या खेरीज स्त्रियांच्या महिला समाज, भगिनी समाज इत्यादि संस्था निर्माण होत आहेत. सेवासदनासारख्या अथवा तत्स्वरूपाच्या अनेक संस्था स्त्रिया चालवीत आहेत. स्त्रिया लोकसभांच्या सभासदहि होत आहेत. स्त्रियांच्या कर्तृत्वाचीं अशीं अनेक स्थानें शोधून काढून त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती कुलवृत्तान्तांत योग्य स्थळीं देण्यांत यावी. मराठे घराण्याच्या कुलवृत्तान्तांत किती स्त्रिया पदवीधर आहेत त्याची संख्या दिली आहे. पण किती स्त्रिया आपल्या कुटुंबाचा निर्वाह स्वतः चालवितात त्यांची नोंद देणें महत्त्वाचें आहे. केवळ पदवीधर झालेल्या स्त्रियांच्या संख्येला तसें महत्त्व नाहीं.

स्थायिक कुटुंब किती ?

कोणीहि गृहस्थ आपल्या घरची आर्थिक स्थिति परक्यास सांगूं इच्छीत नाहीं. यामुळें कोणत्याहि कुटुंबाची सांपत्तिक स्थिति कशी आहे हें कळण्याला मार्ग नाहीं आणि तदभावी कुलाची अभिवृद्धि होत आहे का अवनति होत चालली आहे याविषयीं नक्की अंदाज करतां येत नाहीं. संदिग्धतेचा हा पडदा थोडा तरी दूर सारण्यासाठीं प्रत्येक कुटुंबाच्या माहितींत घर किंवा शेत अथवा दोन्ही अशा स्वरूपाची कांहीं स्थावर जिंदगी आहे कीं नाहीं एवढा प्रश्न विचारून माहिती मिळविण्यास व ती प्रसिद्ध करण्यास कांहीं हरकत नाहीं कारण कोणीहि गृहस्थ स्वतःच्या घरांत राहात आहे का भाड्याच्या घरांत राहात आहे आणि रानांत त्याचें शेत आहे का नाहीं हें शेजाऱ्या पाजाऱ्यासहि ठाऊक असतेंच, तेव्हां ही माहिती देण्यांत कांही गोप्य स्फोट होणार आहे असें नाहीं.

यावर कोणी अशी शंका उत्थापित करतील कीं, नुसतें गावांत घर आहे वा रानांत शेत आहे एवढें कळल्यानें कांही सांपत्तिक स्थिति अनुमानितां येत नाहीं; स्वतःचें घर असलेला मनुष्यहि दरिद्री असूं शकतो आणि दुसऱ्याच्या घरांत राहणारा भाडेकरीहि श्रीमंत असूं शकतो. ही शंका खरी असली तरी स्थावर जिनगीची माहिती नोंदण्याचा हेतु सांपत्तिक स्थिति अनुमानितां यावी एवढाच नसून कोणतेंहि कुटुंब आज जेथें वास्तव्य करीत आहे तेथेंच ते राहण्याचा संभव किती हें ताडण्याकरितां ही माहिती घ्यावयाची आहे. आजमितीला कोठलाहि कुलवृत्तान्त घेतला तरी त्यांत विद्यमान व्यक्ति देशांत कोठेंहि राहात असल्याचें, किंबहुना परदेशांतहि राहात असल्याचें आढळून येतें. परंतु कुलाचा हा विस्तार तात्कालिक स्वरूपाचा असतो. नोकरीच्या पाठीस लागून आफ्रिकेंत, अमेरिकेंत वा इंग्लंडात गेलेला इसम नोकरी संपतांच परत स्वदेशास स्वगृहीं येईल, पण जर त्यानें आपल्या वास्तव्याच्या ठिकाणीं स्वतःच्या मालकीचें घरदार, शेतीवाडी केली असेल तर तें कुटुंब त्याच ठिकाणीं स्थाईक होईल आणि अशा रीतीनें कुलाची ती शाखा त्या स्थानीं स्थिर होणार असें साहजिक अनुमान निघतें. अशा रीतीनें

कुटुंबाचा विस्तार होत जाण्यावरच कुटुंबाची अभिवृद्धि अवलंबून आहे. यास्तव कुलवृत्तान्तांत जितकी घराणीं नमूद असतील त्यांतील किती घराण्यांची स्थावर जिंदगी त्या त्या ठिकाणीं आहे हें कळणें जरूर आहे. नाहींतर पोटाच्या पाठीस लागून झालेला विस्तार हा टिकाऊ न ठरतां 'कूर्मोंगानीव सर्वशः' या न्यायानें कालान्तरानें संकुचित होत जातो. पेंडसे घराण्यांतील बहुसंख्य व्यक्ति मुंबई, पुणें, हीं शहरें आणि रत्नागिरी व कुलाबा हे जिल्हे यांत वास्तव्य करीत आहेत. परंतु मुंबईंत स्वतःचें घर एकाचेंहि नाहीं व पुण्यास ५५ कुटुंबांपैकीं अवघ्या ८ कुटुंबियांना स्वतःचें राहातें घर आहे; उलटपक्षीं रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांत राहाणारांना स्वतःचें घरदार असणारच, त्यामुळें त्या जिल्ह्यांतील पेंडसे कुटुंबीयांची वस्ती स्थायी राहणार आणि मुंबई व पुणें यांतील वस्ती वाढणें वा घटणें हें परिस्थितीवर अवलंबून राहणार हें उघड आहे.

आतांपर्यंत चित्तपावन कुलांचे जेवढे वृत्तान्त प्रसिद्ध झाले त्यावरून पाहतां फारतर जुन्यांत जुनीं नांवें १८ पिढ्या पर्यंतची सांपडूं शकतात एकेक पिढी २५-३० वर्षांची धरल्यास ४ शें ते ५ शें वर्षांपूर्वींपासूनची वंशावळ मिळालेली आढळते. त्या माहितीवरून प्रत्येक घराण्याचें मूळचें ठिकाण ठरविण्यांत आलें आहे. परंतु त्या ठिकाणीं तरी तो मूळ पुरुष कोठून आला ? तो कांहीं आकाशांतून अलगत त्या ठिकाणीं येऊन उतरला नाहीं ! त्याचेहि कोणी पूर्वज असणार आणि भाऊबंदहि असणारच. तेव्हां कोंकणस्थ हे देशांतून कोंकणांत गेले का कोंकणांतून देशांत आले, दक्षिणेंतून उत्तरेकडे पसरत चालले का उत्तरेकडून दक्षिणेकडे सरकत आले, परदेशांतून हिंदुस्थानांत आले का हिंदुस्थानांतून परदेशांत जाऊन परत आले इत्यादि ज्या कित्येक कल्पना मूलस्थानासंबंधानें अनेक ग्रंथांतून मांडलेल्या दिसतात त्यांस निश्चित प्रामाण्य असें कांहींच नसल्यामुळें सर्व शंकांचें निरसन होईल असें ठाम उत्तर कांहींच देतां येत नाहीं.

वास्तविक पाहतां कोंकणस्थ कोठून आले, कऱ्हाडे कोठून आले, देशस्थ कोठून आले, ब्राह्मण कोठून आले, क्षत्रिय कोठून आले, आर्य कोठून आले आणि अनार्य कोठून आले, असे प्रश्न न विचारतां मानवी प्राण्यांत आर्य आणि अनार्य, काळे, गोरे, पिवळे, आशियाटिक व युरोपिअन, इत्यादि भेद रूढ केव्हां झाले असा प्रश्न करून त्याचा शोध केला पाहिजे. पृथ्वीवर जेथें जेथें मनुष्यजात प्रथम निर्माण होणें शक्य झालें तेथें तेथें मनुष्य प्राणी जन्मला. तो कांहीं एकाच गांवांत जन्मला असला पाहिजे असें नाहीं, आणि जन्मतःच विशिष्ट नांव घेऊन जन्मला असेंहि नाहीं. भिन्नभिन्न स्थळीं मानवी प्राणी जन्मास येऊन त्यांची तेथल्या तेथें वाढ कितीहि झाली तरी त्या गटाला विशिष्ट नांव मिळत नाहीं. एका ठिकाणीं वाढत चाललेला जनसमूह जेव्हां कांहीं नैसर्गिक कारणामुळें स्थलांतर करूं लागतो आणि अशा स्थलांतरांत जेव्हां दोन गटांची गांठ पडते तेव्हां त्यांतल्या प्रत्येक गटाला कांहीं विशिष्ट

नांव दिलें जातें. उपमा अलंकारांत ज्याप्रमाणें उपमा आणि उपमेय यांत भिन्नत्व असून साधर्म्य असावें लागतें त्या प्रमाणेंच मानवी वंशांतील पोटभेदांचीं नांवें रूढ होतांना त्या पोटभेदांत कांहीं भिन्नत्व आणि कांहीं साधर्म्य असावें लागतें. हें सर्व सांगण्यांतला हेतु एवढाच कीं, देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे असे भेद पडण्यापूर्वी असे विशिष्ट नामकरण न झालेला जनसमूह एकत्र आला असला पाहिजे आणि त्या समूहाला आपल्यांत कांहीं भिन्नत्व आणि कांहीं साम्य आढळल्यावर पोटभेद करण्याची आवश्यकता भासल्यावरून पोटभेदांचीं नांवें रूढ झालीं असावींत. अर्थातच ज्या वेळीं एका गटाला देशस्थ म्हणूं लागले त्याच वेळीं दुसऱ्या गटाला कोंकणस्थ तिसऱ्या गटाला कऱ्हाडे म्हणूं लागले असावेत, परस्पराशीं कांहीं संबंध नसलेल्या अलग अलग ठिकाणीं देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे असे तीन गट अगदीं पृथक् पृथक् असे निर्माण झाले असें मानणें हें नैसर्गिक प्रवृत्तीला सोडून आहे. जों पर्यंत एकेक गट भिन्न ठिकाणीं राहतो तोपर्यंत त्या गटाला विशिष्ट नांवानें संबोधण्याची गरजच पडत नाहीं. ज्या वेळीं चातुर्वर्ण्यांत एका वर्णाला क्षत्रिय म्हणूं लागाल त्याच वेळीं दुसऱ्या वर्णाला ब्राह्मण असें नांव द्यावें लागेल. त्याचप्रमाणें ब्राह्मणांतील एका गटाला गौड म्हणण्याच्या वेळींच दुसऱ्या गटाला द्रविड ही संज्ञा प्राप्त होते आणि याच न्यायानें दक्षिणी ब्राह्मणांत जेव्हां एका वर्गाला कोंकणस्थ संज्ञा मिळाली तेव्हांच दुसऱ्याला देशस्थ ही संज्ञा मिळाली असली पाहिजे.

या विवेचनाचा निष्कर्ष हाच कीं, चित्तपावन कुलांतील कोणत्याहि घराण्याची मूळ पीठिका १८ पिढ्याहून अधिक पूर्वींची सांपडत नसल्यास पांच सहाशें वर्षांपूर्वीं या दोन गटांत वेगवेगळें नामकरण करण्याइतकी भिन्नता त्या वेळीं त्यांच्यांत दृष्टोत्पत्तीस आली नसावी असें अनुमान निघतें.

संकोच आणि विस्तार

कोंकणस्थांतील आडनांवाचेंहि मूळ शोधीत गेल्यास त्याचाहि असाच पत्ता लागत नाहीं. परंतु आजचीं ३६० आडनांवें रूढ होण्यापूर्वी तीं कमींत कमी ६० असावीं अशी समजूत आहे व ती खरी आहे. कारण सृष्टीचा नियमच असा आहे कीं, एकांतून दोन, दोहोंतून चार असे भेद विकासानें निर्माण होतात पण याच्या उलट कधींहि चार गटांचे दोन, दोनीचा एक असा संकोच होत नाहीं. वनस्पती वर्गांत जसा झाडांच्या जातींचा विकास होत चालला आहे, संकोच कधींच होत नाहीं, त्याचप्रमाणें कोकणस्थांतहि एका आडनावांतून वाढत वाढत साठ, साठांतून वाढत वाढत ३६० असा विकासाचा क्रम नैसर्गिक आहे. या विकासाला मात्र नैसर्गिक परिस्थिति प्रतिकूल असल्यास कोठें तरी खंड पडतो. अर्थातच ३६० आडनांवांची कालान्तरानें ५०० आडनांवें होतील कां उलट ३६० तलींच कांहीं आडनांवें लुप्त होतील, असा प्रश्न विचारल्यास त्याला निश्चित उत्तर देण्याला

अद्यापि अप्रसिद्ध असलेले आणखी किती तरी कुलवृत्तान्त प्रसिद्ध झाले पाहिजेत. तथापि आजवर प्रसिद्ध झालेल्या कुलवृत्तान्तावरून विकासाची परमावधि झाली असून कांहीं आडनांवाचा लोप होऊं लागला असल्याचीं चिन्हें दृग्गोचर होत आहेत. मराठे आडनांवांतील जाईल, रटाटे हे पोटभेद इतके छोटे आहेत कीं, एकांत अवघ्या २९ व दुसऱ्यांत अवघ्या १५ विद्यमान पुरुषव्यक्ति आहेत. नऊ दहा पिढ्यांत जर यांचा विस्तार एवढाच झाला तर यापुढें हें आडनांव वेगळें टिकूं शकेल असें वाटत नाहीं. याच्या उलट ज्या मराठे कुलांतील कांहीं घराण्यांत विद्यमान नऊ बंधु इतकी मोठी संख्या दिसून येते त्या घराण्याचा विस्तार चालू आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

हा विस्तार वा संकोच कशावर अवलंबून आहे यांचा शोध लावणें जरूर आहे. हा परिणाम शारीरिक आरोग्याचा, का वास्तव्यस्थानांतील हवापाण्याचा का सांपत्तिक स्थितीचा, का या सर्व कारणसमुच्चयाचा ? अर्थातच एकच कारण पूर्ण प्रभावी होऊं शकत नसल्यानें या तीनहि कारणांचा संकलित परिणाम यांत दिसून येत असावा. या तिहींतून सांपत्तिक स्थिति दृश्य असून ती सुधारणें वा बिघडविणें त्या त्या कुलांतील व्यक्तीवर अवलंबून आहे. वास्तव्याच्या परिणामाचा विचार करतांना कोणता प्रांत आणि कोणती राहणी विकासानुकूल आणि कोणती प्रतिकूल हें ठरविणें आधीं कठीण आणि तें ठरवितां आलें तरी एकाएकीं वास्तव्य-स्थान बदलणें हें प्रत्येकाला सुलभहि नसतें. शारीरिक प्रकृतीचा विचार तर सर्वांत अधिक गूढ आहे. डॉक्टर वा वैद्य कोणीहि अमुक घराण्यांतील स्त्री वा पुरुष वंश विस्ताराला अनुकूल वा प्रतिकूल असें निश्चितपणें सांगूं शकत नाहींत. त्यामुळें या बाबतींत यदृच्छेवरच अवलंबून राहावें लागणार. परंतु सांपत्तिक स्थिति आणि वास्तव्यस्थान या बाबतींत अनुकूल परिस्थिति प्राप्त करून घेणें पुष्कळांशानें आत्म-स्वाधीन असल्यानें त्या बाबतींत कोणाला काय करतां येईल व कोणीं काय करावें याचा विचार करणें जरूर आहे आणि असा विचार करण्याला साधन म्हणूनच तर कुलवृत्तान्त जमविण्याची व ते प्रसिद्ध करण्याची धडपड करावयाची.

कोणत्याहि कुलाची पूर्वपीठिका शोधीत गेल्यास अगदीं मूळचें निर्वाह साधन शेती हेंच दिसून येतें. त्यांतील पहिली पायरी नापीक जमीन कसून शेत लागवडीस आणणें ही असून त्यानंतर शेत जमीन इनाम मिळविणें ही दुसरी पायरी दिसते. इनामाची जमीन स्वत: धरून न कसण्याइतकी मोठी असल्यास जमीन लागणीनें देऊन त्या उत्पन्नावर निर्वाह करणें ही तिसरी पायरी त्यानंतरची होय. खोतीचा समावेश यांतच होतो. याशिवाय पूर्वकालीन ब्राह्मणाच्या निर्वाहाचें दुसरें साधन वैदिकी हें होय. निर्वाहाचीं वर निर्दिष्ट केलेलीं सर्व साधनें जेमतेम पोटापुरतें उत्पन्न देणारीं असल्यानें कुलाचा विस्तार न होता अनेक कुलें केवळ जीव धरून जगून राहिलीं. स्वराज्यांत पराक्रमाला आणि सांपत्तिक सुस्थिति येण्याला वाव

मिळाल्याबरोबर कुल विस्तार जोरानें होऊं लागला. त्या वेळची निर्वाहाचीं साधनें कोणतीं होतीं व त्या पिढींतल्या जिवन्त व्यक्तींची संख्या किती होती हें पाहतां आल्यास संपत्तीचा कुलविस्ताराशीं संबंध कसा पोंचतो तें कळून येईल.

कुलविस्तारांत क्रमवारी

या कुलवृत्तान्तांत नमूद असलेल्या एकंदर पुरुष व्यक्तींची संख्या २५९५ (प्रथमावृत्ति) आहे. त्यांतून विद्यमान पुरुष व्यक्ती ९९९ वजा केल्यास बाकी १५९६ राहते. विद्यमान व्यक्ती तीन पिढ्यांच्या असूं शकतात. कारण पेंडसे कुलांत जिवंत पणजोबा कोणीच नाहींत असें कुलवृत्तान्तांतच म्हटलें आहे. कुल-वृत्तान्तांत ज्यांची माहिती आली आहे अशा पिढ्यांची सरासरी संख्या ९ धरल्यास अविद्यमान पिढ्या ६ येतात. अविद्यमान ६ पिढ्यांतील व्यक्ती संख्या १५९६ आणि विद्यमान ३ पिढ्यांतील संख्या ९९९ यांचें प्रमाण पाहिल्यास अविद्यमान एका पिढीला २६६ व्यक्ती आणि विद्यमान एका पिढीला ३३३ व्यक्ती असें बसतें. यावरून शें दोनशें वर्षांपूर्वीं पेंडसे घराणीं हल्लींच्या इतकींच असून व्यक्तींची संख्या कमी होती व अलीकडील शंभर वर्षांत ती वाढली, यावरून सांपत्तिक स्थितींत सुधारणा आणि कोंकणांतील वास्तव्य सोडून परप्रान्तांतील राहणी यांचा परि-णाम कुलविस्तारांत झाला असावा असें दिसतें.

साठे घराण्यांतील मृतव्यक्तींची संख्या २४०० असून प्रत्येक पिढी अंदाजें ४०० व्यक्तींची होते. विद्यमान व्यक्ति १६०० असून पिढीची सरासरी ५३३ येते मराठे कुलांतील हेच आकडे अनुक्रमें ७२६० व २८६० असून जुन्या पिढीची सरासरी ७३३ व नव्या पिढीचो सरासरी ९५३ येते.

वरील आंकड्यांवरून पेंडसे कुलापेक्षां साठे कुलाचा विस्तार अधिक आणि साठ्यांपेक्षां मराठ्यांचा विस्तार अधिक असल्याचें तर दिसून येतेंच पण त्यांतहि नव्या पिढींतील वाढीचें प्रमाण अनुक्रमें शेंकडा १२५।१३३ आणि १३० असें पडतें. त्यांतहि पेंडसे यांचा क्रमांक तिसरा असून साठे हे मराठ्यांपेक्षां वर चढलेले दिसतात. ही सरासरी केवळ अनुमान धपक्याची आहे. कारण पूर्वीच्या कोणत्याही तीन पिढ्यांतील विद्यमान व्यक्तींची संख्या या कुलवृत्तान्तांतून नेमकी मोजून ठरविणें अशक्य आहे. तथापि सांपत्तिक सुस्थिति आणि स्थलांतर यांचा परिणाम कुलाच्या विस्ताराला अनुकूल झाल्यावाचून राहात नाहीं हें उघड आहे. वसतिस्थानांच्या संख्येंत मराठे ११५, पेंडसे १४५ आणि साठे २२० असा चढता क्रम लागतोसा दिसतो. परंतु वसतिस्थानांच्या नोंदींची पद्धति सगळ्यांची सारखीच असेल असें म्हणवत नाहीं. याकरितां तदनुषंगिक अनुमानहि संशयास्पदच मानावें लागतें.

कुलाच्या सांपत्तिक स्थितिविषयक अनुमान शिक्षण आणि व्यवसाय यां-वरून बांधता येतें. ब्राह्मणांचीं मुलें प्राथमिक शिक्षण तर सर्वास घेतातच; हायस्कूलचें

शिक्षण मात्र घरची सुस्थिती असल्याविना पूर्ण करतां येत नाहीं. उच्च शिक्षण तर श्रीमंतांनाच शक्य आहे. तेव्हां ज्या कुळांत प्राथमिक व हायस्कूल शिक्षण आणि हायस्कूल व उच्चशिक्षण यांत पुष्कळच घट दिसून येईल तेथें सांपत्तिक स्थितीची प्रतिकूलता अनुमानतां येते. पेंडसे कुलांत हे आंकडे अनुक्रमें ३६, २७ व ६ असे आहेत. थत्ते ३७, २५, ८, गोळे २८, ४२, ७, चितळे ३१, २९, ९, मराठे ३८, २९, ६, असे त्या त्या कुलांतील आंकडे आहेत. यावरून कुलाकुलांत कांहीं फारसा फरक दिसून येत नाहीं. सरसकट गुडघाभर पाणी असा प्रकार दिसतो. त्यांतल्या त्यांत गोळे कुटुंबातील हायस्कुलांतील विद्यार्थ्यांची शेंकडेवारी नजरेंत भरण्यासारखी आहे. कोंकणस्थांचा उच्चशिक्षणाकडे ओढा जास्त आहे असें म्हटलें जातें. परंतु वरील आंकडे पाहतां हायस्कुलांतील शिक्षण घेणाऱ्यांपैकीं निम्मे देखील विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे जात नाहींत असेंच दिसून येईल. आर्थिक दुःस्थिति हेंच याचें कारण असावें.

व्यवसायांची शेंकडेवारी पाहिल्यास त्यांत शेंकडा ५० टक्के नोकरींत गुंतलेले आढळतात. नोकरीच्या बाबतींत परांजपे आणि थत्ते यांची शेंकडेवारी ५४ व ५५ अशी अनुक्रमें असून ती इतर कोणत्याहि कुलापेक्षां अधिक आहे. शेती करणाऱ्या परांजप्यांचा क्रम अगदीं शेवटचा लागतो. अवघे शेंकडा ५ परांजपे शेती करतात तर त्याच्या उलट मोने घराण्यांत शेती करणाऱ्यांचें प्रमाण शेंकडा २९ आहे. पेंडसे कुलांतील हा आंकडा २२ म्हणजे बताचा आहे. स्वतंत्र धंद्यांत परांजपे हे शेंकडा ३५ या प्रमाणामुळें पहिला क्रमांक मिळवितात. तर जोशी हे शेंकडा १५ प्रमाणामुळें शेवटच्या क्रमांकावर बसतात. पेंडसे कुळांतील स्वतंत्र धंदेवाल्यांची शेंकडेवारी २२ आहे.

नोकरी व स्वतंत्र धंदे यांतील तारतम्य

कुलवृत्तान्तांत स्वतंत्र धंदे, उद्योग, व्यापार, इत्यादि भारदस्त शब्द वापरलेले आढळतात खरे, पण ते स्वतंत्र धंदे विशेष किफायतीचे आणि मानाचे असतातच असें नाहीं. हुंडीचा व्यवहार करणारा सावकार जसा स्वतंत्र धंदेवाला तसाच हिंग, जिरेंमिरें विकणारा अथवा शिवण्याचें एक यंत्र घेऊन शिलाईचें काम करणारा शिंपीहि स्वतंत्र धंदेवाला गणला जातो! यामुळें केवळ आंकडे आणि शेंकडेवारी एवढ्यावरून नोकरीवरील लक्ष कमी होऊन उद्योगधंद्याकडे लक्ष लागत चाललें असें निश्चितपणें ठरेलच असें नाहीं आणि आतां तर परकीय सरकार जाऊन स्वकीय सरकार आल्यानें नोकरी पेशा कमी लेखण्याचें कारण नाहीं. याचा अर्थ ब्राह्मणांनीं आपलें लक्ष स्वतंत्र धंद्याकडे वळवूं नये असा नव्हे, सध्याच्या परिस्थितींत नोकरी लाभणें दुर्घट होत जाणार असल्यामुळें नोकरीच्या पाठीस न लागतां स्वतंत्र धंदा शोधणें हें श्रेयस्कर होय. मात्र पूर्वी प्रमाणें नोकरी

ही परक्यांची सेवा म्हणून ज्या प्रमाणें कित्येकजण नोकरी पत्करावयाची नाहीं असा निश्चय करीत, तसा निश्चय करण्याचें यापुढें कारण नाहीं. स्वतंत्र धंद्यांत पडावयाचें झालें तरी त्यांत ग्राह्याग्राह्यतेचा विवेक करावाच लागणार. ब्राह्मणांतील पुष्कळसे तथाकथित स्वतंत्र धंदेवाले नोकरीवाल्यांपेक्षां अधिक परतंत्र असतात; याचें कारण धंद्यांत स्वतंत्रपणाचें उच्चस्थान मिळविणें भांडवलाच्या अभावीं ब्राह्मणांना दुष्कर आहे. स्वतंत्र धंदा करणाऱ्यांतले पुष्कळसे लोक भांडवलासाठींतरी परावलंबी असतात. नाहींतर मालासाठीं तरी घाऊक दुकानदारावर अवलंबून असतात. त्यांचा व्यापार म्हणज एक प्रकारची दलालीच असते, पण दलालांच्यापेक्षां यांना तोशीस मात्र ज्यास्त पडते. यास्तव ब्राह्मण धंदेवाल्यांनीं आपलें हें परावलंबन कसें नाहींसें होईल याचा यापुढें विचार केला पाहिजे. भवानी पेठ, नाना पेठ किंवा मंडई येथून दलालामार्फत माल खरेदी करून आपल्या आळींत एखादें छोटेसें दुकान मांडून बसणाऱ्यांची गणना 'व्यापारी' या सदरांत करतां कामा नये. स्वतःच्या कल्पनेनें कांहीं एखादी नवी चीज तयार करून ती खपविणारा अथवा मालाचें उत्पादन जेथें होतें अशा क्षेत्रांतून मालाची खरेदी करून तिची घाऊक विक्री करणारा तोच व्यापारी होय. अर्थातच यापुढें ब्राह्मणांनीं नोकरीकडील लक्ष वळवून ते व्यापाराकडे वळवावयाचें म्हटल्यास ज्यांत परावलंबन नसेल अशा व्यापाराचें क्षेत्र पाहून त्यांत पदार्पण केलें पाहिजे. नोकरीच करावयाची झाल्यास खासगी नोकरीपेक्षां सरकारी नोकरी अधिक बरी. खासगी नोकरींतहि दोन प्रकार असूं शकतात, एका नोकरींत नोकर अखेरपर्यंत नोकरच राहतो. असली नोकरी सर्वांत हीन दर्जाची. परंतु दुसरा एक नोकरीचा श्रेष्ठ दर्जाचा प्रकार असूं शकतो. त्या नोकरीला उमेदवारी असें म्हणतां येईल. अशी उमेदवारी करून धंद्यांतील खाचा खोचा व मर्म समजून घेऊन स्वतःचा धंदा उभारता यावा, अशा दृष्टीनें अशा प्रकारची नोकरी करणें हें दूषणास्पद नसून भूषणास्पद आहे; कारण त्यांत भावी उत्कर्षाचें बीज असतें. तेव्हां कोणताहि धंदा, व्यवसाय, अथवा नोकरी करावयास लागण्यापूर्वीं त्या धंद्याचें, व्यवसायाचें अगर नोकरीचें पर्यवसान काय तें हेरून त्या दृष्टीनें निवडानिवड करावी. या संबंधात खरे कुलवृत्तान्तांत उपयुक्त सूचना केल्या आहेत त्या लक्षांत घेण्यासारख्या आहेत.

भिक्षुकी व धर्मगुरुत्व

भिक्षुकी हा धंदा आतां नीट चालत नाहीं असें मानून तो धंदा सोडून देण्याकडे जी प्रवृत्ति वाढत आहे ती दुहेरी नुकसानकारक आहे. एकतर आपल्या हक्काचा एक व्यवसाय आपण होऊन सोडून देण्यांत स्वतःचें नुकसान स्वतः करून घेतो; आणि ज्यांना वेदोक्त संस्कार व इतर धर्मकृत्यें करण्याची हौस आहे त्यांना

धर्मकृत्यें चालविणारे वैदिक मिळत नाहींत म्हणून धार्मिक विधि करण्याचें टाळावें लागतें त्यामुळें अनिच्छेने धर्मकृत्यांचा लोप होतो. धार्मिक कृत्यांकडे गृहस्थांचें लक्ष कमी होण्याला एक कारण धार्मिक विधि यथाशास्त्र, व मनःपूर्वक करणारे वैदिक मिळत नाहींत हें आहे. अर्थातच भिक्षुकी चालत नाहीं ही तक्रार अंशतः खरी असली तरी ती पूर्णांशानें खरी नाहीं. पूर्वींच्या इतक्या प्रमाणांत ती फायदेशीर चालू शकणार नाहीं हें खरें. पण एकंदर गृहस्थ कुटुंबांच्या संख्येच्या मानानें शेकडा ३ तरी वैदिक घराणीं अवश्य असून त्यांचा निर्वाह चांगला चालेल. दुसरें एक तत्त्व हल्लींच्या काळांत लक्षांत घ्यावें कीं, कोणत्याहि एका धंद्याला दुसरा एक जोड धंदा पुष्टिपत्रासारखा जोडावा लागतो. नोकर पेशांतले लोकहि उत्पन्नांत भर टाकण्याकरितां एखादा जोडधंदा करीत असतात. त्याप्रमाणें भिक्षुकांनींहि भिक्षुकीच्या जोडीला एखादा शिवणकामाचा, धार्मिक पुस्तक–विक्रीचा, लेखनाचा असा जोडधंदा कां करूं नये? सरकारी वा इतर नोकरी मिळत नाहीं म्हणून मॅट्रिक झालेले गृहस्थ प्रौढ वयांत याज्ञिकी शिकून भिक्षुकी करूं लागलेले पाहण्यांत आहेत. तेव्हां वैदिक परंपरा चालू ठेवणारा एकेक वैदिक तरी तयार करावा. आणि त्या धंद्यांत गर्दी होऊं नये म्हणून इतरांना इतर व्यवसाय करण्याचें शिक्षण द्यावें. आणि जे कोणी आजमितीला भिक्षुकी करीत असतील त्यांनीं त्यावर निर्वाह चालत नाही म्हणून तो व्यवसाय अजीबात टाकण्यापेक्षां आपण दुसरा कोणता व्यवसाय फावल्या वेळांत करून कुटुंबाच्या उत्पन्नांत भर घालूं शकूं तें पाहून तसा एखादा आपल्याला साजेसा जोडधंदा करून वैदिकी चालू ठेवावी.

दुसरीहि एक सूचना करणें अगत्याचें वाटतें कीं, भिक्षुकी करणाऱ्यांनीं आपल्या प्रांतांत किंवा शहरांतच राहण्याचा आग्रह कां धरावा. जसा नोकरीवाला इसम कोठेंहि नोकरींसाठीं जातो त्याप्रमाणें भिक्षुकांनींहि जेथें कोठें हिंदूंची थोडी बहुत स्थाइक वस्ती असेल तेथें आपणहि जाण्याची तयारी ठेवावी. मराठ्यांच्या स्वराज्याच्या स्थापनेपासून भिक्षुकांना इनामें व रोख दक्षिणाहि बरी मिळूं लागली, पण तत्पूर्वीं शतकानुशतकें भिक्षुक वर्ग कोंकणांत तरी निदान स्वतः शेतीवर उदरनिर्वाह करून वेदाध्ययन करीत होता. त्याप्रमाणें आतांहि पर प्रांतांत नवीन वसाहतीच्या स्थळीं पूर्वींच्या प्रमाणेंच शती व भिक्षुकी असे दोन्ही धंदे त्यांनीं का चालवूं नयेत ?

अगदीं अलीकडील वदललेल्या वातावरणावरून कित्येकांची अशी समजूत झाली आहे कीं, या पुढें ब्राह्मणांना खेडेगांवांत राहाणें परवडणार नाहीं. परंतु ही समजूत चुकीची आहे. कोल्हापूर व सातारा या दोन भागांतील विशिष्ट चळवळीमुळें ब्राह्मण कुटुंबांवर संकटें ओढवलीं व त्यांत खेड्यांतील ब्राह्मणांचें अतोनात नुकसान झालें हें खरें. परंतु ब्राह्मणेतरांची ही मनोवृत्ति सार्वत्रिक नव्हे आणि सार्वकालिकहि नव्हे.

रोगांच्या साथी ज्या प्रमाणें आल्या म्हणजे कांहीं काळ राहतात व नंतर ओसरतात त्याप्रमाणें अत्याचारांच्या प्रवृत्तीचीहि एक मानसिक साथ आली होती. ती साथ कालान्तरानें ओसरत आहे. मात्र रोगाची साथ ओसरली तरी तिचा प्रादुर्भाव पुनश्च होऊं नये म्हणून आपण घरांची व गांवाची साफसफाई करतो त्याप्रमाणें ब्राह्मणेतरांच्या अत्याचाराची साथ पुनश्च प्रादुर्भूत होऊं नये म्हणून ब्राह्मणांनीं आपली राहणी व इतरांशीं होणारी वागणूक साफसूफ करून शुद्ध राखावी. ब्राह्मण वर्ग हा धडा नीट गिरवील तर त्यास शहरांतल्या वातावरणापेक्षां खेड्यांतील वातावरणच आपल्या संस्कृतीच्या व धर्माच्या पालनाला अधिक अनुकूल असतें असा अनुभव येईल.

हिंदी पुराणीक व कीर्तनकार

ब्राह्मणांतील कीर्तनकार आणि पुराणीक यांच्या व्यवसायाचा समावेश कोणत्या कोष्टकांत केला आहे तें कळत नाहीं. कोणत्याहि कुलवृत्तान्तांत त्यांचा स्वतं उल्लेख आढळत नाहीं. पण हा व्यवसाय इतका उपेक्षणीय नाहीं. भिक्षुकीच्या प्राप्तींत भर टाकण्यासाठीं इतर कोणताहि जोडधंदा शोधण्यापेक्षां कीर्तन अथवा प्रवचन करण्याचें शिक्षण घेऊन तो व्यवसाय करूं लागल्यास भिक्षुकीशीं त्याचा मेळ उत्तम बसेल आणि तो धंदा मानाचा असून निर्वाहापुरती प्राप्ति करून देण्याइतपत फायदेशीर आहे. त्यांतून आतां हिंदी ही राष्ट्रभाषा झाली असल्यानें हिंदींतून प्रवचन व कीर्तन करणाऱ्यास सगळा हिंदुस्थान देश मोकळा आहे. याशिवाय धार्मिक शिक्षणाचे आणि संस्कृत शिक्षणाचेहि वर्ग चालविणें लाभदायक होईल. भिक्षुकवर्ग संस्कृतचें अध्ययन मुळींच करीत नाहीं त्यामुळें त्याचें मंत्रपठण अर्थहीन बडबडी सारखें वाटतें व त्यामुळें लोकांची श्रद्धा उडते. त्याऐवजीं भिक्षुक जर संस्कृत जाणता असेल तर त्याची छाप समाजावर अधिक बसेल. मात्र त्याकरितां त्याला आधुनिक परिस्थितीचें व विचारप्रवाहांचेंहि ज्ञान असलें पाहिजे. सारांश, भिक्षुक जर चाणाक्ष आणि देशकाल वर्तमान जाणणारा असेल तर त्याला आपल्या व्यवसायाला तेजी आणतां येईल.

व्यवसायांच्या यादींत सर्वच कुलवृत्तान्तांतून डॉक्टर व वैद्य हे एकत्र गणले गेले आहेत. औषधोपचार करणें एवढा एकच हेतु उभयसामान्य असला तरी डॉक्टरी व वैद्यकी यांत साम्यापेक्षां विरोधच अधिक आहे. पाश्चात्य डॉक्टरीचें शिक्षण अतिशय महाग आणि अत्यंत परिश्रमाचें असें आहे आणि तो धंदा करण्याला भांडवल पुष्कळच लागतें. वैद्यकीचें शिक्षण त्या मानानें सुलभ आणि कमी खर्चाचें असून धंदा करण्याच्या सुरुवातीसच मोठें भांडवल त्यांत गुंतविलें पाहिजे असें नाहीं. शिवाय वैद्य आपला धंदा खेड्यापाड्यांत चालवूं शकतो; डॉक्टरांना खेड्यांत जाणें परवडत नाहीं. शिवाय वैद्यकीचा धंदा हा भिक्षुकीला

जोडधंदा म्हणून करतां येण्यासारखा आहे. फलज्योतिष व हस्तसामुद्रिक हेहि सद्यः फलदायी असे धंदे असून ब्राह्मणांना इतर कोणत्याहि व्यवसायाला पुष्टि देण्यासाठीं ते धंदे करतां येण्यासारखे आहेत. सारांश, चिकित्सक बुद्धीनें डोळे उघडे ठेवून आणि निराशेच्या स्वाधीन न होता ब्राह्मणवर्ग उत्साहानें व निरलसपणानें व्यवसायांत पडूं इच्छील तर त्याला इतके स्वतंत्र मार्ग मोकळे आहेत कीं, त्या मार्गांत त्याला इतर वर्गांशीं फारशी स्पर्धा करावी लागणार नाहीं आणि 'काय करावें सरकार आतां ब्राह्मणांना नोकऱ्या देत नाहीं' असें म्हणून हताश होऊन बसण्याचा प्रसंग येणार नाहीं. मात्र दिवसाच्या ६० घटिकांतून एक घटकाहि अध्ययन किंवा अध्यापन केल्यावाचून त्यानें व्यर्थ दवडतां कामा नये.

सांप्रतच्या समाज सुधारणेच्या काळांत किती तरी धंदे नित्य नवे निघत आहेत आणि ते डोळे दिपविण्याइतके किफायतशीरहि आहेत. असें असतां त्यांतील एकाहि धंद्याचा उल्लेख न करितां अल्पलाभाचे व जुने म्हणूनच हीन मानलेल्या व्यवसायांचाच उल्लेख कां केला व त्यावरच एवढा भर कां अशी पृच्छा कोणी करील तर त्यास उत्तर उघड आहे. ब्राह्मणांची विशिष्ट राहणी व संस्कृति यांना सांभाळूनच आपल्याला जगावयाचें आहे. जगण्यासाठीं व जगण्यापुरती द्रव्य-प्राप्ति झाली पाहिजे हें खरें असून द्रव्यप्राप्तीसाठीं जगावयाचें नाहीं. अर्थातच ब्राह्मण्याचा लोप न होतां, किंबहुना ब्राह्मण्याचें तेज वृद्धिंगत करून कसें जगावयाचें याचा विचार आपल्यापुढें आहे. ब्राह्मण्याचा लोप करून कितीहि भरभराटींत राहतां आलें तरी त्या राहणीला, प्राण निघून गेलेल्या कुडीइतकीच किंमत देतां येईल; यास्तव लुप्त होऊं लागलेल्या ब्राह्मण्यपोषक धंद्यांचा उल्लेख मुद्दाम केला आहे. बाकी नवे आधुनिक धंदे चित्ताकर्षक व वित्तदायी असल्यानें त्यांची शिफारस न करतांहि तिकडे प्रवृत्ति चालू आहेच.

धर्मशिक्षणाचें कार्य

आज आपण जे कुलवृत्तान्त प्रसिद्ध करीत आहों ते त्या त्या कुलाच्या अभिमानानेंच ना? प्रत्येक कुलाला आपल्या कुलाचें कांहीं वैशिष्टय आणि कांहीं परंपरा याचा अभिमान आहे म्हणूनच इतके परिश्रम आणि इतका द्रव्यवेंच चालला आहेना? पण समजा, आणखी वीस पंचवीस वर्षांनीं पेंडसे कुलांतल्या एकाहि व्यक्तीला आपण भृगु कुलांतले, जामदग्न्य गोत्री, ऋग्वेदांतील शाकल शाखेचे व आश्वलायन सूत्राचे आणि आपले कुलदैवत अमुक या पैकीं कशाचीच आठवण नाहींशी झाली तर त्या व्यक्तींचा समावेश कोणत्या कुलवृत्तान्तांत करावयाचा? आजचीं पेंडसे कुलांतील नांवें खरे कुलवृत्तान्तांत, खरे कुलवृत्तान्तांतील नांवें परांजपे कुलवृत्तान्तांत, परांजप्याचीं नांवें लिमये वृत्तान्तांत आणि लिमये गोळे कुलांत समाविष्ट केले तरी ते कोणाला उमगणार? आणि अशा परिस्थितींत कुलवृत्तान्त प्रसिद्ध करण्याचा उपद्व्याप तरी कशा करितां करावयाचा? मनुष्य-

प्राण्याला कांहीं आत्मीयता आहे, स्वकुलाभिमान आहे, त्या कुलाच्या आचार-विचारांविषयी आदर आहे, पूर्वजाविषयीं प्रेम आहे आणि आपलें कुल आपलेपणा न सोडतां सतत टिकावें अशी उत्कट इच्छाहि मनुष्यमात्राच्या ठिकाणीं असते. याकरितां स्वधर्म, स्वकुलाचार, देवऋण, पितृऋण, समाजऋण जाणण्याविषयींची नैसर्गिक तत्परता त्याच्या अंगीं असते. या सर्व भावनांचें पोषण आणि संवर्धन करण्याकरितां प्रत्येक कुलानें कुलोपाध्याय टिकविले पाहिजेत व त्याकरितां त्यांचा योगक्षेम चालविला पाहिजे. म्हणून प्रत्येक कुलानें आपल्यांतील उपाध्याय वर्गाच्या योगक्षेमाची जबाबदारी स्वतःवर घेतली पाहिजे आणि त्या उपाध्याय वर्गानें कुलाचे धार्मिक आचारविचार, कुलधर्म, संस्कृति यांचें शिक्षण प्रत्येक पिढीला देत राहिलें पाहिजे. नवीन राजवटींत आणि सध्यांच्या समाजकारणाच्या गोंधळांत हें शिक्षणाचें कार्य सरकाराकडून होऊं शकणार नाहीं. यास्तव धर्म शिक्षणाचें कार्य प्रत्येक कुलानें आपल्यापुरतें आपणच सांभाळलें पाहिजे.

आपापल्या कुलापुरताच वरील विचार मर्यादित आहे असें नसून ब्राह्मण वर्गातील सर्व कुलांनाच तो लागू आहे. वर्गविहीन समाज स्थापण्याचा आपला विचार राजकीय पुढाऱ्यांनीं कितीहि अट्टाहासानें प्रतिपादिला तरी समाजांत या ना त्या रूपानें चातुर्वर्ण्य हें राहणारच आणि तें जर टिकणारच तर त्यांतील ब्राह्मण्य-रक्षणाचें आणि इतर वर्णांचें गुरुत्व करून त्यांना धर्मशिक्षण देण्याचें कार्य ब्राह्मण वर्गालाच करावें लागणार. तेव्हां आपल्यावर आलेली ही नैसर्गिक जबाबदारी, आपला हा सहजधर्म, न डावलतां, आपण स्वकर्तव्य निष्ठापूर्वक पाळण्याचा व तें कर्तव्य पार पाडण्याची पात्रता अंगीं राखण्याकरितां स्वतः धर्म व संस्कृति यांचें ज्ञान संपादन करून तें इतर वर्णांत संक्रमित करण्याचा प्रयत्न ब्राह्मणवर्गानें केला पाहिजे. आजच्या राजकीय पुढाऱ्यांची दिशाभूल कशी होत आहे याचें प्रत्यंतर पट-ण्याला फारसें खोलांत शिरावयाला नको. आपल्या देशांतील सार्वजनिक व्यवहारांत सत्यनिष्ठा आणि नीतिमत्ता राहिली नाहीं म्हणून जो तो पुढारी रडगाणें गात आहे. परंतु धर्मनिष्ठेवांचून सत्यनिष्ठा व नीतिमत्ता अंगांत कशी बिंबणार ? धर्माचें नांव वावडें मानून धर्माचें फल अशी जी नीतिमूल्यें त्यांची मात्र हे पुढारी अपेक्षा करीत आहेत.

'पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवाः ।
पापस्येच्छन्ति न फलं पापं कुर्वन्ति नित्यशः'

अशी या पुढाऱ्यांची अनुकंपनीय स्थिति झाली आहे. धर्म नको पण धर्माचें फल मात्र पाहिजे. आंब्याचें झाड लावण्याची खटपट करावयास नको आंबा मात्र चाखावयास पाहिजे, असली विपरीत वृत्ति दीर्घ काल टिकूं शकणार नाहीं. आणि समाजांतील बजबजपुरी दूर करण्याकरितां पुनश्च धर्माची कांस धरावीच

लागेल. तेव्हां ही भावी स्थिति अगाऊ जाणून ज्यांच्या अंगीं सुदैवानें हें धर्मकार्य व समाजकार्य करण्याची पात्रता आहे त्यांनी ती गाफिलपणानें हातची गमावून पश्चात्तापांत पडण्याची पाळी ओढवून घेऊं नये एवढ्या करितांच ही दीर्घसूचना देण्यांत येत आहे.

आपद्ग्रस्त साहाय्यक कुलसंघ

कुलवृत्तान्तापासून त्या त्या कुलांतील पुढारी वर्गानें हा बोध घेतला तरच असले कुलवृत्तान्त प्रसिद्ध केल्याचें सार्थक होणार आहे. याशिवाय दुसरेंहि एक व्यावहारिक कार्य कुलांतील पुढाऱ्यांनीं कालापहरण न करितां बजावलें पाहिजे. कुलवृत्तान्तांत कुलांतील प्रत्येक कुटुंबाची नोंद आहे व त्यामुळें त्या प्रत्येक कुटुंबाशीं सर्वांचें आपलेपणाचें नातें जोडलें गेलें आहे. यास्तव कुटुंबांतला कर्ता मनुष्य ज्याप्रमाणें आपल्या कुटुंबांतील बाल, वृद्ध, अपंग व्यक्तींची काळजी वाहतो त्याप्रमाणें कुलांतील सुस्थितींतील कुटुंबीयांनीं दुःस्थितींतील कुटुंबांचा समाचार घेतला पाहिजे. आपण जर पेंडसे कुलांतील आजच्या विद्यमान दोन हजार व्यक्ति हें एक कुल असें अभिमानानें म्हणतों, तर आपल्या कुलांतील कोणत्याहि व्यक्तीनें अडचणीच्या प्रसंगीं आपल्या कुलाबाहेर परक्यापुढें याचना करतां कामा नये. स्वकीयांची काळजी स्वकीयांनींच वाहिली पाहिजे. या संबंधांत पारसी लोकांचें उदाहरण कित्ता घेण्याजोगें आहे. कोणीहि आपद्ग्रस्त पारशी अन्य समाजापुढें हात पसरीत नाहीं व तोंड वेंगाडीत नाहीं. पारसी समाजांतच त्याच्या निर्वाहाची तरतूद केली जाते. त्यास अनुसरून ज्या ज्या कुलांचे वृत्तान्त प्रसिद्ध झाले त्यांनीं आपल्या कुलांतील सर्वांचा यथायोग्य परामर्श घेण्याकरितां एक संस्था निर्माण केली पाहिजे. कुलवृत्तान्त संघ निर्माण झाला आहे व तो कुलवृत्तान्त लेखनाच्या कामीं मार्गदर्शन करतो. परंतु कुलवृत्तान्त प्रसिद्ध करूनच काम भागत नाहीं. त्याबरोबरच कुलांतील सर्व व्यक्तींच्या सुखदुःखाची जबाबदारी कुलांतील पुढाऱ्यावर येऊन पडते. ती पार पाडण्याकरितां कुलांतील अनाथांचा समाचार घेऊन त्यास मार्गदर्शन करणारा एकेक कुलाचा एक मध्यवर्ती संघ स्थापन झाला पाहिजे. आपटे व भावे या कुलांचे असे संघ स्थापन झाले आहेत. त्यांतून भावेसंघानें तर एक पाऊल पुढें टाकून दहा हजार रुपयांचा निधि जमवून त्याच्या व्याजांतून भावेकुलांतील विद्यार्थ्यांना शिक्षणार्थ साहाय्य देण्याचा स्तुत्य उपक्रम केला आहे. आतांपर्यंत जेवढ्या कुलांचे वृत्तान्त प्रसिद्ध झाले त्या त्या कुलांतील पुढाऱ्यांनीं याचें अनुकरण करावें आणि जे कुलवृत्तान्त यापुढें प्रसिद्ध होऊं घातले आहेत त्यांतील पुढाऱ्यांनीं कुलवृत्तान्ताबरोबरच असा संघ स्थापन केल्याचें जाहीर करावें आणि आपल्या कुलांतील आपद्ग्रस्तांना साहाय्य करण्याचें केंद्र प्रस्थापित करावें.

कर्तृत्वकारिणी स्त्रियांची अधिक माहिती द्या

याशिवाय कुलवृत्तान्तांत द्यावयाच्या माहिती संबंधानें कांहीं सूचना करून ही लांबलेली प्रस्तावना संपवूं. कुलवृत्तान्तांत पुरुषांच्या प्रमाणेंच स्त्रियांच्याहि कर्तृत्वाची व उल्लेखनीय गुणांची माहिती द्यावी. शिक्षणासंबंधीं कोष्टकें देतांना जशी मुलांची शेंकडेवारी दिली आहे तशी मुलींचीहि शेंकडेवारी द्यावी. पदवीधर स्त्रिया व स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया यांचीं नांवें देऊन त्यांच्या सामाजिक कार्याचाहि तपशील द्यावा. त्याचप्रमाणें विद्यमान अविवाहित मुलगे व मुली यांची कुटुंबवार व गांववार माहिती द्यावी म्हणजे विवाहमंडळांचें कार्य सुलभ होईल. अविवाहित मुलगे २० ते ३० वयाच्या आंतील आणि अविवाहित मुली १५ ते २५ वयाच्या दरम्यानच्या असतील तेवढीं नांवें, त्यांचें शिक्षण व वसतिस्थान यांचा निर्देश करून वेगळ्या प्रकरणांत द्यावी. कौटुंबिक माहिती देतांना जन्म व मृत्यु यांचीं वर्षें कांहीं ठिकाणीं शकांत व कांहीं ठिकाणीं सनांत दिलीं आहेत. कांहीं ठिकाणीं जन्माची नोंद शकांत करून विवाहाची नोंद इसवी सनांत केली आहे; अशी सरमिसळ घोटाळा उत्पन्न करते. यास्तव या संबंधांत एकच पद्धत सर्वत्र ठेवावी व या पुढें सर्व नोंदी शकांत असणेंच इष्ट होय.

येथून पुढें शिरगणतींत कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे इत्यादि पोटजातींचा उल्लेख होणार नाहींच; या करितां प्रत्येक पोटजातीनें आपली शिरगणति आपणच केली पाहिजे. या दृष्टीनें यापुढें कुलवृत्तान्तच खानेसुमारीच्या पुस्तकांची जागा पटकावणार. ही भावी स्थिति ओळखून ज्यांनीं आजवर हें कार्य हातीं घेतलें नाहीं त्यांनींहि तें कार्य हातीं घेऊन कुलवृत्तान्त प्रसिद्ध करावे. ज्या घराण्यांतील विद्यमान कर्त्या पुरुषांची संख्या ५०० हून कमी असेल त्यांनीं समान गोत्रांतील इतर उपनांवांपैकीं ज्या उपनांवाच्या व्यक्तींची भर आपल्या कुलवृत्तान्तांत घालून ग्रंथाची पृष्ठसंख्या छपाईस सोयीची होईल अशा उपनांवांच्या माहितींचा समावेश करून वृत्तान्त तयार करावा. साधारणतः कोणताहि वृत्तान्त ५०० पानांहून लहान किंवा हजार पानांपेक्षां मोठा होऊं नये. या बेतानें एकेका गोत्रांतील उपनांवें शोधून पाहून त्यांचे गट करून शक्य तोंवर कोणतेंहि आडनांव सुटणार नाहीं अशी तजवीज करावी.

जागृतीनंतरचें कार्य

अशा प्रकारें कुलवृत्तान्त तयार झाले म्हणजे आपलें कर्तव्य संपलें असें मात्र मानूं नये. कुलवृत्तान्ताचें कार्य हें ध्येय नसून आपलें ध्येय गांठण्याचें तें एक साधन आहे. स्वकुलाची उन्नति व तद्द्वारा ब्राह्मण समाजाची आणि परंपरेनें देशाची उन्नति हें आपलें ध्येय आहे. तें ध्येय गांठण्यासाठीं मार्गदर्शक नकाशा किंवा

आराखडा एवढीच कुलवृत्तान्ताची योग्यता होय. घरबांधणीसाठीं नकाशा तयार केला म्हणजे जसें कार्य संपत नाहीं याप्रमाणें कुलवृत्तान्त प्रसिद्ध केल्यानें कार्य संपत नाहीं. हा नुसता कार्याचा प्रारंभ आहे. कुलपुरुषाची झोंप संपून तो जागृत झाल्याचें तें चिन्ह आहे. जागृतीनंतरचें कार्य या पुढेंच आहे. त्यासाठीं कुल संघ स्थापून त्या संघामार्फत कुलांतील प्रत्येक कुटुंबांतील अडीअडचणींचा विचार केला जावा. आपल्या कुलांतील कोण कोठें आहे. व त्याचें कार्य काय व कसें चाललें आहे यावर कुल–संघाची नजर असावी. त्या योगानें व्यक्तीला आपल्या वरच्या जबाबदारीची जाणीव होते आणि आपल्या दुष्कृत्यानें आपल्या कुल बांधवांस कमीपणा न येऊं देण्याची तो दक्षता घेऊं लागतो. याचप्रमाणें संकटप्रसंगीं आपल्या कुलबांधवांचा आपल्यास आधार मिळेल अशी आशा वाटून त्या आधारावर भरंवसा ठेवून तो आपलें धैर्य खचूं देत नाहीं. अशा रीतीनें

'एकमेका करूं साहाय्य । अवघे धरूं सुपंथ '

हें ध्येय गांठणें हीच कुलवृत्तान्ताच्या खटाटोपाची सार्थकता होय. अखेरीस

। भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षिभिर्यजत्राः ।।
।। स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ।।

अशी प्रार्थना करून हें विवेचन संपवितों.


५६८ नारायण पेठ,
गायकवाड वाडा, पुणें.
फाल्गुन शुद्ध ९ शके १८७०

जनार्दन सखाराम करंदीकर

श्रीआदित्यनाथ, नेवरें



श्रीजोगेश्वरी



जोगाईचें आंबें (जि. बीड)

श्रीमहालक्ष्मी



केळशी, ता. दापोली, जि. रत्नागिरी

निवेदन

कुलवृत्तान्ताचा दुसरा खंड काढण्याचें प्रयोजन हें पहिल्या प्रकरणांत सांगितलें आहे. शक १८६९च्या देवदिवाळीस सर्व कुलबंधूंकडे विनंतीपत्र पाठवून दुसरा खंड तयार करीत असल्याचें कळविलें आणि पुढें लिहिल्याप्रमाणें माहिती पाठविण्यास व शक्य असल्यास आम्हांस एकवार भेटण्यास विनंती केली. तसेंच या खंडासंबंधीं कांही सूचना असल्यास त्या कळवाव्या असेंही लिहिलें.

(१) पहिल्या खंडांत आढळलेले दोष व त्यांचें निराकरण, शुद्धि इत्यादि.

(२) पूर्वीं न आलेली अशी कांहीं माहिती आपणांजवळ असल्यास ती.

(३) पुस्तक प्रकाशनानंतर आजपर्यंत झालेल्या कौटुंबिक घडामोडी.

(अ) जन्म—विवाह इत्यादि. स्त्रियांचीं माहेरचीं व सासरचीं नांवें व पित्याचें नांव इत्यादि सविस्तर माहिती द्यावी.

(आ) शिक्षण--पदवी—पारितोषिक इत्यादि.

(इ) उद्योगधंदा—पूर्वीं असलेल्यांत प्रगति व नवीन असल्यास त्याचें वर्णन.

(उ) महायुद्धांत लश्करांत प्रवेश झालेल्यांची माहिती, विशेष कामगिरी नि छायाचित्रें.

(ए) वरील बाबींशिवाय पुस्तकांत यावी अशी माहिती; जुना पत्रव्यवहार, सनदा, इत्यादि.

प्रत्येक ज्ञात पेंडसे व्यक्तीकडे छापील विनंतिपत्र पाठविलें; परंतु वास्तव्य बदलल्यामुळें कोणास तें न मिळाल्यास कळावें म्हणून केसरी, काळ, त्रिकाळ, ज्ञानप्रकाश, सकाळ, कुलाबा समाचार, लोकमान्य, हितवाद इत्यादि वर्तमानपत्रांतून दुसरा खंड काढीत असल्याबद्दल प्रसिद्ध केलें. या विनंतिपत्रास अनुसरून कांहींकडून माहिती आली. राहिलेल्यांना स्मरणपत्रें व नंतर अवश्य तेथें जोडकार्डें पाठविलीं. अशा रीतीनें बऱ्याच जणांकडून माहिती आली. शक्य तेथें स्वतः माहिती मिळविली. पुस्तक छपाईस सुरुवात झाल्यावर भाद्रपद शु. १ शक १८७०ला पुनः सर्वांकडे पत्र पाठवून माहिती, छायाचित्रें इत्यादि पाठविण्याबद्दल विनंती केली. याचाहि माहिती मिळण्याचे कामीं बराच उपयोग झाला. दहा वर्षांपूर्वी वृत्तान्त प्रसिद्ध झाल्या वेळेपासून पेंडसे व्यक्तीसंबंधीं जी जी माहिती आम्हांस नियत कालिकांत, इतर कुलवृत्तान्तांत व गांठीभेटींत कळली ती आम्हीं संग्रहीत करून

ठेविली होती तिचाहि समावेश या पुस्तकांत केला आहे. या खंडात नवीन २३५ जिवंत व्यक्तींचा समावेश झाला आहे. प्रथम खंडांत दिलेल्या व्यक्तीं पैकीं १०० व्यक्तींच्या मृत्यूची नोंदही याच्यांत आली आहे. म्हणजे जिवंत पुरुष व्यक्तींची संख्या १३५ नीं वाढली असून एकूण आज जिवंत व्यक्ती १०३४ आहेत. एकंदरींत पाहतां बरीचशी म्हणजे शेंकडा ८०% टक्के माहिती मिळाली असून या खंडांत अपुरेपणा थोडकाच राहिला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. बाविसावें घराणें सोमेश्वर–आवास यामधील मंडळींची माहिती पहिल्या खंडाचे वेळीं योग्य प्रमाणांत मिळाली नव्हती. या वेळींही त्यांचे सहकार्य लाभलें नाहीं व त्यामुळें त्या घराण्याची माहिती या खंडांतहि आली नाहीं हें नमूद करणें अवश्य वाटतें. याचे उलट बारावें घराणें मुर्डी यांतील एकही अपवाद न राहातां सर्व व्यक्तींची माहिती मिळाली आहे.

दुसरा खंड शक १८७०चे देवदिवाळीस प्रसिद्ध करावा असा आमचा विचार होता. परंतु अपरिहार्य अडचणींमुळें तसें होऊं शकलें नाहीं. दुसरा खंड काढीत असल्याचें विनंतिपत्र गेल्यावर थोडक्याच अवधींत महात्मा गांधी यांचा अंत झाला व त्यानंतर महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं जाळपोळ इत्यादि अत्याचार झाले व देशांतील दैनंदिन जीवनास बराच व्यत्यय आला. पहिला खंड पुणें येथील अ. वि. गृहाच्या लोकसंग्रह छापखान्यांत छापिला होता तेथेंच दुसरा खंड छापावा असें आम्हीं योजिलें होतें. हा छापखाना वर उल्लेखिलेल्या प्रक्षोभांत जाळण्यांत आला छापखान्याची पुनः जुळवाजुळव होण्यास बराच काल लागला; त्यामुळें छपाईचें काम वेळेवर सुरू करतां आलें नाहीं. व संकल्पित तिथीस पुस्तक बाहेर पडू शकलें नाहीं.

या पुस्तकांत माहिती देण्याची पद्धति पहिल्या खंडाप्रमाणेंच ठेविली आहे. वंशावळी व व्यक्तींची माहिती निरनिराळ्या प्रकरणांत न देतां एकत्र सहाव्या प्रकरणांत दिली आहे. हें पुस्तक पहिल्या पुस्तकाची सुधारून वाढविलेली आवृत्ति नाहीं. पहिल्या खंडांत आलेली माहिती येथें पुनः उद्धृत केली नाहीं. फक्त पहिला खंड प्रसिद्ध झाल्यानंतर कळलेली जुनी माहिती व त्यानंतरची नवीन माहिती दिली आहे. वंशावळींत झालेली वाढ किंवा दुरुस्ती दर्शविण्यापुरता अवश्य तेवढा भाग व्यक्तीच्या माहितीजवळ दिला आहे. सर्व वंशावळ पुनः मांडून दाखविली नाहीं. म्हणून पहिल्या खंडांतील माहितीच्या अनुसंधानानें ह्या खंडांतील माहिती वाचणें अवश्य आहे. त्यासाठीं पहिल्या खंडांतील पृष्ठांक योग्य ठिकाणीं दिले आहेत त्यावरून पहिल्या खंडांत माहिती कोठें आहे हें चटकन ध्यानीं येईल. पुस्तकाचे शेवटीं दिलेल्या व्यक्तिसूचींत नांवापुढें दिलेल्या दोन आंकड्यापैकीं पहिला आंकडा या म्हणजे दुसऱ्या खंडांतील पृष्ठाचा आहे व दुसरा आंकडा पहिल्या खंडांतील पृष्ठाचा आहे.

मॅट्रिक व मॅट्रिकच्या पुढें शिक्षण घेतलेल्या किंवा गृहकृत्याव्यतिरिक्त इतर बाबतींत लक्ष घालणाऱ्या स्त्रियांचा समावेश या सूचींत नव्यानें केला आहे. व्यक्तिसूचीशिवाय ऐतिहासिक कागदांत आलेल्या व्यक्तींची सूचि स्वतंत्र दिली आहे. तसेंच प्रत्येक गांवांत राहणाऱ्या कर्त्या पुरुषांची नांवनिशी 'निवास–ग्राम' या सूचींत दिली आहे. पहिल्या खंडांत एकतीस घराण्यांची माहिती आली आहे. त्यानंतर मिळालेल्या माहितीवरून पंचविसावे घराण्याचा समावेश सव्विसाव्यांत व अठाविसाव्याचा अंतर्भाव तिसाव्या घराण्यांत झाला आहे. अशा रीतीनें घराण्यांची संख्या दोहोनीं घटली परन्तु दोन नवीन (३२–३३) घराण्यांची माहिती मिळाल्यामुळें एकूण घराण्यांची संख्या तितकीच राहिली. पुस्तकांत छाया–चित्रें देण्यासाठीं पाठवावीं म्हणून सर्वांस विनंती केली होती. आलेलीं छायाचित्रें त्या त्या व्यक्तींच्या माहितीच्या जवळ दिलीं आहेत. पुस्तकांतील माहिती शक्य तितकी ताजी दिली आहे; ती मार्गशीर्ष शु. १ शक १८६९ पासून आज मिती-पर्यंत मिळालेली आहे.

कुलवृत्तान्तलेखनाची प्रथा सुरू झाल्यास तीस पसतीस वर्षें झालीं. या कालांत कोणत्याहि कुलाचा मागील माहितींत अद्ययावत भर टाकणारा दुसरा वृत्तान्त खंड प्रसिद्ध झालेला नाहीं. वाईकर सहस्रबुद्धे या एका कुटुंबाच्या वृत्तान्ताची द्वितीयावृत्ति निघाली आहे. परंतु तो सर्व कुलाचा वृत्तान्त नसल्यामुळें तें लहानसें आटोपशीर कार्य होतें. आपटे यांचा कुलवृत्तान्त प्रसिद्ध झाल्यावर वीस पंचवीस वर्षांनीं 'आपटे जंत्री' या नांवाचे दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत. परंतु त्यांत कांहीं व्यक्तींचीच माहिती आली आहे. सर्व कुलांतील व्यक्तींची नाहीं. म्हणून दुसरा खंड काढण्याचा हा आमचा उपक्रम पहिलाच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. याची रचना आम्हीं आमच्या कल्पनेनुसार केली आहे. या बाबतींत पूर्वींचें कोणाचें मार्गदर्शन उपलब्ध नाहीं.

पुस्तकासंबंधीं पेंडसे मंडळीस काय वाटतें हें त्यांच्याच शब्दांत परिशिष्ट २ मध्यें दिलें आहे. इतरहि कांहीं अभिप्राय त्याबरोबर दिले आहेत.

या व पहिल्या खंडांत एकत्र केलेला सर्व वृत्तान्त अनेक व्यक्तींकडन आलेल्या लेखी व तोंडी माहितीवर आणि इतर उपलब्ध साधनांवर मुख्यतः आधारलेला आहे तो शक्य तितका निर्दोष पद्धतीनें येथें दिला आहे. त्यासंबंधीं कोणत्याही प्रकारचें नैर्बंधिक उत्तरदायित्व (कायदेशीर जबाबदारी) संपादकावर व प्रकाशकावर नाहीं.

हें पुस्तक तयार करण्याचे कामीं श्री. गणेश पांडुरंग तथा बापूराव पेंडसे यांचे आम्हांस सुरुवातीपासून अखेरपर्यंत साहाय्य झालें आहे. हें काम यांनीं निःस्वार्थ कुलप्रेमानें केलें आहे. त्यासाठीं प्रथमारंभीं यांचे आभार मानणें आमचें कर्तव्य आहे. नागपूरचे रावसाहेब गोविंद रामचंद्र यांनीं या खंडाचे बाबतींत वेळो-

वेळीं उपयुक्त सूचना केल्या, माहिती मिळवून पाठविण्याचे कामीं श्रीवर्धनचे रा. महादेव सदाशिव, काशीचे रा. मुकुंद पांडुरंग, वेरळचे रा. दिनकर श्रीराम या पेंडसे मंडळींनीं तसेंच आमचे स्नेही रा. गणेश बाळकृष्ण नित्सुरे, मामेबन्धु चि. जगन्नाथ वासुदेव जोशी यांनीं आपुलकीनें साहाय्य केलें. श्री. शंकर लक्ष्मण वैद्य यांनीं त्यांच्या संग्रहांतील ऐतिहासिक कागद दिले. वर्तमानपत्रांच्या संपादकांनीं आमचे विनंतिपत्रास प्रसिद्धि दिली. याबद्दल आम्ही या सर्वांचे आभारी आहोंत.

पुण्यांतील पुष्कळ माहिती रा. दाजीशास्त्री (विष्णु विनायक) परांजपे यांनीं आणून दिली. भारत इतिहास संशोधक मंडळाचे शंकर नारायण वत्स–जोशी यांनीं ऐतिहासिक कागदांचे परिशीलन करण्याचे कामीं मार्गदर्शन केलें, मुद्रितें तपासण्यांत हौत्रवेत्ते चिंतामणशास्त्री दातार व श्री. दि. गो. दांडेकर, अेम्. अे. बी. टी.यांचें साहाय्य झालें. लोकसंग्रहाचे चालकांनी कागद मिळवून दिला व पुस्तकाचें मुद्रण चांगल्या तऱ्हेनें करून दिलें; याबद्दल या सर्वांचे आम्ही आभारी आहों.

केसरीचे विश्वस्त, महाराष्ट्रांतील प्रसिद्ध पुढारी जनार्दन सखाराम तथा तात्यासाहेब करंदीकर यांनीं आमचे विनंतीस मान देऊन या पुस्तकास प्रस्तावना लिहून दिली याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

हें पुस्तक तयार करण्यास झालेला व्यय व त्यासाठीं आमच्याकडे आलेल्या पैशाचा तपशील पुढें दिला आहे. त्यावरून जमाखर्चाची तोंडमिळवणी होण्यास बरीच रक्कम यावयास पाहिजे हें लक्षांत येईल. तरी प्रत्येकानें शक्य तितकी ज्यास्त रक्कम देऊन ही तूट भरून काढावी.

पहिल्या खंडाचे वेळीं संकल्प केल्याप्रमाणें हा दुसरा खंड प्रसिद्ध करण्याचा योग आला म्हणून जगन्नियंत्यास नम्रपणें वंदन करून हें निवेदन पुरें करतों.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात ॥

मिति फाल्गुन शु॥ ८
शक १८७०
(मातृश्राद्धतिथि)
पुणें

ग्रंथाच्या शेवटीं कोरीं पृष्ठें ठेविलीं आहेत. त्यांवर न्यूनाधिक वृत्त लिहून ठेवावें आणि तें प्रतिवर्षी संपादकाकडे कळवावें.

देणगी देणारे

पेंडसेकुलवृत्तान्ताच्या दुसऱ्या खंडासाठीं ज्यांनीं आगाऊ द्रव्य साहाय्य केलें, त्यांचीं नांवें देणगीच्या संख्यानुक्रमानें व त्यांत अकारादिक्रमानें दिलीं आहेत. पुस्तकाचें मूल्य किंवा ठसे करणावळ यांचा निराळा निर्देश न करतां सर्व रक्कम एकवट दाखविली आहे.

रुपये	नांव	पृष्ट	गांव
१०१	कृष्णाजी विनायक, संपादक	११३	पुणें
७०	विनायक मोरेश्वर	१८०	पेण
७०	सरस्वतीबाई गजानन	१०५	पुणें
६०	डॉ. काशीनाथ केशव	७४	पुणें
५५	नारायण विनायक	११६	बुऱ्हार कॉलिअरि
५१	श्रीधर विनायक	१३६	पुणें
५०	डॉ. गजानन पुरुषोत्तम	१४५	ग्वाल्हेर
५०	डॉ. रामचंद्र दत्तात्रेय	६३	पुणें
५०	सौ. सुशीलाबाई भिडे	१६५	पुणें
४०	लक्ष्मण (बाबूराव) पांडुरंग	१०१	गुणा
३०	गणेश विष्णु	१७६	रोहें
३०	पुरुषोत्तम रामचंद्र	१४५	ग्वाल्हेर
३०	शंकर गोविंद	७४	पुणें
२८	पुरुषोत्तम विठ्ठल महाजन	९३	पुणें
२६	रा. सा. गोविंद रामचंद्र	८४	नागपूर
२५	गणेश पांडुरंग	१४१	पुणें
२५	गणेश विष्णु	६१	पुणें
२१	गजानन शंकर	१२२	पुणें
२०	अज्ञात	—	—
२०	सौ. कमलाबाई मराठे	१६५	पुणें
२०	गोपाळ सदाशिव	२००	पुणें
१९	सौ. सुलोचनादेवी प्रभाकर	२०६	नागपूर
१५	सौ. कमलाबाई घारपुरे	१४१	पुणें
१५	केशव हरी	६८	नागपूर
१५	गणेश बाळकृष्ण	१५०	पुणें

१५	नरहरी विष्णु	१२९	डभोई
१५	नारायण रामचंद्र	१८३	रोहें
१५	नारायण विनायक	१३७	पुणें
१५	वासुदेव रामचंद्र	१५९	पुणें
१५	सदाशिव वासुदेव	१५५	कवळें
११	सौ. पद्मावतीबाई लवाटे	११४	जबलपूर
१०	डॉ. गणेश सीताराम	१०८	पुणें
१०	गोपाळ भास्कर	१२४	पुणें
१०	गोविंद गणेश	११६	आंजर्ले
१०	चिंतामणि नारायण (बंधु अनंतचे स्मरणार्थ)	१८३	माणगांव
१०	चिंतामणि विश्वनाथ	११७	पुणें
१०	दिगंबर चिंतामणि	१२५	दारेसलाम
१०	सौ. द्वारकाबाई साठे	२४२	पुणें
१०	परशुराम महादेव	१६५	परळ
९	दामोदर गजानन	१५३	दादर
७	अनंत मोरेश्वर	१३०	पुणें
७	मोरेश्वर धोंडो	१५५	पुणें
६	विनायक कृष्ण	७२	ठाणें
५	अनंत दत्तात्रेय	१५२	अहमदनगर
५	अनंत वासुदेव	८७	तळें
५	अनंत हरी	८२	कल्याण
५	गजानन सीताराम	१७७	खार
५	गोपाळ विनायक	१९६	पुणें
५	गोविंद गणेश	१७२	पुणें
५	दत्तात्रेय जनार्दन	१४९	पुणें
५	दत्तात्रेय पांडुरंग	७८	मुंबई
५	दत्तात्रेय रामकृष्ण	१६१	बडोदें
५	दामोदर पांडुरंग	१२०	नाशिक
५	दिनकर श्रीराम	१४०	वेरळ
५	धोंडो सीताराम	११२	पुणें
५	नरहरी केशव	२०५	वर्धा
५	नारायण दामोदर	८६	नागपूर
५	पांडुरंग भिकाजी	१३५	दादर

५	पांडुरंग शिवराम	११६	श्रीपूर
५	प्रभाकर भास्कर	१२४	मुंबई
५	महादेव त्र्यंबक	७९	कुर्ला
५	मुकुंद गजानन	७०	इंदूर
५	रामकृष्ण सदाशिव	७८	दादर
५	वामन गणेश	१७३	पुणें
५	विश्वनाथ काशीनाथ	१८९	कोठिंबे
५	शंकर अनंत	१११	कलघटगी
५	शंकर कृष्ण	१४३	चिपळूण
५	श्रीरंग शिवराम	१९०	वेणगांव
५	हिंदुधर्म संस्कृति मंदिर	—	नागपूर
४	जानकीबाई रामचंद्र	१४७	पुणें
१२६५			

आयव्ययाचें स्थूल टांचण

२३ विनंतीपत्रें	२१६ कागद छपाईचा
५५ लेखन साहित्य	१३२० छपाई
७४ टपाल	२५२ ठसे करणावळ
१०० वेतन व लिहणावळ	२१० बांधणी
एकूण रुपये	२२५०
पुस्तकाचें मूल्य, ठसे करणावळ व देणगी मिळून एकूण आय	१२६५
तूट	९८५

अनुक्रमणिका

प्रकरण		पृष्ठें
१ लें	प्रयोजन	१– ३
२ रें	भृगुकुलोत्पन्न पेंडसे	४– ७
३ रें	मूलस्थान	७– ८
४ थें	ऐतिहासिक कागदपत्रें व उल्लेख	९– ५०
५ वें	संशोधनार्थ	५१– ६०
६ वें	वंशावळी व माहिती	६१–२०७
७ वें	सामान्य विचार	२०८–२३१
	परिशिष्ट १ प्रथम खंडाकरितां झालेल्या खर्चाची व्यवस्था	२३२
	,, २ कुलबंधु काय म्हणतात	२३३–२३८
	,, ३ अभिप्राय	२३९–२४२
	पुरवणी माहिती	२४२
	सूचि–ऐतिहासिक कागदांतील पेंडसेव्यक्ति ..	२४३–२४४
	सूचि–निवासग्राम	२४५–२५२
	सूचि–व्यक्ति	२५३–२८०

पेंडसे-कुल-वृत्तान्त

खंड २ रा

प्रकरण १ लें

प्रयोजन

पेंडसे– कुल– वृत्तान्त प्रसिद्ध झाल्यानंतर या वृत्तान्त– प्रसिद्धीच्या प्रथेकडे लोकांचें—विशेषतः चित्तपावनांचें—लक्ष वेधलें गेलें. व आजपर्यंत लिमये, साठे–साठ्ये, भावे, चापेकर, खरे, सोमण, गद्रे, डोंगरे, काळे–वत्सगोत्री, चिपळूणकर, मोडक, नित्सुरे, मराठे, छत्रे, कानिटकर, आठल्ये, गुण्ये व पाचेशेटे या कुलांचे वृत्तान्त प्रकाशित झाले आहेत. पोंक्षे, सोवनी–सोहनी, लेले व नाडकर यांचे वृत्तान्त मुद्रणालयांत आहेत. केळकर व बेडेकर यांचे तयार होत आहेत. अभ्यंकर, आगाशे, काणे, गणपुले, गोगटे, जोग, जोशी, (शांडिल्य गोत्री), टिळक, दातार, नामजोशी, पटवर्धन, पाटणकर, पाळंदे, फडके, भागवत (मायदेव), भिडे, मेहेंदळे, म्हसकर, रानडे, लोंढे, साने, सिद्धये, पोतदार (ओरपे), तांबे, राजोपाध्ये, धडफळे, घाटपांडे, देशपांडे, दास्ताने, ढापरे, चिटणीस (वैद्य), चौधरी, मोरे, रहाटे, साठे इत्यादि कुलांची माहिती एकत्र करण्याचे प्रयत्न झाल्याचें कळतें. स. १९४४ सालीं सोलापुरला भरलेल्या चित्तपावन परिषदेनें व स. १९४७ सालीं त्र्यंबकेश्वरला अखिल शुक्ल यजुर्वेदी माध्यंदीन ब्राह्मण संमेलनानें प्रस्ताव करून कुलवृत्तान्त प्रथेचा पुरस्कार केला असून सर्व ब्राह्मणांनीं आपआपल्या कुलांचे वृत्तान्त प्रसिद्ध करावे अशी प्रोत्साहनपर विनंती केली आहे.

मोठेपणाचा गाजावाजा करणें हा कुलवृत्तान्त लिहिण्याचा हेतु नसून घराण्याचें पूर्ववृत्त व पूर्वपरंपरा हीं, श्रेष्ठ अगर लोकोत्तर असोत वा नसोत, घराण्यामध्यें पुढील पिढ्यांकरितां चिरस्थायी रहावी, या प्रधान हेतूनें कुलवृत्तान्त लिहिले जात असून त्यांचें स्थान मुख्यतः घराण्यांच्या किंवा कुटुंबीयांच्या दप्तरींच रहावयाचें आहे. पूर्वजांची सादर स्मृति ठेवणें हा आपणां आर्यांचा एक गुणविशेष

आहे. वेदकालींही यज्ञयागासारखीं कम करतांना यजमानाला आपल्या पूर्वज ऋषींचा स्मरणपूर्वक नामोच्चार करावा लागे. संध्या करणारे संध्येमध्यें प्रत्यहीं आपल्या ऋषि–पूर्वजांचा उच्चार करीत असतात. पितृतर्पणाचे वेळीं पिता, प्रपिता व प्रपितामह यांना तर्पण करावें लागतें. पौष्टपदी (भाद्रपद शु. १५) श्राद्धांत वृद्ध प्रपितामह, त्याचा पिता आणि पितामह यांचें स्मरण करावें लागतें. अशौचा-संबंधानेंही सात पिढ्या अगर दहा पिढ्या अशौच पाळावें अशी धर्माचार्यांची आज्ञा आहे. या सर्वांचा अर्थच असा कीं, पूर्वजांची स्मृति कायम ठेवणें हें मनुष्यमात्राचें स्वभाववैशिष्ट्य आहे. पशुपक्षी व मानवजात यांमधील भेद दर्शविणाऱ्या गुण-धर्मांपैकीं जन्मदात्या मातापितरांविषयींचें ज्ञान व स्मृति असणें हा एक गुणधर्म आहे. पशुपक्षी संगोपन कालापुरतेच मातापितरांना ओळखतात, उलट पक्षीं मनुष्य-प्राणी वर दर्शविलेल्या मार्गांनीं अनेक पिढ्यांपर्यंत पूर्वजांची स्मृति कायम ठेवतो.

आतां अलीकडील कालामध्यें पितृतर्पण करणें, श्राद्ध करणें किंवा सुतक पाळणें हे पूर्वजांची स्मृति ठेवण्याचे मार्ग कित्येकांस फोल वाटूं लागले असले व तपशिलाचे बाबतींत मतवैचित्र्य झालें असलें तरी स्मृति ठेवण्याचें तत्त्व सर्वमान्यच आहे. कारण, दिवंगत थोरांच्या स्मृति कायम ठेवण्यासाठीं त्यांच्या पुण्यतिथी पाळण्याचे प्रघात नव्यानें सुरू होत असल्याचें आपण पाहतों. त्याचप्रमाणें ग्रामदेवतांना नैवेद्य दाखविणें व देवळांत नंदादीप लावणें असल्या कृत्यांस खूळ मानणारे, आपल्या गांवीं शाळा स्थापून किंवा वाचनालय सुरू करून तेथें ज्ञानदीप अखंड तेवत ठेवतात व अशा प्रकारें स्वग्रामाची सेवा करतात; श्राद्ध–पक्ष न ओळखणारे, आपल्या जन्मदात्या पित्याचें स्मरण आपल्या पश्चातही कायम रहावें म्हणून स्वतःच्या निवासस्थानाला त्याचें नांव देतात; किंवा एखाद्या सार्वजनिक संस्थेकडे निधि देऊन त्याचे व्याजांतून शिष्यवृत्ति, पारितोषिक किंवा भोजन देवविण्याची योजना करतात, पुतळे उभार-तात किंवा तैलचित्रें लावतात किंवा एखादे साहित्याचार्य आपल्या मातापितरांची स्मृति चिरकाल रहावी म्हणून त्यांच्या नांवानें कांहीं रकमेचा विनियोग श्रेष्ठ प्रतीच्या साहित्यनिर्मितीकडे करितात, हेंही आपण पाहतों.

तात्पर्य, पूर्वजांची स्मृति ठेवण्याचे नवे जुने अनेक प्रकार आहेत. त्यांपैकींच नव्या काळास अनुसरून व मनुष्याच्या चिकित्सक बुद्धीस पटेल असा हा कुलवृत्तान्त लिहिण्याचा प्रघात आहे. अलीकडे चरित्र कोश, महाराष्ट्र परिचय, Who's Who in India, Who's Who in Western India इत्यादि परिचयग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. वृत्तान्त हा एका कुलापुरता कोशच होय. अमेरिकेसारख्या पाश्चात्य सुधारणेच्या शिखरावर असलेल्या देशांतहि ही प्रथा असून तेथें सुमारें २००० कुटुंबांचे वृत्तान्त लिहिले गेले असून या कामाकरितां संस्थाही स्थापन झाली आहे.

यावरून कुलवृत्तान्त होणें ही कल्पना आतां सर्वमान्य झाली आहे हें ध्यानांत येईल. कुलाचा वृत्तान्त होणें जसें अवश्य आहे तसें तो अद्ययावत असणें हें

क्रमप्राप्त आहे. तो अद्ययावत् ठेवावयाचा तर त्यांतील माहितींत ठराविक काल-मर्यादेनंतर भर घातली पाहिजे. आपले घराण्याचा वृत्तान्त प्रसिद्ध होऊन १० वर्षें झालीं. १० वर्षांपूर्वीं जीं मुलें विद्यार्जन करीत होतीं त्यांतील बरींच आज विद्यार्जन पूर्ण करून अर्थप्राप्तीसाठीं अनेक व्यवसाय करीत आहेत, कांहीं विवाह करून गृहस्थाश्रमांत आहेत. कित्येक जागतिक युद्धांत भाग घेण्यासाठीं रणांगणावर जाऊन आले आहेत. कुलांत नूतन गृहरत्नें आलीं आहेत; तसेंच कांहीं वृद्ध आपली संसारयात्रा पूर्ण करून निजधामास गेले आहेत. कांहींचे याच भूलोकावर स्थलांतर झालें आहे. या सर्व गोष्टींची योग्य ती नोंद होऊन वृत्तान्त अद्ययावत् राहिला तर तो उपयुक्त राहील या हेतूनें हा द्वितीय खंड तयार करण्याचें आम्हीं ठरविलें. ऐतिहासिक दृष्टया उपयुक्त अशी माहिती सरकार दप्तरीं मिळते म्हणून पुणें येथें असलेल्या पेशवे दप्तरांतील कागदपत्र पहाण्याची अनुज्ञा दक्षिण भागाचे कमिशनर यांजकडे वृत्तान्त प्रसिद्धीपूर्वीं आम्हीं मागितली होती, परंतु ती नाकारण्यांत आली. ती मिळावी या दृष्टीनें खटपट करण्याकरितां आम्ही कुलवृत्तान्त संघ दि. १६ जुलै १९३८ ला स्थापन केला व त्या संघानें मुंबई सरकारकडे कुल वृत्तान्त लेखकास पेशवे दप्तर खुलें करावें असा विनंती अर्ज पाठविला. कायदेमंडळांत या विषयावर श्री. मंडलीक यांनीं प्रश्न विचारले. इंडिअन हिस्टारीकल रेकार्ड कमिशनच्या १९३८ डिसेंबरमध्यें पुण्यास भरलेल्या बैठकींत रा. ब. गो. स. सरदेसाई व महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांनीं या विषयास चालना दिली. केसरी इत्यादि पत्रांनीं यास प्रसिद्धि दिली. सुदैवानें याच वेळीं मुंबई प्रांतांत लोकमतानुवर्ती सरकार अस्तित्वांत आलें होतें. त्यामुळें ह्या प्रश्नाचा विचार सहानुभूतिपूर्वक होऊन पेशवे दप्तर कुलवृत्तान्त-लेखकांस प्रयोगादाखल एक वर्ष विनाशुल्क खुलें केलें. ही मुदत पुढें आणखी एका वर्षानें वाढविण्यांत आली. या सवलतीचा फायदा आम्हीं घेण्याचें ठरवून फेब्रुवारी १९३९ पासून तीन महिने रोज पेशवे दप्तरांत जाऊन तेथील निरनिराळे रुमाल पाहून शक्य तितकी माहिती आणिली. रा. गणेश पांडुरंग पेंडसे हे दररोज आमच्याबरोबर या कामासाठीं येत असत. सातारा येथें असलेला पारसनीस ऐतिहासिक वस्तुसंग्रह पुण्यास डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट ॲन्ड रीसर्च इन्स्टिटयूटकडे आला आहे त्यांतील कागद एप्रिल १९४७ मध्यें आम्हीं पाहून माहिती घेतली. अशा रीतीनें मिळविलेल्या इतिहासकालीन माहितीस प्रसिद्धि देऊन वृत्तान्त परिपूर्ण करणें हें क्रमप्राप्त झालें. हेंहो दुसरें कारण या द्वितीय खंडाचे प्रकाशनास आहे. क्षेत्रोपाध्यायां-कडील लेखांचा उपयोग प्रथम खंडांत केला आहे. त्या वेळीं वेरूळ, पैठण इत्यादि ठिकाणचे लेख मिळाले नव्हते; ते नंतर मिळविले त्यांचा उपयोग यांत केला; त्यामुळें घराणीं क्रमांक २८ व ३० हीं एक असल्याचें कळलें.

प्रकरण २ रें

भृगुकुलोत्पन्न पेंडसे

संध्या करतांना प्रत्येक पेंडसे 'भार्गव, च्यवन, आप्नवान, और्व व जामदग्न्य असे पांच प्रवर असणाऱ्या जामदग्न्य गोत्रांत मी जन्माला आलों असून मी ऋग्वेदाच्या शाकल शाखेचें व आश्वलायन सूत्राचें अध्ययन करणारा अमुक शर्मा आहे' असें म्हणत असतो. प्रवर शब्दाचा अर्थ अधिक श्रेष्ठ असा आहे. "पूर्व: प्रवर: उत्पादयितु: उत्तर : प्रतिग्रहीतु:". प्रवरांतील पहिले ऋषि प्रवराचे उत्पादक व त्यापुढील ऋषि ती परंपरा स्वीकारणारे ऋषि होत असा याचा अर्थ आहे. गोत्र म्हणजे आपण ज्या प्रसिद्ध पुरुषाचे वंशज आहों तो जामदग्न्य. जामदग्न्य हा भृगूचा गण आहे. भृगूचे पांच गण आहेत ते:—

जामदग्न्या वीतहव्यास्तथा गार्त्समदा अपि।
वाघ्यश्वाश्चैव वैन्याश्च भृगो: पंच गणा : स्मृता:॥

जमदग्नि गणांत वत्स गोत्राचा समावेश होतो ". वत्सा विदा आर्ष्टिषेणा इत्ये ते जमदग्नय:".

जमदग्नीची वंशावळ सर्व पुराणांचा विचार करून विद्वानांनीं ठरविली आहे ती अशी :—

भृगु = पुलोमा

कवि (शुक्र) | चवन = सुकन्या | भार्गव

आप्नवान

और्व

ऋचिक = सत्यवति

जमदग्नि = रेणुका

परशुराम

आतां ऋग्वेद म्हणजे काय तें पाहू :—

ज्या श्रुतिवाङमयाला मंत्रवाङमय म्हणून एक सामान्य नाम शोभेल, अशा वाङमयाचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे कारणपरत्वें केलेले वेगवेगळे भाग होत. वेदकालीन संस्कृतीचा मध्यबिंदु यज्ञ हा होता आणि त्याच्यासाठीं जे वेगवेगळे मंत्र लागत त्याचे ऋक् (आवाहनाचे मंत्र), यजूस (आहुति देतांना म्हणण्याचे गद्यमंत्र), सामन् (यज्ञ करतांना गाऊन म्हणण्याचे ऋचांचेच केलेले वेगवेगळे गानभेद) आणि अथर्वन् (आपल्याकरितां शुभ तसेच शत्रूविरुद्ध अशुभ गोष्टी उत्पन्न व्हाव्या म्हणून जपाकरितां उपयोगांत येणारे जादूसारखे मंत्र) असे विनियोगपरत्वें भाग होते. आणि या चारही प्रकारच्या मंत्रांचा उपयोग अनुक्रमें होता, अध्वर्यु, उद्‌गाता आणि ब्रह्मा हे यज्ञांतले ऋत्विज करीत असत. होता ऋक्पठनानें देवांचें आवाहन करी, अध्वर्यु यजुर्मंत्र म्हणून आहुति यज्ञांत टाकी; उद्‌गाता सामगान करी व ब्रह्मा आपल्या अथर्ववेदाच्या ज्ञानानें या सर्व कर्मांचें अध्यवेक्षण (superintending) करीत असे. अशा रीतीनें मंत्र वाङमयाचा यज्ञांत उपयोग केला जाई व कोणाही ऋत्विजास त्याला हवें तें काम करतां येत असे. फक्त त्याला कारणपरत्वें ऋक्, यजुस्, सामन् इत्यादिकांचा उपयोग करावा लागे. अर्थातच याज्ञिक संस्कृति जसजशी वाढत गेली व प्रत्येक ऋत्विजाचा व्याप जसजसा वाढत गेला तसतसे प्रत्येक ऋत्विजाला एक विशिष्ट कार्य करणेंच सोयीचें व्हावयाला लागलें व कांहीं केवळ होत्याचेंच काम करणारे, कांहीं केवळ अध्वर्यूचेंच काम करणारे असे त्यांचे वेगवेगळे वर्ग पडले. आणि मग ओघानेंच प्रत्येकाला आपआपलें मंत्रभांडार एकत्रित करण्याची जरूरी पडली. अशा रीतीनें ऋचांचा संग्रह ऋग्वेदांत, यजूंचा यजुर्वेदांत, सामांचा सामवेदांत व अथर्वांचा अथर्ववेदांत करण्यांत आला. स्थूलमानानें ही उपपत्ति वेगवेगळे वेद कसे झाले हें समजण्यास उपयोगी पडेल. (दुसऱ्या कित्येक शास्त्रीय व्युत्पत्त्या विस्तारभयास्तव येथें देत नाहीं.) अर्थात् ऋग्वेद म्हणजे होत्याला देवांना आवाहन करण्यासाठीं पठण कराव्या लागणाऱ्या ऋचांचा संग्रह. अशा संग्रहांनाच संहिताकरण म्हणतात.

निरनिराळ्या ऋषींनीं आपणांस इष्ट व अनुकूल असणाऱ्या मंत्रांचे एखाद्या विशिष्ट प्रकारें एकीकरण करावें असा प्रकार सुरू झाला; आणि त्या कालीं विद्या ही केवळ मुखपरंपरेनें प्रसृत होत असल्या कारणानें अशा तऱ्हेच्या संहिता करण्याच्या कामीं कांहीं पाठभेद, मतभेद इत्यादि उत्पन्न होणें अगदीं अपरिहार्य होतें, आणि शाखा भिन्नत्वाचें कारण हेंच होय. उदाहरणार्थ, आपल्या ऋग्वेदापुरतें बोलावयाचें झाल्यास त्याच्या पांच वेगवेगळ्या संहिता होत्या असें एके ठिकाणीं सांगितलें आहे. (पतंजलीच्या मतें एकवीस होत्या). जो ऋषि अशी एक संहिता विशिष्ट पाठभेदांची व विशिष्ट रचनातत्त्वावर उभारलेली निर्माण करीत असे किंवा संपादित असे त्यालाच शाखाप्रवर्तक असें म्हणत. शाकल या नांवाच्या ऋषीनें

एका विशिष्ट पद्धतीला अनुसरून त्याला ज्ञात असलेल्या अगर अवश्य असलेल्या ऋचा एकत्र केल्या व ऋग्वेदाची एक शाखा बनविली. हीच आपली शाकल शाखा. या शाखेशिवाय फक्त बाष्कल शाखा असल्याचें नमूद आहे; परंतु तिची संहिता उपलब्ध नाहीं. तसेंच यज्ञामध्यें आहुति कशी द्यावी, एखादें कर्म कोणत्या रीतीनें करावें अगर त्या वेळीं कोणता मंत्र म्हणावा अशा कर्ममार्गीय गोष्टींबद्दल मतभेद उत्पन्न होणें साहजिकच होतें. हे सर्व मतभेद हळू हळू ग्रंथ रूपानें एकत्र करण्यांत आले; त्यांना ब्राह्मण हें नांव देण्यांत आलें. एखाद्या ऋचेचा अर्थ, वैदिक शब्दांची व्युत्पत्ति, कर्मकांडांतील गोष्टींबद्दल संवादरूपानें अगर इतिहासरूपानें चर्चा वगैरे विचार या ब्राह्मण ग्रंथांत केलेले आहेत. निरनिराळ्या संहितांचे अर्थनिर्णायक ग्रंथ म्हणून हे ब्राह्मण ग्रंथ आज उपलब्ध आहेत. ऋग्वेदाच्या आपल्या शाकल शाखेचा ब्राह्मण ग्रंथ ऐतरेय ब्राह्मण या नांवानें प्रसिद्ध आहे. मतभेदाची ही परंपरा वेदांच्या निरनिराळ्या शाखा व निरनिराळे ब्राह्मण ग्रंथ होऊनच थांबली नाहीं तर पुन: एक एका शाखेच्या अनुयायांतही बरेचसे भेद पडले व त्या भेदांचे दर्शक वेगवेगळे ग्रंथही निर्माण झाले. तसेंच मंत्र आणि ब्राह्मण यांचें पठण, त्यांचे व्याकरण, त्यांचा अर्थ लावणें इत्यादि गोष्टींकरितां प्रत्येक शाखेंत वेगवेगळी ग्रंथरचना झाली आणि शिक्षा (वेद कसे पठण करावे इ.), कल्प (कर्में कशी करावीं), व्याकरण, निरुक्त (अर्थ कसा लावावा व व्युत्पत्ति कशी जाणावी), छंदशास्त्र आणि ज्योतिष (कर्में करण्याचा योग्य काल वगैरे ठरविणारें शास्त्र) अशीं सहा प्रसिद्ध शास्त्रें निर्माण होऊन त्यांवर ग्रंथ झाले. (यांना वेदांगें म्हणतात.) अर्थात् हे निरनिराळ्या ऋषींनीं आपआपल्या अनुयायांकरितां संपादिले. आपण ज्याला दशग्रंथी ब्राह्मण म्हणतो तो संहिता आणि ब्राह्मण यांशिवाय शिक्षा, व्याकरणासारखे वर दर्शविलेले ग्रंथ म्हणतो, आणि आपआपल्या शाखेचे असे दहा ग्रंथ म्हणावयाचे असल्यामुळें शाखेचें संपूर्ण अध्ययन करणारास अर्थात्च दशग्रंथी ही अन्वर्थक संज्ञा मिळाली.

या वर वर्णिलेल्या वेदांगांपैकीं कल्प हें वेदांगच कालानें जास्त महत्त्वाचें ठरलें. कर्मकाण्डाचाच कांहीं काल जास्त प्रसार होता आणि त्या कालीं पूर्वाचार्यांनीं कशीं कर्में केलीं हें सांगणारे, कर्माविषयीं निरनिराळे नियम ठरविणारे "सूत्र" नांवाचे ग्रंथ निर्माण झाले. आणि या सूत्र ग्रंथांनींच बरेचसे ब्राह्मणांचे भेद निर्माण केले आहेत. एकंदर कर्मकाण्डाचे श्रौत व गृह्य असे दोन भाग करतां येतात. श्रौत कर्में म्हणजे वेदांत सांगितलेले सोमयाग किंवा हविर्यज्ञासारखे यज्ञ. या श्रौत कर्माविषयींचीं सूत्रें श्रौतसूत्रें या नांवानें प्रसिद्ध आहेत. उपनयन, विवाह वगैरेसारख्या घरगुती विधींना गृह्य म्हणजे घरांतील अशी संज्ञा मिळाली, व त्यासंबंधींचीं सूत्रें गृह्यसूत्रें या नांवानें प्रसिद्ध आहेत. तसेंच मनुष्यानें कसें वागावें वगैरे संबंधींचे

नियम धर्मसूत्रें या नांवाच्या ग्रंथप्रकारांत एकत्रित केलेले आहेत. या तिन्ही प्रकारच्या सूत्रग्रंथांना कल्प अशी सामुदायिक संज्ञा आहे. आपल्या आश्वलायन सूत्रांचे आश्वलायन श्रौतसूत्र व आश्वलायन गृह्यसूत्र असे दोन भाग आहेत. (आश्वलायनाचें धर्मसूत्र उपलब्ध नाहीं). या सूत्रानुसार आपलीं श्रौत व गृह्य कृत्यें केलीं जातात.

या विवेचनावरून आपण ऋग्वेदाच्या शाकलशाखेचें अध्ययन करणारे व आश्वलायन सूत्र मानणारे असें म्हणण्याचें महत्त्व काय व तें कसें प्रचारांत आलें याची थोडीशी तरी कल्पना येईल.

प्रकरण ३ रें

मूलस्थान

प्रथम खंडांत तीस घराण्यांतील व्यक्तींनीं दिलेल्या माहितीवरून व इतर अनुमानावरून पेंडसे यांची वसती ज्ञात अशा पूर्वकालीं रत्नागिरीचे पंचक्रोशींत म्हणजे—नेवरें, गोळप, सोमेश्वर, सडे– पिरंदवणें, टोळवाडी व कासारवेली येथें—होती असें आम्ही दाखविलें आहे. त्यानंतर खालीं दिलेली माहिती उपलब्ध झाली; त्यावरून आमचे म्हणण्यास पुष्टि मिळाली आहे.

१. घराणें ३१ वें याचें मूळ गांव गोळप आहे. या घराण्याची माहिती आम्ही प्रकरण ३ रें लिहिलें त्या वेळीं नव्हती. पुस्तक छापीत असतां शेवटीं शेवटीं ती मिळाली.
२. घराणें ११ वें मूळ कोणत्या ठिकाणचें हें पूर्वी कळलें नव्हतें. तें सडे-पिरंदवणें येथील असल्याचें आतां निश्चित कळलें आहे. संशोधन क्र. २७ चा या घराण्यांत समावेश झाला आहे.
३. घराणें २४ हें गोळपचें आहे असें क्षेत्रोपाध्यायांकडील लेखांवरून ठरतें.
४. संशोधन क्रमांक ११ यांतील व्यक्तींची पूर्वी कांहीं माहिती कळली नव्हती. त्यांचा आतां तपास लागला असून त्यांस आतां स्वतंत्र घराणें क्रमांक ३३ दिला आहे. त्यांचें मूळगांव कासारवेली आहे.
५. संशोधन क्र. ४३, ४६ व ६३ मधील व्यक्तींनीं आपलें मूळगांव अनुक्रमें, गोलप–सडिये, वसणी व पावस सांगितलें आहे.
६. पेशवेदप्तर जमाव रुमाल ५०० मधील स. १७९४ चे जमाबंदी कुलकर्णी कागदांत मौजे मावळंगे तर्फ पावस येथें “ठिकाण पेंडसा” असा उल्लेख आहे.

७. पेशवेदप्तर जमाव रुमाल ४९० व ४९१ मध्यें वाडा सडिये मौजे पुसाळे तर्फ नेवरें येथील ब्रोट खतांत ' ठिकाण पेंडसा कर्दे रामदेमानी भिडे खोत ' व 'सखंभट लक्ष्मण पेंडसे याचे ठिकाण नेने यांजकडे होतें ' अशी माहिती आहे.

वरील १ ते ७ मधील गांवें रत्नागिरी पंचक्रोशींत आहेत.

चित्पावन या पुस्तकांत चित्पावनांचें कोंकणांतले मूळ गांव वा स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न ग्रंथकर्त्यानें केला आहे. या संबंधींचें संशोधन मुख्यतः "कुलस्वामी"-वर आधारलेलें आहे. घराण्याचा कुलस्वामी जेथें असेल तें त्या घराण्याचें मूलस्थान होय असें अनुमान काढलें आहे व गुहागर हें सर्व चित्पावनांचें मूलस्थान असावें असें अनुमान केलें आहे. गुहागरास वाडेश्वर हा देव आहे व कांहीं चित्पावन वाडेश्वर कुलस्वामी मानतात. तो सर्व चित्पावनांचा कुलस्वामी आहे अथवा होता असें दाखवितां आल्यास गुहागर हें त्यांचें कोंकणांतील मूळ वास्तव्याचें ठिकाण ठरवितां येईल. हा हेतु मनांत धरून त्या पुस्तकांत सर्व संशोधन झालें आहे व चित्पावनांच्या कुलस्वामींची त्यांत तपासणी केली आहे. पेंडसे यांचा कुलस्वामी वाडेश्वर असावा व ते गुहागरचे असावे असें इतर अनेक उपनांवाप्रमाणें ओढून ताणून दाखविण्याचा यत्न केला आहे. इतर उपनांवांबद्दल येथें चर्चा करणें अप्रस्तुत आहे. परंतु, पेंडशांचे बाबतींत तो प्रयत्न यशस्वी झाला नाहीं असें स्पष्टपणें म्हणजे सप्रमाण म्हणणें भाग आहे. पेंडसे मूळ गुहागरचे नसून रत्नागिरी पंचक्रोशींतील आहेत व त्यांचें परिभ्रमण मुख्यतः दक्षिणेकडून उत्तरेकडे झालें आहे. धामापुरच्या पेंडशांचा कुलस्वामी वाडेश्वर आहे अशी चुकीची माहिती ग्रंथकर्त्यास मिळाली व त्यावर त्यांनीं त्यांचें अनुमान केलें आहे. धामापुरचें घराणें मूळ गोळपचें असून त्याचा कुलस्वामी लक्ष्मीकेशव आहे, वाडेश्वर नव्हे. कांहीं पेंडसे घराणीं आदित्यनाथ कुलस्वामी मानतात. आदित्यनाथाचीं देवालयें रत्नागिरी पंचक्रोशींत नेवरें, आंबव, आगरगुळें इत्यादि ठिकाणीं आहेत. आदित्यनाथाचें देऊळ गुहागरास नाहीं. ही गोष्टही पेंडसे मूळ रत्नागिरी-जवळील आहेत हेंच सिद्ध करते.

प्रकरण ४ थें

ऐतिहासिक कागदपत्रें व उल्लेख

वृत्तान्त खंड १ मध्यें ४० पत्रें दिलीं आहेत; म्हणून या प्रकरणांतील कागदांस त्यापुढील क्रमांक दिले आहेत. कागद कोठें मिळाला त्याचा उल्लेख प्रत्येक क्रमांकांत वर डाव्या बाजूस केला असून उजवीकडे कालनिर्णयार्थ शक सन दिले आहेत. ज्या व्यक्तीचा उल्लेख त्यांत प्रामुख्यानें आहे तिचें नांव जाड ठशांत घराणें व पिढीच्या क्रमांकासहित दिलें आहे.

पे. द. = पेशवे दप्तर रो = रोजकीर्द

रु = रुमाल

१५ अ

खंड १– पृष्ठ ४४ वरील ५ वे ओळीपासून या क्रमांकांतील पुढील मजकूर रद्द समजावा. तात्या पेंडसे म्हणजे कृष्णाजी गणेश पेंडसे, घराणें (१३–५) हे होत. (काव्येतिहाससंग्रह पृष्ठ ४७१ ले० ४९० पहा.)

पे. द. घडणी रु. ३९४

लक्ष्मण विश्वनाथ (१–४)

४१

सु. ११७३ साबान १८
श. १६९४ कार्तिक वद्य ४
इ. १७७२ नोव्हेंबर १४

रोजकीर्द स्वारी पंतप्रधान सरंजाम नीा लक्ष्मण विश्वनाथ पेंडसे दफाते पत्र छ ११ रबिलावल अखेर खासा स्वारी मोा¶ थेऊर. मशारनिल्हेकडे साडेतीन तर्फा मावळे तालुके शिवनेर येथील फडनिशी साल मजकूर अवलसालापासून यास सांगोन तैनात सालीना नक्त रुपये २०० करार करून देऊन पाठविले असे. तरी मशारनिल्हेच्या हातें कुल कामकाज घेऊन सदरहू नेमणूकेप्रमाणें वेतन पावीत जाणें. म्हणोन उधो§ वीरेश्वर यास छ १८ साबान रसानगी‡ यादी.

¶ हा माधवरावांचा मुकाम पेशवे डायरींत पुणें असा दिला आहे तेथें थेऊर असा पाहिजे. ज्येष्ठ व. ५ स पुण्यास वाड्यांत आले असे ऐ. ले. सं. भा. ४ ले. ११७३ मध्यें आहे.

§ चितळे. मृगसाल.

‡ पोचविणें. रवानगी म्हणजे पाठविणें. रसानगी म्हणजे पोचविणें.

पे. द. रो. रु. १००

लक्ष्मण विश्वनाथ (१–४) } **४२** { सु. ११७५ जिल्काद ३
श. १६९६ पौष शु. ५
इ. १७७५ जानेवारी ६

दफाते—लक्ष्मण विश्वनाथ याचे नांवे सनद कीं पाा गाळणा पैकीं गांव तालुके मुल्हेर येथील बेगमीस आहेत .... मजकूरची जमाबंदी सुभाहून ठरावून देतील त्याप्रमाणें तुम्ही वसूल मशारनिल्हे याजपासून तालुके मजकूरीं घेत जाणें. (वर आडनांवाचा उल्लेख नाहीं; परंतु आडनांव पेंडसे असावें असें मागील क्रमांकावरून वाटतें.)

पे. द. रु. १०७

राघो केशव (२–७) } **४३** { सु. ११७७ जिल्काद ६
श. १६९८ मार्गशीर्ष शु. ८ बुध.
स. १७७६ डिसेंबर १८

सदाशिव केशव पेंडसे वस्ती धामापूर ताा संगमेश्वर त ॥ रत्नागिरी याणीं हुजूर विनंती केली कीं आमचे बंधु राघो केशव हे तोतयाकडे तसदीमुळें गेले होते परंतु तोतया मोडिल्या अगोदर सरकारांत हजीर झाले यास्तव कृपा करून घराची जप्ती न होय तें झालें पाहिजे म्हणोन त्यावरून हे सनद सादर केली असे तरी राघो केशव तसदीमुळें तोतयाकडे गेले होते परंतु तोतया मोडिल्या अगोदरच सरकारांत येऊन दाखल झाले सबब यांचे घराची जप्ती न करणें व यास व मुलांमाणसांस उपद्रव न करणें म्हणोन सदाशिव केशव ताा मजकूर यास छ ६ जिल्काद.

या राघो केशवास विजयदुर्ग येथील फडणीशीकडील दप्तरदारीची असामी सन सबा सबैन छ २९ रबिलावल (श. १६९९ वैशाख शु. १ गुरुवार), रोजीं मिळाली.

केशव राजाराम, धामापूर (२–१०)
केसो रघुनाथ
गणोबा
कृष्णंभट } **४४** { सु. ११७३ रबिलावल ७ रविवार
श. १६९५ ज्येष्ठ शु. ९
स. १७७३ मे ३०

श्री आई आदि पुरुष
श्री राजा शिव छत्रपती
स्वामि कृपाभिलाषी
बाजीराव..........
....
....

आज्ञापत्र राजश्री
पंत प्रतिनिधी‡ ताा* कमाविसदार

‡ श्रीनिवास गंगाधर ऊर्फ भवानराव प्रतिनिधींची एव्हां कारकीर्द चालू आहे. श. १६७३ ते १६९९ (१७५१–१७७७). वर दिलेली मुद्रा वरीच सदोष वाटते.

* ताहा = ला, कडे. धामापुरच्या कमाविसदाराला प्रतिनिधींची आज्ञा.

मौजे धामापूर तो। संगमेश्वर सु सलास सबैन मया व अलफ. केसो रघुनाथ पेंडसे मौजे मार यांसी गणोबा व कृष्णंभट पेंडसे ठिकाणाविसी वगैरे कलह उत्पन्न करून पाटपाणी यास लढा लावितात म्हणोन हुजूर विदीत झालें त्यावरोन हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी गणोबा व कृष्णंभट पेंडसे यांस ताकीद करून केसो रघुनाथ यासी पाटपाण्याविसीं वगैरे कजीया न करीत तें करणें. फिरोन बोभाट हुजूर येऊं न देणें छ ७ रबिलावल निर्देश समक्ष

शिक्का राजने --

पे. द. रो. रु. ६५३
महादेवभट (३–५)
बाबाजी हरभट (३–६)

४५

सु. ११७६ जमादिलाखर २९
श. १६९७ भाद्रपद शुद्ध १
इ. १७७५ ऑगस्ट २७

श्रीवर्धनकर ब्राह्मण यांस पेशजी कै. नानासाहेब यांनीं सन सीत खमसेनांत धर्मादाव असामीवार कुटूंब पाहून प्रांत राजपूरीपैकीं ३२॥ साडेबत्तीस खंडी भात करार करून सनद दिली त्याप्रमाणें कांही दिवस पावलें पुढें नारो त्रिंबक¶ यांनीं कमीजास्त केले त्याप्रमाणें सन खमसपावेतो पावत आलें त्यास ज्याचे कमी केलें ते ब्राह्मण हुजूर येऊन विनंती केली कीं आपलें भात कमी केलें आहे तें करार करून दिलें पाहिजे. म्हणोन त्यावरून तीस ब्राह्मणास सनद दिली.

गल्लाकैली साडेतिसेरी बारळे मापें.

× × ×

महादेवभट चांगबोले.*

बाबाजीभट चांगबोले हरभट याचे पुत्र हरभट मृत्यू पावल्यामुळें.

× × ×

सनद चिमाजी माणकर प्रांत राजपुरी याचे नांवे

छ २४ जमादिलाखर

¶ सोमण, तळेसुभ्याचे मुजूमदार. ह्यांची 'उगवणी रयतीस भारी पडली' म्हणजे वसूल अधिक घेतला असें ह्यांजविषयींचें मत ऐ. सं. खं. ३ पृ. ७७ वर आलें आहे.

*(चांगबोले–चांगभलें.) ही सनद शके १६७७ मधील असेल काय ?

पे. द. घडणी रु. ३९४

महादाजी राम (४–४) } **४६** { सु. ११८१ जिल्हेज २५
श. १७०२ मार्गशीर्ष व. १२
इ. १७८० डिसेंबर २२

रोजकीर्द स्वारी पंतप्रधान सरंजाम नीा महादाजी राम पेंडसे कारकून शिलेदार§ परभारें छ २५ जिल्हेज मशारनिल्हे यास रामाजी रघुनाथ मृत्य पावले सबब त्यास सालाबाद दीडशें रुपये पावत होते त्याप्रमाणे मशारनिल्हेचे नांवे करार करून सालगाा प्रो साल मजकूरीं रसानगी याद—रुपये १५० दीडशें रुपये जकात प्रांत कल्याण भिवडी नीसबत भिकाजी विश्वनाथ यांजकडून देवविले.

निाा महादाजी राम पेंडसे कारकून शिलेदार रामाजी रघूनाथ याचे पुत्र रामाजी रघुनाथ मृत्य पावले सबब.

पे. द. रो. रु. १४१

रामचंद्र महादेव (४–५) } **४७** { सु. ११९२ जमादिलावल १२
श. १७१३ पौष. शु. १३
इ. १७९२ जानेवारी ७

रोजकीर्द पंतप्रधान सु. इसने माहे जमादिलावल तेरीख १२ रोज पौष शु.१३ मंदवासरे शक १७१३ विरोधनाम संवत्सरे मु. कसबे पुणे. बदल देणे रामचंद्र महादेव पेंडसे कारकून सीलेदार याचे तीर्थरूप महादाजीराम यास सालाबाद १५० दीडसें रुपये पावत होते त्यास ते मृत्यु पावले सबब त्याचे पुत्र मशारनिल्हे यास सालमजकूरापासून पेशजी प्रमाणे करार करून रसानगी याद

रु. १५० दीडसें रुपये जकात प्रांत कल्याण भिवडी नीाा बाबूराव हरी कादार याजकडून जकात प्रांत मजकूर येथील अजमासास नेमणूक आहे त्याप्रमाणें देवविले.

पे. द. रु. ३५४

पांडुरंग रामचंद्र (४–४) } **४८** { सु. ११८५ सफर १६
श. १७०६ पौष व. ३
इ. १७८४ डिसेंबर २९

पांडुरंग रामचंद्र कारकून शीलेदार यास पेशजीपासून भात खंडी तीनची नेमणूक प्रांत राजपूरीकडे होती ती सोईवार नाहीं. याचें घर अवचितगड तालुक्यांत. याजकरीतां तिकडून नेमणूक भाताची करून दिल्ही म्हणोन गणेश बल्लाळ व हरी गणेश यांचे नांवे सनद छ २० मोहरम.

---

§ स्वतःचेंच घोडे घेऊन प्रसंगापुरती बोली करून जो स्वार सैनिकी पेशा करतो तो. अशा पथकांकडील कारकून.

पे. द. रो. रु. ९९ **आबाजी रघुनाथ** (६–४) **महादाजी रघुनाथ** (६–४)	**४९**	सु. ११७५ रमजान २६ श. १६९६ कार्तिक व. १३ इ. १७७४ डिसेंबर १

दफाते तालुके अवचितगड येथील दफतराकडे महादाजी रघूनाथ यांची आसामी होती त्यास ते चाकरीवर नाहींत. सबब त्याच्या ऐवजीं आबाजी रघूनाथला सालमजकूरापासून करार करून हे सनद सादर केली असे. तरी तालुके मजकूर येथील त्यांचे लिहीण्याचें कामकाज मशारनिल्हेचे हातीं घेऊन बेहेड्यास १५० दीडशें रुपये नेमणूक आहे त्याप्रमाणें वेतन पावीत जाणें. म्हणोन आबाजी बल्लाळ व भास्कर महादेव यांचे नांवे सनद.

पारसनीस संग्रह रुमाल ५१ फाईल ४–४३ **बाबूभट (बाबाजी) गणेश** (७–४)	**५०**	सु. ११८३ जिल्काद ३० गुरुवार श. १७०४ मार्गशीर्ष शु. २ स. १७८२ डिसेंबर ६

सेवेसी आपाजी राम सहस्रबुद्धे कृ. सा. न. वि. येथील कुशल ताा छ ३० जिल्हेज पावेतों × × असो विशेष × × श्रीमंत राजश्री बाबासाहेब, वो राजश्री बाबूभट पेंडसे श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांचे दुसरे संबंधाचे सासरे, यांचे घरीं कोपरगांवीं भोजनास प्रतिपदा बुधवारीं गेले होते × ×

भिकाजी गणेश (७–४) यांची कन्या रघुनाथराव पेशवे यांस दिली होती. त्यांचे बंधू बाबाजी गणेश हे वरील पत्रांत उल्लेख केलेले बाबूभट पेंडसे असावे म्हणजे हे राघोबादादाचे चुलत सासरे होत. यांचा चुलत नातू व्यंकट सदाशिव हा दुसरे दिवशीं भाऊबिजेनिमित्य श्री. बाजीरावांकडे जेवावयास गेला होता. वरील पत्रांतील बाबासाहेब म्हणजे बाजीराव रघुनाथ पेशवे होत.

सदाशिव गणेश (८–१)	**५१**	स. १७७२ श. १६९४

यादी **सदाशिव गणेश** पेंडसे यांजकडे असाम्या सुा सलास सबैन मया व अलफ.

१४५॥। तालुके बिरवाडीपैकीं
- ७०॥। फडणिशी सुभाची **विश्वनाथ सदाशिव** यांचे नावें
- ७५ माब (हा ?) ळचे मजमुचें वेतन मशारनिल्हेचे नावें

१४५॥।

४७ मजमु ता माडले प्रांत राजपुरी **महादाजी सदाशिव** यांचे नांवे
० पा कोडील येथील मजमु **गोविंद सदाशिव** यांचे नांवें चाकरीस **नारोकृष्ण** पेंडसे मशारनिल्हेचे चुलत भाऊ वेगळे आहेत.
२७० दफ्तरची असामी **गोविंद सदाशिव** याचे नांवे
२५० ऐन नक्त
२० कापड आंख ५० चे
२७०

वरील माहितीवरून खालील वंशावळ तयार होते.

गणेश
|
सदाशिव — कृष्ण
|
विश्वनाथ, गोविंद, महादाजी — नारायण

हीं माणसें घराणें ८ केळशी–बिरवाडीपैकीं दिसतात. पें. कु. वृ. पृष्ठ २०० वर सामानांवरील नांवावरून केलेला तर्क दिला आहे त्याच्याशीं वरील वंशावळ जमते.

पे. द. रो. रु. १०७
बाळाजी हरी (९–२)

५२

सु. ११७७ जिल्काद २९
श. १६९८ पौष शु. १ शुक्रवार
स. १७७७ जानेवारी १०

५००० बा बाळाजी हरी पेंडसे वस्ती बिरवाडी तोतयाचे निशाण घेऊन बिरवाडीस आले व चितो चिमणाजी घाणेकर व विठ्ठलराम दातार दोघे जण बिरवाडीस कारभारी होते त्यास आनंदराव शिंदे याणीं सरकारतर्फे मारनिल्हेचे स्वाधीन केले असतां पळविले सा ५००० रदकर्ज गुा बाळाजी विश्वनाथ यास बा बाळाजी हरी पेंडसे याजकडून.

यानीं तोतयाचे निशाण बिरवाडीवर लाविलें. वरील ५००० रु.ची. रक्कम हे व आणखी दोघे मिळून तिघांपासून खंडगुन्हेगारीबद्दल घेतली आहे.

पे. द. रो. रु. १४९
बाळाजी लक्ष्मण (११–५)
व (सं. क्र. २७)

५३

श. १७१७ कार्तिक शु. ८ गुरुवार
सु. ११९६ जमादिलावल ६
इ. १७९५ नोव्हेंबर १९

स्वारी राजश्री पंतप्रधान मु. पुणें बाळाजी लक्ष्मण पेंडसे यानीं विनंती केली कीं पोा जुनी हुबळी येथील फडणीशी आम्हांकडे आहे. पोतनीसी व दफ्तरदारी दुसऱ्याकडे

होती ते पेशजी सरकारांतून दूर केली आहे याजकरतां दोन्ही दरकाचें काम आम्हाकडे सांगितल्यास फडणीसेचे तयनातीवर चाकरी करूं म्हणोन. याजवरून पोा मजकूरची पोतनिसी चिमणाजी सदाशिव व दफतरदारी राघो दामोदर याजकडे होती ते दूर करून त्यास मोबदला आसाम्या सांगितल्या आहेत सबब दोनही दरकाची कामें हल्लीं बाळाजी लक्ष्मण याजकडे सांगून फडणीसीचे वेतनावर चाकरी करावी याप्रमाणें करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे तरी याजपासून परगणें मजकूर येथील दफतरदारी व पोतनिसीचे कामकाज घेत जाणें. म्हणोन मोरो बापूजी याचे नांवे सनद.

सुा सलास मयातेन व अलफ (स. १८०२) मध्यें पोा जुनी हुबळी प्रांत कर्नाटक नीा जनार्दन रघुनाथ असतांना बाळाजी लक्ष्मण फडणीस यास रु. ३०० तीनशें दिल्याची नोंद आहे. पे. द. जमाव रु. ७२

पे. द. रु. ४९० **सखंभट लक्ष्मण** (११–५) व (सं. क्र. २७)	**५४**	सु. १२१८ सवाल २१ श. १७३९ श्रावण व. ८ इ. १८१७ सप्टेंबर ४

रा. रा. कारकून नीा चिंतो वामन मामलेदार ताा रत्नागिरी गोसावी यांस सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार. सुा समानअशर मयातेन व अलफ सखो धोंडदेव नेने वाा वाडा सडीये मौजे पुसाळें कर्यात नेवरें तालुके मजकूर याणी सरसुभा पुण्याच्या मुकामीं विदीत केलें कीं सखंभट बिन लक्ष्मणभट पेंडसे वास्तव्य मौजे मजकूर यानीं आपले ठिकाणावर घर बांधून ठिकाणाची वहिवाट आम्हांस सांगितली त्याचे तोटयाबद्दल दरसाल रु. १० दहा आम्हास द्यावयाचे करार केले त्याप्रमाणें आम्ही दहापांच वर्षे वहिवाट केली. परंतु ठिकाणचे उपद्रवामुळें आमची खराबी बहोत जाहाली. सालगुदस्तां भुतानें घरही जाळीलें तेव्हां पेंडसे यांस सांगितलें कीं आम्ही जातो. तुमचे ठिकाण तुम्हीं सांभाळावें व गांवचे खोतास सांगून ठिकाण सोडीलें. आणि दुसरें शेत खंडोन राब केला. शेत तयार झालें तों आषाढ मासीं मौजे मजकूरचे खोत यानीं आम्हांस तगादा लाविला कीं पेस्तर सालचे दस्ताचे उगवणीचा जामीन देणें. त्यास ज्याचे ठिकाण त्याजपासून उगवणी करून घ्यावी असें सांगितलें असतां न ऐकितां आम्हापासून सीधे खर्च घेऊं लागले येविशीं आज्ञा होऊन ज्याचे ठिकाण त्याजपासून सरकार दस्ताची उगवणी करून घेऊन आमचे नांवे तगादा लाविल्यामुळें दुसरें शेत करावयाचें होतें तें राहीलें त्याची नुकसानी व तीन बैलांची खांद पेंडसे याजपासून भरून घेऊन आम्हास देववून आमचे बैल अटकावून ठेवले आहेत ते सोडून द्यावयाची आज्ञा झाली पाहिजे म्हणोन. त्यावरून हे पत्र सादर केलें असे तरी मौजे मजकूरचे ठिकाण पेंडसे याचे सखो धोंडदेव नेने याजकडे पेंडसे यानीं वहिवाटीस दिलें होतें ते त्यानीं मुलूख शिरस्ते प्रमाणें पेंडसे याचे हवालीं केलें असल्यास त्याजपासून सरकार

दस्ताची उगवणी करून घेण्याविषयीं खोतास ताकीद करणें व नेने याचे मागें ठिकाणाचे दस्ताचा तगादा लाविल्यामुळें दुसरें शेत नेने यानीं केलें होतें तें राहीलें असल्यास त्याची नुकसानी व बैलाचा खांद पेंडसे याजपासून भरून घेऊन नेने यास देववून त्याचे बैल अटकावून ठेविले असतील ते सोडून द्यावे जाणिजे छ २१ सवाल. पा हुजूर मोर्तब असे लेखन सीमा.

पे द. रो. रु. ९९
महादाजी बल्लाळ (१२–४) } **५५** { सु. ११७५ रजब २१ / श. १६९६ भाद्र. व. ८ / इ. १७७४ सप्टें. २८

खमस सबैन मया व अलफ रजब छ २१ महादाजी बल्लाळ पेंडसे महाजन व कृष्णंभट विद्वांस उपाध्ये धर्माधिकारी व विठलभट परांजपे व बाळाजी विश्वनाथ साठ्ये मौजे मुर्डी तर्फ केळशी तालुके सुवर्णदुर्ग यानी हुजूर विदीत केलें की मौजे मजकूरी दर्यागर्क खाजण आहे..म्हणोन मोरो बापूजी याचें नांवे सनद.

ऐतिहासिक क्रमांक १३ पहा. त्यांतही अशीच मागणी केलेली असून कौल दिला आहे.

पे. द. रो. रु. ५१
गणेश कृष्ण (१३–४) } **५६** { सु ११५५ रबिलावल १८ / श. १६७६ पौष व. ४ / इ. १७७५ जानेवारी २

रोजकीर्द स्वारी दादा मु. गणमुक्तेश्वर दफाते पत्र. रामचद्र§ बल्लाळ कमाविसदार सरकार **खरगोण** व हांडे यास पत्र कीं गणेश कृष्ण **कारकून दीा स्वारी** यास सरकार मजकूरीं सरकारचे मक्तेयाशिवाय साल गुा आसामी रुपये २०० दोनशें रुपयांची करार करून दिले आहे. त्याची सनद गणेश‡ संभाजी याचे नांवे सादर आहे त्याप्रमाणें करार आहे तर सदरहू २०० दोनशे रुपये नक्त यासी द्यावे साल दरसाल पावीत जाणे. म्हणोन रा चिठी पत्र १

पे. द. रो. रु. ५२
गणेश कृष्ण (१३–४) } **५७** { सु. १११५ साबान छ ५ / श. १६७७ अधिक ज्येष्ठ शु. ६ / इ. १७७५ मे १७

स्वारी राजश्री दादा दफाते पत्र. महादजी नारायण नोा गणेश कृष्ण यास पा दसकुरई उर्फ हवेली आमदाबाद येथें सरकारचें मक्तेयाशिवाय सालीना आसामी रु.२०० अक्षरी दोनशें करार करून देवविले त्याची सनद पेशजी राजश्री

§ भुसकुटे. ‡ खांडेकर.

दामोदर महादेव व देवराव* महादेव यांचे नांवें सादर आहे. त्यास हल्लीं त्याजकडून **मामलत** दूर करून तुम्हांकडे जाहली आहे याकरिता हे आज्ञापत्र सादर केलें असे. पेशजीप्रमाणें दोनशें रुपये करार करून देवविले असेत. सरकारचे मक्त्याशिवाय साल दरसाल देत जाणें म्हणोन मोरो शंकर कमाविसदार यास सनद.

पे. द. कोंकण जमाव रु. ४३२ } **५८** { सु. ११५६ मोहरम १०, श. १६७७ आश्विन शु. १३, इ. १७५५ ऑक्टोबर १७

गणेश कृष्ण (१३–४)

राजश्री राणोजी बालकवडे गोसावी यास अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद सुा सीत खमसेन मया अलफ बाा देणे राजश्री गणेश कृष्ण‡ **दफ्तरदार** बाा स्वारी यास तांदूळ बारीक साडेतीसेरी मापें कैली खंडी

२ बाा पेशजी
३ जास्ती साल मजकुरापासून

५ एकूण पांच खंडी तांदूळ बारीक देवविले असेत प्रांत राजपुरीपैकीं साल दरसाल पाववीत जाणे. ताजे सनदेचा उजूर न करणें जाणिजे छ १० मोहरम असल सनद रामचंद्रपंत धारप यांजवळ आहे.

पे. द. कोंकण जमाव रु. ४३२ } **५९** { सु. ११६४ जमादिलाखर १, श. १६८५ मार्गशीर्ष शु. ३, इ. १७६३ डिसेंबर ७

कृष्णाजी गणेश (१३–५)

राजश्री राणोजी बालकवडे गोसावी यास अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद सुा अर्बा सीतैन मया व अलफ. गणेश कृष्ण दपतरदार यासी प्रांत राजपुरी पैकीं तांदूळ पांच खंडी पावत होते त्यास ते मृत्यु पावले. सबब त्याचे पुत्र राजश्री कृष्णाजी गणेश दप्तरदार यासी सदरहुपैकीं साल मजकुरापासून तांदूळ बारीक कैली मापी खंडी दोन २ करार करून देवविले असे. प्रांत राजपुरीपैकीं साल दरसाल पाववीत जाणे. दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें जाणीजे छ १ जमादिलाखर. बहूत काय लिहीणे मोर्तब.

---

* हिंगणे. देवराव = दिवाकर. पेशव्यांचे नाशीकचे तीर्थोपाध्याय व मराठ्यांचे दिल्लींतील वकील.

‡ श. १६८८ चे कल्याण सुभ्याचे कागदांत यांस दफ्तरदार म्हटलें आहे. तेथें यांचा पुत्र कृष्णाजी गणेश याचाही उल्लेख आहे. (पे. द. रु. ११२४).

पे. द. घडणी रु. ३९४
कृष्णाजी गणेश (१३–५) } **६०** { सु....३ रमजान १३

रोजकीर्द स्वारी पंतप्रधान सु. सलास....सरंजाम निा कृष्णाजी गणेश कारकून नीसबत दफतर दफाते पत्र

छ १३ रमजान मशारनिल्हे याची आसामी पोा बलसाड प्रांत गुजराथ येथें पेशजीपासून आहे. वेतन सालीना ३०० तीनशें आहे त्यास पो मार तुम्हांकडे फौजेच्या सरंजामास दिला तेव्हां सदरहु ३०० तीनशें रुपये सरंजामाचे बेरजेंत वजा केले असतां त्यास न द्यावयास कारण काय. हल्लीं हें पत्र सादर केलें असे. तरी पेशजी वेहडेयास ३०० तीनशें नेमणूक आहे त्याप्रमाणें मशारनिल्हेस देत जाणे म्हणोन पत्र १ एक चिटणीसी.

पे. द. घडणी रु. ३९४ .
कृष्णाजी गणेश (१३–५) } **६१** { सु. ११७४ जमादिलावल २३ / श. १६९५ श्रावण व. १० / इ. १७७३ ऑगस्ट १३

सरंजाम नीाा कृष्णाजी गणेश पेंडसे नीाा दफ्तर दफाते पत्र. रोजकीर्द स्वारी पंतप्रधान सुाा आरबा सबैन छ २३ जमादिलावल महालानिहाय प्रांत अंतरवेद येथील **मजमू** पेशजी गणेश कृष्ण याजकडे होती त्यास ते मृत्य पावले सबब त्यांचे पुत्र कृष्णाजी गणेश दीमत राजश्री बाळाजी जनार्दन व मोरो बाबूराव फडणीस याचे नाव करार करून वेतन सालीना रुपये २००० दोन हजार समाईक पेशजी होते त्यास साल मजकुरापासून हिसेरसीत अजमासे महालावर नेमणूक वेतनाची करार करून दिली असे तरी मशारनिल्हेचे तरफेनें कारकून मजमूवर येईल त्याचे हातें महालचे वाटण्याचें व शिबंदीचे वगैरे कुलकामकाज घेऊन नेमणुकीप्रमाणें वेतन सालीना पावीत जाणे म्हणोन सनदा.

१ हरी बाबाजी कमाविसदार पोा इटावे याचे नांवे सनद कीं मजमूचें वेतन हल्लीं रुपये ९०० नउशें करार केले असे तरी मजमूचें कामकाज घेऊन वेतन पावीत जाणें म्हणोन सदरहु अन्वये सनद.

१ तुकोजी होळकर याचे नांवे सनद कीं पोा सकुराबाद व पोा फपूद येथील मजमूचे वेतन तुम्हांकडून नेमणूक घ्यावयाची येणेप्रमाणें रुपये

६५०	पो सकुराबाद
५०	पो फपुदपैकीं तनखा तुम्हाकडे आहे त्यापैकीं रुपये
७००	

तरी कामकाज घेऊन वेतन पावीत जाणें म्हणोन सदरहू अन्वयें सनद.

१ महादजी शिंदे याचे नावे सनद कीं पोा फपूद येथील मजमूचे वेतन तुम्हा-कडून द्यावयाचे रुपये ४०० चारशें करार केले असे तरी कामकाज घेऊन वेतन देत जाणे म्हणून सदरहू अन्वयें सनद.

पे. द. घडणी रु. ३९४

कृष्णाजी गणेश (१३–५)

६२

सु. ११७७ जमादिलाखर २९
श. १६९८ अधिक भाद्रपद शु. १
इ. १७७६ आगस्ट १५

रोजकीर्द स्वारी राजश्री पंतप्रधान सुाा सबा सबैन सरंजाम नीाा कृष्णाजी गणेश निाा परकाले मंडळ दफाते पत्र छ २९ जमादिलाखर मु. पुणें विद्यमान जनार्दन आपाजी मशारनिल्हे याचा जिन्नस मौजे खोपी ताा खेडबारे येथें भरून आणतील त्याचे जकातीविशी साा गुाा प्रमाणें सालमजकुरी दस्तकें

१ प्राा दस्तक गल्ला हर जिन्नस खंडी १० पोाा इंदापूर येथून व बारामती-हून वगैरे जागाहून खरेदी करून आणतील त्याविषयीं.

१ प्राा दस्तक ताा खंडी २ दोन खेाा फिरंगाण कोंकणांतून भरून आणतील त्याविषयीं सदरहू तांदूळाचे जकातीचा आकार होईल तो बाा मुाा धरावा. येणेंप्रमाणें करार असे

२ एकूण दोन दस्तकें दिली असेत छ १ जाावल

पे. द. घडणी रु. ३९४

कृष्णाजी गणेश (१३–५)

६३

सु. ११७७ जिल्हेज २३
श. १६९८ पौष व. ९
इ. १७७७ फेब्रूआरी २

रोजकीर्द स्वारी राजश्री पंतप्रधान सुाा सबा सबैन सरंजाम नीाा कृष्णाजी गणेश दफाते पत्र छ २३ जिल्हेज तर्फ वनखल प्राा कल्याण ताा विसापूर येथील फडणिशी पेशजी विसाजी नारायण याजकडे होती त्यास ते तोतयास मिळाले सबब त्याजकडून दूर करून हल्ली सालमजकुरापासून मशारनिल्हेस सांगून तयनात सालीना पेशजीचे मोइनीप्रमाणें रुपये ५० पन्नास करार करून देऊन पाठविले असत तरी तर्फ मजकूरचे फडणीसीचें कामकाज त्याज-पासून घेऊन वेतन सदरहूप्रमाणें पाववीत जाणें म्हणोन रवा सांवत भोसले व केसो‡ बावाजी याचे नांवे सनद.

---

‡ हा केसो बावाजी विसापूर किल्ल्याचा अंमलदार होता. स. मा. रो. भाग २ पृ. १४४.

पे. द. रो. घडणी रु. ३९४ **कृष्णाजी गणेश** (१३–५)	**६४**	सु. ११८१ सवाल २२ श. १७०२ आश्विन व. ८ इ. १७८० आक्टोबर २१

रोजकीर्द स्वारी राजश्री पंतप्रधान सु. इहिदे समानीन सरंजाम नीा कृष्णाजी गणेश कारकून नीा दफतर. दफाते पत्र छ २२ सवाल मशारनिल्हे यास साल गुदस्तप्रमाणे सालमजकुरी गवत पुळे २००० दोन हजार देवविले असे तरी गंजीपैकीं देणे म्हणोन शिवराम‡ रघुनाथ याचे नांवे सनद.

पे. द. जमाव कोंकण रु. ४८१ **कृष्णाजी गणेश** (१३–५)	**६५**	सु. ११८८ श. १७०९ इ. १७८७

हिशोब मौजे कागू तर्फ नातूपालवण नीा कृष्णाजी गणेश पेंडसे कागू सुा समान समानीन मया व अलफ

जमा

१२०॥ उत्पन्न गावपैकी

२० कारकुनी तर्फ मजकूर भातखंडी १ एक

१४०॥

गल्ला कैली २०। २। १॥

६६

यादी **कृष्णाजी गणेश पेंडसे** कारकून नीा दफ्तर यांजकडे आसामी

८८१ **हुजूरची आसामी**

७०० ऐन नक्त

६०० हुजूरून

१०० शेतसारा

१२१ दिवट्या

६० कापड

८८१

---

‡ ह्या सनदेंत गांवाचा निर्देश नाहीं. पण सनदेंतील व्यक्तिनांवावरून हें गवत पुण्यांतूनच व पेशव्यांच्या खाजगीकडूनच मिळावयाचें असें दिसतें. कारण शिवराम रघुनाथ हा खाजगीकडील कामदार असल्याचें स. मा. रो. भा. १ पृ. ९९ वरून वाटतें.

३०० पाा बलसाड

१५० जकात तापी दक्षीण तीर

१५० पाा पारनेरा प्राा येथील फडणीसी

२०० पाा दसकुरई प्राा गुजराथ

१०० सेत सनद मौजे भीलवलें व मौजे कासरोली ताा वनखैल व मौजे नवोढे.

१७८१

२७५ पोाा मु(दु)डासे तालुके अहमदाबाद
१५० केसो राम मजमदार
१२५ गोविंद हरी फडणीस
२७५

५०० पाा शहापूर अकदापूर येथील दफतरदारी नीाा गणेश कृष्ण याजकडील विसाजी हरी

झाडा सरंजामी गांव वगैरे नीाा गणेश कृष्ण पेंडसे सु. स. तीसा खमसेन मया व अलफ

६०५। पाा नाशीक पोा बाा हिशेब सन सबा मौजे गंगापूर कुल आकार रुपये ७५६॥। पोा वजा मुकासी नाा पवार रुपये १५१॥ बाकी

पे. द. घडणी रु. ३९८

गणेश कृष्ण (१३–६)

६७

सु. ११९० जमादिलावल ४
श. १७११ माघ शु. ५
इ. १७९० जानेवारी २०

स्वारी राजश्री पंतप्रधान सु. तीसेन मया व अलफ सरंजाम नीाा गणेश कृष्ण पेंडसे कारकून नीाा चालतें दफतर दफातें पत्र.

छ ४ जमादिलावल मशारनिल्हे याचे तीर्थरूप कृष्णाजी गणेश पेंडसे यास जकातीविशी दस्तकें सालाबाद पावतात त्यास ते मृत्य पावले सबब त्यांचे पुत्र मशारनिल्हे यांचें नांवे साल मजकुरापासून जकातीविसी दस्तकें.

२ तांदूळ व मीठ बैल सर ५० खोा फिरंगाण कोंकणातून पुण्यास आणीत होते त्याप्रमाणें साल मजकूरापासून बैल सर ४० येाा दस्तकें.
१ प्राा खंडी १ येाा बैल सर १०
१ प्राा खंडी ३ येाा बैल सर ३०
२ ४०

१ तेल व तूप जोडया ६ पो सालमजकूरापासून तेल तूप जोडया ४ देशाहून हरएक जागाहून खो करून हरएक पुण्यास आणतील त्यास जकातीविशी दस्तक.

पे. द. रो. १३७ } **६८** { सु. ११९० जमादिलावल २८
गणेश कृष्ण (१३–६) श. १७११ माघ व. ३०
इ. १७९० फेब्रुआरी १३

रोजकीर्द पंत प्रधान सु. तीसैन माहे जोावल तेरीख २८ माघ व. ३० मंदवासरे शके १७११ सौम्यनाम संवच्छरे मुा पुणे दफातें पत्र.
गणेश कृष्ण पेंडसे कारकून नीा दप्तर यांचे तीर्थरूप कृष्णाजी गणेशयाजकडे महालच्या असाम्या वगैरे चालत होते ते मृत्य‡ पावले सा याचे नांवे असाम्या वगैरे पेशजी प्रमाणे करार करून दिले येविशी सनदा.

४ असाम्याविशी सनद कीं मारनिल्हे यांजकडून कारकून येतील त्यांच्या हातें दरकाचें कामकाज घेऊन वेतन पाववीत जाणे म्हणोन सनदा.

२ आनंदराव भिकार्जी कादार पाा बलसाड व भूतसर व बोहारी व पाा पारनेरा यांचे नांवे सनदा.

१ पाा बलसाड व भूतसर व बोहारी येथील असाम्या वेतन सालीना
१५० फडणीशी
३०० दप्तरदारी खेरीज जाबता
———
४५०

साडेचारशें येविशीं सनद

१ पाा पारनेरा येथील फडणीशी वेतन सालीना दिडशे १५०.

दीडशे येविशी सनद.

१ तुळशीदास नानाशेट कादार जकात तापी दक्षीण तीर याचे नावे सनद कीं जकात मजकूर येथील दप्तरदारी वेतन सालीना रु. १५०.

१ भिकाजी गोविंद याचे नांवे सनद कीं ताा वनखल तालुके विसापूर येथील दप्तरदारी सालीना वेतन रु. ५० पन्नास तालुके मजकूरचे बेहेडयास नेमणूक आहे त्याप्रमाणें करार केले असत. पाववीत जावे म्हणोन सनद

४

---

‡ तात्या पेंडसे यांस माघ व. ३ स देवाज्ञा झाली. शक १७११. (काव्येतिहास–संग्रह, ऐतिहासिक लेख, पत्रें, यादी वगैरे लेख द्वितीयावृत्ति पृष्ठ ४७१ ले ४९० [४९२].)

१ बाबुराव पासलकर याचे नांवे सनद कीं मशारनिल्हे यास तालुके अवचितगड पो॥ तांदूळ बारीक बारुळे साडेतीसेरी मापे खंडी ३ तीन खंडी पेशजी प्रो॥ द्यावयाचे करार केले असत. तालुके मजकूरपैकीं साल दरसाल देत जाणे म्हणोन सनद.

१ भिकाजी गोविंद याचे नांवे सनद कीं मारनिल्हे यास मौजे भिलवले ता॥ वनखल तालुके विसापूर पैकीं तयनातेत पेशजी प्रो॥ सेत सनद रु. १०० शंभरचे करार करून दिले असत. सदरहू १०० शंभर रुपये सेत सनद चालवून बद्दल मु॥ खर्च लिहीत जाणें म्हणून सनद.

१ आनंदराव विश्वनाथ यांचे नांवे सनद कीं मारनिल्हे यास प्रा॥ जुनर पैकीं गवत पुळें सु॥ ५००० पांच हजार पेशजी प्रो॥ द्यावयाचे करार केले असे तरी मारनिल्हेयास सदरहू ५००० पांच हजार गवत दरसाल पाववीत जाणें म्हणोन सनद.

७ रसानगी तयनात जावता.

पे. द. रो. रु. १५९　} ६१ {　सु. १२०० जमादिलावल २८
गणेश कृष्ण (१३–६)　　　　श. १७२१ आश्विन व. ३०
　　　　　　　　　　　　इ. १७९९ आक्टोबर २८

दफाते पत्र आश्विन व. ३० शक १७२१ इंदुवासर तेरीख २८ जमादिलावल पेठ सदाशिव शहर पुणें येथें गणेश कृष्ण पेंडसे यांची जागा होती ती ते खरेदी करून घेतली त्याचे कबाल्याचा व शेल्याचा आकार शिरस्ते प्रो॥ होईल त्यापैकीं निमे माफ खर्च व बद्दल मुशाहिरा खर्च लिहावयाविशीं सनदा

३ रामचंद्र महादेव कमाविसदार कोतवाली शहर पुणें याचे नांवे कीं कबाल्याचा आकार कोतवाली शहर मजकूर येथील हिशेबी खर्च लिहून खरेदीपत्र पाहून कबालपत्र करून देणें म्हणोन सनदा.

१ रामाजी कोन्हेर कारकून गाडदी दी॥ मुसा मोअम याणी जाग्यापैकीं ऐन जागा लांबी × × किंमत रु. १५५६ घेतली येविशी.

१ विनायक नारायण घांगरेकर कारकून दी॥ शहामीरखान रोहिले गाडदी यानी जाग्यापैकीं × × किंमत रु. १५३८ येविशी

१ नारो गणेश लिमये कारकून नी॥ दपतर यानी × × किंमत रु. १२४९ × × त्याचे कबाल्या आकारपैकीं निमे माफ निमे मशारनिल्हेचे चुलतबंधू बापूजी भिकाजी कारकून पागा दी॥ गंगाधर गणेश याचे नावे लिहावयाविशी.

३ आबाजी बल्लाळ ठोसर कमाविसदार पेठ सदाशिव शहर मजकूर याचे नावें कीं शेल्याचा आकार पेठ मजकूर येथील हिशेबी खर्च लिहिणे म्हणोन सदरहू अन्वये.

पे. द. रु. ६५५

गणेश कृष्ण (१३–६)

७०

सु. १२०१ साबान २०
श. १७२२ पौष व. ६
इ. १८०१ जानेवारी ६

गणेश कृष्ण पेंडसे कारकून नीा दफ्तर यास ताा अवचितगडपैकीं तांदूळ बारीक खंडी तीन एकूण भात साडेतीसेरी मापें खंडी सहाची नेमणूक आहे त्याप्रमाणें सालाबाद पावत असतां हल्ली तुम्हीं सनदेचा आक्षेप केला आहे म्हणोन विदीत जाहालें त्यावरून हे सनद सादर केली असे तरी सदरहू तीन खंडी तांदूळ सालाबाद बेहेडयाचे नेमणूकी प्रो माारनिल्हे यास पाववीत जाणे म्हणोन कृष्णाजी बल्लाळ मामलेदार ताा मजकूर याचे नांवे छ २० साबान सनद १

पे. द रो. रु. ६५५

गणेश कृष्ण (१३–६)

७१

सु. १२०४ रजब २७
श. १७२५ कार्तिक व. १४
इ. १८०३ नोव्हेंबर १३

सु. आरबा मयातेन व अलफ छ २७ माहे रजब गणेश कृष्ण पेंडसे कारकून नीा चालतें दफतर यास तयनात पो. ताा वनखल प्रांत कल्याण सरंजाम किल्ले विसापूर येथें सेत सनद रुपये १०० एकशे रुपयाची दरसाल नेमणूक आहे त्यास माारनिल्हे खासास्वारी पुण्यास आली असतां गैरहजीर जहाले सबब सेत सनद द्यावयाची मना करून हे सनद सादर केली असे तरी सदरहू १०० एकशें रुपये सेत सनद बाा हजूर पावते करून जाब घेणे म्हणोन खंडेराव नीळकंठ मामलेदार किल्ले मजकूर यास सनद.

पे. द. जमाव रु. ४८०
नारायणभट (१४–५)
हरी महाजन (९–४)

७२

सु. स. ११२२ जमादिलाखर २५
शक. १६४३
स. १७२१

देशकुळकर्णी कार्ले यांचे देशकुळकर्ण्याबदलचें निवाडपत्र छ. २५ जमादिलाखर इसने अशरीन मया व अलफ चें आहे त्यावर खालील दोन सह्या आहेत.

नारायणभट पेंडसे पंडित वास्तव कसबें खेड यानीं आपलें नांव स्वाक्षरी लिहिलें असे.

हरी महाजन कसबे केळशी.

नारायणभट हे घराणे १४–५ व हरी महाजन हे घराणे ९–१ किंवा ९–४ असावेत.

पे. द. जमाव रु. ५०२
गणेश परशुराम (१४–५)
चिंतामण रामभट (१४–५)

७३

सु.स. ११९४
श. १७१५
इ. १७९३

हिशेब सुभा प्रांत महिपतगड विद्यमान नारो नीळकंठ कमाबिसदार स. सुा अर्बा तीसैन मया व अलफ ह्मा छ २४ सवाल अवलसाल ताा छ ६ जिल्काद अखेर साल.

धर्मादाय भट यांस

४ गणेशभट पेंडसे यास भात कैली ।। बारुळे मापें

२॥–॥। चिंतामणभट पेंडसे वाा मेटे यास नेमणूक.

१ नक्त

१॥–॥। भात कैली ८=

२॥–॥।

हे गणेशभट व चिंतामणिभट घराणें १४ पिढी ५ चे असावेत.

पे. द. रो. रु. ६५३
नारंभट परशुराम (१४–५)

७४

सु. ११७८ सफर २६
श. १६९९ फाल्गुन व. १३
इ. १७७८ मार्च २६

वेाा राा नारंभट पेंडसे वास्तव्य कसबें खेड ता. सुवर्णदुर्ग यानी हुजूर विदीत केले कीं आपणास कसबें मजकूर पैकीं सालाबाद पावत असते

२००० गवत पुळे

२०० पेंढे

२२००

त्यास सालमजकुरीं मोरो बापूजी सदरहूप्रमाणें द्यावयास दिकत करीतात, येविषयीं ताकीद झाली पाहिजे म्हणोन त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी सालाबाद पावते त्याबरहुकूम दरसाल वेदमूर्तीस देत जाणें म्हणोन मोरो* बापूजी यांचे नांवे चिटणीसी पत्र. छ १७ सफर

---

* हा ह्या जागेवर श. १६९५ ज्येष्ठ (स. १७७३ जून) पासून आहे. स. मा. रो. भा. १ पृ. ५०.

पे. द. रो. रु. ९८ **भिकंभट** (१४–६)	**७५**	सु. ११७५ × छ. २९ श. १६९६ इ. १७७४

रोजकीर्द सुाा खमस सबैन मया व अलफ छ २९ दुतोंड्या मारुतीचे देऊळ नासीक रामकुंडासन्निध आहे त्यास प्रदक्षणा करणारे ब्राह्मण

.. .. ..

भिकंभट पेंडसे नासीककर

.. .. ..

हे भिकंभट घराणे १४ पिढी ६ मधील भिकंभट नारायण ऊर्फ भास्कर असावेत.

तारळेकर महाडिक घराण्यांतील कागद भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष २१ अंक ३ पृ. २४०–२४१ **महादेवभट** (१४–) **बाळकृष्णभट** (१४–)	**७६**	श. १६१९ आषाढ शु. १३ इ. १६९७ जून २१

स्वस्ति श्री नृपशालिवाहान शके १६१९ ईश्वरनाम सवछरे अषाढ शुद्ध त्रयोदसी इंदुवासरे तदिनी वेदमूर्ति महादेवभट व बाळकृष्णभट पेंडशे पुरोहित यासी माणकोजी राजे महाडीक दंडवत विनंती उपरी तुम्हास वर्षासन पुरोहितपणाचे रुपये १२८ वारा रुपये रास केले आहेती वर्षाप्रति प्रविष्ट करीत जाऊ हे विनंति* (फारसी दोन वर्तुली १६ बुरुजी मुद्रा)

तारळेकर महाडिक घराण्यांतील कागद–भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष २१ अंक ३ पृ. २४१ **बाळकृष्णभट** (१४–)	**७७**	श. १६१९ आश्विन शु. ८ इ. १६९७ सप्टें. १३

दानपत्र वेदमूर्ति बालकृष्णभट पुरोहित यासीप्रति राजेश्री प्रतापजी राजे माहाडिक दंडवत सुहुर सन ११०७ सन समान तिसैन अलफ तुम्हास कसबे बविडे प्रा इंदापूर येथील जमीन चावर—दिल्ही असे आपली जोपरियत जाहगीर आहे तोपरियंत तुम्ही कबर्द (कीर्द) करून सुख असणे रा छ ७ रबिलावल शके १६१९ विस्वरनाम संवछर मोर्तब सुद (फारसी अष्टबुर्जी मोर्तब)

---

* पत्राच्या बाजूला आलमगीर बादशहाच्या नांवाचा फारसी सिक्का व शेवटी फारसी मोर्तब.

पे. द. रु. ११२

बाबुराव राम (२०–५)

७८

सु. ११७८ सफर २६
श. १६९९ फाल्गुन व. १३ गुरु.
इ. १७७८ मार्च २६

बाबुराव राम पेंडसे याणी कोठें फंदफितूर करूं नये आपले गांवीं कोंकणांत जाऊन राहावें याप्रमाणें करार करून मशारनिल्हे बरोबर सरकारची माणसें देऊन तुम्हांकडे पाठविले आहेत. याजपासून हजीर जामीन चांगला घेऊन जामीन कतबा तेथें ठेऊन जामीन कोण घेतला तो हुजूर लिहून पाठविणें ते आपलें गांवीं खोतीचे वतनावर मौजे वणोशी तर्फ पंचनदी ता. सुवर्णदुर्ग येथें राहतील त्यास मशारनिल्हेचे वतनाचा भोगवटा सन सीत सीतैनापावेतों चालला. अलिकडे याचे तीर्थरूप शांत झाले हे रोजगारामुळें देशांत होते. सबब भोगवटा चालला नाहीं म्हणून हुजूर विदीत केले त्यास सुदामतप्रमाणें भोगवटा चालत आला असेल तो मनास आणून वाजवी असेल त्याप्रो मौजे मजकूरचें खोतीचें कामकाज याचें हातें घेत जाणे मशारनिल्हे गांवी राहतील तेव्हां कर्जदार यास येऊन तगादा करतील तरी तगादा तूर्त करूं न देणें. पुढें सोई सोईनें पैक्याचाहि निकाल करतील. म्हणोन ताकीद करणें म्हणोन मोरो बापूजी तालुके मजकूर यांचे नांवे छ २३ जिल्हेज सनद १

पे. द. जमाव रु. ४८१

मोरो बाबूराव (२०–६)

७९

सु. १२११ सवाल २०
श. १७३२ कार्तिक व. ७
इ. १८१० नोव्हेंबर १८

अजस्वारी राजश्री सदाशिव माणकेश्वर सुभेदार प्रांत जंजीरे सुवर्णदुर्ग तो रयान मौजे वणोसी ताा पंचनदी सुाा इहिदे अशर मयातैन व अलफ मौजे मजकूर येथील वतनदार खोत परागंदा आहे. कांहीं दिवस कमाविस धोंडजोशी पंचनदीकर करीत होते. अलीकडे पेंडसे फडके यांचे कारकिर्दीपासून चालवितात त्याची जप्ती करून मौजे मजकूरची वहिवाट सरकारात ठेविली पाहिजे म्हणोन पुणेयाच्या मुकामी विदीत झालें त्यावरून मौजे मजकूरची जप्ती करून जप्तीचें काम........याज-कडे सांगोन तुम्हांस आज्ञा केली असे. मशारनिल्हे जप्तीची वहिवाट करून सरकार दस्ताची उगवणी करून सरकारांत जमा करतील तुम्ही यांचे रजातलबेंत वर्तोन कीर्द महामुरा करीत जाणें जाणीजे छ २० सवाल.

पे. द. रो. रु. ६४९
बहिरंभट
नारंभट
गोविंद

८०

सु. ११३८ जमादिलावल २४
श. १६५९ भाद्रपद व. ११
इ. १७३७ सप्टेंबर ९

रोजकीर्द दफाते सुा समान सलामीन मया व अलफ छ २४ जमादिलावल चि. राजश्री बाळाजी* बाजीराव यास पत्र कीं मौजे कौठंबें व ××× पाा नसरापूर प्रांत कल्याण ××× या ××× गांवीं ब्राह्मणास शेती करावयास जमीन दिली आहे

जमीन बिघे ४६

किता बिघे

.. .. ..

१ बहिरंभट पेंडसे

२ नारंभट पेंडसे

१ गोविंद पेंडसे

.. .. ..

४६ एकंदर बिघे

एकूण बासष्ट आसामी यास बिघे जमीन दिली आहे आकार होईल तो ब्राह्मणाचे नांवे धर्मादाव असे लिहिणें....गांव खेरीज पाा मजकुरी व ताा बोरटी व प्रांत मजकुरी जेथें ज्यास अनुकूल पडेल तेथें पडजमीनींत शेती करतील त्याचा आकार होईल तो कुलबाब कुलकानू खेरीज हक्कदार साल दरसाल खर्च लिहित जाणे याची प्रत लिहून घेऊन हें पत्र ब्राह्मणास परतून देणें म्हणोन.

पे. द. रो. रु. ६४९
बहिरंभट
नारंभट
गोविंद

८१

सु. ११४९ जिल्हेज ६
श. १६७० मार्गशीर्ष शु. ८
इ. १७४८ नवंबर १७

रोजकीर्द तीसा आरबैन मया व अलफ छ ६ जिल्हेज सन समान सलासीनामध्यें कोठंबें व ×××येथें ब्राह्मणांस शेत करावयास जमीन दिली त्यास ते सनद जीर्ण झाली. यास्तव हल्ली ब्राह्मण हुजूर येऊन विनंती केली त्यावरून त्याप्रमाणे नवी सनद

(जुन्या सनदेंत पेंडसे यांचीं जीं नांवे आहेत तींच यांत आहेत.)

पे. द. रो. रु. ९८१
रामभट
वासुदेवभट
नारायणभट

८२

सु. ११७१
श. १६९२
इ. १७७०

* बाजीरावाचेच कारकीर्दीत हा कारभारावर आहे. चिमाजीअप्पाबरोबर स्वारींत हा गतवर्षींच गेला आहे. पण दप्तरीकामहि हा एव्हांपासून पाहत आहे.

ब्राह्मण वास्तव्य मौजे कोंठिंबे ता वाकस खुद सेते खरीफ जमीन

	बिघे	यो आकार
रामभट अग्निहोत्री	-॥।=॥	३।-
वासुदेवभट अग्निहोत्री	१॥-।॥	६॥
नारायणभट अग्निहोत्री	१।॥-॥	८०-
× × ×	×	×
आसामी २१	३०॥=॥	१३२

पे. द. रु. १४२

बाळाजी वासुदेव (२६–३)

८३

सु. ११९३ रबिलाखर १४
श. १७१४ मार्गशीर्ष व. १ गुरु.
स. १७९२ नवंबर २९

रोजकीर्द सु. सलास तिसैन माहे रबिलाखर तेरिख १४ रोज मार्गशीर्ष वा १ गुरुवासरे शके १७१४ परिधावी नाम संवत्सरे मु. कसबे पुणे छ. १४ दफाते बाळाजी वासुदेव पेंडसे दीा सदाशिव धोंडदेव फडणीस पागा मोरो विश्वनाथ यानीं बालदीक्षित केळकर याजपासून पेठ सदाशिव येथें घर जागा इमल्यासुद्धां किमत रुपये १८७५ अठराशें पंच्याहत्तर खरेदी केले त्याचे कबजाचा आकार होईल तो सदाशिव धोंडदेव याचे नांवे तैनातपैकीं खर्च लिहून बाळाजी वासुदेव यास कबज-पत्र करून देणें म्हणून अनंदराव खिसमतगार कोतवाली शहर पुणे याचे नांवें सनद

पे. द. रु. रो. १४८

अनंतभट (२६–५)

८४

सु. स. ११९५ रमजान १८
श. १७१७ चैत्र व. ५ गुरुवार
स. १७९५ एप्रिल ९

वे. अनंतभट पेंडसे अग्निहोत्री श्रीवर्धनकर कुटुंबसुद्धां श्रीकाशींत राहातात सबब तेथील ब्राह्मणांचे वर्षासनाचे वाटणीबरोबर सन अर्बा समानीनांत एक साला ५० रुपये पावले आहेत त्याप्रमाणें दरसाल वर्षासन रुपये ५० द्यावयाचा करार केला असे तरी सर्व ब्राह्मणांबरोबर वर्षासन श्रीकाशींत पावेल म्हणोन भटजीचे नांवे.

छ १८ रमजान सनद

राघोबल्लाळ (३०–)
अनंतभट (२६–)

८५

पारसनीस संग्रह रु. ७३ फाईल १–४६१

रो विराजित रा. रा. **राघो बल्लाळ** पेंडसे मु. **पुणें** यांस प्रति गणेशभट गोडसे वेदोक्त आशीर्वाद येथील कुशल ता चैत्र वद्य ७ पो श्रीकाशीस येथास्थित

असो विशेष आम्ही देशीं होतो तेव्हां दोनचारदां भेट जाहाली होती हाली **अनंत भटजी** पेंडसे यांनीं सांगितलें कीं सुखरूप आहेत. ××आमचे चिरंजीव रघुनाथभट व अनंतभट आपणापाशीं येत असतात हें ऐकून संतोष झाला. ××आपण श्रीमंतांपाशी आहांत त्यास आमची जाग्याची विपत्य काशीवासाची फार आहे त्यास दरबारातून नाना फडणीस व आणिकांच्या हवेल्या येथें आहेत त्यास लहानमोठें स्थळ आम्हांस नैवेद्य व वैश्वदेव होय ऐसें योजून एखादें लिहून पाठविलें पाहिजे. तुम्ही आमचे येजमान व आप्तविषयी स्नेही सर्व तुम्हींच चालविलें आहे××दोघे चिरंजीव हल्लीं लिहीणार बरेच जाहाले आहेत त्यास आपले हाताखाली ठेऊन लहानमोठी सोय करून द्यावी.

पे. द. जमाव रु. ४८०
बापूजी हरी महाजन
गोविंद सदाशिव पेंडसे

} **८६** { सु. १२११ / श. १७३२ / स. १८१०

वरील दोघेजण केळशीं येथें रहात असल्याचा उल्लेख आहे.

संशोधनार्थ क्रमांक २४ खंड पहिला पृ. ३७० मध्यें बा(ळा)जी हरी केळशीस असल्याचे आढळतें. तो व बापूजी हरी ही व्यक्ति एक असण्याचा संभव आहे. गोविंद सदाशिव हें घराणें ८ पिढी ३ चे असतील काय ?

पे. द. रु. १८०
गोविंद हरी
कृष्णाजी गोविंद

} **८७** { श. १६८१ व १७३३

जंजिरे सुवर्णदुर्ग येथील हिशेबांत तालुक्यांतील हक्क वतनदार खटपटी म्हणून गांवोगांवचे लोकांस दिलेल्या रकमा खर्चीं पडल्या आहेत. त्यांत कसबा केळशीकरितां शक १६८१ मध्यें गोविंद हरी महाजन यास रु. २५ व शक १७३३ मध्यें कृष्णाजी गोविंद महाजन यास रु. २५ अशा नोंदी आहेत. पेंडसे हे केळशीचे महाजन आहेत. म्हणून हीं नांवें पेंडसे यांचीच आहेत. उपलब्ध वंशावळींत हीं नांवें आढळत नाहींत. कृष्णाजी गोविंद हा गोविंद हरीचा पुत्र असावा. हरी महाजन या नांवाचा उल्लेख ऐ. क्र. ७२ मध्यें शक १६४३ मधील आहे. म्हणून बाजूस दाखविल्याप्रमाणें वंशावळ असावी. कालदृष्टचा यास मेळ बसतो. कृष्णाजी गोविंद यांचा मुर्डीचे महाजनकीचे वादांत उल्लेख आला आहे तो हा कृष्णाजी गोविंद महाजन असावा. घराणें १२ पिढी ४ मधील नसावा.

हरी श. १६४३
|
गोविंद श. १६८१
|
कृष्ण श. १७३३

घराणें २८ चा मूळ पुरुष गोविंद आहे. हाच घराणें ३० चाहि मूळ पुरुष आहे असें आतां ठरलें आहे. तो हा गोविंद हरी महाजन असेल काय ? असल्यास घराणें ९ यांत हरी मूळ पुरुष आहे तो या गोविंदचा पिता असूं शकेल.

पे. द. रु ४५९
गोपाळपंत

८८

सु. १२१२
श. १७३३
स. १८११

जिल्काद २६ ताा सुवर्णदुर्ग तर्फ केळशीचे हिशेबांत खालील उल्लेख आहे—
गुाा गोपाळपंत पेंडसे ऐवज ४०० पैकीं ६५ चांदवड
३३१ कुर्शी

हा गोपाळपंत घराणें ७ पिढी ५ मधील गोपाळ भिकाजी असेल काय ? सुाा १२११ या सनांत केळशीस असलेल्या लोकांचे यादींत गोपाळभट महाजन याचें नांव आहे. यावरून हें अनुमान करणें बरोबर होईलसें वाटतें. गोविंदभट पेंडसे, गोपाळपंत पेंडसे व गोविंद हरी महाजन अशा तीन पद्धतीनें केळशी येथील पेंडसे यांचे उल्लेख जुन्या कागदांतून आढळतात. यावरून प्रत्यक्ष महाजनकीचा अधिकार ज्यास असेल त्यासच महाजन हा शब्द लावीत असावे व इतरास पेशाप्रमाणें भट किंवा पंत म्हणत असावे.

पे. द. रु. ४५९
वासुदेवभट
गंगाधरभट
नारायणभट

८९

सु. १२१२
श. १७३३
स. १८११

सुवर्णदुर्ग महाल पोता सदाशिव माणकेश्वर यांचे वेळीं खालील उल्लेख आढळतात.

रबिलावल छ १७ रु. १२५ परभारे पुणीयासी पांडुरंग महादेव जोशी यांची हुंडी वासुदेवभट पेंडसे यांजवर होती तिचा भरणा आला ते

" छ २४ रु. ५५ परभारें देणे गंगाधरभट पेंडसे यांनीं पुण्यांत देऊन मशारनिल्हेस येथें देविले ते माहे रबिलाखर अधिक वैशाखमास.

छ १ रु. ५१ परभारें देणें नारायणभट पेंडसे वास्तव्य गिम्हवणें यांनीं पुण्यास देऊन येथें घेतले ते रोख पोता

नारायणभट पेंडसे गिम्हवणें हें घराणें १८ मधील पिढी ८ चे नारायण बाळाजी असावेत.

पे. रो. रु. ९७
सदाशिव

९०

श. १६९६

तालुके अवचितगड येथें

१ सदाशिव पेंडसा वस्ती करचोंडे ता। सीमहाल

× ×

× ×

एकूण तीन असामीचीं घरें तालुका मजकुरीं आहेत ती जप्त करून मुलें माणसें कैद करून पक्के बंदोवस्तानें अटकेंत ठेवून पोटास शिधा सामग्री मध्यम प्रतीचा देणें व तिन्ही असामीची वस्तभाव जे असेल ते जप्तींत ठेवून जाप्ता हुजूर लेहून पाठवणें म्हणोन गणेश त्र्यंबक यास सनद छ १० मोहरम प्रा। रुबरु सनद १

यांतील सदाशिव हे सदाशिव भिकाजी (७–५) असावेत.

शं. ल. वैद्य यांचे संग्रहांतील
लक्ष्मणभट
आबाजी केशव

९१

सु. ११७० जमादिलावल.
श. १६९१ भाद्रपद.
इ. १७६९ सप्टेंबर

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री बाबूराव वैद्य स्वामीचे शेवेसी पो। लक्ष्मणभट पेंडसे सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावे विशेष बाळाजी महादेव याचे भावाची चिठी रु. ३७३९ सदतीसशें एकूणचाळीस रुपयांची होती त्यात आमचे रु. ६०० सहाशें होते तो ऐवज तुम्हाकडे आला तो ऐवज तुम्ही आम्हास दिल्हा बी तपशील.

३०० गु। गोपाळपंत देव नी। सदाशिवपंत जोग भाद्रपद वद्य त्याचे कबज अलाहिदा दिल्हे असे.

३०० गु। आबाजी केशव पेंडसे रोख मिती आश्विन वद्य ५

६००

सहासे रु. अरकट गजीकोट प्रत आमचे आम्हांस पावले शके १६९१ विरोधी नाम संवत्छरे बहूत काय लिहीणें हे विनंती.

या पत्रांतील लक्ष्मणभट म्हणजे लक्ष्मण केशव (१४–५) व आबाजी केशव म्हणजे महादेव (आबाजी) केशव (१४–५) आहेत.

चैत्र शु. १० शक १६९५ ला लक्ष्मण केशव पेंडसे मोरो गोविंदराम रीसबूड यांचे तर्फे जंजिरे वसई येथील जहाजाचे कामासंबंधांत असल्याचा उल्लेख पे. द. रु. ९४ मध्यें आढळतो. हा उल्लेख व वरील पत्र एकाच वर्षातील आहेत. रीसबूड हे मेटें या गांवचे खोत होते; त्यामुळें त्याच गांवचे लक्ष्मण केशव त्यांचेतर्फे कामावर गेल्याचें संभवनीय आहे. ऐ. क्र. ९३ मधील लक्ष्मणभट हेच असावेत.

गुंडभट महादेव संशो. क्र. १ } ९२ { सु. ११८३ जार २०
श. १७०५ वैशाख वद्य ५
स. १७८३ मार्च २४

मु. सलास समानीन मया व अलफ छ २० जमादिलावल वेदमूर्ती गुंडभट बिन महादेवभट उपनाम पेंडसे गोत्र जामदग्नि सूत्र आश्वलायन वास्तव्य क्षेत्र नरसीपूर यांनीं हुजूर कसबे पुणे मुक्कामीं येऊन विदीत केली की आपले सासरे धोंडभट परांजपे यांस पो। इंदापूर येथें वर्षासन १०० रुपये सरकारांतून पावत होते त्यास भटजीचा वृद्धापकाळ पोटीं पुत्रसंतान नाहीं आपण भटजीचे जांवई यास्तव सदरहू वर्षासनाचे दानपत्र त्यांनीं आमचे नांवे क्षेत्रीं लिहून दिलें उपरांती भटजीचा काळ झाल्यावर भटजीचे पत्राप्रमाणे वर्षासनाचा ऐवज कमाविसदार यांनीं आपणास द्यावा त्यास सरकार सनदेचा आक्षेप करितात याजकरितां स्वामींनीं कृपाळु होऊन आमचे सासरे यांनीं पत्र करून दिले आहे ते पाहून त्याप्रमाणें आमचे नांवे वर्षासन सरकारातून करार करून देऊन भोगवटचास सनद करून दिली पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणतां धोंडभट परांजपे यांस वर्षासन १०० रुपये प्रा। मजकूरपैकीं पावत होतें त्यास ते मृत्य पावले त्याचे पोटीं पुत्र नाहीं याजकरितां त्यांनीं आपले जांवई गुंडभट यास वर्षासनाचे दानपत्र करून दिलें तें पाहून हे थोर शिष्ट सत्पात्र याचें चालविल्यास श्रेयस्कर जाणोन याजवर कृपाळु होऊन सदरहू १०० रुपये वर्षासन पो। सालमजकुरापासून सरकारांतून प्रा। मजकुरी वर्षासन रुपये ५० करार करून देऊन हे सनद सादर केली असे तरी सदरहूप्रमाणें ५० रुपये वर्षासन भटजीस पो। मजकूरपैकी सालदरसाल देत जाणे प्रतिवर्षी ताजे सनदेचा आक्षेप न करणें या सनदेची प्रती लिहून घेऊन हे असल सनद भटजीजवळ भोगवटचास परतोन देणें.

९३

खालील व्यक्तींचे उल्लेख पेशवे दप्तरांतील कागद पहात असतांना आढळले. पूर्ण माहितीच्या अभावीं या व्यक्ती कोणत्या घराण्यांतील आहेत हें कळत नाहीं. तथापि कांहीं ठिकाणीं कोणत्या घराण्यांतील असण्याचा संभव आहे हें आम्हीं दर्शविलें आहे.

नांव	शक, मिति	विषय --कंसांतील आंकडे पेशवे दप्तरांतील रुमालाच्या क्रमांकाचे आहेत.
गोंविदभट	१७२८ आषाढ शु. ४	रु. २०२॥ सनगें व रु. १० दक्षणा दिली [रो. ४०]
,,	१६७१ वैशाख शु. १२	हरीहरेश्वर येथें पंधरा ब्राह्मणांना दक्षणा दिली त्यांत यांना ३०० रु. मिळाले.[रो. ४०]
नारायणभट श्रीवर्धनकर	१६९३ फाल्गुन शु. १	हरीहरेश्वरास अनुष्ठानास ब्राह्मण पाठविले त्यांत हे होते. [रो. ९१]
नारायणभट	१६९५	सौ. पार्वतीबाईकडून घुसलदान गुंडी दही भरून मिळालें [रो. ९६]
रामचंद्र गणेश	१७२१	यांचे मार्फत कुणबीण कृष्णी हीस लुगडी व चोळखणाबद्दल नक्त रुपये १६ दिले. [रो. १६०] घराणें १९ मधील पिढी ४ चे असावेत.
दामोदरभट	१७२१	वाडा बसणीपैकीं देणें हक्कदार म्हणून यांस -॥- धर्मादाव. [जमाव ४८२]
धोंडभट	१७३२ श्रावण	यांचे पुत्रास रुपये २०० दक्षणा दिली. [रो. २४१]. हे घराणें १८ पिढी ६ चे असावेत ?
वासुदेवभट नाशीककर	१७२८ आषाढ शु. ४	अर्धमासिकादि श्राद्धानिमित्त रु. ३० शिवाय धोतरजोडा रु. २॥=

नांव	शक, मिति	**विषय** —कंसांतील आंकडे पेशवे दप्तरांतील रुमालाच्या क्रमांकाचे आहेत.
राघो कृष्ण	१७३४ माघ	सीलकबंद माहालपोता तालुके सुवर्णदुर्ग रु. २८= म॥ काडीकुडी पोा मौजे विने ताा नातुपालवण गुाा [४६१]. घराणें १२ मधील पिढी ५ चे असावेत.
केशवभट	१७३४	वसूलबाकी तालुका सुवर्णदुर्ग रु. ५ शेत हेदलीपैकीं [४६१]
,,	१६७०	जनार्दन बाजीराव याचें उत्तरकार्यानिमित्त अकरावे दिवशीं अश्वदान मिळालें. [रो. ४०]
,,	१६७१ वैशाख शु. १२	रु. ४४ दक्षणा मिळाली. [रो. ४०]
बाळंभट	१६९१	पेशव्यांकडून धर्मादाव रु. २७ शेले साधे रु. १२ धोतरजोडा रु. ११ जनानी मुकटा. [रो. ८४]
,,	१६९५	त्र्यंबकेश्वर येथें अनुष्ठानास शिवकवच जपास ब्राह्मण पाठविले त्यांत होते. [रो. ९६]
,,	१६९७	नागेश्वरास अनुष्ठान केलें त्यांतील एक. [रो. १०१]
लक्ष्मणभट	१६९१ फाल्गुन व. ३०	राघोबादादांनीं त्र्यंबकेश्वरास रु. ९० दक्षणा दिली. [रो. ८६]. घराणें १४ पिढी ५ चे असावे. ऐ. क्र. ९१ पहा.
,,	१७०४ पौष शु. १	षड्ग्रहयोग शांत केली. त्यांत चंद्राप्रीत्यर्थ दान मिळालें. [रो. १२१]
,,	१७२०	गोविंद गणेश फडके यांनीं पेठ शुक्रवार, शहर पुणें येथें यांजपासून जागा इमलासुद्धां किं. रु. १२०० स खरेदी केली. [रो. ५६६] घराणें १ लें पिढी ४ किंवा घराणें १५ पिढी ३ चे असावे ?

नांव	शक, मिति	विषय —कंसांतील आंकडे पेशवे दप्तरांतील रुमालाच्या क्रमांकाचे आहेत.
कृष्णंभट	१६९५ आश्विन शु. ८	नारायणराव पेशवे यांचे उत्तरकार्यानिमित्त आतातपदान दक्षणा रु. १२ मिळाले. [रो. ९५]
,,	१६९६	रुद्रमंत्रेंकरून नमस्कार घालण्याबद्दल रु. ४३॥ मिळाले. [रो. ९७]
,,	१६९७ ज्येष्ठ	सहस्रचंडीचें अनुष्ठान केलें त्यासी कुंडमंडपी उत्तरद्वारीं रु. १० दक्षणा. [रो. १०१]
कृष्णंभट वसईकर **बाळकृष्णभट** करजगांवकर	१६९५ फाल्गुन शु. १	शिवसहस्रनाम, बेल वाहाणेंबद्दल रोज ०१४ प्रमाणें रु. १४ मिळाले. [रो. ९६]
कृष्णंभट अक्षी-नागांवकर	१७०४ आषाढ शु. ३	सौर सूक्तें करून दररोज एक हजार नमस्कार घालण्याप्रीत्यर्थ रु. ५९३। दररोज रु. १॥। प्रमाणें व ३॥ー धोतरजोडा, पंचपात्र व संध्येची पळीबद्दल मिळाले. [रो. १२१]
बाळकृष्णभट	१६९५	स्कंध जप, दररोज ऋचेची संख्या १२०० करण्याबद्दल रु. २१ मिळाले. [रो. ९६]
यादोभट	१७१५	मौजे टोकें तर्फ नेवासें येथील क्षेत्रस्थ ब्राह्मणांतील एक, दर घरांस रु. ४।=। अजमासें रु. ६०≡।।। मोकासा १।।।ー।। जागीर रु. ४।=।। [जमाव १४०८] घराणें १७ पिढी ३ अथवा घराणें ३१ पिढी ३ चे असतील.
त्र्यंबकभट	१६९७	जनार्दन बाजीराव यांचे पक्षानिमित्त रु. ७. [रो. १०३]
बगंभट	१७३३	यांची हुंडी मुंबईहून पुण्यास आली. रुपये परभारें येसोबा नाईक टेंभुर्णीकर यांजकडे देविले. रु. २२५० [४५९] घराणें १४ पिढी ६ वी चे गोविंद उर्फ बगं असतील काय ?

नांव	शक, मिति	**विषय** —कंसांतील आंकडे पेशवे दप्तरांतील रुमालाच्या क्रमांकाचे आहेत.
महादेवभट	१६७१ वैशाख शु. १२	विश्वासराव यांचे लग्नाप्रीत्यर्थ यांस रु. १४ तिवट रु.३३। जाफरखानी अशी सनगें मिळालीं. यांच्या मुलास रु. ७ मिळाले. [रो. ४०]
बाळंभट कृष्णंभट	१७५९	नागोठणें येथें यांजकडे दास्तानी भात ठेविलें त्याबद्दल भाडें रु. २२ मिळाले. [४१६]
आबाभट	१७०४ आषाढ शु. ३	रविप्रीत्यर्थ आरक्तवस्त्र दान मिळालें. [रो. १२१]
गोविंदभट	१६७६ आषाढ शु. ५	मौजे केळशी येथील ब्राह्मण म्हणून यास ८२ भात धर्मादाव मिळालें आहे. [६४९]
अन्नपूर्णाबाई	१७१०	सोमेश्वर येथें यांचें नांवावर शेतजमीन आहे. [जमाव ४९५]
बाळंभट	१७२८	मौजे जुआठी येथील हिशेबांत श्री. आपासाहेब यांचे हिशेबांत (रु. ३० बाळंभट पेंडसे) असा उल्लेख आहे. [५०४]

मुर्डीचे महाजनकीचे वादासंबंधी कागद

९४

याद कलमे मौजे मुर्डी गांव स्वतंत्रपणाची तावार. जबानी गोविंद कृष्ण पेंडसे.

सध्या चालतात दाखले

१ श्रीदुर्गा मुरुडचें यात्रेचें पत्र येतें.

१ वेसे नदीपलीकडील मुर्डीचे देवास नेतात.

१ होळी शिमग्याची सहाण* निराळी.

पूर्वी चालत होते दाखले

३ कृष्णाजी पेंडसा गेल्यावर दुसऱ्यांनीं खोत्या मुर्डीच्या केल्या होत्या.

१ भानजोशी वृत्तीवान मौजे मजकूर

१ कृष्णाजीपंत घाणेकर

*सहाण म्ह. मोकळी जागा. शि. च. सा. खं. ४ ले. ६९० पृ. ३४

१ शिमग्याचा खेळ निराळा.
१ धर्माधिकारी उपाध्ये निराळे आहेत.
१ जोशी आंजर्ल्याचा निराळा व मुर्डीचा निराळा.
१ आवाजी बल्लाळ परभू

३

तीघांनीं खोत्या केल्या.

१ रामाजी बापूजी दातीर, आंजर्लेकर महाजन प्रस्तुत घाटावर आहेत. त्यांनीं मुर्डी गांव प्राचीन स्वतंत्र निराळा म्हणून सांगितलें.

१ मुर्डीचा महाजन कृष्णाजी पेंडसा होता. त्याची लेक खरवळे यासी दिली आहे. ती अद्यापी बिरवाडीस आहे.

१ शिवशेजारी सुखोंडीकर खोत सांगतात जे मुर्डी गांव निराळा

१ दुसरे जोशी वेळासकर आंजर्लें यासी पूर्वी आणून ठेविलें ते समयीं आंजर्ल्यांत वृत्त करून दिली येणेंप्रमाणें

-।- लग्नकार्यास
ʊ= व्रतबंधास
ʊ- चूडाकर्मास

येणेप्रमाणें आंजर्ल्यांत करून दिलें आहेत. मुर्डीमध्यें कांहीं नाहीं.

१०

येणेप्रमाणें दाखले दहा चालतात.

१ मुर्डीचे वर्तक पूर्वी मराठे ब्राह्मण होते. ते बहुत वर्षें परागंदा जाहले. त्यांची वाडी मौजे मजकूरी वर्तकवाडी ऐसी आहे.

१ दुसरे वर्तक आंजर्लेंयाचे साठे घाटावर नेरळास आहेत. त्याचें नांव वासुदेव वर्तक. त्यानें परिच्छिन्न सांगितलें कीं मुर्डी गांव निराळा. त्याचे साक्षी

१ बापूजीपंत विवलकर
१ सदाशिवपंत घाणेकर

२

२ पूर्वी श्रीचे यात्रेची बलावण्याचीं पत्रें येत होतीं.

१ केळशी
१ वेळास

२

१ श्रीदुर्गेचा रथ आंजर्लें यांत फिरोन उपाध्ये यांचे दाराशी आला म्हणजे आंजर्लेकर उपाध्ये बसोन मुर्डीचे सीमेपावेतों जातात. सीमेवर उतरोन मुर्डीकर उपाध्ये रथावर बसोन मुर्डीस जातात.

१ बाळाजी हरी केळशीकर महाजन हल्ली वस्ती मेढें अवचितगड यानें सांगितलें कीं मुर्डी गांव निराळा.

कृष्णाजी पेंडसा महाजन याचा साक्षी
कृष्णंभट वैद्य वाा वेळास.

९

येणेंप्रमाणें दाखले नऊ ९ पूर्वीचे चालत होत. मनास आणावें.

येणेंप्रमाणें दाखले असत. आंजर्लेकर सर्व एकत्र होऊन गांव एकच म्हणतात. सदरहू दाखले पेंडसे याणीं लिहून दिले याची यादी बी. तपशील.

पे. द. जमाव रु. ५८५ } **९५** { श. १६८३ वैशाख व. ११ शनि. स. १७६१ मे ३०

गणेश नारायण महाजन यांनीं केसोराम खांबेटे यांनीं आम्हांस मारेकरी वगैरे घातले ऐसे मनस्वी भाषण केलें सबब मसाला* गाा भवानजीसिंग परदेशी रु. ५

पे. द. रो. रु. ६५१ } **९६** { श. १६८५ पौष शु. १४ स. १७६४ जानेवारी १७

सु. आरबा सीतैन मया व अलफ छ १३ रजब. बापूजी रघूनाथ भट महाजन कसबें आंजर्ले तर्फ केळशी यानीं हुजूर विदीत केलें कीं मुर्डी पाखाडी कसबें मजकूर येथील महाजनकी आपली असतां गोविंद कृष्ण पेंडसा चौगुला कसबा मजकूर हा आपली म्हणून कजीया करीत होता व कसबा मजकूर घर आहे तें ठिकाण केसो राम खांबेटे आपले म्हणून कजीया करीत होते त्यास सालगुदस्त तालुका मजकूरीं नारो त्रिंबक गेले होते ते समय जंजीरे सुवर्णदुर्गचे मुकामीं साक्ष माझे व भोगवटा मनास आणिला त्यावरून पेंडसा महाजनकीस व खांबेटा ठिकाणास लागू होत नाहीं दोन्ही वतनें आपली असें पंचाइताचे मतें झालें. त्यावरून महाजनकी अमानत होती ते मोकळी करून आम्हांकडे चालती केली व ठिकाण पहिल्यापासून चालते त्याप्रमाणें चालतें केलें. त्याजवर पेंडसा हुजूर येऊन महाजनकी अमानत म्हणून सनद घेऊन गेला त्याजवरून महाजनकी अमानत केली आहे ती नारो त्रिंबक यानीं चालती केली त्याप्रमाणें चालविणें म्हणोन ताकीद झाली

---

* मसाला ही एक ऐतिहासिक फारसी संज्ञा आहे व त्याचा एक अर्थ दंड हा आहे. ज्या व्यक्तीवर कांहीं गुन्ह्याचा आरोप असेल त्या व्यक्तीला सरकारांत बोलावून आणण्याचें काम करणाऱ्याला हा मसाला परस्पर त्या व्यक्तीकडून मिळावयाचा असे.

पाहिजे त्यावरून हें पत्र सादर केलें असे. तरी नारो त्रिंबक यानीं जंजीरे मजकूरीं रूबरू इनसाफ करून सुदामत प्रमाणें महाजनकी व ठिकाणें भटाकडे चालते त्याप्रमाणें चालवणें. खांबेटे व पेंडसे कजीया करतील तर त्यास नारो त्रिंबक याजकडे पाठविणें. आपलें वर्तमान सांगतील. नारो त्रिंबक यानीं समजवून विनंती हुजूर करतील. कांहीं दिकत असल्यास मनास आणिलें जाईल. तूर्त नारो त्रिंबक यानीं केल्याप्रमाणें चालवणें. सावणें पाखाडी कसबा मजकूर येथील कुरण नूतन खांबेटे राखतात त्यास राखो न देणे म्हणोन रामाजी महादेव यासी पत्र चिटणीसी.

पे. द. रो. रु. ६५१ } **१७** { श. १६८७ पौष व. ३० स. १७६६ जानेवारी ११

सु. सीत सीतैन मया व अलफ छ २९ रजब रामाजी महादेव तालुका सुवर्णदुर्ग याचे नांवे पत्र कीं गोविंद कृष्ण पेंडसे यांचा व महादाजी रघुनाथ भट यांचा मौजे मुर्डी तर्फ केळशी येथील महाजनकीचा कजीया लागून मनसुबी हुजूर पडली आहे त्यास गोविंद कृष्ण हुजूर मनसूबी सांगत असता महादाजी रघुनाथ भट सरकारची आज्ञा न घेतां पळोन गेला, याजकरतां हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी भट मजकूर याजपासून १० दहा रुपये मसाला घेऊन भटास व मनसुबीचे सडचा साक्षीचे कागद पत्र तुम्हापाशीं असतील ते लखोटा करून हुजूर पुण्यास जलद रवाना करणें म्हणोन चिटणीस छ २० रजब.

पे. द. रो. रु. ६५१ } **१८** { श. १६९० पौष व. ३० स. १७६९ फेब्रुवारी ६

सु. तीसा सीतैन मया व अलफ छ २८ रमजान. गोविंद कृष्ण पेंडसे व महादाजी रघुनाथ भट महाजन कसबे आंजर्ले यांचा मुर्डीविशी कजीया आहे. त्यास पेंडसे म्हणतात कीं आंजर्ले गांव निराळा व मुर्डी गांव निराळा. मुर्डीची महाजनकी आपली व भट म्हणतो कीं मुर्डी गांव निराळा नाहीं. आंजर्ल्याचा वाडा. तेथील महाजनकी आपली आहे. म्हणोन भांडण भांडतात. त्याचा निवाडा पेशजी तुळाजी आंग्रे यानीं केला. तेव्हां पेंडसे खरे झाले. त्याजवरी सरकारचे अमलांत तुम्ही मुर्डी व आंजर्ले अमानत करून सडचा घेतल्या त्याउपरी नारो त्रिंबक यानीं सडचा घेऊन दोन गांवचा एक गांव करून भटाकडे महाजनकी चालती केली. त्याअन्वयें हुजूरचे ताकीदपत्र भटानें घेतलें होतें. परंतु मनसुबीचा निर्वाह जाहला नाहीं. हाली ते अन्वयें कागदपत्र हुजूर मनास आणितां गांव दोन किंवा एक हा ठराव होत नाहीं. मागती सडचा घेऊन शोध करावा लागतो. याजकरितां मुर्डी अमानत

करून हे सनद सादर केली असे. तरी मुर्डीचे महाजनकीचे उत्पन्न होईल तें सरकार हिशेबीं जमा करणें व मुर्डी आंजर्ल्याखालीं न ओढणें. अलाहिदा जमाबंदी करून देऊन वसूल घेत जाणे म्हणोन रामाजी महादेव यास सनद.

(या पत्राचें उत्तर ऐ. क्र. ५ मध्यें आहे)

पे. द. रो. रु. ९९　} **९९** { सु. ११७५ साबान २३
स. १७७४ ऑक्टोबर २९

वा. ता. फिरंगोजी बावाजी जासूद जथे बजाजी नाईक यास मसाल्याबाबत ताा चिठी चिटणीस रुपये २५ पंचवीस माहे साबान छ २३ आश्विन व. ९ सह १० शक १६९६ जयनाम संवत्सरे मुकाम माची पुरंदर पंचवीस रुपये कमावीस मसाला बाा गणेश नारायण भट महाजन कसबें आजर्लें ताा केळशी ताा सुवर्णदुर्ग याजकडून सबब कीं कृष्णंभट बिन केशवभट विद्वांस उपाध्ये धर्माधिकारी मुर्डी ताा मजकूर याचा व तुमचा कसबे मजकूर येथील श्रीचे उत्सवाचा रथ साल दरसाल निघतो त्यास सालाबादप्रमाणें विद्वांस रथावर बसत असतां तुमचा व गोविंद कृष्ण पेंडसे यांचा मुर्डी हा गांव निराळा किंवा एक ये विषयींचा कजीया लागला आहे त्या कजीयामुळें आंजर्लेकर भट यांनीं कृष्णंभट विद्वांस यांस रथावरून ओढून मारामार केली आणि विसाजी आपाजी याजजवळ सरसुभा जाऊन गैरवाका समजावून याचे बंधू सदाशिवभट यांचे मानेवर दगड देऊन १० दहा रुपये गुन्हेगारी घेतली व कसबे मजकूर येथील धर्माधिकरण व सोमवतीचा विभाग कृष्णंभट यांचा सालाबादप्रमाणें चालत आला असतां तुम्ही कजीया करून देत नाहीं अमानत ठेविले आहे तो चालत आल्याप्रमाणें चालता करणे व रथाचे कजीयाचे वर्तमान मनास आणावया करीतां हुजूर आणवून देवविले.

---

१०० { श. १६९७ ज्येष्ठ व. २
स. १७७५ जून १५

अजस्वारी राजश्री मोरो बापूजी सुभेदार प्रांत जंजीरे सुवर्णदुर्ग ताा गोविंद कृष्ण व महादाजी बल्लाळ पेंडसे महाजन मौजे मुर्डी तर्फ केळशी सुभा दाभोळ सुाा सीतसबैन मया व अलफ. तुम्ही मौजे मजकुरीचे महाजनकीविसी हुजूरहून सनद आणिली कीं गोविंद कृष्ण व महादाजी बल्लाळ पेंडसे महाजन मौजे मुर्डी तर्फ केळशी ताा जंजीरे सुवर्णदुर्ग याचा व महादाजी रघुनाथ व गणेश नारायण भट महाजन कसबें आंजरलें ताा मजकूर याचा मुर्डीविसी कजीया लागला आहे त्यास पेंडसे म्हणतात कीं मुर्डी हा मौजा निराळा. तेथील महाजनकी आमची. आमचा दायाद कृष्णाजी बापूजी पेंडसा चालवीत होता तो मृत्यु पावल्यावर बांधेकरी खोती करीत

होते त्यावर आंजरलेंकर भट महाजन व रयत खोती करूं लागले त्यांणी मौजा मोडून आंजरल्याखालीं ओढीला होता त्याची मनसुबी तुळाजी आंगरे यांनीं करून पूर्ववत प्रो मौजा निराळा करून आपलें स्वाधीन केला म्हणोन. व भट म्हणतात कीं मुर्डी मौजा निराळा नाहीं आंजरल्याचा वाडा तुळाजी आंगरे यांनीं जबरदस्तीनें मौजा निराळा करून पेंडसे यांचे स्वाधीन केला म्हणोन. याप्रमाणें हरदुजणाचा कजीया लागोन मनसुबी पेशजी हुजूर पडली ते हरदूजणाजवळील कागद पाहून दोघांचे रजावतीचे साक्षीदाराच्या साक्षी हुजूर लिहून आणविल्या त्यावरून पाहतां मुरडी मौजा

× × ×

त्यास भट महाजन आंजर्लेकर यांनीं विनंति केली कीं मौजा निराळा नव्हे. या विसीचे साधकाचा कागद आम्ही आणितो तो पाहून करणें तें करावें. ऐसा करार करून गेले होते त्यास सालमजकुरी भट हुजूर आले त्याणी कराराप्रमाणें कागद दाखवावा तो न दाखविता पेशजी कागद आणून दाखविले त्याची चौकशी होणें. ते जाहाली असतां फिरोन त्याच कागदाच्या नकला आणून दाखविल्या नवा कागद कांही दाखविला नाहीं. आणि घरास गेले. त्यास सडी साक्षीचा व तुळाजी आंगरे याणीं निवाड पत्र पेंडसे यास करून दिलें त्याचा अर्थ पाहून पेंडशापासून नजर रुपये ४०१ सरकारांत घेऊन मौजे मुर्डी येथील महाजनकीचे वतन सरकारांत जप्त आहे तें मोकळें करून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे तरी पेशजी तुळाजी आंगरे याणी मुर्डी गांव निराळा करून तेथील महाजनकीचें वतन मानपानसुद्धां पेंडशाकडे चालविलें होते त्याप्रमाणें महाजनकीचा मुशाहिरा सुदामत असेल तो वगैरे मान हल्लीं पेंडसे महाजन याजकडे चालविणें सदरहू नजरेचे रुपये याजपासून घेतले आहेत. त्यास पेस्तर फडशा करून यासी मजूरा दिल्हे जातील म्हणोन छ १७ जिल्हेज सन खमस सबैनची सनद सादर झाली त्याप्रमाणें मौजे मुर्डी येथील महाजनकीचें वतन तुम्हांकडे सुभाहून चालतें करावें परंतु भट महाजन आंजरलेकर यांचा व तुमचा कजीया सुभास येऊन भट महाजन हुजूर निघोन गेले तेव्हां तुम्हांसही हुजूर जावयाची आज्ञा जाहल्यावर तुम्ही हुजूर जाऊन हरदुवादी हुजूर रुजु झाल्यावर दुसरी सनद हुजूरहून आणिली कीं गोविंद कृष्ण व महादाजी बल्लाळ पेंडसे महाजन मौजे मुर्डी तर्फ केळशी ता। सुवर्णदुर्ग यानीं हुजूर पुरंदरच्या मुक्कामीं विदित केलें कीं मौजे मजकूर हा गांव निराळा आंजरलें याचा वाडा नव्हे. तेथील महाजनकी आमची असतां महादाजी रघुनाथ व गणेश नारायण भट महाजन कसबे आंजरले ता. मजकूर हे म्हणत होते कीं मुर्डी हा कसबे मजकूरचा वाडा. मौजा निराळा नव्हे. येविसी त्याचा आमचा कजीया लागोन मनसुबी हुजूर पडली होती ते विल्हेस लाऊन मौजे मजकूरचे महाजनकीचे वतन सरकारांत जप्त होतें तें मोकळें करून आमचे आम्हाकडे चालवावयाविसी सुभा सनद सादर जाहाली असतां त्याप्रमाणें वतन आपणाकडे सुभाहून चालते करीत नाही येविसी आज्ञा जाहाली पाहिजे

म्हणोन. ऐसियास सरकारची सनद सादर जाहली असतां महाजनकी याची याजकडे चालवावयास दिक्कत करितां हे कार्याचे नसे. हल्लीं हें पत्र सादर केलें असे तरी पेशजीचे सनदेप्रमाणें मौजे मजकूरचें महाजनकीचें वतन दरोबस्त पेंडसे मजकूर याजकडे चालविणें येविसीचा फिरोन बोभाटा आलिया कार्यास येणार नाहीं म्हणोन सनद छ १ रााखर सन खमस सबैनची सादर येणेंप्रमाणें दोन सनदा, तुम्ही आणिल्यावरून सनदांच्या अन्वयें मौजे मजकूरचे महाजनकीचे वतन सरकारांत जप्त होतें तें मोकळे करून तुमचे तुम्हांकडे चालते केलें असे. तरी मौजे मजकूरचे महाजनकीचे वतन चालवून महाजनकी संबंधे मुशाहिरा सुदामत असेल तो व वतन संबंधें मानपान वेठबेगार व आगर शेते ×× पेशजीच्या चालीप्रमाणें अनुभवून गावकीर्द आबादी करून सालमजकूरापासून सरकार दस्ताची उगावणी करून सुखरूप राहाणें. छ १६ माहे रबिलाखर मोर्तब सुद.

श. १६९६ माघ वद्य. ५ चें चिटणीशीपत्र मोरो बापुजीचे नांवें आहे. त्यांत पेंडसे यांजवळून रु ४०१ नजर घेतले असून ते " छ १८ जिल्हेज रोजी पोता जमा असे मुक्काम पुणें हस्तें खुद्द " असें लिहिलें आहे.

---

१०१ { श. १६९७ ज्येष्ठ व. १४
स. १७७५ जून २६

पुा राजश्री सदाशिव विश्वनाथ हवालदार ताा केलसी गोसावी यांस सुाा सीत सबैन मया व अलफ गोविंद कृष्ण व महादाजी बल्लाळ पेंडसे महाजन मौजे मुरडी ताा मजकूर यांनीं विदित केलें कीं मौजे माारीं काा आजरलेकर भट महाजन वगैरे सेत करितात त्याविसीं महालास आगोदर सनद सादर जाहालीच आहे. त्याअन्वयें सेताची नागरटी चालऊन आम्ही लागवड करणार भट महाजन धटाईस येऊन मारामारीस प्रवर्तणार येविशीची आज्ञा काय म्हणोन त्यावरून हें पत्र तुम्हांस सादर केले असे. तरी पेशजीचे सनदेप्रमाणें पेंडसे महाजन सेताची लागवड करीतील. आंजरलेकर महाजन वगैरे धटाई करून मारामार करूं लागल्यास त्याचें पारपत्य केले जाईल येविसी तुम्ही त्यास ताकीद करून सदरहू अन्वयें मारामार होऊं लागल्यास तुम्हीं पारपत्य करणें. गैरवाजवी कजीया करावयास प्रयोजन कोणास नाहीं. निक्षुन ताकीद करून सुरलीत सनद पेशजी सादर आहे त्याप्राा वर्तवणें जाणीजे छ २१ माहे राखर मोा

पे. द. रो. रु. १०२

१०२ { श. १६९७ आषाढ व. ५
स. १७७५ जुलै १७

सीत सबैन मया व अलफ जमादिलावल छ १८ आषाढ व. ५ इंदुवासरे शक १६९७ मन्मथनामसंवत्सरे मुा माची किल्ले पुरंदर रवासुदगी बाा देणें ताा गाडदी दीा अबदुल कादर यास मसाल्याबाबद बाा चिठी चिटणीस रु. १०० शंभर.

शंभर रुपये मसाल्याबाबत हाय रु. चाल गोविंद कृष्ण पेंडसे महाजन मौजे मुर्डी ताा केळशी ता. सुवर्णदुर्ग याचा मौजे मजकूराविषयीं कजीया लागोन मनसुबी हुजूर पडली होती त्याचा निवाडा होऊन पेंडसे वादास खरे जाहले सबब याजपासून सरकारांत हरकी घेऊन मौजे मजकूर सरकारांत जप्त होता तो मोकळा करून पूर्ववतप्रमाणें महाजनकी शेत भात सुद्धां पेंडसे याजकडे चालवावा याजविषयीं सनद सादर झाली असतां व त्याप्रमाणें सुभाहून चिठ्या दिल्या असतां धटाई करून मौजे मजकूरचीं शेतें पेंडसे यास लाऊं देत नाहीं. मारामार करितात. सुभाचे ताकीदीस मानीत नाहींत येविशसींचे मनास आणावयाकरितां हुजूर आणवून देवविले.

रु ५० बा। गणेश रघुनाथ व बाबाजी रघुनाथ व नारो रघुनाथ भट महाजन कसबें आंजर्ले तर्फ मजकूर यांजकडून देवविले.

रु २५ बाा गणेश नारायण भट महाजन ताा आंजर्ले तर्फ मजकूर यांजकडून.

रु २५ बाा कृष्णशेट सोनार तळेकर व जिऊशेट बिन महादसेट सोनार कसबे आंजर्ले याजकडून.

———

१००

---

१०३ { श. १७१६ भाद्रपद व. ३
स. १७९४ सप्टेंबर १२

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री मोरो बापूजी गोसावी सेवक यासी माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुहूर सन खमस तीसेन मया व अलफ कृष्णाजी गोविंद पेंडसे महाजन मौजे मुर्डी ताा केळसी ताा सुवर्णदुर्ग यानीं सरसुभा पुण्याचे मुकामीं विदीत केलें कीं मौजे मजकूरचे महाजनकी विसीं महादाजी रघुनाथ व गणेश नारायण भट महाजन काा आंजरलें ताा मजकूर याचा व आमचा कर्जीया लागून मनसुबी सरकारांत गेली. तुळाजी आंगरे याचे कारकीर्दीत विजेदूर्गचे मुकामीं निवाडा होऊन आम्हांस निवाडापत्र करून दिल्हे व आंजरलेकर महाजन याजपासून येजीतखत देविले. पुढें सरकार अमल स्वराज्य जाहाल्यावर आंजरलेकर महाजन मनसुबीस उभे राहिले. तेव्हां सरकारांत निवाडा होऊन आम्हांस निवाडपत्र करून दिल्हे व वादी याचे पत्र ताा मजकूरचे देशमुख याचे साक्षीनीसी देविलें त्याप्रो आमचे

महाजनकीसमंधे व गांवसमंधे सेत आगरवाडी पूर्ववत प्रो आमची आम्हांकडे चालो लागली. अलीकडे च्यारपाच वर्षांत सुभाहून आंजरलेकर व मुरडीकर रयतावा कुलें यास पांच सहा सेतें लागवड करून धारा द्यावा याप्रोा चिठ्या दिल्या आहेत व गयाली ठिकाण मौजे मजकुरी होतें तें आम्हीं महामुरा केलें असतां सुभाहून अमानत केले आहे त्यास सदरहू निवाडपत्राअन्वयें आगर व सेत आमची आम्हांकडे चालवावी. सालमजकुरीं ज्यानीं सेते लागवड केली आहेत त्यापासून अर्धेल देविली पाहिजे म्हणोन. त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केले असे. तरी महाजनकी समंधी व गांव समंधे सेतें सुदामत चालत आल्या प्रो याजकडे चालवणे. दरम्यान सुभाहून याजकडे सेते असतां आंजरलेकर व मुरडीकर कुलास धान्यानें सेतें दिल्ही असतील त्याची अर्धेल पेंडसे यास देवऊन सरकार दस्ताची उगवणी याजपासून करून घेत जाणे. गयाली ठिकाण मौजे मजकूरी होतें त्याचा महामुरा पेंडसे यांनीं केला असोन हलीं तुम्ही तें ठिकाण अमानत केलें त्यास यानीं महामुरा केला असील्यास याजकडे ठिकाण चालवणें. सदरहू ठिकाणाचा वारीसदार कोणी असल्यास त्यास सरसुभा पाठवून देणें समजोन आज्ञा कर्णे ते केली जाईल. जाणीजे छ १७ सफर पाा उजूर

---

१०४ { श. १७२९ फाल्गुन शु. १५ / इ. १८०८ मार्च १२ शनिवार

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री दीनकरपंत केळकर स्वामीचे सेवेशीं, पोा सदाशिव माणकेश्वर सा. नमस्कार विनंति उपरी यैथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष, राजश्री नारो महादेव पेडसे व अंताजी गोविंद पेंडसे महाजन मौजे मुर्डी ताा केलसी ताा सुवर्णदुर्ग यांनीं समजाविले कीं छ ११ जिल्हेजचें पत्र भट आंजरलेकर याणीं आपल्याकडील नेलें त्यांतील मजकूर राजश्री महादाजी रघुनाथ भट कोा आंजरलें याचा व अंताजी गोविंद पेंडसे याचा प्रो मजकूरचे मुर्डी पाखाडी विसी कजीया लागला आहे त्यास भट याणीं आपले भोगवटे याचे कागद सरसुभास दाखवून मुर्डी पाखाडी आपलेकडे चालवणे याविसी पत्र घेऊन पेंडसे यास सरसुभाचे बलावणें केलें आहे. त्याप्रोा जाहाले पाहिजे म्हणोन महादाजी रघुनाथ याणी समजाविलें त्याजवरून हें पत्र लिहिले असे. तरी पेंडसे यास सरसुभाकडे रवाना करून भट महाजन याजकडे मुर्डी पाखाडीची वहीवाट कसब्याकडे पूर्ववत प्रो जसी चालत आली असेल त्या प्रोा सरसुभाचें पत्राअन्वयें सुदामत चालविणे. पेंडसे याचें कांहीं बोलणें असल्यास सरसुभाकडे अगर हिकडे रवाना करावे वाजवी मनास आणोन करण्यांत येईल. म्हणोन त्याजवरून पेंडसे महाजन पुणेंयास येऊन आपले कागदपत्र वतनाचे समजाविले त्यांतील अर्थ मौजे मजकूर हा गांव निराळा तेथील महाजनकीचे वतनाचा खटला पडला होता त्याचा निवाडा आंगरे यांचे कारकीर्दीत होऊन भट यांचे येजीतपत्र शके १६७५ श्रीमुख संवत्सरीचे

आहे, व सरकार अमलांत कै. रामशास्त्री बाबा याजकडे पंचायीत होऊन फडशा झाला तेव्हां दुसरे येजीतपत्र शके १६९७ मन्मथनाम संवत्सरी भट याणीं लिहून दिलें व पेंडसे याचकडे वतन चालविणें येविसीं सरकारची पत्रें आहेत त्या प्रो। पेंडसे यांजकडे मौजे मजकूरचे वतन महाजनकीचें चालत आहे. असें असतां हल्लीं भट मशारनिल्हे यांनीं सरसुभा गैरवाका मालूमाती एक पक्षी समजाऊन सुभ्यास पत्र नेलें यास्तव हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे तरी सरसुभाचे पत्र व येथील पत्र भट यांनीं नेलें आहे तें त्याजपासून परत घेऊन पुणेंयासी पाठविणें. आणि मौजे मजकूरचे महाजनकीचे वतन आगर शेतें वगैरे पूर्वापार चालत आल्याप्रमाणें पेंडसे महाजन यांजकडे चालविणें, भट आंजरलेकर यास पुणेयास रवाना करणें ता। छ १४ मोहरम सु॥ समान मयातैन व अलफ बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

---

१०५ { श. १७३०—३१ स. १८०८—९

यादी महादाजी रघुनाथ भट महाजन कसबे आंजरलें तर्फ केळशी ता। सुवर्ण-दुर्ग सु॥ तीसा मयातेन व अलफ कसबे मजकूरचा महाजन आपली आम्ही पिढी दर पिढी अनुभव करीत आलों असें असतां मुर्डी पाखाडी ही कसबे मजकूरची वाडी पुरातन असून तुलाजी आंगरे याचे अखेरीस गोविंद कृष्ण पेंडसे का। मजकूर याणीं नवीन कजीया उपस्थित केला की पाखाडी हा मौजा निराळा तेथील महाजन आपण ऐसा गैरवाका आंगरे यासी समजाविला व भट हे श्रीमंत पेशवे यांचे भाऊबंद आपलेकडील वर्तमान वरचेवर सरकारांत समजावितात. ऐशा आदावती बहुत प्रकारे समजाविल्या त्याजवरून आंगरे याणीं येकायेकीं मनास न आणितां पाखाडी हा मौजा निराळा म्हणोन पेंडसे यांसी चिठी दिल्ही आमचे पत्र जबरदस्तीनें लिहोन घेतलें नंतर सा च्यार महिन्यांनीं अमल सरकारांत आला ते समयीं रामाजी महादेव सुभेदार यांजकडे हुजूराहून मनास आण्याविसी परवानगी जाहाली त्याजवरून सुभेदार याणीं पाखाडीची जप्ती करून पंचाईत मते व सडी साक्षीवरून व गांवच्या हदमहदूद चतुःसीमापूर्वक शोध करून व मागील दाखले व भोगवटे यावरून गांव एक असें ठरलें. त्याजवरून पाखाडीची वहीवाट एकंदराकडे पूर्ववतप्रमाणें चालती केली. पेंडसे यांजवळून अजीतपत्र व पेशजी आंगरे याणी पत्र दिलें आहे तें माघारे घ्यावें तों जामीनसुद्धां पळोन पुण्यास आला आणि सरकारांत समजाविलें कीं पंचाईत एक पक्षीं जाहाली त्याजवरून सा चार महीने यानीं पाखाडीची जप्ती करून हुजूर-हून सड्या घ्यावयासी कारकून गांवीं पाठवून साक्षी लिहून आणविल्या. त्याची चौकशी होऊन फडशा व्हावा तो कै. नारायणराव साहेबांचा काळ झाला. त्यामुळें

तैसे राहिले. पुढें पुरंदरचे मुकामी बावाजी‡ बल्लाळ साठे हे पेंडसे यांचे आतेभाऊ. यांची चाल नानांजवळ बहुत ते हिमायतीनें मनसुबीचा फडशा न होतो तो पेंडसे यास चालवणुकीबद्दल चिठी दिली आणि आम्हास पुरंदराहून मसाला करून चौघा भावांसहित घेऊन आले आणि चाप लाऊन मनस्वी उपद्रव करून सेतें पेंडशाच्या हवाला करूं ऐसें पत्र लिहून घेतलें. आम्हांवर आदावतीही बहूतच घातल्या. बावाजी बल्लाळ याजमुळें आपला इलाज न चाले म्हणून तसेच राहिले. हल्ली स्वामीचे राज्यांत धर्मन्याय गरीबगुरीबाचे वाजवी मनास आणून स्थापना होते या ....(हें पत्र अपूर्ण आहे).

पे. द. जमाव रु. ४८० } **१०६**

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री आनंदराव तात्या स्वामींचे सेवेशी

पो रामचंद्र खंडेराव सा नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे विशेष मौजे मुरडी तर्फ केळशी येथील जप्ती करण्याविषयीं तुम्हांस पेशजी लीा आहे. त्याप्रो कारकून पाठवून जप्ती करणें. राजश्री पांडो अणा तुम्हांशी बोलले त्याचे धमकीवर मोकळीक करितां हें काय आम्ही पुण्यास असतां तुम्हांस काय करावयाचें होतें असो. जाहाली गोष्ट ती तुम्हांपासून गेली. आतां पत्र पावतांच कुल बागायत जिरायत सुा याद पाठविली आहे इतक्या इमल्यांची जप्ती करावी त्यांत कांहीं माल गेला असल्यास फडशा करून घ्यावा. केळशीकडील वर्तक वगैरे यांची शेते केळकर यांनी गहाण ठेवून अथवा कुभांडे करून शेतें लोकांची घेतली आहेत त्यास तुम्हांजवळ जो जिन्नस जमा येईल त्याचा वाका लिहून घेऊन ध्यानांत आणून जप्ती करावयाजोगें जें आढळेल त्याची करीत जावी. दुमालाच करणें जाहलीयास पुरती चौकशी खातरजमेची पाहून करीत जावें. इकडील काळजी करीत जाऊं नये. येथून कारकून या कामाकरितां पाठवावयाचें नाहीं. तुम्ही कोणाचें भिडेस पडत जाऊं नये. येथील लिहिल्याप्रमाणे करीत जावें. येविषयीं यजमान स्वारीची आज्ञा जाहालीच आहे रा॥ छ १० जिल्हेज बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

रा. धोंडोपंत § नानास नमस्कार व गोविंदपंत यांस नमस्कार. तुम्ही येविशीचे माहीत असतां हें चांगले झालें नाहीं हे विनंति.

---

‡ यांचा उल्लेख खंड पहिला पृष्ठ ६६ वर पांचव्या ओळींत आला आहे. हे पेंडसे यांचे आतेभाऊ असल्यामुळें देण्याघेण्याचा व्यवहार होता असें दिसतें.

§ ऐतिहासिक क्रमांक ७ मधील धोंडो विश्वनाथ ते हेच काय ?

पे. द. जमाव रु. ४८० } **१०७** { श. १७३४–३५ इ. १८१२–१३

अज स्वारी राजश्री सदाशिव माणकेश्वर सुभेदार प्रो जंजीरे सुवर्णदुर्ग ताा कमावीसदार मौजे मुर्डी ताा केळशी सुाा सलास अशर मयातेन व अलफ कोा आंजर्ले ताा केळशी येथील वतनदार यानीं विदीत केलें कीं मौजे मजकुरीं आपलें आगर व शेतें आहेत ते आपल्याकडे चालत असतां पेंडसे यानीं पेशजी भर पिकावर घेऊन लागवड करीतात. आमचे हवालीं करवावी म्हणून त्याजवरून शेत व आगर अमानत करून कोट गोवा वहिवाट सांगितली आहे.

× × × ×

सदरहू शेत व आगर जप्त करून जप्तीचे काम कोट गोवाकडे सांगून तुम्हांस आज्ञा केली असे.

पे. द. जमाव रु. ४८० } **१०८** { श. १७३६ माघ शु. ६ स. १८१५ फेब्रुआरी १५

अज स्वारी राजश्री सदाशिव माणकेश्वर सुभेदार प्राा जंजीरे सुवर्णदुर्ग ताा रयात मौजे मुर्डी ताा केळशी सुाा खमस अशर मयातेन व अलफ मौजे मजकूरची जप्ती करून जप्तीचे काम राा गोविंद रामचंद्र यांजकडे सांगोन तुम्हांस आज्ञा केली असे तरी मारनिल्हे मौजे मजकूरी जप्तीनें वहीवाट करून उत्पन्न सरकारांत जमा करीतील. तुम्ही यांचे रजातलबेत वर्तोन कीर्द महामुरा करणे जाणिजे छ ५ रबिलावल मोर्तब सुद.

---

१०९ { श. १७२७ फाल्गुन शु. ३ स. १८०६ फेब्रुआरी २१

आंजर्ल्याचे शिर्के यांचें पत्र

....श्री. समस्त कारभारी व समस्त....तर्फ केळशी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राज....स्नेाा....तान्हाजी राजे सिर्के महाजन कसबे मजकूर दंडवत व रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीये कुशेल लिहित असले पाहिजे. विशेष आपणाकडून पत्र येऊन सविस्तर कलवण्यानंतरी श्रीदेव याणीं वडिलोपार्जित वृत्तिस्थानाचे दर्शनास येण्याविसीं मनास संचार केला त्याजवरून पेशजी आमचे निसबतीनें वृत्तीचें काम....व राजवाडी आगराची वोा वहिवाट करीत होते त्याचे वौसीक महादेवभट व गोपालभट भट हे येथें पुणीयाचे मुकामी सन इसने मयातैनात उभयेता आले होते त्यास भेटीस बलाविले. त्याणी भेटीस न येता आम्हांसी नौदिगरीच्या गोष्टी सांगू लागले. त्याजवरून सरकारचे कानावर घालून राजश्री बालोजी बाबा कुंजीर सुभेदार तालुके सुवर्णदुर्ग यास ताकीद जाहली की

आमचे वतन आमचे हावाली करावे त्याचा फडशा होऊन उलगडचांत यावे तो आम्ही सरकारचे आज्ञेप्रो स्वारीस गेलो. मागे भटजी निघोन गेले. पुढें दंगा होऊन आजपर्यंत तसेच राहिले. सालमजकुरी सदर वतनाचे फडशाकरितां माहाजनकीचे व राजवाडी आगराचे वगैरे जप्ती सरकारांतून करऊन भट यास पुणीयास आणविले आहेत तरी फडशांत लौकरच येईल हाली श्रीदेवाकरिता पोशाख सनगे येणेप्रो

श्रीलक्ष्मी नारायण देव यास धोत्र जोडे दोन दर साल पेशजी आमचे वडील परागंदा जाले ते समई आमचे निसबतीने कारभारावर भट ठेविले होते त्यास द्यावयास सांगितले होते त्याप्रो पावतच आले असतील. हाली येथून श्री देवास धोत्र जोडा येक पा आहे हा नेसवावा. कलम १

श्रीदुर्गाभवानी देवीस लुगडें व चोलखण पाठविला आहे हा नेसवावा. कलम १

श्रीकालभैरव देवास पागोटे व फडकी येकूण सनगे दोन पा आहेत. कलम १

सदरहू पाच सनगे श्रीदेवास पाठविली आहेत ही सर्वत्र....भाऊ वगैरे बाल गोपाल मिलोन देवास नेसऊन श्रीचा कौल घेऊन पत्राचे उत्तर पाठवून द्यावे मिा फाल्गुन शुा ३ शके १७२७ बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति.

सदरहू वस्त्रें श्रीदेवास चैत्रमासीं दिनकरपंत कारकून........याणें दिल्ही असेत. शके १७२८ क्षयनाम संवत्सरी.

---

११० { श. १७२१–२२ / स. १७९९–१८००

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांचें शेवेशी पो वो तानाजी बिा सकोजीराजे सिरके माहाजन कोा आंजरले तर्फ केळशी सुभा सन मयातैन व अलफ. आपले वडील कोा मजकुरी राजवाडी ठिकाण वतनीं आपलें आहे तेथें राहून माहाजनकीचे वतनाचा अनुभव करीत होते ते परागंदा जाहाल्यास बहुत दिवस जाहाले त्यापासून कोा मजकूरी आपले वतनावर यावे हे आपले बापापासून आजपावेतों घडलें नाहीं आतांही गांवीं यावयाचें प्रयोजन पडलें नवतें परंतु आपला कुलदेव श्रीकालभैरव को। मजकूर याचा उपद्रव होऊं लागला त्यावरून वडिलांचें मुखचें ऐकीव मागील कुळकटीचा शोध पाहातां आपले वतनाचा देव व गाव आहे त्यास वतनावर जावें असें जाहालें त्यावरून येविसीचा शोध आपले वडील कोा मजकुरी नांदत होते त्यावेळेस मौजे कोंगळे तााा मजकूर येथें ब्राह्मण

उपनाम भट होते त्यास आपले वडिलांनीं आपले घरचे पुरोहित कोा मजकूरचें दिले होतें त्यास येणें जाणे यास दूर पडो लागले साा कोा मजकुरीं ब्राह्मणाकडील पांचवा मान व आगर ठिकाण देवऊन गांवीं आणून ठेविले होते त्यास वडील गावीहून गेल्यावर मागें पुरोहित भट आमची आगरवाडी महाजनकी देखील झाडून वतनाची वैवाट करूं लागले त्यावरून हालीं वो. राजश्री महादेवभट व गोपाळभट भटाचे वंशज्य वतनाची वैवाट करितात त्यांस भेटीस येण्याविसीं वगैरे बोलण्यास राा बाबुराव सुरवे यांस पाठविले त्यांस माारनिल्हेनीं नौदिगर गोष्टी बोलोन सरकारांत फोर्याद येऊन आमचे वतनाचा लोप करो पाहातात त्यास बहुत दिवस परागंदा साा आपण क्रियावल येविसीची चौकशी करून पांढरीच्या मुखें आम्ही वतनदार माहाजन कोा मजकुर हे खरे जाहाल्यास आमचे वतन आमचे हवालीं करावें आम्ही सदरहू लिहिल्याप्रमाणें कोा मजकूरचे वतनदार याचे सहीसाक्षीनिसी खरें करून देऊ. न देऊ तर सरकारचे गुनेगार.

पोा बोा भगवतराव गुजर खोत मौजे सेवसी तर्फ खेड ताा सुवर्णदुर्ग सुमा सन मयातैन अलफ लिहून दिल्हा जामीन कतबा ऐसीजे राजश्री तानाजी बिा सकोजी राजे सिरके महाजन कोा आंजर्ले तर्फ केळशी यासी वेदमूर्ती राजश्री महादेवभट भट हे महाजनकी व आगर ठिकाणासी वाद सांगतात साा येविसीची पंचाईत पडली आहे यास राजे मजकूर........याणीं कसबे लिहून दिल्हे आहेत त्यांची चौकसी कोा मजकूरच्या वतनदारांचे सडीसाक्षीनिसी मनास आणून वाजवीचे रीतीनें इनसाफ होऊन आज्ञा होईल त्याप्रमाणें यानें माारनिल्हे वर्तणूक करतील न करतील तर आपण खुद निा वर्तऊन देऊं.

प्रकरण ५ वें

संशोधनार्थ

वृत्तान्ताकरितां जमविलेल्या माहितीपैकीं ज्या माहितीचा उपयोग अवश्य त्या तपशीलाचे अभावीं पुस्तकांत करतां आला नाहीं, अशी माहिती पहिल्या खंडाच्या नवव्या प्रकरणांत संशोधनार्थ दिली होती. यापैकीं अधिक तपशील उपलब्ध होऊन कांहीं माहिती निरनिराळ्या घराण्यांच्या माहितींत कशी समाविष्ट करतां आली तें पुढें दाखविलें आहे. वृत्तान्त प्रसिद्धीनंतर वेरूळ व पैठण येथील क्षेत्रोपाध्यायांकडील लेख पाहावयास मिळाले. तसेच नासीक व त्र्यंबकेश्वर येथील अधिक लेख उपलब्ध झाले. माहितीची संगती लावण्यास अशा लेखांचा उपयोग झाला. नवीन मिळालेल्या लेखांपैकीं ज्यांचा कोणत्याहि घराण्याच्या वंशावळीशीं संबंध दाखवितां आला नाहीं ते लेख क्र. ४३ पासून पुढें दिले आहेत. वाचकांनीं त्याकडे लक्ष देऊन त्यांची संगती पुस्तकांत कोठें लावतां येईल तें कळवावें.

खंड पहिला, पृष्ठ ३६४

१

या क्रमांकाशीं संबंध असणारे पुढील लेख मिळाले आहेत; त्यावरून पूर्वी दिलेल्या वंशावळींत वाढ होऊन झालेली नवीन वंशावळ खालीं दिली आहे.


पैठण धर्माधिकारी :– सदाशीवभाऊ बंधु दाजीबा, पुत्र नाना व रामचंद्र पेंडसे. — पंढरपूर.

नारायण सदाशिव आ. भगवंतभ. प. नारायणभट बं. रामभाऊ पुतणे गोविंद.

वेरूळ–पैठणकर १०–४१. नारायणभट गणेशभट आ. नारायणभट बं. महादेवभट व गोपाळभट.—टेंभुर्णी साळशी.

(या लेखांत नारायणभटानें आपल्या आज्याचें नांव नारायण सांगितलें आहे; परंतु गुंडो महादेवनें आपल्या पणज्याचें नांव केशव सांगितलें आहे. यांत विसंगती दिसते. बाकी नांवें एकमेकांशीं जमतात.)

नाशीक–वा. दाते. ३४–५. साळूबाई भ्र. बाळाजी भगवंतभट नारायण चु. सा. रघुनाथभट. दीर सदाशिव व विठ्ठल पुत्र जयराम पुतणे नारायणभट –पंढरपूर.



गुंडो महादेव (४) हे वैदिक असून नरसीपूर येथें राहात. यांचे सासरे धोंडभट परांजपे यांस परगणे इंदापूर येथें वर्षासन रु. १०० शंभरचें सरकारांतून मिळत होतें. या वर्षासनाचें दानपत्र धोंडभटानें जांवई गुंडभट महादेव यांस लिहून दिलें. कारण पोटीं पुत्र नव्हता. त्यापैकीं वर्षासन रु. ५० पन्नास फक्त सरकारांतून गुंडभटास चालू ठेवलें. (ऐ. क्र. ९२ पहा)

खंड पहिला, पृष्ठ ३६५

२

गोविंद लक्ष्मण (५) यांनीं राघो बल्लाळ पेंडसे, घराणें ३० यास लिहिलेलें पत्र सामान्य विचार या प्रकरणांत दिलें आहे. त्यावरून गोविंद लक्ष्मणचें व राघो बल्लाळचें नातें असावें असें वाटतें. या क्रमांकांतील कांहीं नांवें घराणें २६ मध्यें आढळतात. त्यावरून त्या घराण्याशीं कांहीं संबंध असेल.

३

क्रमांक ३ मधील व्यक्ति घराणें ४ मधील असल्याचें निश्चित झाल्यावरून त्यांचा समावेश त्या घराण्यांत केला आहे.

४

गणेश भिकाजी (३) श. १६६३ मध्यें त्र्यंबकेश्वरीं गेले होते. घराणें ८ मधील सदाशिव गणेश यांस कांहीं आसाम्यांच्या नेमणुका होत्या. (ऐ. क्र.५१) त्याचा काळ श. १६९४ आहे. यांत ३१ वर्षांचें अंतर आहे. सदाशिव गणेश (घराणें ८) हा या गणेश भिकाजीचा पुत्र असावा. प्रथम खंडांत तसा संभव दर्शविला होता. या नवीन माहितीमुळें त्यास बरीच पुष्टी मिळते.

खंड पहिला पृष्ठ ३६६

५

पुढें दिलेल्या क्रमांक ४६ मधील पिढी १, २, ३ व ४ मध्यें या क्रमांका-प्रमाणेंच महादेव, नारायण, बाळाजी व नारायण अशीं नांवें आहेत. घराणें २६ च्या दुरुस्त वंशावळींतहि हीं नांवें आढळतात.

८

घराणें १५ मधील विश्वनाथ विनायक (४) व यांतील विश्वनाथ (१) ही एकच व्यक्ति असावी असें वाटतें. विश्वनाथ विनायक यास कृष्ण या नांवाचा मुलगा होता. (नाशीक–वा. दाते. २३–६३)

१०

पुढील लेख उपलब्ध झाले त्यावरून बनलेली वंशावळ पुढें दिली आहे.

नाशीक–वा. दा. ४–४५ महादेव नारायण कृष्ण पुत्र अनंत–कोचरें.

वा. दा. ५–११ महादेव नारायण कृष्ण महादेव बं. कृष्ण. पुत्र अनंत व रामचंद्र व सदाशिव व जनार्दन—सुपें कोचरें, नाट.

वेरूळ–देव १५–८ सदाशिव महादेव आ. नारायणभट पं. कृष्णंभट चु. कृष्णंभट बं. जनार्दनभट व बाळंभट चु. बं. नारायणभट—कोचरें.

वा. दा. १ – राधाबाई भ्र. अनंत महादेव नारायण दीर रामचंद्र व सदाशिव व जनार्दन –– नाट.

वा. दा. ३६–१८ रामचंद्र सदाशिव महादेव नारायण. चुलते अनंत व रामचंद्र व बाळंभट. पुत्र सदाशिव चु. बं. नारायण रामचंद्र मा. उमाबाई—गोठणें, कोचरें, मालपें, सुपें, सांगली आणि मुंबई.

१ महादेव

२ कृष्ण

३ नारायण

४ **महादेव** — कृष्ण

५ अनंत = **राधा** रामचंद्र **सदाशिव** = उमा **जनार्दन** बाळंभट — नारायण

६ नारायण **रामचंद्र**

७ सदाशिव नारायण

खंड पहिला, पृष्ठ ३६७

११

५ व्या पिढींतील नारायण व भास्कर इत्यादि मंडळी विद्यमान आहेत. त्यांची माहिती घराणें ३३ मध्यें दिली आहे.

खंड पहिला, पृष्ठ ३६९

१९

घराणें २६ मध्यें समावेश केला.

२०

घराणें २० मध्यें समावेश केला.

खंड पहिला, पृष्ठ ३७०

२३

घराणें २६ मध्यें समावेश केला.

२५

या सावित्रीबाईचा नाशीक येथें पुढीलप्रमाणें लेख आहे. त्यावरून ही बाई घराणें २९ गुहागर–किवळेंपैकीं आहे.

नाशीक–दाते ४२–१ सावित्री भ्र. दामोदर बाळकृष्ण भिकाजी चु. सा. गोविंदराव याचे पुत्र वामन व बळवंत हे किवळें येथें राहातात. सा. रखमा. किवळें, वाई, गुहागर.

२७


घराणें ११ मध्यें समावेश केला. सं. क्र. ४३ पहा.

खंड पहिला, पृष्ठ ३७१

२८

नाशिक येथें मिळालेल्या खालील लेखांचा समावेश करून वंशावळ पुढें दिली आहे.

दाते. १–४ महादाजी गोपाळ नारो कृष्ण चुलते विठ्ठलपंत बंधु रामचंद्र व विष्णु. चु. बंधु केसोपंत. पुतणे हरी सदाशिव व बाळा व धोंडु. माता वेणु.—केळशी.



३०

नाशिक – वा. दा. गं. ४-४५ महादेव कृष्ण नारोपंत चुलते केसोपंत– सोमेश्वर.

यावरून नारायणास केशव या नांवाचा आणखी एक मुलगा होता.

३२

नाशिक येथील खालील लेखाचा समावेश करून वंशावळ पुढें दिली आहे.

वा. दाते गं. ९-११. रामकृष्ण महादेव बाबदेव महादेव चु. दादंभट. बंधु बाबदेव व आबाभट व गणेश.– सोंदे सावंतवाडी

१ महादेव
२ वावदेव
३ महादेव दादंभट
४ { **रामकृष्ण** आबा
बावदेव गणेश

खंड पहिला, पृष्ठ ३७२

३७

घराणें २८शीं याचा संबंध असावा.

४०

घराणें ३३ शीं याचा संबंध असावा.

खंड पहिला पृष्ठ ३७३

४२

क्रमांक २३ मधील अनंत दीक्षित हे काशीस राहात होते व तें घराणें २६ मधील असल्याचें निश्चित झालें आहे. या क्रमांकांतील अनंतदेव हे हेच अनंत दीक्षित असावे.

४३

नाशिक—वा. दाते १७-६६. ३९-३८ गोळप, सडिये, पुणें.

१ महादेव
२ बल्लाळ
३ नारायण = **सावित्री** गणेश विनायक केशव
४ विश्वनाथ
५ महादेव = **सावित्री** कृष्ण

यांतील केशव बल्लाळ (३) हा घराणें क्रमांक २ धामापूरमध्यें दत्तक गेला असावा. तेथील नांव केसो राघो. या क्रमांकांतील महादेव (१) व घराणें २ मधील महादेव (३) हेहि एक असतील. कारण दत्तक बहुधा जवळचाच घेतात.

सं. क्र. २७ याचा समावेश घराणें ११ मध्यें झाला आहे. महादेव (२) हा या क्रमांकांतील महादेव (१) मानिल्यास त्याचा नातू गणेश असून क्र. २७ मध्येंही गणेश (४) आहे. मधलें नांव कळलें नाहीं तें बल्लाळ असावें.

सं. क्र. ९ मधील नारायण (१) व विश्वनाथ (२) हे यांतील नारायण (३) व विश्वनाथ (४) असतील काय ?

४४

नाशिक–वा. दाते. १८–१०.

बाळाजी नारायण बाळाजी चु. बं. मोर व कृष्ण व बाळ चु. रामभट, महाळुंग.

४५

नाशिक–वा. दाते. ६–५ नंदेश्वर ता. मंगळवेढें, पेंडूर (पंढरपूर ?).

१ विष्णू
२ गोविंद
३ रघुनाथ = लक्ष्मी
४ **विष्णु** = पार्वती
५ { चिंतामणी, रघुनाथ

४६

नाशिक–वा. दाते. १८–१४ यश्वदाबाई भ्र. गणेशपंत सा. नारायण अ. सा. महादेव दीर नरसोपंत व बळवंतराव यांचे पुत्र गणपती व नारायण—नरसोपंताचे पुत्र कृष्णा चु. सा. त्रिंबक महादेव चु. चु. सा. भाऊ याचे पुत्र गोपाळ व विष्णु सा. पार्वतीबाई. धारवाड–पुणें सदाशिव– बसणीकर.

वरील माहिती वंशावळीचे रूपांत मांडली असतां खालीलप्रमाणें दिसते.

१ महादेव — पुत्र: नारायण, त्र्यंबक
२ नारायण = पार्वती; त्र्यंबक; भाऊ
३ गणेश = **यशोदा**; नरसो; बळवंत (नारायणाचे पुत्र); गोपाळ, विष्णु (भाऊचे पुत्र)
४ { कृष्ण (नरसोचा पुत्र); गणेश, नारायण (बळवंताचे पुत्र)

संशोधन क्रमांक ५ मधील अनुक्रमें पिढी १, २, ३ व ४ मधील नांवें महादेव, नारायण, बाळाजी व नारायण या क्रमांकांत त्याच क्रमांत आढळतात. यावरून ही वंशावळ व क्रमांक ५ एकच आहेत असें दिसतें. एकाचें मूळ गांव

सोमेश्वर व दुसऱ्याचें बसणी दिलेलें आहे. घराणें २६ ची दुरुस्त वंशावळ पहा. त्यांत हीं वरील चार नांवें आहेत.

४७

त्र्यंबकेश्वर– पिंगळे ३५-१३ गोरेगांव

१ काशीनाथ
|
२ बाळकृष्ण
|
३ महादेव = साळू
|
४ विष्णु = वाराणशी — बाळकृष्ण
|
५ { परशुराम, रामकृष्ण, वासुदेव }

४८

वेरूळ– पैठणकर ८–९ रामभट नारायणभट आजे बाळंभट—हरिहरेश्वर श्रीवर्धन.

४९

वेरूळ– त्रिंबक वैद्य. १३३–२५

विष्णुभट शास्त्री पिते बाबूभट, आजे रामचंद्रभट– वाडखोल सु. नरगुंद

५०

वेरूळ–पैठणकर. २५–३० शिवरामपंत रामचंद्र आ. महादेव नारायण बं. नीळकंठ नाना व चिंतुकाका. पुत्र गोविंदराव व गोपाळराव व विनायकराव. पुणें आदितवार

पैठण–महेश पाठक पा. ३२ माधवराव रामचंद्र बंधु शिवरामपंत—गांव बीड सु. पुणें.

५१

पैठण–महेश पाठक ५–२६ व ३–२४

धोंडो मोरेश्वर—गांव बोरवाडी परगणे राजापूर.

सरस्वतीबाई भ्र. धोंडो मोरेश्वर दीर बाळाजीपंत–गांव बोरवाडी

५२

नाशिक–वे. त्र्यंबकभट पिंगळे, १८–८ विसाजी कृष्ण बाबाजी—केळशी.

५३

त्र्यंबकभट पिंगळे १२–२२ मनूबाई भ्र. बाळंभट महादेव पुत्र सदाशिव व महादेव—तारळें

त्र्यंबकभट पिंगळे २६–५४. महादेव बाळंभट महादेव बंधु सदाशिव पुत्र बाळंभट पुतणे गुंडो माता मनूबाई. पेंडसे उपाध्याय–तारळें.

वरील दोन उताऱ्यांवरून पुढीलप्रमाणें वंशावळ दिसते :—

१ महादेव
|
२ बाळंभट = मनुबाई
|
३ महादेव — सदाशिव
|
४ बाळंभट — गुंडो

गांव तारळें आहे. खंड पहिला पृष्ठ ११७ वर बाळंभट नारायण (२) याचा वंशविस्तार दिला आहे, त्यांतील नांवें व या वंशावळींतील नांवें बरींच सारखीं आहेत. परंतु तीं क्रमानें सारखीं येत नाहींत. या घराण्यांतील विद्यमान व्यक्तीस महादेव (५) पासून पुढील विस्तार माहीत आहे. पूर्वजांचीं नांवें त्यांस माहीत नाहींत तीं आम्ही क्षेत्रांतील लेखांवरून दिलीं आहेत. आतां उपलब्ध झालेले वरील दोन लेख व पूर्वीं मिळालेले लेख यांत फरक आहे. कोणते लेख बरोबर व कोणते चूक हें समजण्यास साधन नाहीं. परंतु नामसादृश्य व वास्तव्याचें ठिकाण एकच यावरून हीं एकाच घराण्यांतील माणसें दिसतात. संशोधन क्रमांक ३४ (पृष्ठ ३७२) याचाही याच घराण्याशीं संबध दिसतो. ऐ. क्र. ७६ व ७७ पहा.

५४

वे. शंकर विष्णु पिंगळे. १२–४१

गणेश कृष्ण गणेश बंधु नारायण पुत्र गोविंद– हेदवी– नरवण

घराणें १९ मधील वंशावळीशीं हीं नांवें जमत नाहींत.

महादेव (१) च्या ऐवजीं गणेश हें नांव मानल्यास हा लेख त्याच्याशीं जमेल. घराणें १९ मधील दिलेली माहिती या संबंधांत पाहावी.

५५

नाशिक–वा. दाते. २२–१८ बाळंभट बाबजी गोविंदभट बंधु गणेश.

५६

नाशिक–वा. दाते ४-५६ हरी बाजी गणेश – नागोठणें

५७

नाशिक–वा. दाते १२-१९ ठकूबाई भ्र. बाबूभट सा. केशवभट–कोंठिबें–श्रीवर्धन.

५८

नाशिक–वा. दाते ३२-८६ मोरो जनार्दन – पळसाणें.

संशोधन क्रमांक २६ पृष्ठ ३७० मधील नारायण जनार्दनचा हा भाऊ असावा. कारण वास्तव्याचें ठिकाण दोघांनींही पळसाणें सांगितलें आहे.

घराणें २९ मधील मूळ पुरुष जनार्दन ऊर्फ आपाचा मोरो हा भाऊ असावा. आपाजी बल्लाळ नाशिकास पेठे यांच्याकडे होते. पळसाणें गांव नाशिकजवळ आहे.

५९

नाशिक–वा. दा. ३-३६ गंगाबाई भ्र. लक्ष्मणराव दीर नाना पुत्र भिकु–मेणवली.

घराणें १३ पृष्ठ १०३ मधील लक्ष्मण (७) ची गंगाबाई पत्नी असावी. पुरुषोत्तम लक्ष्मण (६) हे नाना फडणीस यांची बायको जिऊबाई हिचे नोकर होते असें पारसनीस संग्रहांतील उपलब्ध पत्रांवरून कळतें व त्यामुळें त्यांचा मेणवलीस संबंध होता. गंगाबाई ही त्यांची सून असावी. हिनें नाना म्हणून दीर सांगितला आहे तो नारायण मानल्यास वरील विधानास पुष्टी येते.

६०

वेरूळ–वे. शें ८–३३ गउवा पुत्र यादोवभ. पि. रामभ. आ. बाळंभ.–संगमेश्वर.

६१

वेरूळ–वे. शे. ७।८५–लक्ष्मीबाई पुत्र गोविंद अनंत—नाशिक.

६२

वेरूळ–वे. शे. ७।८५ आबाजी गोविंद आ. अनंत चु. चु. अपाजी बल्लाळ पुत्र अंतोबा–गुहागर.

सं. क्र. ५८ व घराणें २९ शीं संबंध असावा.

६३

वेरूळ–वे. शे. ५।६ दादाजी गोविंद आ. विठ्ठलपंत—पावस.

६४

शक १६७३ आश्विन शु. १० बुधवासर संवत १८०८ या दिवशीं वाराणशी येथें समस्त ब्रह्मवृंदांनीं क्रमवंतांबद्दल निर्णय केला त्यावर संमतीदर्शक सह्या आहेत त्यांत ' मोरेश्वर पेणसे ' अशी एक सही आहे.

प्रकरण ६ वें

वंशावळी व माहिती

१. पहिल्या खंडांत सहाव्या प्रकरणांत वंशावळी व सातव्या प्रकरणांत घराणें व व्यक्ती यांची माहिती दिली आहे. या खंडांत वंशावळी व व्यक्तीची माहिती या प्रकरणांत एकत्र दिली आहे. वंशावळीचें स्वतंत्र प्रकरण केलें नाहीं.

२. वंशावळींत झालेली वाढ किंवा दुरुस्ती दर्शविण्यापुरता अवश्य तेवढा भाग येथें व्यक्तीच्या माहितीजवळ खंडशः दिला आहे. सर्व घराण्याची वंशावळ पुन्हां दिली नाहीं. अनुसंधानासाठीं खंड एकमधील पृष्ठ तेथें दिलें आहे. वंशावळ मांडण्याची व माहिती देण्याची पद्धति खंड एकप्रमाणेंच ठेवली आहे. वंशावळींतील डावीकडील आंकडे पिढी दाखवितात.

३. व्यक्तींच्या माहितींत पहिल्या खंडांत आलेली माहिती पुन्हां उद्धृत केली नाहीं. फक्त नवीन माहिती दिली आहे.

४. व्यक्तीचें नांव पहिल्या खंडांत कोणत्या पृष्ठावर आलें आहे हें समजण्या साठीं तें पृष्ठ सुरुवातीस दिलें आहे.


घराणें १ लें, गोळप--पुणें--रामपूर

खंड पहिला, पृष्ठ १५१

* **गणेश विष्णु** (११) औद्योगिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ति देण्या-साठीं हे आपले मिळकतींतून किमान चाळीस हजार रुपये बाजूस काढून त्यांचा विश्वस्तनिधि करणार आहेत. त्यासंबंधीं कायदेशीर योजना करीत आहेत. एवढी मोठी रक्कम धर्मार्थ देणारे पेंडसे कुळांत हे पहिले गृहस्थ आहेत.

* **वामन गणेश** (१२) मुंबईस दि इंडियन ह्यूम पाईप कंपनीमध्यें नोकरी आहे. वास्तव्य भिवंडीवाल्याची चाळ तिसरा मजला, दादर– मुंबई. कन्या (१) नलिनी, वय १० (२) मंदाकिनी, वय ८.

* **नारायण गणेश** (१२) हे डी. सी. ई. (सिव्हिल) असून पश्चिम खानदेश जिल्ह्यांत नवापूर येथें पब्लिक वर्क्स खात्यांत ओव्हरसिअर आहेत. भार्या सुमति (कुसुम), पि. वासुदेव गोपाळ पटवर्धन, नाशिक. वि. स. १९४५.



खुर्चीवरील :—१ सौ. शांताबाई वामन, २ मंदाकिनी, ३ गणेश विष्णु, ४ सौ. सरस्वतीबाई गणेश, ५ नलिनी,
६ सौ. सुमतीबाई नारायण.

उभे :—१ वामन गणेश, २ नारायण गणेश.

दि. ४-२-१९४५

खंड पहिला, पृष्ठ १५२

दामोदर सदाशिव (१०) मृ. स. १८९२ वय ६५. पुण्यास राहात. अविवाहित.

रंगनाथ सदाशिव (१०) भार्या यशोदा (काशी), मृ. स. १९२१ वय ७८. कन्या कृष्णा (गंगा), मृ. स. १९२५ वय ६०, भ्र. काशीनाथ विठ्ठल टकले, धुळें.

दत्तात्रेय रंगनाथ (११) ज. श. १७८५ कार्तिक शु. १२, मृ. श. १८४१ चैत्र शु. ३. यांनीं स. १९१५ नवंबरमध्यें आपला दौहित्र रामचंद्र नारायण फडके यांस दत्तक घेतलें. भार्या (१) सावित्री (येसू) पि. अभ्यंकर, पुणें. कन्या माणकु (जानकी), वय ६३, भ्र. दिनकर विष्णु बापट, इंदूर. भार्या (२) लक्ष्मी (गोदू), यांचें शिक्षण इंग्रजी तीन इयत्तेचें झालें होते. त्यावेळच्या मानानें हें शिक्षण विशेष होय. पि. भट गुरुजी, हे परदेशांत जाऊन रंगाचें शिक्षण घेऊन आलेले पुण्यांतील ख्यातनाम व्यापारी होते. कन्या चिणकू (लक्ष्मी), वय ६१. भ्र. नारायण खंडेराव फडके, अकोला. भार्या (३) गंगा (काशी), ज. स. १८७५; वि. स. १८९०. पि. दिनकर विनायक आठवले, सोमेश्वर.



दत्तात्रेय रंगनाथ


* **रामचंद्र दत्तात्रेय** (१२) ज. स. १९०४ मार्च ५. दत्तक. पूर्वीचें नांव रामचंद्र नारायण फडके. भार्या सीता (कमला), वि. स. १९२७. कन्या इंदुमति, कॉलेजमध्यें पहिले वर्षांत.

खंड पहिला, पृष्ठ ७१

१२ रामचंद्र*

१३ दत्तात्रेय* (पुणें) यशवंत श्रीकांत* (पुणें)

* **दत्तात्रेय रामचंद्र** (१३) ज. स. १९३० सप्टेंबर ६. एस. पी. कॉलेजांत ज्युनिअर बी. ए. चे वर्गांत. मॅट्रिकपासून पुढील परीक्षांत उत्तम प्रकारें उत्तीर्ण होऊन पारितोषिकें व शिष्यवृत्त्या मिळविल्या. कॉलेजमधील चित्तपावन विद्यार्थ्यांत इन्टर आर्टसचे परीक्षेंत पहिला क्रमांक आला. इन्टरमधील विद्यार्थ्यांचा लेखसंग्रह 'उजळत्या दिशा' छापून प्रसिद्ध केला. नू. म. वि. हायस्कुलांतील विद्यार्थ्यांच्या स. १९४३ ते ४५ पर्यंतच्या नियतकालीकांतील लेखांत



१ सौ. कमलाबाई, २ दत्तात्रेय रामचंद्र, ३ श्रीकांत रामचंद्र, ४ श्री. गंगाबाई, ५ कु. इंदुमती, ६ डॉ. रामचंद्र दत्तात्रेय.
स. १९४८

उच्चांक गांठून पारितोषिकें मिळविलीं. मासिकें व वर्तमानपत्रें यांमध्यें लेख लिहितात.

यशवंत रामचंद्र (१३) ज. स. १९३६ मार्च ४. मृ. स. १९४६ मार्च २८. नू. म. वि. त मराठी ४ थींत पहिला क्रमांक आला. इंग्रजी १ लींतही पहिला क्रमांक होता.



यशवंत रामचंद्र

* **श्रीकांत रामचंद्र** (१३) ज. स. १९४४ सप्टेंबर १५.

नारायण सदाशिव (१०) मृ. स. १९१५. वय ८०. शेवटीं काशीक्षेत्रांत मृत्यु यावा म्हणून काशीस गेले. अविवाहित.

गोपाळ भास्कर (९) पुण्यास सावकारी करीत. मंडईंत खुर्दा विकीत. भार्या (१) पुत्र गोविंद. भार्या (२) पुत्र विठ्ठल. भार्या (३) राधा (यमू), पि. गणेश दिवेकर, पुणें. पुत्र सीताराम, वामन व नारायण. पहिल्या खंडांत वंशावळीमध्यें यांस शिवराम म्हणून एक पुत्र दाखविला आहे. परंतु या नांवाचा यांस पुत्र नव्हता असें नारायण गोपाळ (१०) हे सांगतात. कन्या (१) वालू भ्र. टकले, पिंपळगांव–नाशिक. (२) ठकू, भ्र. कृष्णाजी गंगाधर जोशी, आंबेगांव.

गोविंद गोपाळ (१०) पुण्यास सावकारी करीत. भार्या गोदू. कन्या मैना, भ्र. गोपाळराव भट, पुणें.

वासुदेव गोविंद (११) मॅट्रिक. मालेगांव (नाशिक) येथील इंग्रजी शाळेंत हेडमास्तर होते. मृ. श. १८५५ आश्विन व. ३०. भार्या अन्नपूर्णा (यमू), पि. काशीनाथ बापू काळे. कन्या गोदू (भागीरथी), भ्र. रामकृष्ण नागेश अभ्यंकर, सातारा.

विठ्ठल गोपाळ (१०) पुण्यास होते.

सीताराम गोपाळ (१०) पुण्यास असत. भार्या कृष्णा, पि. दाते, पुणें.

गोपाळ सीताराम (११) पुण्यास नगरपालिकेच्या नाक्यावर कारकून होते.

वामन गोपाळ (१०) ज. श. सुमारे १८००; मृ. स. १९३१. जी. आय्. पी. रेल्वेंत स्टेशनमास्तर होते. भार्या राधा (चिटकू), पि. कृष्णाजी विश्वनाथ छत्रे, वऱ्हाड. कन्या सोनू (सगुणा), भ्र. दत्तात्रेय (यशवंत) विष्णु कानिटकर, जुन्नर.

* **नारायण गोपाळ** (१०) नवंबर १९४४ मध्यें यांची पुण्यास गांठ पडली. ज. श. १८०४. खासगी नोकरी होती. सध्यां पुण्यास असतात. अविवाहित. शिवराम या नांवाचा भाऊ यांस नव्हता असें यांच्या सांगण्यावरून समजतें.

लक्ष्मण विश्वनाथ (४) पेशवे दप्तरांत "लक्ष्मण विश्वनाथ पेंडसे" यांस साडेतीन तर्फा मावळे ता. शिवनेर येथील फडणीशी दिल्याचा उल्लेख आहे. ते हेच लक्ष्मण विश्वनाथ असावेत. (ऐ. क्र. ४१ नि ४२ पहा.)

त्र्यंबक विठ्ठल (४) सु. सन १२११ (इ. स. १८१०) मध्यें केळशीचे रहिवाश्यांचे यादींत "घरवाडी महाजन" ही यांचे नांवावर दाखविली आहे. (पे. द. जमाव रुमाल ४८०)

खंड पहिला, पृष्ठ १५३

रामचंद्र विष्णु (७) कन्या (४) गोदू, भ्र. विनायकराव (नारायणराव नव्हे) अभ्यंकर, गुलबर्गा.

यशवंत रामचंद्र ऊर्फ बापू (८) मृ. स. १९२५. यांना बापू म्हणत.

* **भगवान यशवंत** (९) ज. स. १९०५. वास्तव्य ३१६ इ शेवटचा मजला, हेमराज वाडी, ठाकूरद्वार, मुंबई २. भार्या (२) पि. करंदीकर, अकोला.

विष्णु विनायक (८) कन्या सुशीला, भ्र. चिंतामणराव दातार, मुंबई.

* **पंढरीनाथ विष्णु** (९) कन्या (२) सुनंदा (३) रजनी.

* **अच्युत पंढरीनाथ** (१०) शिवाजी कॉमर्स कॉलेज, अमरावती.

* **वसंत पंढरीनाथ** (१०) शिवाजी आर्टस् कॉलेज, अमरावती.

* **सुरेशचंद्र पंढरीनाथ** (१०) ज. स. १९४०.

खंड पहिला, पृष्ठ ७२

९ पंढरीनाथ*   श्रीनिवास*   पुरुषोत्तम*   गणेश*   नारायण*

१० { अच्युत* भालचंद्र* सुरेशचंद्र*   कुमार*   जयंत* प्रभाकर विजयकुमार*
{ वसंत* शरच्चंद्र*   प्रकाश* अनिलकुमार*

उमरावती उमरावती उमरावती कामठी नागपूर नागपूर नागपूर

खंड पहिला, पृष्ठ १५४

शंकर सदाशिव (८) भार्या (२) पार्वती (ठकू), पि. नरहर केशव लिमये, नागपूर.

* **श्रीनिवास शंकर** (९) यांस सदाशिव ऊर्फ राजाभाऊ असें म्हणतात. ज. स. १९११. यांस हायस्कूल शिष्यवृत्ति व एन्ट्रन्स एक्झॅमिनेशन शिष्यवृत्ति (१९२६) मिळाली. कामठी येथें ब्रुक बाँड कंपनीचे असिस्टंट मॅनेजर आहेत. जातीवंत प्रेम या नांवाची कादंबरी लिहिली. भार्या नलिनी (शांता), पि. वासुदेव दत्तात्रेय गाडगीळ, माटुंगा. वि. स. १९३८. कन्या शैला.



८ नारायण केशव, २० अरुणकुमार, ४ सौ. पुष्पावती, ९ केशव हरी, ५ सौ. सीताबाई, १० जगन्नाथ हरी, ११ गणेश केशव, ६ सौ. इंदिराबाई, १२ वासुदेव केशव, ७ सौ. भागीरथीबाई, १ सौ. कृष्णाबाई जोगळेकर, २ अरविंद, १८ प्रमिला, १९ रामचंद्र केशव, ३ सौ. काशीबाई जोशी, १३ गंगाधर केशव, १४ दुर्गाताई, १५ सौ. सिंधूबाई जोग, १६ तारा, १७ दामोदर केशव.

दि. ८-७- १९४१

* **कुमार श्रीनिवास** (१०) ज. स. १९३९ जुलै २४.

* **माधव शंकर** (९) भार्या मालिनी (मैना), पि. परांजपे, जबलपूर. कन्या लीला, ज. स. १९४२ ऑगस्ट ८.

* **पुरुषोत्तम शंकर** (९) एल्. एम्. पी. नागपूर येथें डॉक्टर आहेत. सध्यां मुंबईस एम्. बी. बी. एस्. चा अभ्यास करितात. भार्या उषा, पि. सोहोनी, अकोला.

* **जयंत पुरुषोत्तम** (१०) ज. स. १९४७ जून २४.

* **दिगंबर सदाशिव** (८) भुसावळ येथें डी. टी. एस ऑफिसमध्यें नोकरी. भार्या यमुना (दुर्गा), पि. रामचंद्र त्र्यंबक सोमण, मृ. स. १९४०. कन्या (१) शकुंतला, भ्र. नरहर वासुदेव राहाळकर, पुणें. (२) प्रमिला, भ्र. गोपाळराव बापट, यवतमाळ.

जगन्नाथ हरी (८) मृ. स. १९४७ सप्टेंबर १६. भार्या (१) यशोदा (विठाबाई). भार्या (२) यशोदा (यमुना). कन्या माई (रमा).

* **केशव हरी** (८) भार्या सीता (गंगू). कन्या (२) कृष्णा (लक्ष्मी), वि. श. १८५३. (३) काशी (पद्मावती), भ्र. सदाशिव दत्तात्रेय जोशी, उमरावती. वि. स. १९३९. (४) सिंधु, भ्र. शंकर हरी जोग, काटाभांजी.

खंड पहिला, पृष्ठ १५५

* **गणेश केशव** (९) नागपूर येथें हितवाद पत्राचे असिस्टंट मॅनेजर आहेत. भार्या (३) इंदिरा (कमल), पि. श्रीधर विष्णु परांजपे, वर्धा. वि. स. १९४१. पुत्र प्रकाश. कन्या कुमुद, ज. स. १९४३ एप्रिल १६.

प्रभाकर गणेश (१०) मृत.

* **प्रकाश गणेश** (१०) ज. स. १९४५ डिसेंबर २३.

* **वासुदेव केशव** (९) ज. स. १९११ नवंबर २१. पंचमढीस क्लबमध्यें अकाउन्टंट होते. रायपूर येथें इन्कमटॅक्स सल्लागार म्हणून काम करतात. भार्या भागीरथी (द्वारका), पि. भिकाजी हरी चितळे, नागपूर. वि. स. १९३८.

* **नारायण केशव** (९) नागपुरास पी. डब्ल्यु. डी. मध्यें ओव्हरसीअर आहेत. भार्या पुष्पावती (कमल), पि. अनंत गणेश गोंधळेकर, दारवा. वि. स. १९४०.

* **विजयकुमार नारायण** (१०) ज. स. १९४४ जुलै १०.

* **अनिलकुमार नारायण** (१०) ज. स. १९४६ ऑक्टोबर २६.

* **गंगाधर केशव** (९) ज. स. १९१८ सप्टेंबर ३०. मॅट्रिक. नागपूर येथें के. के. माणकेश्वर अँड को, रजिस्टर्ड अकाउन्टंट व ऑडिटर्स यांचेकडे सीनीअर असिस्टंट आहेत. याच कंपनीच्या इंदूर शाखेची व्यवस्था पाहतात. भार्या वसुधा (सुधा), पि. विनायक गोपाळ दीक्षित, अकोला. वि. स. १९४८.

* **दामोदर केशव** (९) नागपुरास पॉप्युलर स्टोअर्समध्यें नोकरी.

* **रामचंद्र केशव** (९) मॅट्रिक विद्यार्थी, नागपूर.

रामकृष्ण लक्ष्मण (७) कन्या (१) बहिणा (अन्नपूर्णा), भ्र. नरसिंह यादव मराठे, उमरावती.

खंड पहिला, पृष्ठ १५६

विश्वंभर रामकृष्ण (८) कन्या (२) वेणू भ्र. गोखले, नागपूर.

* **प्रभाकर विश्वंभर** (९) वाशीम येथें पोलिसखात्यांत नोकरी आहे. भार्या वेण (आशा), पि. वेलणकर. वि. स. १९४८.

* **भास्कर विश्वंभर** (९) अमरावती येथें जंगलखात्यांत नोकरी आहे.

* **वैजनाथ रामकृष्ण** (८) सेवानिवृत्त होऊन धानोरा येथें राहतात. भार्या (१) कमला (अंबू), पि. रामचंद्र त्र्यंबक सोमण, कल्याण. कन्या (१) इंदू, भ्र. कृष्णराव जोशी, नागपूर.

* **मनोहर वैजनाथ** (९) धानोरा येथें शेती पाहतात.

* **लक्ष्मण वैजनाथ** (९) धानोरा येथें शेती पाहतात.

सखाराम रामकृष्ण (८) मृ. स. १९४८ सप्टेंबर १. कन्या द्रौपदी, भ्र. अनंतराव करंदीकर, कल्याण.

* **जनार्दन सखाराम तथा राजाभाऊ** (९) नागपूर येथें डेप्युटी अकाउन्टन्ट जनरल (पोस्ट व टेलिग्राफ) ऑफिसमध्यें नोकर आहेत. भार्या जयश्री (सुशीला), पि. गोपाळराव जोगळेकर, नागपूर. वि. स. १९४७.

* **श्रीराम सखाराम** (९) धानोरा येथें पटवारीपणाचें काम करतात.

घराणें २ रें, गोळप–धामापूर

खंड पहिला, पृष्ठ १५८

केशव राघो (६) यांचें वय श. १७०० मध्यें ७० वर्षांचें होतें अशी नोंद पेशवे दप्तरांतील कागदांत आहे. (ऐ. क्र. ४४ पहा). तसेंच सु. ११८८ (इ. स. १७८७) मध्यें खालील उल्लेख आहे.

तेरीज कुळकर्ण मौजे माखजन तर्फ संगमेश्वर

केसो रघुनाथ पेंडसे भात -॥-। (पे. द. जमाव रुमाल ४९६)

सदाशिव केशव (७) यांनीं शक १६९८ त आपले बंधु राघो केशव हे तसदीमुळें तोतयाकडे गेले होते सबब त्यांस त्रास न देणें म्हणोन पेशव्यांस विनंती केली. (ऐ. क्र ४३ पहा.)


खंड पहिला, पृष्ठ १५९

राघो केशव (७) हे तोतयाकडे गेले होते परंतु तोतया मोडण्यापूर्वी हुजूर दाखल झाले. (ऐ. क्र. ४३ पहा.) यांस सु. सबासबैन छ २९ रविलावल रोजीं

तालुके विजयदुर्ग येथील फडणीशीकडील दप्तरदारीची आसामी दिली.
(पे. द. रुमाल ५९८) वेतन सालीना खेरीज शिरस्ता.
१५० नक्त मोइन
१०० सनद गला खंडी ५ दर रु. २०

* **गजानन कृष्ण** (१२) सेवानिवृत्त होऊन पनवेल येथें राहतात. भार्या यमुना, पि. वामन विश्वनाथ विद्वांस, पुणें. कन्या (१) लीला (पद्मा), भ्र. हरी राजाराम वैद्य, मुंबई. (२) सुशीला, इंग्रजी ४ थींत.

खंड पहिला, पृष्ठ ७४



खंड पहिला, पृष्ठ १६०

* **सुरेश (शिवराम ऊर्फ बंडू) गजानन** (१३) ज्युनीअर बी.ए. शिकून पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्यें गेले. नाशिक येथें सबइन्स्पेक्टर आहेत. वास्तव्य—आशा, बलसारा कॉलनी, नाशिक. भार्या स्नेहलता (अंबू), पि. वैजनाथ रघुनाथ टिळक, वरसई.

* **मनोहर गजानन** (१३) वय १६. पनवेल येथें मॅट्रिकचे वर्गांत.

मोरो रामकृष्ण (११) पुण्यास फोटो झिंको खात्यांत नोकर होते. हे विवाहित होते. यांनीं शिक्षण प्रसारक मंडळी, पुणें या संस्थेस रु. ४५०० ची देणगी दिली.

एकनाथ गजानन (१२) मृ. सुमारे स. १९३५. वय ३५. अविवाहित.

* **मुकुंद गजानन** (१२) वय ३६. इंदूर येथें टायरटच्यूब दुरुस्तीचें दुकान गेलीं १६ वर्षें आहे. घर क्र. १०३ कृष्णपुरा, इंदूर. भार्या इंदिरा, पि. परांजपे, उंबरगांव. वय ३०. कन्या (१) शालिनी, वय ९. (२) सुलभा, वय ७. (३) चंद्ररेखा, वय १.

* **श्रीनिवास मुकुंद** (१३) वय ५.

* **चंद्रशेखर मुकुंद** (१३) वय ३.

वासुदेव रामकृष्ण (११) पोस्टखात्यांत नोकर होते. कन्या (२) अंबू, माहुलीच्या भिडे घराण्यांत दिली.

विष्णु वामन (१२) भार्या सगुणा (मनू), वय ३७. पि. भालचंद्र गणेश भावे, कळंबुशी. या मोफतलाल हिंदु स्विमींग बाथ, मुंबईच्या लेडी इन्स्ट्रक्टर आहेत.

गणेश जयराम (११) कन्या दुर्गा (रमा), भ्र. नरहरी महादेव लिमये, रत्नागिरी.

खंड पहिला, पृष्ठ १६१

रावजी बाळकृष्ण (११) कन्या (१) नर्मदा (लक्ष्मी) मृ. स. १९३९ मार्च १. (२) कृष्णा मृ. स. १९३१. (३) गंगू मृ. स. १९४३ फेब्रु. ११.

खंड पहिला पृष्ठ १६२

* **रघुनाथ रावजी** (१२) कन्या (१) सुमति (उषा), भ्र. प्रभाकर कृष्ण दामले, वि. स. १९४६. (४) लीला, ज. स. १९३८ मे २९. (५) प्रमिला, ज. स. १९४० जुलै ११.

खंड पहिला, पृष्ठ ७५

१२	रघुनाथ*	महादेव*
	|	|
१३	बाळकृष्ण* जयंत* शशिकांत* रमाकांत*	मुरलीधर*
	धामणी	धामणी

* **बाळकृष्ण रघुनाथ** (१३) इंग्रजी तिसरींत.

* **जयंत रघुनाथ** (१३) इंग्रजी पहिलींत.

* **शशिकांत रघुनाथ** (१३) ज. स. १९४२ मे १९.

* **रमाकांत रघुनाथ** (१३) ज. स. १९४४ एप्रिल २१.

* **महादेव रावजी** (१२) भार्या (१) इंदिरा (विठा), पि. हरी गोपाळ केळकर, चिपळूण. वि. स. १९३९. कन्या विजया ज. स. १९४१. भार्या (२) कमळा (प्रभावती), ज. स. १९२९. पि. विष्णु शिवराम पोंक्षे, आंबव. वि. स. १९४६. पुत्र मुरलीधर.

* **मुरलीधर महादेव** (१३) ज. स. १९४८ जून ८.

पुरुषोत्तम रावजी (१२) मृ. स. १९४३ फेब्रु. २०. भार्या सुशीला (गौरी), ज. स. १९२४. वि. स. १९४२. पि. परशुराम नारायण पोंक्षे, आंबव.

* **विनायक रावजी** (१२) मॅट्रिक. ठाणें येथें बी. जे. हायस्कूलमध्यें नोकर आहेत.

* **शंकर रावजी** (१२) मॅट्रिक. मुंबईस सरकारी नोकर आहेत.

* **दत्तात्रेय हरी** (११) कन्या (२) मालती मृत. (३) उषा वय ४ (४) कुंदा वय २.

खंड पहिला, पृष्ठ ७५

११	दत्तात्रेय*	गंगाधर*
	|	|
१२	श्रीकृष्ण* वसंत* वासुदेव* रामचंद्र*	यशवंत* दिनकर* अशोक* प्रभाकर* सुधाकर*
	धामणी	धामणी

* **वासुदेव दत्तात्रेय** (१२) वय ८
* **रामचंद्र दत्तात्रेय** (१२) वय ६
* **अशोक गंगाधर** (१२) वय ८
* **प्रभाकर गंगाधर** (१२) वय ६
* **सुधाकर गंगाधर** (१२) वय २

खंड पहिला पृष्ठ १६३

शिवराम रघुनाथ (८) भार्या उमा.

खंड पहिला पृष्ठ १६४

गोपाळ दामोदर (१०) भार्या अन्नपूर्णा (मनू), पि. मोरो कृष्ण मराठ, गोरेगांव.

खंड पहिला पृष्ठ १६६

धोंडो जनार्दन (१०) भार्या पार्वती, पि. गोपाळ परशुराम पोंक्षे, आंबव.

खंड पहिला, पृष्ठ ७७

११	हरी*		विनायक*			
१२	पद्माकर* ठाणें	मुकुंद* ठाणें	दिगंबर* ठाणें	प्रभाकर* ठाणें	हनुमान* ठाणें	भास्कर* ठाणें

खंड पहिला, पृष्ठ १६७

* **हरी कृष्ण** (११) नौपाडा-ठाणें येथील ग्रामपंचायतींतील ब्राह्मणवाडीच्या हद्दींतील एका रस्त्यास यांचें म्हणजे "हरी कृष्ण पेंडसे रोड" असें नांव दिलें आहे. भार्या (३) लक्ष्मी (वाराणशी), पि. दिनकर रामकृष्ण पोंक्षे, आंबव. सर्व संतती यांची. कन्या (१) कमल (मंदाकिनी) भ्र. महेश्वर लक्ष्मण रानडे, मुंबई. (२) कुसुम (मंगला), भ्र. मनोहर (चिंतामणि) वैद्य, दादर.
* **पद्माकर हरी** (१२) मॅट्रिक.
* **मुकुंद हरी** (१२) ज. स. १९३८ मे २५.
* **लक्ष्मण कृष्ण** (११) यांनीं आर्यप्रलाप किंवा परमेश्वरस्तव या नांवाचें १८ पृष्ठांचें पद्य श. १८२९ मध्यें प्रसिद्ध केलें.
* **विनायक कृष्ण** (११) सेवानिवृत्त होऊन स्वतःचें घर क्रमांक ३८, ब्राह्मणवाडी, ठाणें येथें राहतात. भार्या सरस्वती मृ. स. १९४० ऑक्टोबर १. कन्या (१) यमुना (मंदाकिनी), भ्र. शामराव सहस्रबुद्धे, कल्याण. मृ. स. १९४२. (२) नर्मदा (मंदाकिनी), भ्र. लक्ष्मण जोशी, नाशिक (३) शकुंतला, मॅट्रिकच्या वर्गांत.
* **दिगंबर विनायक** (१२) वय २४. मुंबई नगरपालिकेंत नोकरी आहे. भार्या मालती (सुशीला), पि. रामचंद्र गोपाळ चाफेकर, तळेगांव दाभाडे. वि. स. १९४८.

* **प्रभाकर विनायक** (१२) ज. स. १९३१ ऑगस्ट ३१. वाङमय पहिले वर्षात आहेत.
* **हनुमान विनायक** (१२) ज. स. १९३७ मार्च १४. मराठी शिकतो.
* **भास्कर विनायक** (१२) ज. स. १९३९ डिसेंबर २९. मराठी शिकतो.

घराणें ३ रें, गोळप–चौल–श्रीवर्धन

खंड पहिला, पृष्ठ १६९

सु. स. ११५६ मोहरम १७ (श. १६७७ आश्विन व. ४ शुक्रवार, स. १७५५ ऑक्टोबर २४) ला राजपुरीपैकीं भात श्रीवर्धनकर ब्राह्मणांस पेशव्यांनीं धर्मादाव करून दिलें; त्यांत खालील दोन नांवें आढळतात :—

१ हरभट चांगबोले
२ महादेवभट चांगबोले

नारो त्र्यंबक यांनीं भात कमजास्त केलें म्हणोन ज्यांचें कमी केलें त्या ब्राह्मणांनीं विनंती केल्यावरून ३० (तीस) ब्राह्मणांस श. १६९७ मध्यें पेशव्यांनीं भात करार करून दिलें. (ऐ. क्र. ४५ पहा.) यांत (१) बाबाजीभट चांगबोले, हरभट यांचे पुत्र, हरभट मृत्यु पावल्यामुळें (२) महादेवभट चांगबोले अशीं नांवें आहेत.

हे हरभट व महादाजीभट घराणें ३ मधील महादेव गणेश (५) व हरी गणेश (५) होत. महादेव गणेश (१०) यांस सध्या रोहें मामलतदार कचेरींतून रोख इनाम रु. ७ चालू आहे. हरभटाचे पांच पुत्र असल्याचें पृष्ठ ७९ वर दाखविलें आहे. त्यांत सावाजी व आबाजी असे दोन पुत्र आहेत; त्यांतील एक बाबाजी असावा.

हरी गणेश हे वरील माहितीवरून श. १६७७ ते १६९७ या दरम्यान केव्हां-तरी मृत्यु पावले असावे.

त्र्यंबक महादेव (६) पे. द. कोंकण जमाव रु. १३८ मध्यें मौजे कुणें येथील शुक्ल यांची जमीन भाऊबंदकीमुळें सुटली होती ती त्र्यंबकभट पेंडसे यांजकडे होती अशी नोंद आहे. श. १७६३.

खंड पहिला, पृष्ठ १७०

रघुनाथ सीताराम (१०) भार्या जानकी. यांनीं अखिल भारत हिंदु महिला सभा प्रचारकार्याकरितां १०० रु. दिले.

* **यशवंत रघुनाथ** (११) शनवार पेठ, गृह क्रमांक ११४, पुणें ह्या स्वतःचें घरांत राहतात. भार्या (१) लक्ष्मी (गोदू), पि. बाळकृष्ण विष्णु मेहेंदळे, पुणें. भार्या (२) यशोदा (सुभद्रा), पि. शिवराम श्रीधर दीक्षित, पुणें. सर्व संतती हिची. कन्या कमल (सुमति), भ्र. भालचंद्र नारायण लिमये, पुणें.

* **सीताराम यशवंत** (१२) मॅट्रिक. आय्. ए. एस्. सीमध्यें व्हॉइसरॉय कमिशन घेऊन महायुद्धांत चार वर्षें नोकरी केली. सध्यां अजमीर येथें रेल्वेखात्यांत शिक्षण चालू. भार्या मंदाकिनी (लीला), वय १८. पि. नरहर वासुदेव बेडेकर, रोहें. वि. स. १९४७.

खंड पहिला, पृष्ठ १७१

* **नीलकंठ रघुनाथ** (११) इंडियन मोटार सर्व्हिसमध्यें नोकरी आहे. कन्या (१) शांता, भ्र. भालचंद्रपंत घाणेकर, पुणें. (२) लीला, वय ७.

* **प्रभाकर नीळकंठ** (१२) मॅट्रिकच्या वर्गांत.

* **पांडुरंग नीळकंठ** (१२) पुणें व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटमध्यें शिक्षण चालू.

* **रघुनाथ नीळकंठ** (१२) इंग्रजी शिक्षण चालू.

* **गोविंद नीळकंठ** (१२) इंग्रजी शिक्षण चालू.

विश्वनाथ मुकुंद ऊर्फ बळवंत (९) भार्या सत्यभामा (यशोदा), ज. श. १८०३ वि. श. १८१४. पि. गंगाधर अनंत नित्सुरे, वाई.

दत्तात्रेय हरी (९) मृ. स. सुमारें १९४२. कन्या (५) पद्मावती, भ्र. पंडीत, पुणें.

* **विश्वनाथ दत्तात्रेय** (१०) यवतमाळला वकिली करतात.

* **मधुकर दत्तात्रेय** (१०) यांना व्हाइसरॉयचें कमिशन मिळालें.

खंड पहिला, पृष्ठ १७३

गोपाळ वासुदेव (८) भार्या (१) रखमा (साळू), पि. प्रभाकर नारायण विनोद–मोडक.

खंड पहिला पृष्ठ १७५

* **काशीनाथ केशव** (१०) महाराष्ट्र चित्तपावन संघाच्या नियामक मंडळाचे सभासद व राष्ट्रीय शिक्षण मंडळ, लोकमान्य एज्यु. सोसायटी आणि अष्टांग आयुर्वेद शिक्षण मंडळाच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सभासद आहेत. कन्या लीला, बी. एस्सी (१९४६).

खंड पहिला, पृष्ठ १७७

* **भालचंद्र काशीनाथ** (११) पुण्यास मॅट्रिकचे वर्गांत.

* **मधुसूदन जनार्दन** (९) भार्या (२) लक्ष्मी मृ. स. १९४१.

गोविंद वासुदेव (८) भार्या (२) सावित्री (सखू), पि. कृष्णाजी पटवर्धन, पुणें. कन्या (१) गंगू (लक्ष्मी), वय ४९. भ्र. विष्णु बाळाजी गोखले, पुणें. (२) चिंगू (जानकी).

* **शंकर गोविंद** (९) पुण्यास डेक्कन डिस्ट्रीब्युटर या नांवाचें दुकान चालवितात. भार्या इंदिरा (कृष्णा), ज. स. १९०३. पि. सदाशिव रामचंद्र आपटे, इचलकरंजी.

कन्या (१) उषा (मंदाकिनी), इंटर आर्टस्. वि. श. १८६२. भ्र. वसंत काशीनाथ पटवर्धन, पुणें. (२) वैजयंती, मॅट्रिकचे वर्गात. (३) निर्मला, ज. स. १९३८ सप्टें. २१. इंग्रजी पहिलींत.

खंड पहिला, पृष्ठ १७८

* **माधव शंकर** (१०) जन्म १ । ९ । १९२३. नाशिक येथील भोसले मिलिटरी स्कूलमध्यें एक वर्ष शिक्षण झालें. पुणें नू. म. वि. हायस्कूल-मधून मॅट्रिक. फर्ग्युसनमधून इंटर सायन्स. **बनारस हिंदु-युनिव्हर्सिटींत** १९४५ मध्यें बी. एस्सी. फर्स्ट क्लास. १९४६ मार्च २३ ला अमेरिकेला गेले. तेथील मिचिगान युनिव्हर्सिटीची पुन्हां बी. एस्सी. पदवी मिळविली १९४७. पुढें सहा महिने व्हिटॅमिन तयार करण्याचें शिक्षण घेतलें. सध्यां एम्.एस्सी-चें शिक्षण कोलंबस, ओहिओ युनिव्हर्सिटीमध्यें चालू आहे.



माधव शंकर

* **महादेव गणेश** (१०) चांदा (मध्यप्रांत) येथें शेती करतात. वास्तव्य गोविंद-स्वामींच्या देवळाजवळ. हे चांगबोले आडनांव लावतात. भार्या गंगा (नर्मदा), मृ. स. १९१९ ऑगस्ट ३.

खंड पहिला पृष्ठ ७९

९ गणेश
|
१० महादेव*
|
११ गजानन
चांदा

गजानन महादेव (११) मृ. स. १९१७ सातवे वर्षी.

* **केशव जनार्दन** (११) वावें—मदगड येथें शेती करतात. भार्या शारदा (भीमा) पि. जोशी, हर्णे. कन्या उषा. ज. श १८६९.

* **विश्वास केशव** (१२) ज. वावें—मदगड श. १८६७.

* **महादेव सदाशिव** (१०) भार्या पार्वती, मृ. श. १८४९.

* **गजानन वासुदेव** (११) मॅट्रिक. कांहीं दिवस शिक्षक होते. हल्लीं श्रीवर्धन येथें घरचा व्यवहार, शेती व व्यापार पाहतात. भार्या विमला (कृष्णा), पि. दातार, म्हशेळें. ज. श. १८४७. कन्या प्रभावती, ज. श. १८६९.

* **चिंतामणि वासुदेव** (११) इंग्रजी शिक्षण चालू.

* **रामकृष्ण सदाशिव** (१०) कन्या (१) सिंधु, मुंबई युनिव्हर्सिटी व स्त्रियांची युनिव्हर्सिटी यांची मॅट्रिक. भ्र. सहस्रबुद्धे.

* **अनंत रामकृष्ण** (११) मॅट्रिक. सिद्धार्थ कॉलेजांत शिकत आहे.

* **वसंत रामकृष्ण** (११) ज. श १८६१. मराठी शिक्षण चालू.

खंड पहिला, पृष्ठ ८०–८१

१०	रामकृष्ण*		विनायक*		हरी*	दत्तात्रेय*	गोविंद*
११	केशव*	अनंत* वसंत*	रामचंद्र*	बाळकृष्ण*	सुधीर*	सुहास*	श्रीनिवास* घनश्याम*
१२	विश्वास*		आनंद*				
	श्रीवर्धन	दादर	सुथरी	सुथरी	दादर	दादर	मुरुड

खंड पहिला, पृष्ठ १७९

* **विनायक पांडुरंग** (१०) कन्या आशा, ज. स. १९४६.

* **रामचंद्र विनायक** (११) शिक्षण सातारा आर्यांग्लवैद्यकविद्यालयाचें शेवटचें वर्ष. पत्ता :—सुथरी (कच्छ). भार्या मथुरा (सुशीला), पि. दामोदर साठे, सुसेरी. वि. स. १९४६.

* **आनंद रामचंद्र** (१२) ज. स. १९४८.

* **बाळकृष्ण विनायक** (११) ज. स. १९३६. शिक्षण गुजराथी ६ वी.

* **विष्णु पांडुरंग** (१०) यांनीं सप्टेंबर १९४७ मध्यें जंजिरा संस्थानांतील सत्याग्रहांत भाग घेतला.

* **रघुनाथ विष्णु** (११) बी. कॉम्. जंजिरा बँकेंत नोकरी आहे.

* **प्रभाकर विष्णु** (११) मॅट्रिक.

* **सुरेश विष्णु** (११) इंग्रजी २ री.

* **हरी पांडुरंग** (१०) मॅट्रिक. एल्. एम्. ई. वास्तव्य—इस्माईल बिल्डिंग, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई. कन्या (२) सुनंदा, ज. स. १९३९.

* **सुधीर हरी** (११) ज. स. १९४४ मे १४.

* **दत्तात्रेय पांडुरंग** (१०) मुंबईस पोर्टट्रस्टहेडऑफिसमध्यें लघुलेखक आहेत. संगम नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें. भार्या सुमति (शांता), शिवणकामाचा डिप्लोमा. पि. बर्वे, केळशी, वि. स. १९४०. कन्या शोभना, ज. स. १९४५.

* **सुहास दत्तात्रेय** (११) ज. मुंबई स. १९४१. मराठी २ री.

अनंत यादव (९) भार्या रमा, मृ. श. १८६३.

नारायण यादव (९) मृ. स. १९४३ डिसेंबर ७. श्रीवर्धन येथील ब्राह्मणसभा, सार्वजनिक वाचनालय, इंग्लिश स्कूल इत्यादि संस्थांचे हे उत्पादक असून श्रीवर्धन येथील सार्वजनिक चळवळीचे सूत्रधार होते. यांनीं श्रीवर्धनला गीताजयंति, टिळकपुण्यतिथि, थोरले बाजीराव पेशवे यांची पुण्यतिथि इत्यादि नवीन समारंभ चालू केले. गांवांतील कित्येक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. धार्मिक, सामाजिक, राजकीय सर्वच चळवळींत निर्भयपणें पुढाकार घेत.

* **गोविंद नारायण** (१०) कन्या जान्हवी ज. स १९४६.

* **श्रीनिवास गोविंद** (११) ज. स. १९३६. मराठी ६ वी.

* **घनश्याम गोविंद** (११) ज. स. १९४४.

भास्कर यादव (९) मृ. स. १९४६ नोव्हेम्बर ३. हे लो. टिळकांचे कट्टे अनुयायी होते. लोकमान्यांच्या बहुतेक चळवळींत यांनीं आपुलकीनें भाग घेतला. स. १९१८ सालीं मुंबईंत जंजीरा रयतसभेची यांनीं स्थापना केली. स. १९१९ सालीं जंगलसत्याग्रह करून मालकीहक्काचे आणेवारीचे पैसे लोकांना परत देण्यास जंजीरा दरबारला यांनीं भाग पाडलें. स. १९२० सालीं श्रीवर्धन तालुका सभा स्थापन केली. आपलें सर्व आयुष्य जनसेवेंत घालविलें.

खंड पहिला, पृष्ठ १८०

भिकाजी बाळकृष्ण (९) मृत.

* **गंगाधर भिकाजी** (१०) धरणगांव येथें रमेश क्लॉथ स्टोअर्समध्यें आहेत.

केरो(केशव) दामोदर (१०) भार्या अन्नपूर्णा (सई), ज. स. १९१२. पि. रामचंद्र बोडस, वरसई. या बाई मुंबईस महमदी बिल्डिंग, सदाशिव गल्ली, गिरगांव येथें राहतात.

खंड पहिला, पृष्ठ ८२

१०	केरो (केशव)	भालचंद्र
	|	|
११	{ अनंत* यशवंत*	सुधाकर*
	मुंबई	श्रीवर्धन

* **अनंत केशव** (११) ज. मुंबई स. १९३२. इंग्रजी ४ थी.

* **यशवंत केशव** (११) ज. मुंबई स. १९३४. मराठी ५ वी.

* **महादेव त्र्यंबक** (१०) कुर्ल्यास असतात.

* **सीताराम महादेव** (११) मॅट्रिक. जी. आय. पी. रेल्वेंत नोकरी आहे. वास्तव्य सर्वेश्वर मंदिर, कुर्ला. भार्या मंगला, माहेर कशेण (कुलाबा) येथें.

भालचंद्र त्र्यंबक (१०) मृ. श. १८६४. भार्या गंगा मृ. श. १८६३.

* **सुधाकर भालचंद्र** (११) ज. दिवेंआगर श. १८५७. मराठी शिक्षण चालू.

लक्ष्मण त्र्यंबक (१०) मृ. श. १८६९. कन्या विमल, ज. श. १८६८.

* **पुरुषोत्तम त्र्यंबक** (१०) कुर्ल्यास स्वदेशी मिलमध्यें नोकरी आहे. वास्तव्य सर्वेश्वर मंदिर, कुर्ला. भार्या प्रमिला (यमू), पि. केळकर, चौल. कन्या कमल ज. श. १८६७.

खंड पहिला, पृष्ठ १८१

नारायण केशव (९) भार्या रमा (मथुरा), पि. नारायणराव जोशी, विसनगर.

* **निंबराज (राजाराम) नारायण** (१०) यांचे नांव निंबराज आहे. ह्यूम पाईप कंपनींत नोकरी होती.

महादेव चिंतामणि (८) बडोदें येथें मुन्सफ होते. भार्या उमा, मराठ्यांकडील.

घराणें ४ थें, गोळप–अक्षी–नागांव

खंड पहिला, पृष्ठ ८३

क्षेत्रोपाध्यायांकडील पुढें दिलेल्या लेखांवरून व इतर माहितीवरून या घराण्याच्या पूर्वी दिलेल्या वंशावळींत बरीच सुधारणा करावी लागत आहे.

गणेश नारायण (४) यांस रामचंद्र या नांवाचा पुत्र, तसेंच विठ्ठल नारायण (४) यांस बाळाजी या नांवाचा पुत्र नव्हता. रामचंद्र व बाळाजी हें घराणें २६ मधील आहेत. घराणें २६ मध्यें यासंबंधीं तपशीलवार माहिती दिली आहे. रामचंद्र पांडुरंग (५) यांस बाळकृष्ण या नांवाचा दुसरा पुत्र होता. तो व त्याचा वंश वंशावळींत नव्यानें दाखविला आहे. संशोधन क्र. ३ यांत सूचित केलें होतें त्याप्रमाणें त्यांतील व्यक्तींचा समावेश या घराण्यांत झाला म्हणून तो क्रमांक रद्द समजावा; तसेंच संशोधन क्र. ३८ यांतील गणेश बाळकृष्ण हे याच घराण्यांतील पिढी ७ मधील आहेत; म्हणून तोहि क्रमांक रद्द समजावा.

संशोधन क्रमांक ३ जानकी भ्र. चिमणभट व गंगाबाई भ्र. मोरोपंत सा. विठ्ठल चु. दी. सखोपंत, अक्षी–नागांव.

रखमा भ्र. विठ्ठलभट सखोपंत अ. सा. सदाशिव, दी. आनंदराव व तात्या, अक्षी–नागांव.

वेरूळ-पैठण–गंगा भ्र. मोरोपंत, सा. विठ्ठलपंत, चु. दी. सखोपंत, दी. चिमणभट. अक्षी–नागांव.


वेरूळ-पैठण–सखाराम बापूजी आ. नारायण रघुनाथ, बं. चिमणभट, पुत्र विठ्ठलपंत अक्षी–नागांव.

दाते–जानकी भ्र. चिमणाजी विठ्ठल चु. दी. सखोपंत पुत्र अनंत. चु. सा. बापूजी. सासू राधा.

दाते–विठ्ठल नारो राघो नारो बंधु गणेश व बापू चु. रामाजीपंताचा पांडुरंग.

गोडबोले, काशी–महादेव बाळकृष्ण, चुलते नारो रामचंद्र, बंधु गणेश. ज्येष्ठ वद्य १३ शक १७८४. मूळ वस्ती अक्षी; हल्लीं पुणें व बडोदें.

खंड पहिला, पृष्ठ ८३



खंड पहिला, पृष्ठ १८२

रामाजी रघुनाथ (३) यांस सालीना १५० दीडशे रुपये कारकून शिलेदाराचे आसामीबद्दल मिळत होते. ते मृत्यु पावल्यामुळें शक १७०२ मार्गशीर्ष वद्य १२ चे सनदेनें यांचा पुत्र महादाजी राम याचें नांवें सदर आसामी करून दिली. (ऐ. क्र. ४६ पहा.)

महादाजी राम (४) यांची कारकून शिलेदाराची रुपये १५० दीडशेची आसामी हे मृत्यु पावल्यामुळें यांचा पुत्र रामचंद्र महादेव यास शक १७१३ पौष शु. १३ चे सनदेनें करून दिली. (ऐ. क्र. ४७ पहा.) हे व यांचे बंधु पांडुरंग रामचंद्र यांस शिलेदार म्हणून पुण्यास श्री. सवाईमाधवराव यांचे लग्नाचे वेळीं दुमाही आणलें होतें. तनखा अनुक्रमें रु. ५० व ४० प्रमाणें होता.

रामचंद्र महादेव (५) यांजकडे वडिलार्जित शिलेदाराची आसामी चालू होती. पारसनीस संग्रहांतील कागदांत रामचंद्र महादेव पेंडसे यांनीं पुरुषोत्तम लक्ष्मण पेंडसे यांस शक १७३४ मध्यें लिहिलेलीं पत्रें आहेत, ते रामचंद्र महादेव हेच असावे.

पांडुरंग रामचंद्र (४) यांना प्रांत राजपुरीकडे भात खंडी ३ तीनची नेमणूक होती. यांचें घर अवचितगड तालुक्यांत म्हणून ती तिकडे बदलून दिली. शक १७०६ पौष शु. ३. (ऐ. क्र. ४८ पहा). पे. द. घडणी रुमाल ३०८ मध्यें यांचा दोनदां कारकून शिलेदार म्हणून शक १७२० चे सुमारास उल्लेख आढळतो.

रामचंद्र पांडुरंग (५) छ २ सफरला (वर्ष माहीत नाहीं) यांचे वडील वारल्यामुळें त्यांस मिळणारें भात खंडी ३ तीन यांस देत जावें असा उल्लेख पेशवे दप्तरांतील कागदांत आहे; तेथें यांस कारकून शिलेदार म्हटलें आहे.

रामचंद्र त्र्यंबक (८) यांचे पुण्यास बेलबागेजवळ गंध्याचें दुकान होतें.

* **विनायक महादेव** (९) बंगलोर येथें मिलिटरी फार्ममध्यें नोकरी आहे. पुण्यास गृह क्र. २६५ नारायण पेठ, येथें बिऱ्हाड आहे. भार्या (१) सरला, मृ. स. १९४२ मार्च ३. पुत्र विलास. भार्या (२) सरोजिनी, पि. नारायण विष्णु भागवत. पुत्र विजय. कन्या विनोदिनी ज. स. १९४७ सप्टेंबर ५.

* **विलास विनायक** (१०) वय ७.

* **विजय विनायक** (१०) वय २.

खंड पहिला, पृष्ठ १८३

गोपाळ नारायण (७)कन्या (१)गंगा (जानकी), भ्र. गंगाधर गणेश फणशे, पळस्पे. (२) यमुना (मालती), भ्र. सदाशिव बल्लाळ जोशी, पोमेंडी.

* **हरी गोपाळ** (८) वास्तव्य ठाणेकर बिल्डिंग, आग्रारोड, कल्याण. भार्या अन्नपूर्णा, पि. महादेवराव घाणेकर, पुणें.

* **अनंत हरी** (९) मुंबईस मेट कॉम्युनिकेशन सेंटरमध्यें टी. पी. ऑपरेटर आहेत. वास्तव्य–ठाणेकर बिल्डिंग खोली नं. ४ आग्रारोड, कल्याण. भार्या उषा (कमल), वय २३, पि. श्रीपाद खंडेराव वैद्य, करंजगांव. कन्या नलिनी, वय ३.

* **श्रीनिवास अनंत** (१०) वय ५.

* **दत्तात्रेय गोपाळ** (८) पुण्यास बिस्किट कारखानदार साठे बंधु यांचेकडे नोकरी आहे. कन्या (१) द्वारका (सुशीला), भ्र. गोविंद वासुदेव सहस्त्रबुद्धे, कोतवडें. (२) सुमन (मंगला), भ्र. महादेव भास्कर कोपरकर, पेढांबें.

* **बाळकृष्ण दत्तात्रेय (९)** पैसाफंड वस्तुभांडार, पुणें येथें नोकरी आहे. भार्या सुलोचना (कुमुदिनी), वय १६, पि. नरहरी कृष्ण जोशी, अलिबाग.

* **त्र्यंबक दत्तात्रेय (९)** लक्ष्मी होजिअरी वर्क्स, पुणें येथें नोकरी आहे.

गोविंद गोपाळ (८) मृ. स. १९३९.

बाळकृष्ण रामचंद्र (६) हे उद्योगधंद्यानिमित्त ग्वाल्हेर संस्थानांत गेले.

महादेव बाळकृष्ण (७) हे श. १७८४ मध्यें काशीयात्रेस गेले.

गणेश बाळकृष्ण (७) हे ग्वाल्हेर संस्थानांत नोकर होते. संशोधन क्र. ३८ खंड पहिला, पृष्ठ ३७२ वर यांची माहिती आहे.


घराणें ५ वें, गोळप–नाशिक–धौम

खंड पहिला, पृष्ठ ८४

खालीं दिलेल्या दोन लेखांवरून वंशावळीमध्यें वाढ झाली आहे. ती लक्षांत घेऊन अवश्य तेवढी वंशावळ खालीं दिली आहे.

नाशिक–वा. दाते. गं ४।४५ लक्ष्मण नारायण गणेश लक्ष्मण चुलते नरसिंह व रामभट, चु. बंधु बाळंभट, पुत्र विष्णु, माता लक्ष्मी. धौम–सांवतवाडी.

त्र्यंबकेश्वर–पिंगळे २९।५ सीताराम विनायक नारायण गणेश, चु. गबाभट, बं. कोंडभट, स्त्री भागीरथी चु. जानकी. गोळप–नाशिक.



खंड पहिला, पृष्ठ १८४

नाशिककडे गेलेल्या मंडळींच्या शाखेंत नवरात्रांत एक दिवस– मंगळवारीं वा शुक्रवारीं–जोगवा मागतात.

नारायण गणेश (३) भार्या लक्ष्मी.

भालचंद्र सीताराम (६) कन्या (१) गंगू (लक्ष्मी), भ्र. नारायण बळवंत डोंगरे, नाशिक. मृ. स. १९०४.

* **गोविंद रामचंद्र** (८) हे मोठे आस्थेवाईक, व्यवस्थित व टापटिपीचे गृहस्थ आहेत.



रावसाहेब गोविंद रामचंद्र **सौ. भागीरथीबाई** स. १९४७

यांची दानधर्माकडे प्रवृत्ति असून, सार्वजनिक संस्थांस सढळ हातानें कायमनिधि देणग्या दिल्या आहेत. देणगीच्या रकमेच्या व्याजाचा विनियोग गरीब निराश्रितांना अन्नवस्त्र व औषधपाणी देण्यासाठीं व्हावयाचा आहे. पेंडसे कुळांत अशा रीतीनें सार्वजनिक संस्थाना दानधर्म करणाऱ्यांत आज मितीस यांचा पहिला क्रमांक आहे. देणग्यांपैकीं ठळक देणग्या :—

मेयो हॉस्पिटल, नागपूर	रु. १००००
अनाथ वि. गृह पुणें, नाशिक शाखा	रु. ५१००
सेवासदन सोसायटी, पुणें. नागपूर शाखा	रु. २६१२
अनाथबालिकाश्रम, हिंगणें–पुणें	रु. २५००
बालहत्याप्रतिबंधक गृह आणि अनाथबालकाश्रम, पंढरपूर	रु. १५१०
श्रद्धानंद अनाथमहिलाश्रम, माटुंगा, मुंबई	रु. १५११
अनाथ हिंदु महिलाश्रम, पुणें.	रु. १५११

भार्या भागीरथी (दुर्गा). कन्या (३) सुमति (प्रमिला), मृ. स. १९४७ ऑगस्ट १६.

खंड पहिला, पृष्ठ १८५

* **प्रभाकर गोविंद** (९) वास्तव्य जोग इंजिनीयरांचा बंगला धंतोली, नागपूर.

* **धनंजय प्रभाकर** (१०) मॅट्रिक १९४७. नागपुरास कॉलेजमधील पहिले वर्षाचे विद्यार्थी. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक.



धनंजय प्रभाकर स. १९४७

* **त्र्यंबक गोविंद** (९) नागपुरास न्यू इंग्लिश स्कूलचे सीताबर्डी शाखेचे मुख्याध्यापक आहेत. कन्या (१) नलिनी (इंदिरा), भ्र. मोरेश्वर शंकर फाटक, नागपूर. (२) पुष्पलता, ज. स. १९३७ जुलै १०. (३) सुहास, ज. स. १९४१ डिसें. १५. वास्तव्य साठे यांचा बंगला, छोटी धनतोली.

वसंत त्र्यंबक (१०) मृ. स. १९४६ फेब्रु. २३. मुंबईंस सरकारनें केलेल्या गोळीबारांत.

* **विनायक त्र्यंबक** (१०) मॅट्रिक १९४३. नागपुरास कॉमर्स कॉलेजची इंटर परीक्षा उत्तीर्ण.

* **मोरेश्वर गोविंद** (९) रॉयल सॅनिटरी इन्स्टिट्यूट, लंडनची सॅनिटरी इन्स्पेक्टरची परीक्षा पहिला क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले १९३८. एल्. टी. एम्. (कलकत्ता) १९३८. फेब्रुवारी १९३९ पासून असि. मेडिकल ऑफिसर होते. पगार रु. ६०. मार्च १९४४ मध्यें किंग्ज कमिशन मिळून दुसरे महायुद्धांत युरोपांत गेले. १९४७ मध्यें परत आले. जून १९४८ पासून कलकत्त्यास मेडिकल कॉलेजांत एम. बी. चें शिक्षण घेत आहेत. भार्या निर्मला (लीला), ज. स. १९२२ जून २४. पि. श्रीधर दामोदर पटवर्धन, मालगुजार, नागपूर. कन्या कलावती, ज. स. १९४० डिसें. ३०.

खंड पहिला, पृष्ठ ८४

९ मोरेश्वर* | दत्तात्रेय*

१० अनिल* नागपूर | अरुण* नागपूर

* **अनिल मोरेश्वर** (१०) ज. स. १९४२ जुलै ७.

* **भास्कर गोविंद** (९) स. १९३८ त बी. एस्सी. परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण. नागपुरास अकौंटंट जनरलचे कचेरींत स. १९४० पासून नोकरी आहे. १९४७ त एस्. ए. एस्. परीक्षा उत्तीर्ण. सुपरिंटेंडंट आहेत. भार्या उषा (कुसुम), ज. स.

१९२६ मे १७. पि. विष्णु रावजी नेने, वर्धा. कन्या माणिक, ज. स. १९४६ फेब्रु. २५.

रघुनाथ भालचंद्र (७) भार्या (१) पार्वती (यमुना), पि. नारायण बाळकृष्ण कानिटकर, कठोरें. कन्या चिमणी, मृ. स. १९४७ ऑगस्ट २७.

दामोदर भालचंद्र (७) स. १९१९ पासून सेवानिवृत्त झाल्यावर नागपुरास राहात असत. कन्या (१) दुर्गा, मृ. स. १९४७ ऑक्टो. ३०.

* **नारायण दामोदर** (८) ज. स. १८८५. थिऑसॉफिकल सोसायटीचे सभासद आहेत. कन्या (३) यमुना, बी. ए, भ्र. रंगनाथ सदाशिव गोडबोले, मुंबई. (४) गोदावरी ऊर्फ चमकी, मॅट्रिक. मृ. स. १९४० सप्टें. २५. (५) मालती (अनसूया), इंग्रजी सहावींत.

खंड पहिला, पृष्ठ १८६

* **दत्तात्रेय नारायण** (९) सेक्रेटरी, डिस्ट्रिक्ट सोल्जर्स बोर्ड. संरक्षण खातें, नागपूर भार्या शामला (विजया), ज. स. १९२८ आगस्ट २७, वि. स. १९४७. पि. लक्ष्मण जनार्दन मायदेव, यवतमाळ.

* **अरुण दत्तात्रेय** (१०) ज. स. १९४८ फेब्रु. १८.

* **रघुनाथ नारायण** (९) नागपुरास सायन्स कॉलेजांत बी. एस्सी. चे वर्गांत.

कोंडभट विनायक (५) वैदिक होते.

गबाभट नारायण (४) वैदिक होते. भार्या जानकी.

नरहरी लक्ष्मण (५) भार्या भागीरथी.

* **नारायण नरहरी** (६) कन्या (२) कमल. बी. ए. बडोद्यास शिक्षिका आहेत. (३) तारा, मॅट्रिक. बडोद्यास शिक्षिका आहेत.

खंड पहिला, पृष्ठ १८७

दत्तात्रेय कृष्ण (६) मृ. स. १९४४.

* **गोपाळ दत्तात्रेय** (७) विटें येथें वकील आहेत.

नरसिंह गणेश (३) वैदिक होते.

रामभट गणेश (३) वैदिक होते. श्री. शं. ल. वैद्य, पुणें, यांजकडील कागदांत वे. रा. रामभट पेंडसे, धोमकर असा उल्लेख श. १७६१ चैत्र व. ९ सोमवारचे पत्रांत केलेला आढळतो.

बाळंभट —(४) वैदिक होते.

घराणें ६ वें, केळशी–तळें

खंड पहिला, पृष्ठ १८८

शारदीय नवरात्रांत अखंड दीप व माळ असते. कुटुंबापैकीं एका व्यक्तीनें धान्यफराळ करण्याची चाल आहे. बोडण प्रतिवर्षी असतें. तसेंच मंगलकार्य व जननानंतरहि असतें.

या घराण्यांत दोन सरकारी आसाम्या होत्या; त्या आबाजी रघुनाथ व महादाजी रघुनाथ यांचे वांटणीस गेल्या असें लिहिलें आहे. या संबधांत पेशवेदप्तरांत मिळालेल्या माहितीवरून कळतें कीं, अवचितगड येथील दप्तराकडे महादाजी रघुनाथ यांची आसामी होती. ती शक १६९६ कार्तिक वद्य १३ ला आबाजी रघुनाथला करार करून दिली. बेहडचास १५० दीडशें रुपयांची नेमणूक होती. (ऐ. क्र. ४९ पहा.)

खंड पहिला, पृष्ठ १८९

बल्लाळ गणेश ऊर्फ बाळ गोसावी (५) चतुर्थाश्रमांतील नांव श्रीब्रह्मानंद.

खंड पहिला, पृष्ठ १९०

वासुदेव रघुनाथ (७) भार्या सरस्वती, मृ. श. १८६८ भाद्रपद व. ११.

* **अनंत वासुदेव** (८) भार्या (२) राधा, पि. पेठे, वरंध. कन्या (३) कृष्णा, ज. श. १८६३ चैत्र शु. ८. (४) शकुंतला, ज. श. १८६५ भाद्रपद व. ३.

* **पुरुषोत्तम विठ्ठल** (८) हे सध्यां रोहें येथें राहतात. कन्या (२) नीला, ज. तळें. श. १८६३ भाद्र. शु. १३.

खंड पहिला, पृष्ठ ८५

८	विनायक*	काशीनाथ
९	मोरेश्वर* मधु* (गणेश)	गजानन* दत्तात्रय* भालचंद्र*
	तळें	तळें

खंड पहिला, पृ. १९२

* **रघुनाथ गणेश** (८) कन्या अंबू, भ्र. सहस्रबुद्धे, नागांव. वि. श. १८६५.

* **विनायक गणेश** (८) भार्या (२) सावित्री, मृ. श. १८६२ चैत्र शु. ४.

खंड पहिला, पृष्ठ १९३

* **मधु (गणेश) विनायक** (९) ज. श. १८६० फाल्गुन व. ९.

* **चिंतामणि गणेश** (८) कन्या (१) मीना, ज. श. १८६५, आषाढ व. ९. (२) वेणू, ज. श. १८६७ वैशाख शु. ७. (३) शैला, ज. श. १८६९ कार्तिक शु. १३.

काशीनाथ कृष्ण (८) मृ. श. १८६८ अ. चैत्र शु. ७. कन्या शालिनी, ज. श. १८६२ माघ व. ११.

* **दत्तात्रेय (बना) काशीनाथ** (९) ज. श. १८६० आषाढ व. २.

* **भालचंद्र (सुरेश) काशीनाथ** (९) ज. श. १८६६ ज्येष्ठ शु. ९.

घराणें ७ वें, केळशी

खंड पहिला, पृष्ठ १९३

केळशी येथें त्या गांवासंबंधीं कांहीं माहिती संग्रहित करून ठेविलेली आहे. तींत केळशीच्या पेंडसे घराण्यांतील एका व्यक्तीनें लिहिलेली रोजनिशीची नक्कल आमचे मामेबंधु रा. जगन्नाथ वासुदेव जोशी यांस पहावयास मिळाली. ती वाचण्यास फार दुर्बोध होती. ती कितपत विश्वसनीय आहे याबद्दल शंका आहे. परंतु तिच्यांतील माहिती येथें देऊन ठेवण्यास हरकत नाहीं असें वाटल्यावरून देत आहों.

"शकाच्या १३ व्या शतकांत केळशीची वसाहत झाली. श. १५१५ मध्यें अनंत महादेव पेंडसे केळशीस आले. (हा आदिलशाहीचा काळ आहे.) त्यांचे चुलतभाऊ मुर्डी गांवीं आले. श. १५८२ मध्यें अनंत महादेव कालवश झाले. त्यांस पुत्र पांच. (१) बापूजी, (२) दाजी, (३) महादेव, (४) कृष्ण, (५) नारायण.

बापूजी अनंत यांनीं वडिलांचे सांगीवरून श्रीदेव काळबहिरी (श्रीकाळभैरव ऊर्फ बहिरी) ची स्थापना केळशीमध्यें श. १६३५ मध्यें केली व देवालय बांधिलें. श. १६७१ सालीं विसाजीपंत महाजन यांनीं त्या देवळाचा जीर्णोद्धार केला." केळशीस असणारे पेंडसे हे त्या गांवचे महाजन असल्यामुळें कागदोपत्रीं महाजन आडनांव लावूं लागले हें येथें सांगणें अवश्य आहे.

हे जीर्णोद्धार करणारे विसाजीपंत बापूजी अनंताचे कोण हें माहीत नाहीं. मुर्डीचे महाजन कृष्णाजी बापूजी यांचे वडील म्हणजे बापूजी हे बसणीहून याच सुमारास मुर्डीस रहावयास आले असा पेंडसे—भट यांच्यांतील मुर्डीचे महाजनकीचे वादांत निर्देश आहे. (खंड १ पृष्ठ ३४). अनंत महादेवांचे चुलतबंधु मुर्डीस आले म्हणून जें वर लिहिलें आहे तें हेच बापूजी असावे; तसें मानल्यास वंशावळ खालीलप्रमाणें मांडतां येईल.

१ महादेव ?
२ अनंत (मृ. श. १५८२) बापूजी (श. १५७०)
३ बापूजी (श. १६३५) | दाजी | महादेव | कृष्ण | नारायण | कृष्ण (मृ. श. १६३२)

केळशी गटांतील घराणीं ६ ते १० ह्यांत वरीलप्रमाणें वंशावळ आढळत नाहीं. परंतु याच सुमारास भास्करनाईक पेंडसे केळशीकर या नांवाची व्यक्ति होती. घराणें १ पिढी ५ पहा. (प्रथम खंड, पृष्ठ ३१ व ५९).

शक १६७१ मध्यें विसाजीपंत महाजन यांनीं देवळाचा जीर्णोद्धार केला. त्याच सुमारास म्हणजे श. १६८१ मध्यें केळशीस गोविंद हरी महाजन होते व

त्यांस कसबा केळशी येथील हक्क वतनदार महाजन म्हणून रु. २५ मिळाले आहेत. (पे. द. रु. १८०). हे विसाजीपंतांचे कोण हें कळत नाहीं. कृष्णाजी गोविंद (हे गोविंद हरीचे पुत्र असावे) यांस अशीच रक्कम श. १७३३ मध्यें मिळाली आहे. (ऐ. क्र. ८७ पहा). याच सुमारास केळशीस बापूजी हरी महाजन व गोविंद सदाशिव पेंडसे आहेत. (ऐ. क्र. ८६ पहा.) बापूजी हरी हा गोविंद हरीचा भाऊ असूं शकेल.

खंड पहिला, पृष्ठ ८६–८७

८ विनायक

९ गणेश* सदाशिव* कृष्ण* बापू* परशुराम

१० वसंत* (नागू) सिद्धनाथ* चिंतामणि* वसंत* रामचंद्र* कृष्ण* विष्णु* जनार्दन* बळवंत विठ्ठल* लक्ष्मण*

११ रवीन्द्र* सुरेंद्र*

उमरावती यवतमाळ यवतमाळ पुणें दादर पुणें पुणें पुणें टिळकनगर (बेलापूर)

खंड पहिला, पृष्ठ १९४

गणेश भिकाजी (५) सुहुर सन १२११ (इ. स. १८१०) मध्यें केळशीस असलेल्या माणसांच्या यादींत यांचें नांव आहे. (पे. द. जमाव रुमाल ४८०)

विश्वनाथ गणेश (६) संस्थान श्रीपुरंदरेश्वर अन्नछत्र, मौजे खामगांव निा राजश्री रामराव काशीनाथ परचुरे येथील बेगमीस मौजे असनोली ताा वाडा प्राा कल्याण भिवंडी हा गांव होता. या असनोली गांवची वहिवाट हे पहात असत; असें परचुरे यांजकडे उपलब्ध झालेल्या हिशेबी कागदांवरून कळतें. श. १७२१ ते १७४७ पर्यंतचे हिशेबांत यांचें नांव आहे. सु. स. १२१२ जिल्काद छ १ रोजींचा कौल केळशीचा आहे. त्यांत विसाजी सदाशिव व विश्वनाथ गणेश महाजन हीं नांवें आहेत. (पे. द. जमाव रुमाल ४८०)

खंड पहिला, पृष्ठ १९५

भास्कर रामचंद्र (१०) मृत.

विनायक गंगाधर (८) हे यवतमाळास शेती करीत. तेथेंच स्थाईक झाले. भार्या अन्नपूर्णा. कन्या (१) शांता, भ्र. जोशी, यवतमाळ. (२) आवडी, भ्र. नातू अकोला.

* **गणेश विनायक** (९) वय सुमारें ४९. उमरावतीस शेती फॉर्मवर नोकरी आहे. भार्या तारा (भीमा), पि. विनायक गोविंद डोंगरे, नागपूर.

* **वसंत (नागू) गणेश** (१०) वय २२. शिकत आहे.

* **सदाशिव विनायक** (९) वय सुमारें ४४. यवतमाळला मोटारड्रायव्हर आहेत. भार्या इंदिरा (कृष्णा), पि. विष्णु दिनकर भट, वडुथ. कन्या कुमुदिनी, ज. स. १९३५.

* **सिद्धनाथ सदाशिव** (१०) ज. स. १९३२. शिकत आहे.

* **कृष्णाजी विनायक** (९) वय सुमारें ३७. यवतमाळास मोटारड्रायव्हर आहेत.

खंड पहिला, पृ. १९६

सखाराम बापूजी (६) मौजे विडवागळें, ता पोयनाड, जि. कुलाबा येथें यांची शेती होती असा श. १७६४ मधील उल्लेख आढळतो. (पे. द. जमाव रुमाल ९५)

कृष्णाजी गणेश (९) मृ. स. १९४२.

* **दत्तात्रेय गणेश** (९) सध्यां अलिबागेस सबजज्जकोर्टांत कारकून आहेत.

* **बापूजी गणेश** (९) स. १९३९ त सेवानिवृत्त होऊन पुण्यास सदाशिव पेठ गृ. क्र. ९८२ येथें शिवराम लॉन्ड्री या नांवाची लॉन्ड्री चालवितात. वास्तव्य शुक्रवार पेठ, घर नंबर ३४५ केंजळेवाडा. यांचा कागदाच्या पिशव्यांचाहि कारखाना आहे. कन्या (१) तारा (शकुंतला), भ्र. विष्णु रामचंद्र दाबके, दापोली, व्ह. फा. (२) रेवती, मृ. स. १९४०.

* **चिंतामणी बापूजी** (१०) पुण्यास डॉ. गोखले यांचेकडे कंपाउंडर आहेत.

* **वसंत बापूजी** (१०) ज. स. १९४०. मराठी शिक्षण चालू.

शंकर अनंत (८) पिढी ५ नसून ८ आहे.

बाबाजी गणेश (४) हे शक १७०४ मध्यें कोपरगांवीं सहकुटुंब गेले होते. (ऐ. क्र. ५० पहा).

कृष्णाजी रामचंद्र (६) सु. स. १२२० मध्यें कृष्णाजी राम महाजन, केळशी यांची तक्षीम अपाभट साठे, खोत यांजबरोबर एक चतुर्थांश होती. स. १८०९ चे सुवर्णदुर्गाचे हिशेबांत खालील उल्लेख आहे. 'रुपये ४० सालमजकूरचे गल्याबद्दल गु. कृष्णाजीराम महाजन केळशीकर' याचे पुढील वर्षाचे केळशीचे रहिवाशांचे यादींत यांचें नांव आहे. (पे. द. जमाव रुमाल ४८०)

खंड पहिला, पृष्ठ १९७

परशुराम विठ्ठल (९) मृत्यु १५ मे १९४५. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे चिटणीस या नात्यानें हे मुख्यत: हिशेब ठेवण्याचें काम करीत. ते हिशेब यांनीं इतक्या निर्दोष पद्धतीनें ठेवले होते कीं, ऑल इन्डिया काँग्रेस कमिटीचे हिशेब तपासनीस म. प्रां. कॉं. क. चे हिशेब इतर कमिट्यांपुढें आदर्श म्हणून ठेवीत.

सार्वजनिक कार्याची आवड असल्यामुळें हे टिळकपक्षाच्या प्रत्येक कार्यांत अंगमेहनत स्वार्थत्यागपूर्वक करावयास नेहमीं तयार असत. व प्रत्येक अंगीकृत काम उत्कृष्ट रीतीनें पुरें करीत. राहणी साधी, हिशेबांत कांटेकोर व चोख, मित्रकार्यांत तत्पर, स्वकर्तव्यांत दक्ष अशी यांची वागणूक होती. भार्या (३) रमा, यांचा पुत्र, विठ्ठल ऊर्फ बन्या.



परशुराम विठ्ठल

* **रामचंद्र परशुराम** (१०) सिनेमा कंपनींत नोकरी आहे. वास्तव्य ६७ लतीफ बिल्डिंग, दादर, मुंबई. भार्या उषा (कुसुम), पि. नारायणराव जोशी, थळ. वि. स. १९४२. कन्या नीला, ज. स. १९४६.

* **कृष्णाजी परशुराम** (१०) मॅट्रिक. पुण्यास मिलिटरी एन्जिनिअरिंग सर्व्हिसमध्यें नोकरी. वास्तव्य, गृह क्र. ६, नारायण पेठ, पुणें. भार्या शांता, पि. हरीभाऊ सहस्रबुद्धे, जुन्नर.

* **रवींद्र कृष्ण** (११) ज. स. १९४७.

* **विष्णु परशुराम** (१०) एम्. ए. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रचारक, पूर्व खानदेश.

* **जनार्दन परशुराम** (१०) शिक्षण मॅट्रिकपर्यंत.



१ कृष्णाजी परशुराम　२ सौ. शांताबाई स. १९४६



खुर्चीवर:—१ पुरुषोत्तम विठ्ठल, २ सौ. सत्यभामाबाई, ३ मनु परशुराम, ४ सौ. निर्मलाबाई ५ लक्ष्मण पुरुषोत्तम.
उभे:—१ माधव पुरुषोत्तम, २ दत्तात्रेय पुरुषोत्तम.
स. १९४३.

बळवंत परशुराम (१०) मृ. स. १९४० ऑक्टोबर २५.

* **विठ्ठल परशुराम** (१०) ज. स. १९३८. पुणें येथें मराठी शिक्षण चालू.

* **पुरुषोत्तम विठ्ठल** (९) बी. बी. सी. आय्. रेल्वेंत हेड गुडस् क्लार्क होते. स. १९४२ त सेवानिवृत्त झाले. वास्तव्य, गृह क्र. ५०१, नारायण पेठ पुणें. भार्या सत्यभामा (गोद्रू), पि. श्रीधरपंत जोशी, मांडवणें.

* **लक्ष्मण पुरुषोत्तम** (१०) बी. एस्सी. स्कॉलर, गव्हर्नमेंट पेपर सेन्टर, पुणें.



१ लक्ष्मण पुरुषोत्तम २ सौ. शीलाबाई स. १९४६

पेपर आणि बोर्ड मिल टिळकनगर (बेलापूर) मध्यें नोकरी आहे. भार्या (१) निर्मला (तारामती), पि. गोविंद कृष्ण मोडक, पुणें. वि. श. १८६४. मृ. स. १९४५. (२) शीला (कमल), पि. बाळकृष्ण नारायण दाते, पुणें.

* **सुरेंद्र लक्ष्मण** (११) ज. स. १९४८ फेब्रुवारी २२.

* **माधव पुरुषोत्तम** (१०) एम्. ए. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रचारक, ठाणें.

* **दत्तात्रेय पुरुषोत्तम** (१०) ज. स. १९२७. पुण्यास ज्युनिअर बी. एस्सी. चे वर्गांत.

बचंभट रामचंद्र (६) इ. स. १८१३–१४ त बचंभट पेंडसे वा। केळशी, यांस गवत २००० व चुडी २०० सरकारांतून मिळत असल्याचा उल्लेख आढळतो.

खंड पहिला, पृष्ठ १९८

भिकाजी सदाशिव (६) स. १८१० मधील केळशीचे रहिवाशांचे यादींत यांचें नांव आहे. (पे. द. जमाव रु. ४८०).

विसाजी सदाशिव (६) सु. स. १२१२ जिल्काद छ १ चा एक कौल केळशीचा आहे. त्यांत यांचें नांव आहे.

विनायक सदाशिव (६) स. १८१० मधील केळशीचे रहिवाशांचे यादींत यांचें नांव आहे.

विनायक श्रीधर (९) मृत्यु सन १९४२.

*** गणेश श्रीधर** (९) भार्या सरस्वती. मृ. स. १९४८ जाने. ८ कन्या (१) प्रभावती, ज. स. १९३४. इंग्रजी चवथींत. (२) नलिनी, ज. स. १९३७. मराठी चवथींत.

*** मोरेश्वर गणेश** (१०) ज. स. १९२२. मुंबईस बी. ए. चे वर्गांत आहेत. मॅट्रिक पुढील शिक्षण नोकरी करून घेतलें. पोर्टट्रस्टमध्यें नोकरी असून हिंदी व शॉर्टहँड टायपिस्ट क्लासमध्यें अध्यापकाचें काम करतात. हिंदी रत्न व लंडन कॉमर्सची परीक्षा उत्तीर्ण. भार्या सुमति, वय२०, मॅट्रिक पि. गाडगीळ, पालवणी.

खंड पहिला, पृष्ठ ८८

९ गणेश*

|

१० { मोरेश्वर* मुरुड; गजानन* मुंबई; अनंत* मुरुड }

*** गजानन गणेश** (१०) ज. स. १९३२. इंग्रजी सहावींत.

*** अनंत गणेश** (१०) ज. स. १९४२. मराठी दुसरींत.

खंड पहिला, पृष्ठ १९९

सखाराम काशीनाथ (८) कन्या उत्तरा (सावित्री), ज. स. १९१२ डिसें. २३. भ्र. बाळकृष्ण सीताराम मोडक.

*** वामन सखाराम** (९) ज. स. १९१६. वास्तव्य ३२ नंदलालपुरा, इंदूर. भार्या शांता, पि. केशव गणेश फणसे, मंडलेश्वर.

*** जयंत वामन** (१०) ज. स. १९३९ एप्रिल १७.

खंड पहिला, पृष्ठ ८८

९ वामन*

|

१० { जयंत*, वसंत*, हेमंत* }

इंदूर

*** वसंत वामन** (१०) ज. स. १९४२ आगस्ट १७.

*** हेमंत वामन** (१०) ज. स. १९४८ एप्रिल २०.

बापूजो लक्ष्मण (८) भार्या येसू, पि. कृष्णंभट अनंत विद्वांस, केळशी.

घराणें ८ वें, केळशी–बिरवाडी

खंड पहिला, पृष्ठ १९९

या घराण्याचा मूळ पुरुष महादेव दाखविला आहे. सु. सन सलास सबैन मया व अलफ (इ. स. १७७२) मधील सदाशिव गणेश पेंडसे यांजकडे असलेल्या

आसाम्यांची यादी उपलब्ध झाली आहे. (ऐ. क्र. ५१ पहा). तीवरून गणेश हा या घराण्याचा मूळ पुरुष होय. त्या यादींतील माहितीवरून खालीलप्रमाणें वंशावळ आहे :—

उणे२ गणेश

उणे१ सदाशिव　　कृष्ण

१ विश्वनाथ　गोविंद　महादाजी　नारायण

यांतील माहादाजी हा मूळपुरुष म्हणून दाखविलेला महादेव होय. म्हणजे याच्या पूर्वीच्या दोन पिढ्यांचीं नांवें कळलीं. या घराण्यांतील जुने पाट वगैरे सामानांवर कांहीं नांवें आढळलीं त्यांवरून कल्पनेनें यांचे पूर्वजांची वंशावळ पृष्ठ २०० वर दिलेली आहे. तिच्याशीं वरील यादीचा मेळ पडतो. घरांतील वस्तूंवरील नांवें इत्यादि क्षुल्लक वाटणारी माहितीहि संशोधनाच्या कामीं कशी उपयोगी पडते हें यावरून निदर्शनास येईल.

गोविंद अगर गोपाळ असें पृष्ठ २०० वर नांव लिहिलें होतें; तें आतां गोविंद हें निश्चित झालें आहे. महादाजी सदाशिव यांस गोविंद व्यतिरिक्त आणखी एक विश्वनाथ या नांवाचा भाऊ होता.

वरील यादींत पा. कोडील येथील मजमू गोविंद सदाशिव याचें नांवें होती. तेथें त्याचे चुलतभाऊ नारो कृष्ण पेंडसे चाकरीस होते असें लिहिलें आहे. हे सख्खे चुलत भाऊ असल्यास सदाशिव गणेशाचा कृष्ण हा सख्खा भाऊ ठरतो. निश्चित माहितीच्या अभावीं तो त्याच पिढींत पितापुत्रसंबंध न दाखवितां दाखविला आहे.

महादेव (१) याच्या पूर्वीच्या दोन पिढ्यांचीं नांवें नवीन मिळालेल्या माहितीमुळें उपलब्ध झालीं आहेत. त्यामुळें महादेव याची पिढी एक दाखविली आहे ती आतां तीन म्हणावयास पाहिजे व याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीच्या पिढीच्या क्रमांकांत बदल होईल; परंतु तसें केलें असतां वाचकांचा घोटाळा होईल, म्हणून पहिल्या खंडांत दाखविलेले पिढीचे अंक या खंडांत कायम ठेविले आहेत. नवीन उपलब्ध झालेल्या वरील पिढ्यांस अनुक्रमें उणे १ व उणे २ असे अंक दिले आहेत.

खंड पहिला, पृष्ठ २००

सदाशिव गणेश (उणे १) पेशवाईंत दप्तराकडे फडणिशी व मजमूच्या बऱ्याचशा महत्त्वाच्या कामावर हे असावेत असें वाटतें. उपलब्ध यादीवरून तालुके बिरवाडीपैकीं सुभाची फडणिशी, महालची मजमू, तालुके मांडलें येथील मजमू, पा कोडील येथील मजमू, शिवाय दप्तरची आसामी अशा पांच आसाम्या यांजकडे होत्या. आपाजी राम दाभोळकर यांच्याकडे शिंद्यांच्या स्वारींत उत्तरेस सदाशिव-

पंत पेंडसे होता असे उल्लेख इ. स. १७८७ पर्यंत सांपडतात; ते सदाशिवपंत हेच असावेत असें दिसतें.

विश्वनाथ सदाशिव (१) यांजकडे सन १७७२ मध्यें सुभाची फडणिशी व महालचे मजमूचें काम होतें (ऐ. क्र. ५१ पहा).

गोविंद सदाशिव (१) यांजकडे इ. स. १७७२ मध्यें प्रा कोडील येथील मजमूची आसामी होती. तें काम यांचे चुलतबंधु नारो कृष्ण करीत. शिवाय यांजकडे दप्तरची आसामी होती. त्याबद्दल यांस रु. २५० ऐन नक्त नेमणूक व कापड आख ५० चे मिळत असे (ऐ. क्र. ५१ पहा).

खंड १ ऐतिहासिक कागदपत्र क्रमांक १२ (पृष्ठ ३७) मध्यें पेशवे यांचे एकबेरजी दप्तरांत गोविंद सदाशिव असल्याचें लिहिलें आहे. ते गोविंद सदाशिव, घराणें २ मधील नसून या घराण्यांतील गोविंद सदाशिव असावेत असें वाटतें.

महादाजी सदाशिव (१) इ. स. १७७२ मध्यें ता. मांडलें, प्रांत राजपुरी येथील मजमूचें काम यांचे नांवें होतें. (ऐ. क्र. ५१ पहा).

नारायण कृष्ण (१) हे इ. स. १७७२ मध्यें प्रो कोडील येथील मजमूचें काम करीत असत. (ऐ. क्र. ५१ पहा).

* **विष्णु हरी** (६) कन्या शांता, भ्र. गंगाधर बहिरेश्वर दामले, पेण.

* **दत्तात्रेय विष्णु** (७) भार्या सुशीला (काशी), पि. वामन रावजी सोमण, तळें.

* **गोविंद विष्णु** (७) ब्रुकबॉन्ड कंपनींत नोकरी आहे. वास्तव्य इराणी मंझील, पहिला मजला, दादर, मुंबई. भार्या शालिनी, पि. नरसिंह अनंत म्हसकर, पुणें. कन्या मंगला.

* **मधुकर विष्णु** (७) वय ७.

महादेव हरी (६) मृत.

खंड पहिला, पृष्ठ ८९

६	विष्णु*	कृष्ण*
७	दत्तात्रेय* गोविंद* विनायक* दिनकर* श्रीधर* मधुकर*	शिवराम* गजानन* गोपाळ* लक्ष्मण*
	बिरवाडी दादर	बिरवाडी

खंड पहिला, पृष्ठ २०१

आपाजी काशीनाथ (४) भार्या द्वारका, मृ. श. १८६२.

अनंत आपाजी (५) मृ. श. १८६४.

* **कृष्णाजी अनंत** (६) कन्या (१) सुंदरा, भ्र. मधुकर गणेश वैद्य, रोहें, (२) विमल, वय ९. (३) कुसुम, वय ७.

* **लक्ष्मण कृष्ण** (७) वय ५.

घराणें ९ वें, केळशी–रेवदंडा

खंड पहिला, पृष्ठ २०२

हरी (१) सु. स. ११२२ जमादिलाखर छ २५ चे कालें यांच्या देशकुळकर्णाबिद्दलचें निवाडपत्र आहे. त्यामध्यें हरी महाजन, कसबें केळशी असें नांव आहे. त्यावरून हे श. १६४३ मध्यें केळशीस होते. (पे. द. जमाव रुमाल ४८०)

बाळाजी हरी (२) श. १६९८ मध्यें यांनीं तोतयाचें निशाण बिरवाडीवर लावलें (ऐ. क्र. ५२ पहा). मुर्डी-आंजर्लें वादांत "बाळाजी हरी केळशीकर महाजन हल्ली वस्ती मेढें अवचितगड" असा यांचा उल्लेख आहे.

बाळाजी पांडुरंग (४) सु. स. १२११ मधील केळशीचे माणसांचे यादींत यांचें नांव आढळतें. (पे. द. जमाव रुमाल ४८०)

* **गजानन श्रीधर** (९) मुंबईस जी. आय्. पी. रेल्वेंत नोकरी. वास्तव्य २२२ नीळकंठाश्रम, विठ्ठलभाई पटेल रोड, गिरगांव. भार्या सरस्वती, पि. दांडेकर, जालगांव. वि. स. १९४१.

खंड पहिला, पृष्ठ ९०

९ गजानन*
|
१० रामचंद्र*
मुंबई

* **रामचंद्र गजानन** (१०) ज. स. १९४४ ऑक्टो. ११.

* **बल्लाळ श्रीधर** (९) मॅट्रिक. मुंबईस जी. आय्. पी. रेल्वेंत नोकरी. वास्तव्य सीतारामभुवन, मागची चाळ, पहिला मजला ठाकुरद्वार. भार्या प्रेमला (दुर्गा), ज. श. १८४६. पि. कृष्णाजी काशीनाथ लेले, अनगांव. वि. स. १९४४, कन्या प्रतिभा.

* **चिंतामणि श्रीधर** (९) मुंबईस रिझर्व्ह बँक ऑफ् इंडियामध्यें नोकरी. वास्तव्य वासुदेव बिल्डिंग क्र. ३, दुसरा मजला, खोली ११, ठाकुरद्वार. भार्या सुधा, पि. गोरे, देवगड. वि. स. १९४७.

* **हरी श्रीधर** (९) रेवदंड्यास व्यापार करतात.

खंड पहिला, पृष्ठ २०३

भालचंद्र श्रीधर (९) मृ. स. १९४४.

* **मधुसूदन श्रीधर** (९) इंग्रजी २ री.

* **गंगाधर श्रीधर** (९) इंग्रजी पहिली.

* **विनायक श्रीधर** (९) मराठी ४ थी.

* **गोविंद भिकाजी ऊर्फ सावळाराम** (८) भार्या (१) सत्यभामा, पि. काशीनाथ जोशी, आपटें (पनवेल). कन्या चंद्रभागा (राधा), भ्र. कृष्णाजी रामचंद्र मोडक, पढघवली. भार्या (२) उमा. कन्या (१) येसू (इंदिरा), भ्र. त्रिविक्रम शिदोरे, मुंबई. (२) लीला (वागीश्वरी), भ्र. कुमार संभाजी गोखले, नागपूर. (३) रतन (मंगला), भ्र. रामचंद्र लेले, मुंबई. (४) मालती.

* **वासुदेव गोविंद** (९) मुंबईस नोकरी आहे.

* **सदाशिव गोविंद** (९) डिलाईल रोड पोस्ट ऑफिसांत नोकरी आहे. वास्तव्य कुर्ला.

* **भास्कर गोविंद** (९) मॅट्रिकचे वर्गात.

आत्माराम भिकाजी (८) भार्या अन्नपूर्णा. कन्या सई, भ्र. गजानन फडके, कल्याण.

* **त्र्यंबक आत्माराम** (९) नागपुरास एस्. के. रानडे आणि कंपनी यांचे कापड–दुकानांत नोकर.

खंड पहिला, पृष्ठ २०६

* **सांईराम पांडुरंग** (८) खडकी आर्सेनल-मध्यें नोकरी आहे. वास्तव्य नगरकर वाडा, ५१९ बुधवार पेठ, पुणें. भार्या, पि. विष्णु सदाशिव गोखले. भोर. वि. स. १९४४.

खंड पहिला, पृष्ठ ९१

८ सांईराम*
|
९ जयंत*
पुणें

* **जयंत सांईराम** (९) ज. स. १९४७ जून.

* **वामन पांडुरंग** (८) मॅट्रिक. जी. आय्. पी. रेल्वेंत माटुंगा येथें डब्ल्यू. ए. ओ. ऑफिसमध्यें नोकरी आहे. वास्तव्य ४७ नूरमँझील शेवटचा मजला, व्हिन्सेन्ट रोड, दादर.

* **दिगंबर पांडुरंग** (८) मुंबईस बोरीबंदर स्टेशनवर पार्सल खात्यांत नोकरी. वास्तव्य बंधूजवळ.

* **जनार्दन पांडुरंग** (८) मॅट्रिक. मुंबईस इन्कमटॅक्स ऑफिसमध्यें नोकरी करून सिद्धार्थ कॉलेजमध्यें शिकतात. वास्तव्य बंधूंजवळ.

* **विष्णु पांडुरंग** (८) रेवदंड्यास व्यापार करतात.

* **दामोदर पांडुरंग** (८) इंग्रजी ५ वी.

दत्ताजी बाळाजी (३) सु. स. समानीन मया व अलफ मोहरम छ १३ या दिवशीं गोविंद बाळकृष्ण गणपुले यास केळशी येथें जमीन इनाम दिली. त्याचे चतुःसीमेंत "उत्तरेस दत्तो बल्लाळ महाजन पेंडसे ठिकाण" असें म्हटलें आहे. (पे. द. दफाते रुमाल ६५४).

घराणें १० वें, केळशी–वाडें

खंड पहिला, पृष्ठ २०७

बापू रामचंद्र (७) मृ. सुमारें स. १९४२.

श्रीकृष्ण बापू (८) मृ. सुमारें स. १९४४.

खंड पहिला, पृष्ठ २०८

मोरो रामचंद्र (५) स. १८५६ मध्यें पुनर्विवाहाचा कायदा झाला. स. १८६५

मध्यें पुर्नविवाहोत्तेजक सभेची स्थापना झाली व त्याच सालीं पुण्याचे वकील नारायण जगन्नाथ भिडे यांच्याशीं मोरो रामचंद्र पेंडसे यांची गतभर्तृका कन्या हिचा विवाह झाला. (पराग मासिक, नोव्हेंबर १९४७).

* **चिंतामणि केशव** (८) कन्या (१) द्वारका, मृ. स. १९४४. (२) दुर्गा, मृत. (६) प्रमिला, ज. स. १९४०.

श्रीराम चिंतामणि (९) मृ. स. १९४७.

खंड पहिला, पृष्ठ ९३

६ पांडुरंग

७ माधव* मुकुंद* लक्ष्मण* रामचंद्र* श्रीनिवास*

८ माधव: {कृष्ण* वसंत*} — लक्ष्मण: विलास*, शशिकांत*, रवीन्द्रकुमार* — रामचंद्र: सुधाकर*, प्रभाकर* — श्रीनिवास: विनायक*


बीना काशी गुणा गुणा गुणा खाचरोद ग्वाल्हेर खाचरोद रतलाम

खंड पहिला, पृष्ठ २०९



सौ. लक्ष्मीबाई पांडुरंग भिकाजी

* **माधव पांडुरंग** (७) बीना येथें राहतात व जवळच्या दुरुवा गांवीं शेती करतात.



उभे :—लक्ष्मण पांडुरंग, मुकुंद पांडुरंग, गोविंदराव देवधर, माधव पांडुरंग, माधवराव केळकर, कु. इंदु, रामचंद्र पांडुरंग, कडेवर प्रभाकर रामचंद्र, सौ. सीताबाई, गोविंदराव वैद्य, रामकृष्ण वि. वैद्य, श्रीनिवास गणेश.

खुर्चीवर :—सौ. लक्ष्मीबाई परांजपे, सौ. राधाबाई, मांडीवर रवींद्र लक्ष्मण, सौ. लक्ष्मीबाई, सौ. कमल देवधर, सौ. इंदिराबाई, सौ. मालती केळकर, काशीताई फडके, सरस्वतीबाई, गोदू मावशी भागवत, सौ. माई सरवटे, सौ. आऊताई वैद्य, सौ. बनुबाई मराठे, सौ. शालिनी, मांडीवर विनायक श्रीनिवास.

बसलेले :—कु. प्रभावती मराठे, कु. प्रमिला, हरी रा. वैद्य, विलास लक्ष्मण, सुधाकर रामचंद्र, श्रीकृष्ण माधव.

दुसरी रांग :—कुसुम, विजया, शशिकांत लक्ष्मण, वसंत माधव, सुधाकर मराठे.

कन्या (१) कमल, भ्र. गोविंदराव देवधर, झांशी. (२) मालती, भ्र. माधवराव केळकर, ग्वाल्हेर. (३) इंदू, वय १६. आठवींत शिकते.

* **कृष्णाजी माधव** (८) सातवींत शिकतो, बीना.

* **वसंत माधव** (८) वय ९. ४ थींत शिकतो, बीना.

* **मुकुंद पांडुरंग** (७) स. १९४६ मध्यें सेवानिवृत्त झाले. सध्यां काशी येथें वास्तव्य. आपटे यांचा वाडा, गृहक्रमांक के २३/१३ दुर्गाघाट.

* **लक्ष्मण ऊर्फ बाबूराव पांडुरंग** (७) ग्वाल्हेर, सेन्ट्रल इन्डिया ट्रॅन्स्पोर्ट कंपनीं.



बसलेले :—१ कु. विजया, २ लक्ष्मण पांडुरंग, ३ विलास लक्ष्मण, ४ सौ. राधाबाई, ५ शशिकांत लक्ष्मण, पुढें ६ रवींद्र लक्ष्मण, मागें मिश्री बाबू.

गुणा येथें डेपो मॅनेजर आहेत. पगार रु. २५०. भेलसा जिल्ह्यांत हमळवदा येथें शेती आहे. भेलसा डिस्ट्रिक्ट बोर्डांत काश्तकारी सभासद होते. ग्वाल्हेर संस्थानची विशेष कामगिरीचीं कामें केल्यामुळें शिंदे सरकारकडून १७–६–१९४४ ला पोशाक, २३–१०–१९४५ ला रु. ६०० व २९–३–१९४६ ला रु. ६००० बक्षीस मिळाले. तसेंच हिंदुस्थान सरकारकडून २–४–१९४८ ला २५० रु. मिळाले. ग्वाल्हेर संस्थानांत लोकानुवर्ति कारभार सुरू झाल्यावर यांची विशेष कामगिरीवर योजना करण्यांत आली व त्यासाठीं यांना या वर्षीं रु. १५००, रु. २००० व रु. १००० अशीं इनामें मिळालीं. कन्या विजया, वय ७, दुसरींत शिकते.

* **विलास लक्ष्मण** (८) वय १५. गुण्यास ८ वींत आहे.

* **शशिकांत लक्ष्मण** (८) वय ९. गुण्यास ४ थींत आहे.

* **रवीन्द्रकुमार लक्ष्मण** (८) वय ४.

* **रामचंद्र पांडुरंग** (७) ग्वाल्हेर संस्थानांत कॉन्ट्रॅक्टर आहेत. वास्तव्य खाचरोद. कन्या प्रमिला, वय १०. ४ थींत शिकते.

* **सुधाकर रामचंद्र** (८) वय १६. ग्वाल्हेरला ७ वींत शिकतो.

* **प्रभाकर रामचंद्र** (८) वय ४. पहिलींत शिकतो.

गणेश भिकाजी (६) मृ. स. १९४६ सप्टेंबर २७. रतलामला रहात. कन्या (१) वेणू (इंदिरा), भ्र. हरी वासुदेव सोमण, देहली. (२) बनी, भ्र. गोपाळ लक्ष्मण मराठे, महेश्वर. (३) सुशीला, भ्र. प्रभाकर भास्कर मराठे, इंदूर.

* **श्रीनिवास गणेश** (७) रतलामला पोलिस कमिशनरचे ऑफिसमध्यें हेडक्लार्क आहेत. भार्या (१) सुंदरा. (२) शालिनी, पि. केतकर, बहादरपूर. कन्या कुसुम, वय ७, पहिलींत शिकते.

* **विनायक श्रीनिवास** (८) वय २.

खंड पहिला, पृष्ठ २१०

नागेश गणेश (८) भार्या गिरिजा (सोनू), पि. बाळकृष्ण गणेश कानिटकर, वाई.
रामकृष्ण वामन (७) कन्या (२) दुर्गा, (इंदिरा), भ्र. वासुदेव हरी फडके, पुणें.
राजाराम रामकृष्ण (८) मृत.

घराणें ११ वें, हुबळी

खंड पहिला, पृष्ठ २११

संशोधन क्र. २७ व घराणें ११ वें हुबळी हीं एक आहेत. म्हणून घराणें **११** ची वंशावळ पुढें दिल्याप्रमाणें होते. हीं एक असण्याचीं कारणें :—

महादेव सखाराम (३) मृ. स. १९००. ९२ व्या वर्षी. पुण्यास सदाशिव पेठेंत यांचें स्वतःचें घर होतें. सदाशिव पेठेंतील हौदाची व्यवस्था ठेवण्याचें काम यांजकडे होतें. पगार अपुरा पडूं लागल्यामुळें पुण्याहून वऱ्हाडांत गेले. परतवाडा येथें सरकारी मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक होते. शरीर भव्य असून देखणें होतें. भार्या उमा, पि. काशीनाथ रामचंद्र. कन्या (१) वाराणसी, तिवरें येथें केळकरांकडे दिली. (२) गोदावरी (पार्वती), भ्र. सदाशिव शिवराम चिपळूणकर, पुणें. (३) चिमा. (४) दुर्गा, परतवाडा येथील दासले यांजकडे दिली.

विष्णु महादेव (४) १८ व्या वर्षी मृत. अविवाहित.

गोपाळ महादेव (४) ज. स. १८५२, मृ. स. १९०९ पुणें. परतवाड्यास स्टेशनरी दुकान होतें. भार्या राधा (बहिणा), पि. विष्णुपंत गोडबोले, पुणें. कन्या (१) गंगू (अन्नपूर्णा), भ्र. विठ्ठल मोरेश्वर सोमण, नागपूर. (२) यमू, भ्र. भास्कर बळवंत मोने, उमरावती.

बापूराव (श्रीकृष्ण) महादेव (४) ज. स. १८६५. मृ. स. १९४०. मॅट्रिक. परतवाडा येथें वकील होते. स. १९०६ मध्यें बरार मॅच मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड चालू केली. तीन चार वर्षांत कारखाना बंद पडला. वकिलींत चांगला पैसा मिळाला; परंतु कारखान्यांत व व्यापारांत गेला. महाराष्ट्रीय मंडळींनीं व्यापार व उद्योगधंद्यांत पडावें अशी यांची उत्कट इच्छा होती. परतवाडा म्युनिसिपालिटीचे सभासद व ऑनररी सेक्रेटरी होते. सार्वजनिक वाचनालयाचे आजीव सभासद होते. औद्योगिक हिंदुस्थान या नांवाचें पुस्तक यांनीं प्रसिद्ध केलें. औद्योगिक बाबतींत साहस करणारे गृहस्थ असा यांचा उल्लेख सह्याद्रि मासिकाचे सप्टेंबर १९४४ चे अंकांत आहे. भार्या (१) रुक्मिणी (अंबू), पि. विश्वंभरराव सहस्रबुद्धे, धुळें. (२) रुक्मिणी (द्वारका), पि. हरी धोंडो मराठे, पुणें. सर्व संतती हिची. कन्या (१) काशी (लक्ष्मी), ज. स. १९००. भ्र. रावबहादूर दत्तात्रेय विश्वनाथ वाळ, नागपूर. (२) मनकर्णिका (पार्वती), ज. स. १९०५ जानेवारी १५. वि. स. १९१८. भ्र. महादेव विठ्ठल जोगदेव, पुणें.

* **नारायण बापूराव** (५) ज. स. १८९७. परतवाडा येथें किराणा दुकान आहे. भार्या लक्ष्मी (द्वारका), पि. माधव यादव पटवर्धन, भडगांव. कन्या (१) शांता (सुमति), भ्र. काशीनाथ विष्णु सहस्रबुद्धे, उमरावती. (२) सुशीला, ज. स. १९२६. वि. स. १९४२. मृ. स. १९४४. भ्र. केळकर, जबलपूर. (३) विमल, ज. स. १९३२. मॅट्रिकचे वर्गांत. (४) कुसुम, ज. स. १९३५. (५) तारामति, ज. स. १९३८.

* **बाळकृष्ण नारायण** (६) ज. स. १९२०. परतवाडा येथें घरच्या दुकानांत काम करतात. भार्या मंगला, मॅट्रिक. पि. पटवर्धन, जळगांव.

* **भास्कर (राजाभाऊ) बापूराव** (५) ज. स. १९०९ जाने. २८. तळेगांव येथील नूतन समर्थ विद्यालयांतील अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे. परतवाडा येथें फर्निचरमेकर आणि स्टॅम्प्‌वेन्डर होते. सध्यां पुण्यास लोकसंग्रह छापखान्यांत आहेत. वास्तव्य भिडे वाडा, ३२५ सदाशिव पेठ, पुणें. भार्या सावित्री (मालती), पि. चिंतामणि गणेश अभ्यंकर, उमरावती. कन्या उषा.

* **रामचंद्र भास्कर** (६) ज. स. १९३३ ऑक्टो. ११. इंग्रजी सहावींत.

* **मधुकर भास्कर** (६) ज. स. १९३८ जाने. ८. मराठी चौथींत.

* **श्रीपाद भास्कर** (६) ज. स. १९४०.

* **वसंत भास्कर** (६)

रामचंद्र महादेव (४) अल्पवयीं मृत.

उशीरा आलेली माहिती

घराणें ३ रें, गोळप–चौल–श्रीवर्धन

खंड पहिला, वंशावळ पृष्ठ ७८–७९

पिढी ७ मधील विश्वनाथ त्र्यंबक यांचे पुत्रांचा क्रम १ मुकुंद, २ काशीनाथ, ३ हरी व ४ रामकृष्ण असा आहे.

वंशावळ पृष्ठ ७९.

१० नीळकंठ*

११ वसंत* विजय* रमेश*

१२ चंद्रशेखर*

नागपूर इंदूर इंदूर

खंड पहिला, पृष्ठ १७२

* **नरहर केशव** (१०) स. १९३९ मध्यें सेवानिवृत्त होऊन वर्धा येथें काकासाहेब परांजपे यांच्या चाळींत राहतात. नागपूर युनिव्हर्सिटीत स्त्रियांना कॉलेज टर्म भरल्याशिवाय युनिव्हर्सिटीचे परीक्षेस बसण्याची परवानगी असल्यामुळें १९४४ पासून होतकरू व गरीब विद्यार्थिनींस इंग्रजी, संस्कृत व मराठी हे विषय विनावेतन शिकवितात. त्यांपैकीं एक बी. ए. व आठ इंटर परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. भार्या लक्ष्मी, मृ. स. १९३४. कन्या (१) उषा (सुशीला), मॅट्रिक. भ्र. काशीनाथ हरी फडके, अकोला. वि. स. १९४४.

भालचंद्र नरहर (११) मृ. स. १९३९ नोव्हेंबर ९.

* **वसंत नरहर** (११) मॅट्रिक. डी. ए. जो. पी. टी. ऑफिस, नागपूर येथें नोकरी आहे. भार्या शकुंतला, पि. विष्णु कृष्ण जोगळेकर. वि. स. १९४६.

* **चंद्रशेखर वसंत** (१२) ज. स. १९४८ मार्च २४.

* **शरच्चंद्र नरहर** (११) मध्यप्रांत सरकारचे होमगार्डमध्यें आहेत. वास्तव्य वर्धा. स. १९४८ मध्यें झालेल्या हैद्राबाद संस्थानांतील पोलिस अॅक्शनमध्यें यांनीं भाग घेतला.

* **रामचंद्र केशव** (१०) यांनीं स. १९४१ मध्यें जबलपूर सोडलें. स. १९४३ पासून नागपुरास हिंदुधर्म संस्कृति मंदिर या संस्थेचे मॅनेजर आणि सेक्रेटरी असून स. १९४४ पासून तिचे मॅनेजिंग ट्रस्टीहि आहेत. संशोधन करणें हें या संस्थेचें कार्य आहे. रामचंद्रपंत यांचा कल संशोधन आणि राजकारण यांकडे आहे. त्यामुळें यांनीं सन्मान्य वेतन घेऊन या संस्थेचें कार्य पत्करलें आहे. जबलपुरास वकिली करण्यापूर्वीं नागपुरला ज्ञानकोषमंडळ असतांना त्यांत हे संपादकीय मंडळावर काम करीत असत.

* **श्रीकृष्ण केशव** (१०) सध्या वर्धा येथें बंधूजवळ असतात.

* **श्रीपाद केशव** (१०) वास्तव्य नवी शुक्रवारी रोड, नागपूर.

* **नीळकंठ केशव** (१०) इंदूर–माळवा युनाईटेड् मिल्स्‌मध्यें असिस्टंट स्पिनिंग मास्तर आहेत. पगार रु. २००. कन्या हेमलता, ज. स. १९४६ मे १०.

* **विजय नीळकंठ** (११) ज. स. १९३५ ऑक्टो. ७. इंग्रजी ३ रींत.

* **रमेश नीळकंठ** (११) ज. स. १९३९ ऑक्टो ८. मराठी ४ थींत.

दामोदर केशव (१०) मृ. स. १९४० एप्रिल ३.

* **दत्तात्रेय केशव** (१०) सध्यां भंडारा येथें सरकारी हायस्कूलमध्यें शिक्षक आहेत. वर्धा येथें गर्लस् हायस्कूल संस्थापकांपैकीं हे एक असून शाळेंतील प्रमुख शिक्षक म्हणून गणले जात.

घराणें ५ वें, गोळप–नाशिक–धौम

खंड पहिला, पृष्ठ १८५

* **प्रभाकर गोविंद** (९) भार्या सुलोचनादेवी. यांचें शिक्षण कन्यामहाविद्यालय, जालंदर येथें झालें. यांना पांच सहा भाषा येतात. यांनीं आपले वडील बालमुकुंद गंगाराम पंड्या यांच्या बरोबर इंग्लंड, अमेरिका, जपान इत्यादि परदेशांचा प्रवास दोन तीन वेळां केला. या वडिलांच्या एकुलत्या एक कन्या असल्यामुळें वडिलांची सर्व मिळकत यांस मिळाली आहे. मध्यप्रांतांत आर्य समाज मंदिर, हायस्कूल, डी. व्ही. स्कूल, कन्या गुरुकुल अनाथालय व विद्यालय मिळून आर्यसमाजाच्या १५० संस्था आहेत. त्यांची व्यवस्था पहाणाऱ्या आर्यसमाजाच्या आंतरिक सभेच्या संचालकांपैकीं या एक आहेत. आपल्या वडिलांचें अंगीकृत कार्य अशा तऱ्हेनें पूर्ण करणें हें आपलें कर्तव्य आहे असें या समजतात. स्वतःचें मुद्रणालय असून 'सत्यार्थ प्रकाश' चें मराठी भाषांतर करून छापण्याचा यांचा विचार आहे. डी. पी. आणि कंपनी या नांवाच्या जवाहिराचा व सोन्याचांदीचा व्यापार करणाऱ्या पेढीच्या या प्रोप्रायटर आहेत. यांचा विवाह श्री. प्रभाकरराव यांजबरोबर सन १९२६ मध्यें झाला.



सौ. सुलोचनादेवी

खंड पहिला, पृष्ठ १८६

* **काशीनाथ नारायण** (९) एम. बी. बी. एस; बी. एचवाय. वास्तव्य कृष्ण बिल्डींग १ पोयबावडी, परळ, मुंबई १२.

खंड पहिला, पृष्ठ १८७

दत्तात्रेय कृष्ण (६) मृ. स. १९३९ आगस्ट ९. भार्या (२) पिंगला. पुत्र कृष्ण. कन्या सुंदरा व गंगू. भार्या (३) भागीरथी, वय ४५. पि. विष्णुपंत फाटक, चाफळ. पुत्र गोपाळ व हरी. कन्या मालती तथा मैना, वय १३. इंग्रजी ४ थींत.

*** कृष्णाजी दत्तात्रेय** (७) विटयास घड्याळ दुरुस्ती व शिवणकाम करतात. कन्या (१) शशिकला, वय ११. यांना आणखी दोन कन्या आहेत.

*** हणमंत कृष्ण** (८) वय १८. मॅट्रिक विद्यार्थी, विटें.

खंड पहिला, पृष्ठ ८४

७ कृष्ण* गोपाळ*

८ { हणमंत* विजयकुमार* जयंत*
पद्माकर*
विटें विटें विटें

*** पद्माकर कृष्ण** (८) वय १३. इंग्रजी ४ थींत, विटें.

*** विजयकुमार कृष्ण** (८) वय ४.

*** गोपाळ दत्तात्रेय ऊर्फ गणेश** (७) हायकोर्ट वकिलीची परीक्षा उत्तीर्ण. भार्या पद्मावती (अंबू), मॅट्रिक. वय २३. वि. स. १९४३. पि. शंकरराव पटवर्धन, कुरुंदवाड.

*** जयत गोपाळ** (८) वय २.

*** हरी दत्तात्रेय** (७) मॅट्रिक. मुंबईस व्हि. ज्यु. टे. इन्स्टिटयूटमध्यें इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगचें तिसरे वर्षांत शिकतात.

रामचंद्र कृष्ण (६) मृ. स. १९४५. कन्या दोन. एक विटें येथें बव्यांकडे दिली होती.

*** श्रीपाद रामचंद्र** (७) विटें येथें इंग्रजी ५ वींत.

घराणें १४ वें, मेटें

खंड पहिला, पृष्ठ २६९

*** गणेश जनार्दन** (९) स. १९४२ ते १९४६ कल्याण तालुका खरेदी विक्री संघाचे अकाउन्टन्ट व मॅनेजर होते. सध्यां पुण्यास के. बी. चिंचणकर कंपनी यांचेकडे अकाउन्टन्ट व मॅनेजर आहेत. वास्तव्य घर क्रमांक ५०६ सदाशिव पेठ, पुणें.

*** यशवंत गणेश** (१०) हे दुसऱ्या महायुद्धांत स. १९४२ ते १९४७ इराक व ब्रह्मदेशांत होते. सध्यां पुण्यास एस्. बी. नादे यांचे स्टेशनरी दुकान चालवितात.

*** भास्कर गणेश ऊर्फ जयवंत** (१०) दुसऱ्या महायुद्धांत लष्करी नोकरींत होते. सध्यां सांताक्रूझ येथें एअर इन्डिया लिमिटेडमध्यें मेकॅनिक आहेत.

*** लक्ष्मण गणेश** (१०) पुण्यास मॅट्रिकचे वर्गांत.

*** वसंत गणेश** (१०) पुण्यास मराठी सातवींत.

*** माधव जनार्दन** (९) पुण्यास पेपर अॅन्ड पल्प कन्व्हर्शन कंपनींत अकाउन्टन्ट आहेत.

*** दामोदर माधव ऊर्फ प्रभाकर** (१०) पुण्यास इंग्रजी ४ थींत.

*** अनंत माधव** (१०) पुण्यास मराठी ४ थींत.

परशुराम पिलाजी (८) मृत्यु सन १९३८.

विष्णु परशुराम (९) मृत्यु सन १९४५.

प्रकरण ७ वें

सामान्य विचार

ऐतिहासिक कागदपत्रें व उल्लेख, संशोधनार्थ आणि वंशावळी व माहिती या तीन प्रकरणांत आलेल्या माहितीवरून सुचणारे कांहीं विचार येथें देत आहों.

ऐतिहासिक कागदांची पाहाणी

आकाशांत तारा हा स्वत:भोंवतीं फिरत असतांहि तो दुसऱ्या ताऱ्यांभोंवतीं फिरतच असतो आणि त्याच्याहि भोंवतीं आणखी इतर ताऱ्यांचें फिरणें चालूच असतें. म्हणजे इतका या परस्परांत ज्याप्रमाणें वेगळेपणा असूनहि मूलत:च दृढ असा संबंध आहे त्याप्रमाणेंच इतिहासाच्या नभोवितानांत व्यक्तीचें घराण्याच्या व समाजाच्या इतिहासाशीं म्हणजे पर्यायानें प्रांतीय व राष्ट्रीय इतिहासाशीं दृढ नातें आहे. व्यक्तीच्या वा घराण्याच्या इतिहासाला त्याचें म्हणून मूळचें, अंगचें असें कांहीं महत्त्व व स्थान आहेच. पण तें तेथेंच संपतें असें नाहीं; तर त्या इतिहासाची सामाजिक व राष्ट्रीय इतिहासालाहि आवश्यकता आहे आणि म्हणूनच " लोकगर्भ-गृहं कृत्स्नं यथावत् संप्रकाशितं " हें इतिहासाचें एक लक्षण सांगितलेलें आहे. एरवीं नुसत्या राजकीय वृत्तान्तानें इतिहासाचें पुरतें स्वरूप ध्यानीं येणार नाहीं. दुसरी व प्रस्तुत मुख्य गोष्ट ही सांगावयाची कीं, राजकीय इतिहासाचें एक अंग राज्यकारभार हें आहे व त्यासंबंधीं माहिती घराण्याच्या इतिहासांतच मुख्यत: मिळावयाची. अशा दृष्टीनें घराण्यांच्या इतिहासाची आवश्यकता व इष्टता आहे. प्रस्तुत पेंडसे घराण्याच्या ह्या पुस्तकांतहि दोन्हीं तिन्ही अंगांची अशा दृष्टीनें जी माहिती मिळते ती पाहूं--

कुलवृत्तान्त सन १९३८ सालीं प्रसिद्ध झाला; त्यानंतर दहा अकरा वर्षांनीं हा वृत्तान्ताचा दुसरा खंड प्रसिद्ध होत आहे. गेल्या दहा वर्षांत घराण्यांमध्यें झालेल्या घडामोडी आणि त्या अवधींत घराण्यांसंबंधीं मिळालेली माहिती व उपलब्ध झालेले ऐतिहासिक लेख यांत समाविष्ट करावयाचे आहेत. पहिल्या खंडांत आलेल्या वृत्तान्तापुढील म्हणजे कालदृष्टया पुढील माहिती ह्या खंडांत समाविष्ट करावयाची ह्या अर्थानें हा पुरवणी ग्रंथ नाहीं. ऐतिहासिक मूळ साधनें ज्यांत दाखल करावयाचीं आहेत त्या ग्रंथांचे बाबतींत पुरवणी म्हणजें पुढील पुढील तेवढीच माहिती देणें हा अर्थ नसतो. तर संशोधनानें नवीन उपलब्ध झालेलीं पत्रें इत्यादि मग तीं पहिल्या ग्रंथांत आलेल्या पत्रादि ऐतिहासिक साधनाआधींची असलीं तरी,

ती देणें हेंहि ह्या ग्रंथाचें कार्य असतें. अर्थात् त्यासाठीं संशोधन सारखें करीत राहिलें पाहिजे हें जें सांगितलें जातें तें कसें आवश्यक आहे तें निराळें सांगणें नको.

पहिल्या पुस्तकांत इतिहासकालांतील म्हणून जो पेंडसे व्यक्तीचा पहिला उल्लेख दिला होता तो थोरले बाजीराव पेशवेकालीन होता. आतां सन १६९७ चा म्हणजे त्यामागील ३०।४० वर्षांचा उल्लेख उपलब्ध झाला आहे. तो येथें प्रथम द्यावयाचा आहे. शिवाजीमहाराजांचे तिसरे जामात ज्या महाडीक घराण्यांतील त्या महाडीक घराण्यांतील माणकोजी यांजकडून पुरोहितपणाबद्दल प्रतिवार्षिक संभावना म्हणून रु. १२ पेंडसे घराण्यांतील वैदिक महादेवभट आणि बाळकृष्णभट यांस मिळावयाचे असें स्वतः राजे माणकोजीनीं लिहून दिलेलें आहे. (ऐ क्र. ७६–७७ पहा.) हे माणकोजी शिवाजीचे जांवई हरजीराजे यांचे किती जवळचे आप्त होत हें महाडीक यांची पूर्ण व विश्वसनीय वंशावळ न मिळाल्यामुळें सांगतां येत नाहीं. पण ज्या घराण्यांत हा कागद उपलब्ध झाला ते तारळ्याचेच महाडीक होत व त्याच घराण्यांतील हरजीराजे महाडीक हे असल्याचें प्रसिद्ध व निश्चित आहे. ह्याच घराण्यांत पुढें पुनः शाहूची बहीण म्हणजे शिवाजीची नात भवानीबाई ही दिली होती. भवानीबाईचा पति शंकराजी राजे हा जसा औरंगजेबाच्या नोकरींत होता तसाच हा माणकोजीहि ह्या वेळीं दिल्लीकर मोंगलांचाच नोकर होता व म्हणून वरील देणगीच्या पत्रावर आलमगीरचा शिक्का आहे. वर सांगितलेल्यांपैकीं बाळकृष्णभट पेंडसे यांस प्रतापजी राजे महाडीक यांनीं ह्याच वर्षी दुसरें एक दानपत्र दिलें आहे आणि त्यांत इंदापूर परगण्यांतील कसबें बावडें येथील चाहूरभर जमीन 'जो परियत जहागीर आहे तो परियत तुम्ही कीर्द करून सुखें असणें' असें सांगून दिली आहे. हें दान देणारा प्रतापजी राजे महाडीक हा शिवाजीचा नातू म्हणजे हरजीराजे यांचा मुलगा होय. ह्यावरून माणकोजी हा ह्याच महाडीक घराण्यांतील व जवळचा आप्त असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं.

शिवोत्तर कालांतील पण पुणें राजधानीशीं संबद्ध अशा व्यक्तींची माहिती पाहूं. प्रथम पुण्याचे कोतवाल बाबूराव राम व नंतर पुणें राजधानीचे दप्तरदार गणेश कृष्ण यांचे संबंधीं जी नवीन माहिती मिळाली ती अशी—

बाबूराव राम ह्याचें मूळ नांव रघुनाथ राम असें आहे. पण हा पुण्याचा कोतवाल असल्यामुळें व पुण्याची कोतवाली ही ऐतिहासिक कालांत फार मोठी प्रतिष्ठेची व अधिकाराची जागा असल्यामुळें बाबूराव ह्या टोपण नांवानेंच त्यास ओळखलें जाई. ह्याचा निर्देश पहिल्या खंडांत योग्य स्थळीं (पृ. ३१९) आला आहे. पुण्यास असतां सवाई माधवरावाच्या राजवटींत जी अधून मधून थोडी बजबजपुरी माजत असे त्यांत ह्याजवर कांहीं टपका येऊन ह्यास आपल्या मूळ गांवीं

म्हणजे वणोशी येथें जावें लागलें. अर्थात सरकार पक्षाची अवकृपा झालेल्या ह्या बाबूरावास " कोठें फंदफितुर करणार नाहीं " अशा करारावर व त्याबद्दल जामीन देऊनच आपल्या गांवीं राहावें लागलें आहे. पण ह्यांतहि हें लक्षांत घेण्याजोगें आहे कीं, ह्याचें वणोशी गांवचें खोतीचें वतन—त्या वतनाचा भोगवटा हा बाबूराव पुण्यास असल्यामुळें तुटला होता तरी—पुन: पूर्ववत् चालू केलें आहे; वृत्तिच्छेद केला नाहीं. इतकेंच नव्हे तर, बाबूराव यास कांहीं कर्ज होतें त्याबद्दलहि ' कर्जदारांस तगादा करूं न देणें. सोइसोईनें ते पैक्याचा निकाल करतील ' असा काळजीच्या व आपलेपणाच्या दृष्टीनेंच त्याचा बंदोबस्त करून ' खोतीचें कामकाज ह्याचेंच हातें घेत जाणें ' असेंहि ह्या हुकुमांत बजाविलें आहे.

वर आलेंच आहे कीं, वणोशी येथील खोती वतन ह्या बाबूराव राम याचे घराण्याकडे पूर्वापर होतें; पण बाबुरावाच्या पंधरा सतरा वर्षें पुण्याच्या वास्तव्या-मुळें ह्या वतनाच्या हक्कांत इतरास हात घालण्यास अवसर मिळाला व ती जी एकदां भांडणास सुरुवात झाली ती पुन: पुन: अधून मधून चालूच राहिली. ह्या वादाचा निर्णय सर्व प्रकारच्या साक्षीपुराव्यानें श. १७०३ मध्यें यथास्थित लागला असतां श. १७३२ मध्यें बाबुरावाचा मुलगा मोरोपंत ह्याचे वेळीं हा तंटा पुन: सुरू झाला व वतनाची जप्तीहि सरकारांत झाली. ह्या तंट्याचा निर्णयहि पुन: पेंडसे ह्यांच्याच बाजूनें झालेला आहे. हें प्रत्यक्ष भोगवटयावरून ध्यानीं येतें. इ. स. १८१० नंतर लवकरच हें भांडण संपलें व बाबूराव राम ह्याच्या वंशजाकडे हें खोती वतन पूर्ववत् चालू झालें. पण त्यानंतर बहुधा ह्या वादापायीं झालेल्या खर्चामुळें हें खोती वतन बाबूराव रामाच्या वंशजास श. १७५७ च्या सुमारास गहाण टाकावें लागलें. सध्यां तें अन्य घराण्याकडे चालू आहे.

गणेश कृष्ण हे पेशवे सरकारी दप्तराचे आद्य प्रस्थापक होत. ह्यांचे संबंधानें पहिल्या भागांत आलेल्या माहितींत पुढील भर घातली पाहिजे. तेथें सांगितलेंच आहे कीं स्वारी दप्तर, चालतें दप्तर, एकबेरजी दप्तर, कोणचेंहि प्रमुख दप्तर म्हटलें कीं त्याशीं ह्यांचा संबंध असावयाचाच. त्यामुळें ह्यांना निरनिराळ्या प्रांतां-तून त्या त्या बाजूचे स्वारी कारकून म्हणून रक्कम मिळत असे. रघुनाथराव दादांचे बरोबर हे स्वारीवर असतांना अशापैकीं सरकार खरगोण व सरकार होडे येथून रु. २०० करार करून ह्या दोन्ही सरकारचे कमाविसदार नारो बल्लाळ भेसकुटे यांजकडून यांना देवविले आहेत. विशेष हें कीं, हे रुपये सरकारचे मक्त्या-शिवायचे आहेत. म्हणजे आधीं ठरलेल्याखेरीज हे रुपये मिळावयाचे आहेत व ह्या संबधींची सनद त्या प्रांतांतल्या सरदारांच्या* म्हणजे गणेश खंडाजी खांडेकर यांच्या

* प्रांतांत अधिकारी तीन. एक मुख्य फौजबंद सरदार, नंतर वसूली अधिकारी कमाविसदार आणि तिसरा लेखकाधिकारी दप्तरदार.

दिमतींत आहे. त्याचप्रमाणें अहमदाबाद परगण्यांतूनहि असेच रु. २०० गणेश कृष्णांना मिळावयाचे आहेत. ह्या अनेक ठिकाणीं गणेश कृष्णाचे मार्फतच तेथील दप्तरी कामावर लेखक नेमले जात असत. व त्यांना ही रकमेची पोंच व्हावयाची असे. गुजराथेंत बलसाड प्रांताचीहि दप्तरदारी यांजकडे होती. अहमदाबादकडे महादाजी नारायण म्हणून गणेश कृष्णाकडील कारकून नेमला गेला होता.

कारकून ह्याचा अर्थ येथें मामलत करणारा कारकून असा आहे. कारण ह्यापूर्वींची म्हणजे श. १६७७ च्या आधींची अहमदाबादची मामलत दामोदर महादेव व देवराव महादेव ह्या हिंगणे बंधूंच्याकडे होती. पण आतां ती त्यांजकडून काढून गणेश कृष्ण यांच्या निसबतीच्या महादाजी नारायण याजकडे दिली असें स्पष्ट सांगितलें आहे (ऐ. क्र. ५७). ह्यावरून गणेश कृष्णाचे तर्फे बऱ्याच ठिकाणचे कारकून म्हणजे मामलतदार नेमले जात; एवढा अधिकार त्यांचे दप्तरदारींत अंतर्भूत होता असें स्पष्ट ध्यानांत येतें. गंगायमुना ह्या दोन नद्यांमधील म्हणजे अंतर्वेदी प्रांताची मजमूहि गणेश कृष्णाचेकडे होती. आतांपर्यंत गणेश कृष्णाचे बाबतींत त्याची कामगिरी सांगणारे उल्लेखच देतां आले; आतां त्याला होणाऱ्या प्राप्तीचे उल्लेख मिळाले ते दर्शित करावयाचे आहेत. अर्थात् ह्या उल्लेखांबरोबर त्याचें काम कोठें कोठें झालेलें आहे तें सांगावयाचें आहे. श. १६७७ मध्यें राजपुरी महालपैकीं पूर्वींप्रमाणें २ खंडी आणि नवी देणगी म्हणून ३ खंडी असे आणखी ५ खंडी तांदूळ बारीक, राजपुरीचे अधिकारी राणोजी वलकवडे¶ यांजकडून यास नानासाहेब पेशवे ह्यांनीं देवविले. ह्या ठिकाणीं तांदुळाचें माप सांगतांना 'साडे तिसेरी कैली खंडी' असें म्हटलें आहे. म्हणजे वीस मणाची खंडी हें प्रमाण. तसेंच मण किती पायलींचा, तर कैली, म्ह. बारा पायलींचा. पण पायली "साडे तिसेरी" असें सांगितलें आहे. साडे तिसेरीप्रमाणें छशेरी, नवशेरी किंवा कोठी मापें असें ह्या संबंधांत अन्यत्र पायलीचें प्रमाण आलेलें आहे.

कृष्णाजी गणेश हा गणेश कृष्णाजीचा मुलगा आपल्या बापाच्या जागीं दप्तरदार म्हणून आला. हा बापाच्या हयातींतही कोठें कोठें हें काम करीत असे. बापाच्या जागीं बापाच्या पश्चात् तो कामावर आला तेव्हां बापास मिळणारें सर्व उत्पन्न यास न मिळतां कांहीं उत्पन्न कमी झालें. प्रांत राजपुरीपैकीं ५ खंडी तांदूळ मिळत; ते आतां २ खंडी मिळूं लागले. गणेश कृष्णाजीकडे जो दप्तरदारीचा अधिकार होता तो, असें वाटतें कीं, सर्व मराठे राज्यांतील दप्तरदारीचा होता. ह्या

¶ हा तर्फ उंदेरीचा अधिकारी होता व तर्फपेक्षां तालुका हा लहान असल्यामुळें उंदेरी वगैरेंचाहि तो अधिकारी होता. सवाई माधवराव रोजनिशी भाग १, २ पृ. ७४, १२, २८५.

सर्व दप्तरदारीच्या कामाचा सर्वश्रेष्ठ व मुख्य एक अधिकारी कोण तर फडणीस. ह्या फडणीसीमध्यें दोन प्रकार. एक स्वारी फडणीस व दुसरा दरबार फडणीस. ह्यांतहि दरबार फडणीस प्रमुख. स्वारी फडणीसचे दप्तराला 'चालतें दप्तर' असें दुसरें नांव आहे. चालतें दप्तर म्हणजे चालू दप्तर हा एक अर्थ आहेच. आणि मुख्य फडणीसाच्या दफ्तराला एकबेरजी दप्तर हें दुसरें नांव आहे. स्वारी फडणीसानें आपलें सर्व काम, हिशेब व कागदपत्र मुख्य दरबार फडणीसाकडे सुपूर्द करावयाचे असत. ह्या फडणीसी कामांतीलच एक भाग मजमू दप्तर हा आहे. अंतर्वेद प्रांतांतील मजमू ही ह्या गणेश कृष्णाजीकडे म्हणजे कृष्णाजी गणेशच्या बापाकडे होती. व ती 'दिमत बाळाजी जनार्दन व मोरो बाबूराव फडणीस' अशी होती. वर जे फडणीशीचे दोन प्रकार सांगितले तेच ह्या ठिकाणच्या दोन नांवांनीं लक्षांत घ्यावयाचे आहेत. म्हणजे बाळाजी जनार्दन हे दरबार फडणीस व मोरो बाबूराव स्वारी फडणीस होते. असो. ह्या कृष्णाजी गणेशाला अंतर्वेदींतील मुजुमदारीबद्दल वर्षाला दोन सहस्र रुपये वेतन मिळत असे. पण श. १६९५ पासून त्या महालच्या जमा होणाऱ्या वसुलाच्या प्रमाणांत येतील तसे रुपये द्यावेत असा नियम केला. म्हणजे थोरले माधवरावांचे कारकीर्दींत अंतर्वेद महालचा वसूल जितका येत असे तितका त्यानंतर येईनासा झाला म्हणून वसुलाच्या प्रमाणाशीं मजमूच्या मिळाव-याच्या वेतनाचें प्रमाण ठरविणें भाग झालें. कृष्णाजी गणेशाकडे परगणे इटावा, परगणे सकुराबाद, परगणे फपुदे येथीलहि मजमूचें काम होतें. व त्याबद्दल अनुक्रमें ९००, ७०० व ४०० अशा रकमा मिळत. तसेंच विसापूर तर्फ (प्रांत कल्याण) येथील फडणीस विसाजी नारायण तोतयास मिळाल्यामुळें ही फडणिशीहि कृष्णाजीकडे आली. तोतयाचा शेवट इ. १७७६ मध्यें झाला. पण त्याला सामील झालेल्यांना शिक्षा देण्याचें काम चालू झालें व त्यांत हा विसाजी नारायण असल्याचें आढळून आल्यामुळें त्याला त्याच्या फडणिशीवरून काढून टाकलें व ती फडणिशी कृष्णाजीपंतास दिली. ह्या फडणिशीचें वेतन वर्षास रु. ५० असे. (ऐ. क्र. ६३). कृष्णाजीपंतास फिरंगाण कोंकण तसेंच इंदापूर, बारामती व खोपी (खेडेंबारें) येथून तांदूळ अगर इतर हर जिन्नस १० खंडीपर्यंत आणतील त्याचा जकातीचा आकार मुशाहिऱ्यांत धरण्यास सांगणारीं दस्तकेंहि पुण्याचे त्या वेळचे सुभेदार जनार्दन आपाजी खिरे, तुळशीबागवाले यांजकडून स्वारी राजमंडळाच्या दप्तरांतून मिळालीं आहेत. तसेंच पेशवे यांच्या खासगी गंजीपैकीं २००० पेंढ्या गवत प्रतिवर्षी ह्यास मिळत असे. ह्यावरून पेंडसे कुलापैकीं ह्या कृष्णाजीच्या घराण्याचा पंतप्रधान पेशवे घराण्याशीं आपलेपणाचा व घरोब्याचा भाग असावा हें दिसून येण्यास अवसर सांपडतो. कृष्णाजीस कोंकणांतील नातूपालवण तर्फपैकीं मौजे कागू ह्या गांवांतूनहि गांव उत्पन्नांतील रु. १२०॥ आणि एक खंडी भात (रु. २०) मिळत असे. पैकीं रु. २० कारकुनीचे म्हणून सांगितले आहेत. कारकुनी

ह्याचा अर्थ आज फार गौण समजला जातो. तसा अर्थ तेव्हां नव्हता. उघड उघड जे पैसे काम केल्याबद्दल मिळत त्यास कारकुनी ही संज्ञा होती. सरकारदरबारीं सरकार कामासाठींच केवळ कारकून असत. आजच्याप्रमाणें सर्व सामान्य नागरिकांचा व राजसत्तेचा निकट संबंध येत नसे. म्हणजे जो आपला कारकून नाहीं पण काम मात्र त्याजकडून करून घ्यावयाचें आहे अशा स्थितींत त्या कारकुनाला कांहीं पैसे उघड व सरळ रीतीनें देणें इष्ट व अवश्य असे. आणि असे पैसे देणें घेणें हें राजमान्य व लोकमान्यहि समजलें जाई. म्हणून सरकारी हिशेबी कागदांत ह्या कारकुनी रकमेची नोंद न्यायतःच होई. असो.

एकंदरींत गणेश कृष्ण व त्याचे पुत्र कृष्णाजी गणेश व त्याचेहि पुत्र गणेश कृष्ण ह्यांजकडे खरगोण, अंतर्वेद, हाडें, राजपुरी, कल्याण, इटावा, बलसाड, पारनेर, दसकुरई (गुजराथ), सकुराबाद, फपुंद, खोपी, विसापूर, कागू, भिलवलें, कासरोली, नवोढ, दुंडास (अहमदाबाद), शहापूर-अकदापूर, गंगापूर, नाशिक, भूतसर, बोहारी, जुन्नर, अवचितगड, ह्या ठिकाणांतून फडणिसी म्हणून, मजमूदारी म्हणून, मामलत म्हणून व दप्तरदार म्हणून कोठें जकातीचें उत्पन्न, तर कोठें महालच्या किंवा गांवच्या उत्पन्नाचाच कांहीं भाग, कोठें खाजगीतून गुरांना गवत, कडबा, तर कोठें जकातीचीं दस्तकें मिळत. तसेंच सरकारी खर्चानें मशालजी व दसऱ्याचें कापड मिळे. ही कामगिरी व त्यासंबंधींची मिळकत ह्याची स्वतंत्र नोंद असलेले कागद तर मिळालेच आहेत. पण एकत्रित यादीहि उपलब्ध झाली आहे. व ती ऐ. कागदपत्रांत (ऐ. क्र. ६६) वर दिली आहे. हे सर्व कागद शक १६७६ व श. १७३२ ह्या कालमर्यादेंतील आहेत. शिबंदीची वाटणी, महालांची वाटणी वगैरे कुल काम ह्या कृष्णाजी गणेशकडून घ्यावें असाहि उल्लेख सांपडतो. ह्यावरूनहि फडणिशीचे दोन प्रकार व त्या दोन्ही फडणिशींकडील दप्तरदारीचें काम ह्या घराण्याकडे असे, असें दिसून येतें.

ह्या पेंडशांची सदाशिव पेठेंत जागा होती. ती गाड्याकडील कारकून घांगरेकर व रामाजी कोन्हेर आणि दप्तराकडील कारकून नारो गणेश लिमये ह्या तिघांनीं ४३४३ रुपयांस श. १७२१ च्या आश्विनांत विकत घेतली. त्या वेळची पद्धत अशी होती कीं, खरेदी देणार-घेणारांचें खरेदीपत्र झालें तरी तें पाहून कोतवालनें एक 'कबालेपत्र' द्यावयाचें व 'कबाल्या' चा व 'शेल्या' चा आकार घेऊन कोतवालानें आपलें पत्र द्यावयाचें म्हणजे तो व्यवहार पूर्ण होत असे. प्रस्तुत व्यवहारांत हा कबाल्याचा आकार निमा माफ केला आहे व शेल्याचा आकारहि हिशेबी खर्च लिहावा असें सांगितलें आहे.

पेंडसे कुलांतील शिवकालीन व्यक्तींविषयीं व शिवोत्तर कालांतील पुण्यनगरींतील प्रमुख व्यक्तीविषयींची माहिती आज उपलब्ध झालेली वर दिली. आतां

कालानुक्रमानें निरनिराळे लहान मोठे अधिकारी कोण कोण झाले तें साकल्यें-करून सांगावयाचें आहे.

श. १६४३ मध्यें कार्ले यांचें देशकुलकर्णीपणाबद्दल निवाडपत्र झालेलें उपलब्ध आहे. (ऐ. क्र. ७२). त्यावर पंडित, वास्तव्य खेड व महाजन वास्तव्य केळशी ही पदवी लावलेले दोन पेंडसे पुरुषांच्या साक्षी आहेत. [श. १६५९ मध्यें ६२ मंडळींना मिळून ४६ बिघे जमीन शेती करण्यासाठीं दिल्याचें एक पत्र (ऐ. क्र. ८०) मिळालें आहे. त्यांत तीन पेंडसे व्यक्तींकडे चार बिघे जमीन सोंपवून ह्या जमिनीचा आकार धर्मादाय लिहिण्याबद्दल नानासाहेब पेशव्यांनीं फर्माविलें आहे. ही देणगी परगणे नसरापूर प्रांत कल्याणपैकीं कोंठिंबें व त्याजवळच्या गांवांतील आहे. विशेष कीं, ह्या देणगीच्या स्वीकाराबरोबर त्या बासष्ट मंडळीकडे याच बाजूच्या पड जमिनींपैकीं अनुकूल पडेल तेथें शेती करण्याबद्दलचेंहि काम सोंपविलेलें आहे. जमीन लागवडीस आणणें हेंहि काम त्या काळीं चालू होतें व तें काम वैदिक ब्राह्मण करीत हें ह्यावरून ध्यानीं येतें.] पण श. १६५९ मध्यें दिलेला ह्यासंबंधीं कागद श. १६७० मध्यें जीर्ण झाला असें म्हणून पुनः सनद दिली (ऐ. क्र. ८१) हें चित्य वाटतें. कारण ११ वर्षांतच इतकें जीर्णत्व कां यावें हें समजत नाहीं. कालानुक्रमाच्या दृष्टीनें ह्यापुढील कागद श. १६८३ मधील आहेत. पण ते मुर्डी—आंजर्लें ह्या वादप्रकरणांतील असल्यामुळें व तो वाद स्वतंत्रच सांगणें इष्ट असल्यामुळें त्या कागदांसंबंधीं विवेचन येथें न करता पुढें केलें आहे. म्हणून इतर कागदांविषयीं येथें विचार करूं.

पेंडसे कुलांतील मंडळी ऐतिहासिक कालांत मुख्यतः दोन व्यवसाय करणारी अधिक प्रमाणांत आढळतात. एक निपिकी जमीन पिकाऊ करणें आणि राजकारभारापैकीं लेख्यशालेकडील म्हणजे दफ्तरदारीकडील काम करणें. इतर व्यवसायी त्या मानानें कमी. उदा० अग्निपूजक म्हणजे अग्निहोत्री घराणीं थोडीं. मौजे कोंठिंबें ह्या एका गांवीं तीन अग्निहोत्री असून त्यांना प्रत्येकीं थोडी जमीन दिली आहे. (ऐ. क्र. ८२). पण फडणिशी शिलेदारीकडील कारकून, मुजुमदारी, पोतनिसी हीं कामें करणारे अधिक आहेत. तालुका शिवनेर खालील साडे तीन तर्फा मावळ भाग आहे तेथील फडणिशी करणारे लक्ष्मण विश्वनाथ हे असून त्यांना प्रतिवर्षी २०० रु. ची तैनात दिलेली आहे (ऐ. क्र. ४१). पुढें तीन वर्षांनीं म्हणजे श. १६९७ च्या पौषांत ह्याच लक्ष्मणपंताकडे मुल्हेरकडील कमाविसी सोंपविली आहे. (ऐ. क्र. ४२). सदाशिव गणेश याचे तिन्ही मुलगे विश्वनाथ, महादाजी व गोविंद यांजकडे अनुक्रमें बीरवाडी तालुक्यांत सुभ्याची फडणिसी व महालची मुजूमदारी; राजपुरी प्रांतापैकीं तर्फ मांडल्याची मजुमू आणि परगणें कोडील येथील मजुमू असे अधिकार व कामें असून ह्यांस १४५॥।, ४७ व २७० अशी वेतनाची रकम मिळत असे. ह्यांतील गोविंदरावाकडे सर्व कोडील परगण्याची मजमदारी असल्यामुळें ह्यानें आपल्या चुलत-

भावास म्हणजे नारो कृष्ण यास चाकरीस घेतलें होतें म्हणजे नांव गोविंद सदाशिवाचे पण चाकरी प्रत्यक्ष नारो कृष्ण ह्याजकडे असे. ह्या मंडळींची माहिती नवीनच उपलब्ध होत असून त्यांचा अंतर्भाव घराणें ८ मध्यें होतो. (ऐ. क्र. ५१).

ह्यानंतर धामापुरच्या केसो रघुनाथाचा उल्लेख श. १६९५ चा येतो. हा गांव संगमेश्वर तालुक्यांतील असून त्यावर प्रतिनिधींची सत्ता असे. ह्या वेळीं श्रीनिवास गंगाधर ऊर्फ भवानराव हे प्रतिनिधी पदावर होते. ह्या प्रतिनिधींनीं केसो रघुनाथच्या पाटषाण्यास गणोबा व कृष्णंभट हे कलह करून अडथळा करतात तो करूं न देण्याबद्दल बजाविलें आहे. वर जसे तिघेहि सख्खे बंधू निरनिराळ्या परगण्यांत फडणिसी वा मुजुमदारी करीत असल्याचें आलें आहे त्याप्रमाणें अवचितगड येथील दफ्तराकडील कारकुनीची आसामी महादाजी रघुनाथ यांची होती. पण त्यांचे बंधु आबाजी हेहि ह्या कामावर नियोजित केले जाऊन त्यास रु. १५० ची नेमणूक करून दिली आहे व ही गोष्ट श. १६९६ सालांतील आहे. ह्याच वर्षीची म्हणून येथेंच सांगून टाकावयाची दुसरी किरकोळ गोष्ट ही कीं नाशिकाच्या दुतोंड्या मारुतीस प्रदक्षणा घालणाऱ्या ब्राह्मणांत एक भिकंभट नाशिककर पेशव्यांच्या रोजकोर्दींत निर्दिष्ट आहे. श. १६९७ मध्यें श्रीवर्धनकर ब्राह्मणांस राजपुरी महालपैकीं कुटुंब पाहून कांहीं खंडी भात देण्याची जी व्यवस्था केली होती ती मध्यंतरीं बिघडल्यामुळें ती पुनः पूर्ववत् चालू राहावी म्हणून चिमाजी माणकर यास सनदपत्र दिलें आहे. त्यांत महादेवभट व बाबाजीभट ह्यांची नांवें आलीं असून ह्या नांवांपुढें चांगबोले ह्या शब्दाची जोड दिली आहे. सरकारी कागदपत्रांत पेंडसे यांस 'चांगबोले' म्हणून संबोधिल्याचा हा पहिलाच उल्लेख आहे. चांगभलेचे चांगबोले होणें शक्य आहे व ह्यांतील चांग आणि बोले हे दोन्ही शब्द शुद्ध मराठी व रूढ आहेत. तरी ह्या दोहोंचा झालेला एक शब्द हा मात्र श्रुत नाहीं. तात्पर्य, हा शब्द विचारांत घेण्याजोगा आहे. चांगबोलेच्या सादृश्यानें गोडबोलेचें स्मरण होतें. ह्यापुढील उल्लेख श. १६९९ मधील असून नारंभट असा त्यांत नामनिर्देश आहे. नारंभट हें नारायणभटाचें लघुरूप आहे. ह्याच नारं किंवा नारायणभटाचा उल्लेख श. १६४३ मध्येंहि मागें आलेला सांगितला आहे. व तो खेड (सुवर्णदुर्ग) येथील राहणाराचाच आहे. दोन्ही उल्लेखांतील अंतर ५७ वर्षांचें आहे व तें कालदृष्टचा अशक्य नाहीं. पहिल्या उल्लेखाचे वेळीं ह्या नारायणभटांस पंडित असें संबोधिलें आहे. त्या कालीं पंडित म्हणण्याइतकें अध्ययन नारायणभटांचें झालेलें असण्यास व त्यानंतर ५७ वर्षांचा आयुर्दाय धरावयाचा म्हणजे ह्या दुसऱ्या उल्लेखाचे वेळीं नारंभटाचें वय सत्तरऐंशीच्या घरांत गेलें असण्याचा संभव आहे. मात्र येथें त्यास नुसतें वेदमूर्तिच म्हटलेलें आहे.

ह्यानंतर श. १७०५ मध्यें गुंडभट महादेवभट यांस-हे नरसीपुरचे राहणारे-त्यांच्या सासऱ्याचें वर्षासन मिळालें आहे. मात्र सासऱ्यास १०० रु. मिळत तरें

त्याचे निम्मे म्हणजे. रु. ५० च जावयास करार करून दिले आहेत. मागेंहि अशा प्रकारचें उदाहरण घडलेलें दर्शित केलें आहे. गणेश कृष्णाला ५ खंडी तांदूळ पावत होते. पण त्याच्या पश्चात् कृष्णाजी गणेशाकडे हाच दरख चालवितांना तीन खंडी कमी करून दोनच खंडी चालविण्याविषयीं आज्ञा सादर झाली आहे. श. १७११ मध्यें ह्या कृष्णाजी गणेशास ५० बैलांवरून तांदूळ, धान्य व मीठ फिरंगाण कोंकणांतून आणण्याबद्दलचीं जकातीचीं दस्तकें मिळत; तींच त्याचा मुलगा गणेश कृष्ण याजला फक्त ४० बैलांचीं दस्तकें मिळूं लागलीं. (ऐ क्र. ६७) ह्यावरून वारसा हक्क चालू करतांना नजराणा किंवा पूर्वीच्या देणगींत कांहीं कमी करून ती चालविण्याचा शिरस्ता असावा असें दिसतें. वारसाकर किंवा डेथडयूटी असें सध्यां ज्यास म्हणतात त्याच प्रकारचा हा कर होता असें म्हणतां येईल. श. १७०६ मध्यें शिलेदारीकडील कारकून पांडुरंग रामचंद्र हा मूळचा अवचितगड तालुक्यांतील रहिवासी. व ह्यास तीन खंडी भाताची नेमणूक राजपुरी प्रांतांतून होती. अर्थात् हे सोयीवार नाहीं म्हणून बदलून अवचितगड तालुक्यांतूनच नेमणूक मिळण्याची व्यवस्था केली आहे.

मध्यंतरींची एक गोष्ट निदर्शनास आणणें जरूर आहे. रघुनाथ बाजीराव म्हणजे राघोबादादा ह्यांचीं दोन लग्नें सर्वांस माहीत आहेत. तिसरेंहि लग्न त्यांचें झालें होतें हें तितकें प्रसिद्ध नाहीं. परंतु तें झालें होतें हें निश्चित आहे. पेंडसे कुलवृत्तान्ताच्या पहिल्या खंडांत पृ. १९४ वर हें तिसरें लग्न प्रत्यंतर–पुराव्यासह प्रसिद्ध केलें आहे. हें लग्न भिकाजी गणेश पेंडसे ह्यांच्या मथुरा ह्या मुलीशीं श. १७०२ मध्यें दादा सुरतेस इंग्रजाकडे असतांना झालें. ह्या भिकाजींचे बंधु बाबाजी गणेश म्हणजे राघोबादादाचे चुलत सासरे ह्यांचा उल्लेख (ऐ. क्र. ५०) श. १७०४ च्या पत्रांत आला आहे. त्यांजकडे दादासाहेबांचे चिरंजीव बाबासाहेब म्हणजे दुसरे बाजीराव हे कोपरगांवीं भोजनास गेल्याची नोंद आप्पाजी राम सहस्रबुद्धे ह्यांच्या पत्रांत आली आहे.

राघोबादादा व पुण्यांतील कारभारी मंडळी (बारभाई) यांचा शक १६९६ चे सुमारास जेव्हां बेबनाव झाला त्या वेळीं राघोबादादांचे पक्षाच्या मंडळीची धरपकड व मिळकतीची जप्ती कारभारी मंडळींनी केली. त्यांत सदाशिव भिकाजी (७-५) यास हा राघोबांचे पक्षाचा म्हणून कैद व घराची जप्ती झाल्याचें दिसतें. (ऐ. क्र ९०). यावरून सदाशिव पेंडसे यांचा ऋणानुबंध राघोबाशीं मथुराबाईचे लग्नापूर्वीपासून असावा. या झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणूनच कीं काय पुढें श. १७३८ मध्यें यांस रावबाजीनें फुलगांवीं घर बांधण्यास दोन हजार रुपये दिले.

पेशवाईच्या उत्तरार्धामध्यें तोतया प्रकरण चांगलेंच गाजलें व अनेकांना त्या प्रकरणानें गांजलें. त्याची झळ ह्या पेंडसे कुलालाहि लागली. कांहीं ह्या प्रकरणांत

जबरदस्तीनें ओढले गेले व कांहीं आपण होऊन अज्ञानामुळें किंवा स्वार्थ साधण्याच्या हेतूनें त्यांत समाविष्ट झाले. ह्या दोन्ही प्रकारचीं उदाहरणें पेंडसे मंडळींत सांपडतात. सदाशिव केशव यांचे बंधु 'राघो केशव हे तोतयाकडे तसदीमुळें गेले होते' आणि ही त्याजवर तसदीच झाली होती. हें तोतयाप्रकरण निकालांत लागण्यापूर्वी तें अशाच कांहीं सोडवणुकीच्या गोष्टी करून परत आले होते, ह्यावरून ठरतें. पण जेव्हां ते तोतयाकडे तसदीमुळें कां होईना गेले तेव्हां त्यांचें घर जप्त करण्याचा हुकूम सुटला आणि तोतया मोडण्यापूर्वी हे राघो केशव परत आल्यामुळें त्यांच्या घराची जप्तींतून मोकळीक झाली. (ऐ. क्र. ४३) ह्या राघो केशवाकडे विजयदुर्गच्या फडणिशीकडील दप्तरदारी होती. राघो केशवाचें हें पहिल्या प्रकाराचें उदाहरण होय. दुसरा प्रकार असा—बीरवाडीकर बाळाजी हरी पेंडसे हा तोतयाचे निशाण घेऊन बीरवाडीवर आला आणि तेथील दोघे कारभारी ह्यांस त्यानें पळवून नेलें. वस्तुतः हे कारभारी बाळाजीच्या धाकामुळें त्याजकडे आलेच होते पण पुढें त्यास पळवून नेलें ही गोष्ट तोतया प्रकरणानंतर उघडकीस आली. तेव्हां बाळाजीकडून ५ हजार रुपये गुन्हेगारी म्हणून वसूल करण्यांत आले. (ऐ. क्र. ५२).

शिलेदारी कारकून ही आसामी वंशपरंपरा चालू राहात असे. माहादाजी राम ज्याप्रमाणें आपले वडील रामचंद्र रघुनाथ यांच्या जागीं शिलेदार कारकून म्हणून आला त्याप्रमाणें रामचंद्र महादेव हाहि आपल्या बापाच्या जागीं म्हणजे महादाजी राम ह्याच्या जागीं शिलेदारी कारकून म्हणून श. १७१३ च्या पौषांत आला. म्हणजे ओळीनें तीन पिढ्या या कामावर होत्या असें दिसतें. त्यास कल्याण भिवंडीच्या जकातींतून रु. १५० वेतन म्हणून देण्याबद्दल जकातीकडील अधिकाऱ्यांस हुकूम दिला आहे (ऐ. क्र. ४७). ह्याच्याच पुढल्या वर्षीं म्ह. श. १७१४ मध्यें पागाफडणीसीकडील कामदार बाळाजी वासुदेव ह्यांनीं सदाशिव पेठेंतील केळकर यांची जागा त्यावरील घरासुद्धां १८७५ रुपयांस खरेदी केली (ऐ. क्र. ८३). श. १७१५ मध्यें गणेशभट व चिंतामणभट यांना महिपतगड प्रांतांतून कांहीं भात व रोकड अशी नेमणूक असल्याची नोंद ऐ. क्र. ७३ च्या कागदांत आहे. मागें श. १६९७ मध्यें नानासाहेब पेशव्यांनीं श्रीवर्धन हें आपलें मूळ वतनी गांव म्हणून तेथील ब्राह्मण मंडळीस कांहीं भात धर्मादाय देवविलें होतें. ह्या ब्राह्मणांपैकीं वेदमूर्ति अनंतभट पेंडसे हे अग्निहोत्री होऊन काशींत राहात. तेथें भात पोंचविणें शक्य नाहीं म्हणून त्यांना वर्षासन रु. ५० पोंचविण्याची व्यवस्था केली होती. त्यासंबंधीं उल्लेख ऐ. क्र. ८४ मध्यें आला आहे. ह्याच वर्षीची दुसरी गोष्ट विशेष लक्ष्य आहे. पोतनिसी, दफ्तरदारी व फडणिशी हीं सर्व कामें एकट्या बाळाजी लक्ष्मण यांनींच आपणहून मागून घेऊन चालविलीं आहेत. परगणे जुनी हुबळी येथील हीं तिन्ही कार्यें वार्षिक वेतन रु. ३०० घेऊन चालवावी अशी सनद ऐ. क्र. ५३ मध्यें आली आहे.

त्या वेळच्या सामाजिक समजुती व शेती ह्यासंबंधीं एक घटना पाहण्याजोगी आहे. तालुका नेवरेपैकी पुसाळें गांवच्या सखंभट पेंडसे यांनीं त्याच गांवाखालील वाडा सडिये येथील आपलें घर व त्याभोंवतालची शेती करण्यासाठीं सखोपंत नेने ह्यास सांगितलें. अर्थात् ह्या उद्योगांत तोटयाचाच संभव फार. कारण कोंकणांत दरवर्षी घरावर नवीन शाकार—झांप, पेंढा—घालावा लागतो व अशा तृणाच्छादित घरास आगीची भीति ज्यास्त. हें जाणून दरसाल रु. १८ तोटयापोटीं देण्याचाहि करार झाला. कराराप्रमाणें दहा पांच वर्षें नेने यांनीं वहिवाटहि केली. पण त्या ठिकाणच्या भुताच्या उपद्रवामुळें नेने ह्यास तें सोडून द्यावें लागलें. इतिहास-कालांत देवस्तान पडणें, भुताची बाधा होणें, भुतें घालणें हे प्रकार फार. भुतें घातल्यामुळें फिर्यादीहि झाल्या आहेत. त्यांतलाच प्रकार येथें होऊन नेने ह्यांनीं सांगितलें कीं 'भुतानें घरहि जाळिलें' इतरहि फार खराबी केली. नेने ह्यांनीं खोता-सहि रीतीप्रमाणें कळविलें कीं पेंडसे यांचे ठिकाण आपण सोडलें व पेंडसे यांसहि सांगितलें कीं 'आम्ही जातों. ठिकाण सांभाळा.' नेनें ह्यांनीं दुसरें शेत खंडानें घेतलें व राबहि केला. तों आषाढ मास आला. तेव्हां खोतांनीं पुढल्या सालच्या सरकार साऱ्याचा जामीन द्या असा तगादा नेने यांस लाविला. नेने यांजकडून तगादेवाल्याचा शिधा व खर्च घेऊं लागले. अर्थात् हें प्रकरण तेथेंच न मिटतां सरकार दरबारपर्यंत गेलें व प्रधान बाजीराव रघुनाथ यांजकडून रीतसर बंदोबस्त झाला. त्यासंबंधीं बाजीरावाचे श. १७३९ चें पत्र ऐ. क्र. ५४ मध्यें छापलें आहे. ह्यावरून राज्यकारभार पद्धतींतील कांहीं रीती सहज कळून येतात व शेतीसंबंधींहि कांहीं माहिती ध्यानीं येते. या पत्राप्रमाणें प्रथम खंड व हा खंड यांतील कित्येक पत्रांवरून हें उघड होतें कीं बैल पदरीं बाळगून शेतीचीं अवजारें घरीं ठेवून स्वतः अंगमेहनतीनें शेतें लागवडीला आणण्यापासून तों वर्षानुवर्ष सर्व प्रकारचीं पिकें काढण्यापर्यंत सर्व शेतीचें काम कोंकणांतील वैदिक ब्राह्मण करीत. ह्याच पत्रांत तीन बैलांची खांद पेंडसे यांजपासून नेने यास भरून दिली आहे. मालकाचें शेत सोडावयाचें तर मालकाबरोबर गांवखोतासहि कळविण्याची रीत होती. नवीन एखादें शेत खंडानें घेतलें तर सरकारी सारा देऊं अशाबद्दल वेळीं जामीन मागण्याचीहि पद्धत होती आणि तगादा करते वेळीं तगादेवाल्याचा शिधा व खर्च ही परस्पर म्हणजे ज्याकडे तगादा करावयाचा त्याजपासून घेण्याचा परिपाठ होता. अशा कितीतरी गोष्टी ह्या पत्रांवरून कळून येतात. वर म्हटलेंच आहे कीं हें पत्र श. १७३९ चें म्हणजे पेशवाईअखेरचें आहे. अर्थात ह्या कालांतील विवेचनाचीहि अखेर येथेंच आली. नवीनोपलब्ध ऐतिहासिक पत्रें चवथ्या प्रकरणांत दिलीं आहेत.

मुर्डीचे महाजनकीचा वाद

पहिल्या खंडाच्या चवथ्या प्रकरणांत मुर्डीचे महाजनकीच्या वादासंबंधीं ११ कागद (ऐतिहासिक क्रमांक १ ते ७, ९, १०, १४ व २५) आले आहेत. त्यानंतर उपलब्ध झालेले कागद या खंडांत ऐ. क्र. ९४ ते ११० पर्यंत दिले आहेत. त्यावरून या वादाची एकंदर तपशीलवार हकीकत ध्यानांत येते ती अशी:—

इ. स. १७५४* मध्यें तुळाजी आंग्रे यांचे कारकिर्दीत मुर्डी आंजर्ले वादाची चवकशी विजयदुर्ग मुकामीं होऊन पेंडसे यांस अनुकूल असा निकाल झाला. (ऐ. क्र. १ शक १६७५ माघ वद्य ९). पुढें लवकरच सुवर्णदुर्ग किल्ला पेशवे यांजकडे आला. सरकार अंमल म्हणजे स्वराज्य झाल्यावर या बदललेल्या परिस्थितीची संधि साधून आंजर्लेकर भट पुनः मनसुबीस उभे राहिले व धटाईनें पेंडसे यांचें घर मोडावयास लागले (ऐ. क्र. १०). म्हणून पेंडसे हुजुर पुणें यासी म्हणजे पेशवे

शक १६८४ माघ शु. ३ स. १७६३ जाने. १७

यांजकडे गेले. तेथून सुभेदारास लिहून आल्यावरून त्यांचेकडून केळशीचे हवालदार यास ताकीदपत्र गेलें कीं हुजरहून निवाडा होईपर्यंत चौकीचे लोकांस ताकीद करून भट कजीया न करीत तें करणें व महाजनकी अमानत करणें. यावर भटांनीं पुण्यास जाऊन कळविलें कीं नारो त्रिंबक (देशमुख) यांनीं हे सुवर्णदुर्ग मुकामीं रुबरु इन्साफ करून महाजनकी व वतनें आम्हांकडे सालगुदस्त सुदामतप्रमाणें चालू केली असतां पेंडसे तक्रार करितो; त्यावरून पुण्याहून वादाचा निकाल होईपर्यंत अमानत मोकळी करण्याबद्दल सुवर्णदुर्गचे मामलेदार रामाजी महादेव यांस शक १६८५ पौष शु. १४ ला लिहून गेलें व वादाची चवकशी चालू राहिली (ऐ क्र. ९६). याप्रमाणें मनसुबी चालू असतां महादाजी रघुनाथ भट सरकारची आज्ञा न घेतां पळोन गेला म्हणून त्याजपासून मसाला घेऊन त्यास व मनसुबीचे सड्या साक्षीचे कागदपत्र पुण्यास पाठविण्याबद्दल सुवर्णदुर्गचे रामाजी महादेव यांस पुण्याहून लिहून गेलें शक १६८७ पौष वद्य ३० (ऐ. क्र. ९७).

त्याप्रमाणें कागदपत्र पुण्यास पाठविण्यांत आले. ते पाहून पुण्याहून शक १६९० पौष वद्य ३० ला रामाजी महादेव यास पत्र गेलें कीं 'तुम्हीं सरकारचे अमलांत गांव अमानत करून सड्या घेतल्या त्या उपरी नारो त्रिंबक यांनीं सड्या घेऊन दोन

---


*याचे अगोदरची म्हणजे राज्याभिषेक शक ५७ ज्येष्ठ शु. १ (इ. १७३१) ची छत्रपती शाहुमहाराज सातारा यांनीं आंजर्ले येथील गण जोशी व चिंतामण जोशी बिन आदित्य जोशी यांस दिलेली सनद आहे त्यांत " मौजे आंजर्लें " व " मजरे मुर्डी " असा या दोन गांवांचा स्वतंत्र उल्लेख आहे. यावरून त्या वेळीं दोन गांव वेगळे होते असें दिसतें.

गांवांचा एक गांव केला व भटाकडे महाजनकी चालती केली. कागदपत्र हुजूर मनास आणतां गांव दोन किंवा एक हा ठराव होत नाहीं मागती सड्या घेऊन शोध करावा लागतो यांजकरितां मुर्डी अमानत करावी' (ऐ. क्र. ९८). या पत्राप्रमाणें रामाजी महादेव यानें केळशीस श्रीबेलेश्वर याचे देवालयीं सड्या घेऊन शक १६९२ ज्येष्ठ वद्य ८ स पेशवे यांजकडे त्या पाठविल्या (ऐ. क्र. ५. याची शक मिति पूर्वी कळली नव्हती ती आतां मिळाली आहे). या वादांत अशा सड्यासाक्षी यापूर्वीं तीन वेळां घेतल्या होत्या. पहिल्यानें तुळाजी आंग्रे यांचे वेळीं, नंतर रामाजी महादेवानें व तिसऱ्यानें नारो त्रिंबक यानें. पुण्यास हरदुजणांजवळील कागद व साक्षीदारांच्या साक्षी पहातां मुर्डी मौजा निराळा असें ठरलें व त्याप्रमाणें निकाल द्यावयाचा तो भटांनीं सांगितलें कीं मौजे निराळा नव्हे येविशीचे साधनाचा कागद आम्ही आणतों तो पाहून करणें तें करावें. याप्रमाणें करार करून भट गेले व पुढील वर्षीं पूर्वी पाहिलेलेच जुने कागद आणून दाखविले, नवा कागद दाखविला नाहीं; आणि घरास गेले त्यावरून रामशास्त्रीबाबा प्रभुणे यांनीं श. १६९६ माघ वद्य ५ स मुर्डी गांव निराळा असा पेंडसे यांचे बाजूनें निकाल दिला. याजसाठीं पेंडसे यांजकडून सरकारांत नजर रुपये ४०१ घेतले. भट यांनीं दुसरें येजितपत्र शक १६९७ मन्मथनाम संवत्सरीं लिहून दिलें. पहिलें येजितपत्र शक १६७५ त लिहून दिलें होतें. याप्रमाणें निकाल पेंडसे यांस अनुकूल झाला तरी भटांनीं प्रत्यक्ष वहिवाट सुरू न होऊं दिल्यामुळें पेंडसे यांस पुरंदर मुकामीं पेशवे यांजकडे तक्रार घेऊन जावें लागलें व त्यानंतर सुवर्णदुर्गचे मामलेदार मोरो बापूजी यांजकडून शक १६९७ ज्येष्ठ वद्य २ स गांवची सनद पेंडसे यांस मिळाली (ऐ. क्र १००). भट धटाईस येऊन मारामारीस प्रवर्ततील म्हणून त्यांस ताकीद करण्यासाठीं हवालदार ता। केळशी यांस शक १६९७ ज्येष्ठ वद्य १४ स सुभाहून कळविण्यांत आले (ऐ. क्र. १०१). तथापि भटांनीं धटाईनें सुभाचे ताकिदीस न मानतां पेंडसे यांस शेतें लावू दिलीं नाहींत म्हणून गणेश रघुनाथ, बाबाजी रघुनाथ नि नारो रघुनाथ यांस हुजुर (पुण्यास) आणण्याकरितां गारदी पाठविले—शक १६९७ आषाढ वद्य ४ (ऐ. क्र. १४). याचप्रमाणें गणेश नारायण भट, कृष्णाशेट सोनार तळेकर, नि जीऊशेट बीन महादशेट सोनार यांस आणण्यास गारदी पाठवून प्रत्यकीं रु. २५ मसाला देवविला.

इतक्या प्रयत्नांनंतर पेंडसे यांची वहिवाट सुरळीत चालू असतां शक १७१०—११ चे सुमारास मुरडीकर रयतावा कुळें यांस शेतें लागवड करून धारा द्यावा याप्रमाणें सुभाहून चिठ्या दिल्या व गयाळी ठिकाण पेंडसे यांनीं महामूर केलें असतां सुभाहून अमानत केलें म्हणून पेंडसे यांना या सुभाचे हुकुमाविरुद्ध तकरार करावी लागली व शक १७१६ भाद्रपद वद्य ३ ला पुण्याहून मोरो बापूजी यांस पत्र गेलें

कीं धाऱ्यानें शेतें दिलीं असतील त्याची अर्धेल पेंडसे यांस देववावी व गयाळी ठिकाण त्याजकडे चालवावें. पुनः कांहीं दिवसांनीं आंजर्लेकर रयता यांनीं सुभाहून चिठ्या नेऊन शेत आगर घेतलें म्हणून तसें न होऊं देण्याबद्दल आनंदराव धुमाळ यांचे रंगोपंत असवळकर यांस शक १७२३ भाद्रपद शु. २ चें पत्र गेलें व त्यांजकडून केळशीचे हवालदार यांस तोच मजकूर भाद्रपद वद्य ३ चें पत्रानें कळविण्यांत आला व पेंडसे यांची वहिवाट पूर्ववत चालू राहिली (ऐ. क्र. २५).इतक्या उपरहि भट स्वस्थ बसले नाहींत. ४-५ वर्षानंतर ते सरसुभा जाऊन गैरवाका एकपक्षी समजाऊन तेथून सुभास व सुभाहून तालुक्यास पत्रें नेऊन पेंडसे यांचे वतनास हरकत करविली. यावरून पेंडसे यांनी तकरार केली. त्याचा योग्य तो उपयोग होऊन सदाशिव माण-केश्वर, सुभा यांनीं गेलेलीं पत्रें परत मागवून वतन पेंडसे यांजकडे चालू ठेवण्यास व भट यांस पुणें येथें पाठविण्यास शक १७२९ फाल्गुन शु. १५ रोजीं दिनकरपंत केळकर यांस कळविलें (दिनकरपंत केळशीचे हवालदार असावेत). (ऐ. क्र. १०४). येथेंच हा वाद संपलेला दिसत नाहीं. कारण शक १७३६ माघ शुद्ध ६ चे सदाशिव माणकेश्वर यांचे पत्रावरून पुनः मुर्डी येथील शेत व आगर अमानत करून कोट गोवाकडे वहिवाट सांगितल्याचें दिसतें (ऐ. क्र. १०७), ही जप्ती पुढें केव्हां उठली हें माहीत नाहीं. हा वाद ४ पिढ्या चालला. पेंडसे यांच्या खालीं दाखविलेल्या पुरुषांचीं नांवें वादांतील कागदपत्रांत कोणते काळांत आढळतात तें पुढें दिलें आहे. तसेंच त्यांचें एकमेकाशीं काय नातें आहे हें समजावें म्हणून वंशावळ दिली आहे.

१ बाळाजी कृष्ण	शक	१६७५	माघ	ते	शक १६७९	
२ गोविंद कृष्ण	शक	१६८४	माघ	ते	शक १६९७	ज्येष्ठ
३ महादाजी बल्लाळ	शक	१६९६	माघ	ते	शक १६९७	ज्येष्ठ
४ कृष्णाजी गोविंद	शक	१७१६	भाद्रपद	ते	शक १७२३	भाद्रपद
५ नारो महादेव	शक	१७२९				
६ अनंत गोविंद	शक	१७२९				



पेंडसे व भट यांजमध्यें महाजनकी-बद्दल वाद चालू होता त्याच वेळेस केसो राम खांबेटे व बापूजी रघुनाथ भट यांचे "घर आहे तें ठिकाण" याबद्दल भांडण चालू होतें. व केसो राम खांबेटे यास मनस्वी भाषण केलें म्हणून गणेश नारायण भट यांजपासून रु. ५ पांच मसाला घेतला असें या कागदपत्रांवरून दिसतें व तसेंच मुर्डीचे महाजनकीचे वादामुळें मुर्डीचे उपाध्ये व धर्माधिकारी कृष्णंभट बिन केशवभट

विद्वांस यांस रथावरून ओढून मारामार केली व त्याचे बंधु सदाशिवभट याचे मानेवर दगड देऊन रु. १० गुनेगारी घेतली यार्कारतां गणेश नारायण भट यास रु. २५ मसाला करून पुण्यास बोलाविलें असल्याचें आढळतें (शक १६९६ आश्विन वद्य ९. ऐ. क्र. ९९). यावरून भट यांचें भांडण पेंडसे यांच्याशींच चालू होतें असें नसून खांबेटे व विद्वांस यांच्याशींहि चालू होतें. यांत पेंडसे व विद्वांस यांचा शेवटीं जय झाल्याचें निश्चित कळतें. खांबेटे यांचे बाबतींत शेवट कसा झाला हें समजत नाहीं.

शिवाजी महाराजांनीं आंजर्ल्यानजीकचा किनारा ताब्यांत घेतला तेव्हां तेथें विजापुरकरांतर्फे शिरके व्यवस्था पहात असत. त्यांचे वंशज तान्हाजी राजे शिरके यांनीं आंजर्लें गांवची महाजनकी व राजवाडी आगर इत्यादि आपले ताब्यांत मिळावीं म्हणून शक १७२७ मध्यें खटपट केल्याचें दिसतें. त्याचा शेवट कसा झाला हें माहीत नाहीं. यासंबंधीं दोन पत्रांच्या नकला आम्हांस पहावयास मिळाल्या त्या येथें दिल्या आहेत (ऐ. क्र. १०९-११०). असल पत्रें पहावयास मिळालीं नाहींत त्यामुळें पत्रांच्या सत्यतेविषयीं कांहीं सांगता येत नाहीं. परंतु या पत्रांत शिरके यांनीं भटास आंजर्ल्यास आणलें. शिरके हे महाजन होते ते परागंदा झाल्यावर भट आपणांस महाजन म्हणवूं लागलें इत्यादि मजकूर आहे. दातीर आंजर्ल्याचे महाजन असल्याचाहि उल्लेख कागदोपत्रीं आहे. बाळाजी चिंतामणि दातीर हे आंजर्ल्याचे महाजन असा उल्लेख सवाईमाधवराव रोजनिशी रुमाल ९९–खमस-सबैन मया व अलफ छ १७ रमजान—मध्यें आहे.

नाना फडणवीस दप्तर

पारसनीस संग्रहांत नाना फडणवीस यांचे कागद आहेत त्यांत आठ पेंडसे यांचे उल्लेख आढळले त्यासंबंधीं माहिती येथें दिली आहे.

१ राघो बल्लाळ २ बाबजी महादेव ३ लक्ष्मणपंत
४ गोविंद लक्ष्मण ५ पुरुषोत्तम लक्ष्मण ६ बाळाजी लक्ष्मण
७ महादाजी वासुदेव ८ रामचंद्र महादेव

खंड पहिला, पृष्ठें ४७–४८–४९–३४२–३४३–३६५

पहिल्या खंडाच्या प्रकरण ४ मधील ऐतिहासिक कागदपत्र क्रमांक २१, २२ नि २४ मध्यें नाना फडणवीस यांचे खाजगीचे कारकून म्हणून राघोपंत पेंडसे यांचें नांव आलें आहे. त्यांत राघोपंताचे वडिलांचे नांवाचा उल्लेख नाहीं व इतर ठिकाणाहूनहि हे राघोपंत कोण, कोठील यासंबंधी कांहींच माहिती उपलब्ध झाली नाहीं. नाना फडणविसांचे खातरजमेचे गृहस्थ म्हणून लक्ष्मण महादेव पेंडसे या नांवाचे गृहस्थाचा उल्लेख ऐ. क्र. २३ नि २३ अ मध्यें आला आहे. या लक्ष्मणपंतास रघुनाथ

या नांवाचा एक भाऊ असल्याचें वंशावळींवरून कळल्यामुळें 'राघोपंत' म्हणजे हाच रघुनाथ नानाजवळ असावा असें अनुमान करून व चौक येथील ऐकीव माहितीवरून राघोपंत म्हणजे घराणें १३ मधील रघुनाथ महादेव (५) असल्याचें आम्हीं लिहिलें. सन १९४७ मध्यें 'पारसनीस संग्रह' यामधील नाना फडणवीसांचे कागद पहावयास मिळाले त्यांत 'राघो बल्लाळ पेंडसे' यांस इतर गृहस्थाकडून आलेलीं पत्रें आढळलीं. त्यावरून खरें नाव राघो **बल्लाळ** असून घराणें १३ मधील राघो **महादेव** नाहीं हें निश्चित झालें. (ऐ. क्र. ८५ पहा).

सन १७९७–१८०० (शक १७१९–२२) चे कालांत राघो बल्लाळ पेंडसे या नांवाची एकच व्यक्ति होती व ती म्हणजे घराणें ३० मधील तिसरे पिढींतील होय. प्रथम खंडाचे वेळीं या व्यक्तीची कांहींच माहिती उपलब्ध नव्हती. त्यानंतर मिळालेल्या क्षेत्रोपाध्यायांकडील लेखांवरून घराणें ३० ची वंशावळ विस्तृत झाली असून क्रमांक २८ नि ३० हीं घराणीं एकत्र झालीं आहेत व त्या घराण्यांत राघो बल्लाळ असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. या राघोपंताच्या पत्नी नाशिकास यात्रेस गेल्या असतां त्यांनीं खालीलप्रमाणें माहिती दिली आहे.

गंगाबाई भ्रतार राघोपंत बाळाजी गोविंद, दीर पांडोबा व आबा, पुतणे विसाजीपंत व महादेव. गांव तुराडें–साष्टी.

ऐ. क्र. १७ व १८ मधील आबाजी बल्लाळ व भास्कर पांडुरंग यांस जंगलगर्क जमिनी लागवडीस आणण्याची सनद मिळाली आहे. त्यांत या दोघांचे वास्तव्याचें गांव तुराडें असें दिलें आहे. हे गृहस्थ राघोपंताचे अनुक्रमें बंधु व पुतणे होत राघोपंताचे खटपटीनें त्यांस जमिनीच्या सनदा मिळाल्या असाव्या असें मानणें चूक होईलसें वाटत नाहीं. या जमिनी आसरोटी ता। तुंगातन व तुपगांव ता। वनखळ मुरंजन येथें आहेत. तुराडें गांव ता। तुंगातन प्रांत कर्नाळामध्यें आहे. पारसनीस संग्रहांतील कागदांत एक पत्र वाचण्यांत आलें तें ता। वनखळचे भगाजी दिनकरराव देशमुख यांनीं राघोपंतास पाठविलें असून कांहीं कामकाज करण्याबद्दल विनंति केली आहे. यावरून नानाजवळील राघोपंत तुराडें येथील रहाणारे होत.

गोविंद लक्ष्मण पेंडसे यांनीं राघोपंतास लिहिलेलें पत्र पुढें दिलें आहे. त्यांत गोविंद लक्ष्मणानें राघोपंतास 'सहस्रायु चिरंजीव' व 'आशीर्वाद' लिहिलें आहे यावरून गोविंद हे राघोपंताचे कोणी आप्त असून नात्यानें मोठे असावेत. गोविंद लक्ष्मण या नांवाची व्यक्ति घराणें ३० मध्यें आढळत नाहीं. तसेंच इतर घराण्यांतही आढळत नाहीं. संशोधन क्र. २ (पृष्ठ ३६५) मध्यें ५ वे पिढींत हें नांव आढळतें. यावरून या क्रमांकांतील व्यक्तींचा घराणें ३० मधील व्यक्तींशीं कांहीं संबंध असावा असें अनुमान करतां येईल. (पारसनीस संग्रह रुमाल ६० फाईल १२–७.)

'श्री सहस्रायु चिरंजीव राजश्री राघोपंत दादा पेंडसे मु॥ पुणें याप्रति गोविंद लक्ष्मण पेंडसे आशीरवाद. येथील कुशल त॥ मार्गशीर्ष शु. १३ पा। जाणून स्वकीय कुशल लेखन करावें विशेष. आपणास पेशजी पत्रें पा॥ त्यांत योगक्षेमाचा वगैरे मा॥र लि॥ आहे ते आपले ध्यानांत असेलच. त्याजविशीं मीच यावें तो कांहीं गुंत्यामुळें आलों नाहीं असो चिरंजीव रामचंद्रपंत साने तेथें आहेत ते आपणाजवळ ×× विनंती करतील.'

याच संग्रहांत लक्ष्मणपंत पेंडसे यांस बाबजी महादेव पेंडसे यांनीं लिहिलेलें पत्र असून लेखक लक्ष्मणपंतास आशीर्वाद लिहीत आहे. त्यावरून हे बाबजी मानानें लक्ष्मणपेक्षां मोठे असावे. घराणें १३ मधील लक्ष्मण महादेव (५) यांस बाबाजी या नांवाचा भाऊ होता तोच हा बाबजी लक्ष्मण असावा. या पत्रांत "भगवंतराव यास रा॥ राघोपंतदादांनीं पत्र दिलें त्यावरून निवारण दिलें आहे पत्राचें उत्तर दिलें आहे तें पाहून त्याअन्वयें उभयता* मन घालून याचें कार्य करून द्यावें" इत्यादि मजकूर आहे (रुमाल ६० फाईल १२–८). यावरून १३ वें व ३० वें घराण्यांतील माणसांचे हितसंबंध कांहीं बाबतींत एक असावेत असें दिसतें. १३ वें घराणें चौकास व ३० वें तेथून जवळच तुराड्यास होतें.

या पारसनीस संग्रहांत पुरुषोत्तम लक्ष्मण पेंडसे यांची १५।१६ पत्रें आमचे पाहण्यांत आलीं. त्यावरून हे नाना फडणवीस यांच्या पत्नी जीऊबाई यांचेकडे जबाबदारीचे कामावर होते असें दिसतें. पुण्यास राहून बाई तर्फेचा व्यवहार हे करीत असावे. यांतील बरींच पत्रें पुण्याहून मेणवलीस पाठविलेलीं आहेत. पत्रांचा काल साधारणतः श. १७२८ ते श. १७४३ चा आहे. हे निश्चित कोणच्या घराण्यांतील हें कळलें नाहीं; परंतु वरच्या परिच्छेदांत उल्लेखिलेले व नानाफडणवीस यांचे खातरजमेचे गृहस्थ लक्ष्मणपंत पेंडसे असा ज्यांचा उल्लेख ऐ. क्र. २३ मध्यें आहे त्यांचे हे पुत्र असावेत. व तसें असल्यास हे घराणें १३ मधील ६ व्या पिढीचे होत असें ठरेल. यांचें टोपणनांव भाऊ असें आढळतें.

बाळाजी लक्ष्मण पेंडसे याचें श. १७३६ श्रावण व. १४ रविवारचें एक पत्र राघोपंत गोखले यांस लिहिलेलें आहे. यावरून बाळाजी या नांवाचे बंधु पुरुषोत्तमपंतास असावे असें दिसतें. यांची कांहीं माहिती उपलब्ध नाहीं.

जीऊबाई फडणीस यांचे नोकरवर्गांत महादाजी वासुदेव पेंडसे या नांवाचे एक गृहस्थ होते. त्यांची व त्यांचा उल्लेख असलेलीं कांहीं पत्रें संग्रहांत आहेत. या पत्रांचा काल शक १७३६ ते १७४४ पर्यंतचा आहे. हें घराणें ३० मधील पिढी ३–सुधारलेली वंशावळ पिढी ४–चे गृहस्थ होत म्हणजे वर उल्लेखिलेल्या राघो बल्लाळचे हे पुतणे होत.

*लक्ष्मणपंत व राघोपंत

रामचंद्र महादेव पेंडसे यांनीं " राजश्री भाऊ " यांस लिहिलेलीं दोन पत्रें आहेत. " भाऊ " म्हणजे " पुरुषोत्तम लक्ष्मण पेंडसे " असावेत. हीं पत्रें शक १७३४ मधील कार्तिक शु. ४ रविवार व कार्तिक वद्य १० शनिवारचीं आहेत. यांत तांदुळाचा भाव व तूप पाठविण्याचा मजकूर आहे. हे रामचंद्र महादेव कोण हें कळण्यास कांहीं साधन उपलब्ध झालें नाहीं. बहुधा घराणें ४ मधील रामचंद्र महादेव (५) असावेत. यांस शक १७१३ त कारकून शिलेदारीची आसामी मिळाली होती.

श्री. भास्कर रामचंद्र भालेराव, ग्वाल्हेर यांचे संग्रहांत नाना फडणीसांचे मिळकतीची जप्ती रावबाजीनें केली त्या वेळची ' समागमें मंडळी ' ची छ १८ रजब सु॥ समान तिसैन मया व अलफ शक १७१९ माघची यादी आहे त्यांत पुढील मजकूर आहे. यावरून राघोपंत पेंडसे, खाजगीकडील कारकून याचें घर तुपगांवीं होतें हें निश्चित आहे.

' घर तुपगांवीं आहे. त्यांचीं मुलें माणसें कल्याणहून गणेशपंत पाटणकर, त्यांचे मामा यांनीं साष्टीस पोहोंचविलीं आहेत. '

